म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

# दिल्लीवर हल्ला.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

ऐतिहासिक कथाकुसुममाला.

( संपादक.-गोविंद मंगेश कालेलकर. )

कुसुम १ लें.

# दिल्लीवर हल्ला

अथवा

# भरतखंडाच्या परवशतेचा प्रारंभ.

हा ग्रंथ

इच्छाराम सूर्यराम देसाई

यांच्या

गुजराथी ग्रंथावरून

जगन्नाथ धोंडू भांगले

यांनीं लिहिला.

मुंबई,

सुबोधप्रकाश छापखान्यांत छापिला.

कालेलकर आणि मंडळी, गिरगांव, मुंबई.

१८९९

किंमत २ रुपये.

( सर्व हक्क राखिले आहेत. )

# अनुक्रमणिका.


| प्रकरणं. | | पृष्ठें. |
|---|---|---|
| १ | कुमारजन्म | १ |
| २ | कुमार गेला! | १६ |
| ३ | तुफान! | २८ |
| ४ | पर्णकुटी | ४२ |
| ५ | शैलबाला मेली! | ५४ |
| ६ | शैलबाला कोठें आहे? | ६७ |
| ७ | रंगांत भंग | ७८ |
| ८ | अयोग्य मागणी | ९० |
| ९ | प्रेम गेलें आणि वैर आलें | १०१ |
| १० | संन्याशाचा परलोकवास | ११० |
| ११ | चंद आणि दिलीप | १२७ |
| १२ | मातृद्रोही कीं देशद्रोही? | १३७ |
| १३ | दरबार | १५१ |
| १४ | प्रेमप्रवास | १६८ |
| १५ | कपटजाल | १७६ |
| १६ | कपटजाल (पुढें चालू) | १८० |
| १७ | कपटजाल ( ,, ) | १८७ |
| १८ | शैलबाला कोण? | १९२ |

| प्रकरणें. | पृष्ठें. |
|---|---|
| १९ करणसिंग कोठें ? .... .... .... | २०७ |
| २० आनंद ! .... .... .... .... | २१५ |
| २१ कपटपारिस्फोट .... .... .... | २१८ |
| २२ ठाणेश्वरीं प्रयाण .... .... .... | २२६ |
| २३ शोकाकुल प्रभावती .... .... .... | २३४ |
| २४ प्रेम! प्राण ! .... .... .... .... | २४२ |
| २५ चंद कवीची सुटका .... .... .... | २५३ |
| २६ विलक्षण भेट! .... .... .... .... | २६० |
| २७ मुसलमानांच्या छावणींत धामधूम .... | २७० |
| २८ पहिल्या लढाईतील त्रेधा .... .... | २७६ |
| २९ प्रेमाविर्भाव .... .... .... .... | २८३ |
| ३० कपटसन्धि .... .... .... .... | २९३ |
| ३१ प्रेममूर्च्छा नव्हे, प्रेममृत्यु ! .... .... | ३०७ |
| ३२ विश्वास देऊन घात केला .... .... | ३१८ |
| ३३ महायुद्ध .... .... .... .... | ३२४ |
| ३४ वीरपत्नी .... .... .... .... | ३३२ |
| ३५ न जाने जानकीनाथ प्रभाते किं भविष्यति .... .... ... | ३४० |
| ३६ उपसंहार .... .... .... .... | ३४८ |

## प्रस्तुत ग्रंथासंबंधीं दोन शब्द

इतिहास ह्मणजे मनुष्य जातीस निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या स्थळीं, व निरनिराळ्या परिस्थितींत आलेला अनुभव होय. तेव्हां या अनुभवाचें, अर्थात् इतिहासाचें ज्ञान किती आवश्यक व अपरिहार्य आहे हें सांगावयास नकोच. विवक्षित काळीं व विवक्षित स्थितींत आपलें आचरण कसें असलें पाहिजे हें समजण्यास इतिहासाज्ञानासारखें दुसरें साधन नाहीं. एखादें राष्ट्र कितीही सुसंपन्न असो, त्यांत कलाकौशल्याचा कितीही उत्कर्ष झालेला असो, अथवा तें कितीही सुधारलेलें असो, जर त्यांतील लोकांत इतिहासज्ञानाचा अभाव असेल, तर तें आजपर्यंत निबिड अंधकारांत आपला मार्ग आक्रमीत असून त्यास कधींना कधीं वरीच ठोकर खावी लागेल यांत संशय नाहीं. अथवा ज्या राष्ट्रांत इतिहासज्ञान नसेल तें राष्ट्र वस्तुतः खऱ्या उन्नतीच्या दिशेसही लागलें नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एका इंग्लिश ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, ज्यास भूतकाळ नाहीं त्यास भविष्यकाळही नाहीं. हें अगदीं खरें आहे. आधीं आपण कोण, कोणाचे

कोण, आपली पूर्वींची स्थिति कशी होती, आतांची कशी आहे, आपल्यांत काय कमी होतें, आपल्या पूर्वजांनीं काय पराक्रम केले, त्यांवर कसे प्रसंग आले, त्यांतून ते कसे पार पडले, त्यांचें वर्तन कसें होतें, इत्यादि गोष्टींचें यथार्थ ज्ञान ज्या लोकांस झालें त्याच लोकांमध्यें महाप्रतापी व स्वदेशनिष्ठ पुरुष अवतीर्ण झाले. यास अनेक उदाहरणें देतां येतील. आकिलिसाच्या पराक्रमाचा इतिहास वाचून शिकंदरासारखा भीमपराक्रमी पुरुष उत्पन्न झाला, शिकंदराच्या इतिहासानें सीझर उदयास आला, व सीझराच्या इतिहासानें सर्व युरोपखंडास मूर्तिमंत काळासारखा दिसणाऱ्या नेपोलियनाचा अवतार झाला! शिवाजीनें पांडवांचा पराक्रम ऐकला नसता, तर त्यानें यवनांचा समाचार घेतला असता काय? शिवाजीची कारकीर्द गाजली म्हणूनच ना थोरल्या बाजीरावांनीं दिल्लीच्या मोंगलांस व हैद्राबादच्या नबाबास जेरीस आणलें? चिमाजी आप्पानें फिरंग्याची व राघोबादादानें गिलच्यांची रग जिरवली ती तरी शिवाजीच्या इतिहासामुळेंच! तर सांगावयाचें काय कीं, इतिहासज्ञानानें एखादे वेळेस विलक्षण स्फूर्ति उत्पन्न होऊन महत्कार्य सिद्धीस जातें; व पुनः आवेशाच्या भरांत कांहीं अनन्वित प्रकार होऊं लागला, तर त्यापासून परावृत्त होण्यास इतिहासज्ञानच कारण

होतें! कारण, कोणत्या प्रसंगीं कसें वागावें ही गोष्ट इतिहासामुळें जशी समजते तशी दुसऱ्या कशापासूनही समजत नाहीं. तेव्हां इतिहासज्ञानापासून तत्ववेत्त्यांस, राजकारणी पुरुषांस, शास्त्रज्ञांस, कलाकुशलांस व परोक्षतः सर्व देशास—विशेषतः जीवनार्थकलहांत मागें पडलेल्या आमच्या देशास तर जे अनंत लाभ आहेत ते एकीकडे ठेवले, तरी वरील मुद्यापुरतेंच पाहतां इतिहासज्ञानाची महति असामान्य आहे हें उघड दिसून येईल.

इतिहासज्ञानापासून जर एवढे फायदे आहेत, तर त्याविषयीं आमच्या लोकांस प्रीति कां उत्पन्न होत नाहीं? असा साहजिक प्रश्न उद्भवतो. त्यास उत्तर, आमच्या भाषेंत मनोवेधक रीतीनें लिहिलेले इतिहासग्रंथ नाहींत हें होय. इतिहासाचें पत्रक हातीं घेतल्यापासून तों 'हंटरचा इतिहास' हातांतून खालीं ठेवीपर्यंत शाळेंतील विद्यार्थ्यांची कोण त्रेधा उडून जाते हें ज्याचें त्यासच विचारावें! येऊन जाऊन त्या तारखा, तीं नांवें, त्या लढाया, त्यांतील सैन्याच्या संख्या यांशिवाय त्यांत मनोरंजक माहिती असेल तर शपथ! हीच माहिती घोंकतांना बिचाऱ्यांच्या नाकीं नऊ येतात! पुनः अशा कंटाळ्यानें घोंकलेला विषय ध्यानांत राहण्याचीही मारामार! मग शिक्षकाच्या काठीचा प्रसाद

मिळावयाचा तो नेमका मिळावयाचाच! त्यास ह्मणून कधीं खळ नाहीं! कित्येकांस या नीरस ग्रंथांचा इतका कंटाळा येतो कीं ते वार्गांत बसण्याच्या शिक्षेपेक्षां शाळेंत छम छम वाजणाऱ्या छडीची शिक्षा ते मोठ्या आनंदानें पतकरतात! ज्यांच्या मनांत लहानपणींच अशा पुस्तकांनीं वरील विषयाविषयीं अत्यंत तिरस्कार उत्पन्न केला, त्यांनीं शिक्षणक्रमास रामराम ठोकतांनाच इतिहासग्रंथांसही शेवटचा रामराम ठोकल्यास आश्चर्य तें कसलें! सारांश काय कीं, नीरस ग्रंथांमुळें आमच्या लोकांत इतिहासज्ञानाविषयीं प्रीति उत्पन्न होत नाहीं.

तर आतां काय करावें? यास उत्तर एवढेंच कीं, ज्या कारणामुळें आह्मांस इतिहासज्ञानाची अभिरुचि लागत नाहीं, तें कारणच दूर केलें ह्मणजे झालें. ऐतिहासिक कादंबऱ्यांनीं हें काम पुष्कळ अंशांनीं सिद्धीस जाईल असें आमचें मत आहे. इतिहासवाचनाची गोडी लागण्यास तो प्रथम अलंकारिक व मनोवेधक भाषेनें व सरणीनें लिहिलेल्या कादंबऱ्यांच्याच रूपानें बाहेर पडणें आवश्यक होय. अशा प्रकारच्या कादंबऱ्यांमुळें सामान्यजनांस फार उपयोग होतो. मोठमोठ्या इतिहासग्रंथांच्या वाचनानें जो बोध होणें अगदीं कठीण, किंबहुना अशक्य, तोच बोध सुरेखरीतीनें लिहिलेल्या ऐतिहासिक कादंबरीच्या योगानें

मनावर विशेष चांगला होतो, व तो चिरकाल रहतो. अशा कादंबऱ्यांमुळें इतिहासांतर्गत महत्प्रसंगांचें व प्रचंडप्रताप नरपुंगवांच्या चरित्राचें ज्ञान सर्वत्र प्रसृत होऊन त्याचें अनुकरण करण्याची उत्कट इच्छा सामान्य जनांत होऊं लागते. अशा ग्रंथांमुळें अनेक प्रकारें फायदा होतो. ते चांगलेच असले तर त्यांपासून भाषाज्ञानास उत्कृष्ट साहाय्य होतें. विषयव्यवस्था व विषयविवेचन कसें करावें हेंही त्याच ग्रंथांवरून समजून येतें; त्यांत अनेक विषयांविषयीं गोड भाषेनें खोल व मार्मिक विचार ठिकठिकाणीं ग्रथित केलेले सांपडतात; व नुसत्या मनोरंजनाकरितांच जे त्यांस हातीं घेणार, त्यांस तें इतकें मुबलक सांपडतें कीं, तेवढें कल्पित कादंबऱ्यांतही सांपडणें अशक्य. ऐतिहासिक कादंबऱ्यांत सत्य गोष्टींचेंच निरूपण होत असतें, व त्यांत कल्पनासौंदर्य कमी असतें हें जरी खरें आहे, तरी त्यामुळें त्यांच्या मनोरंजकपणास कोणत्याही रीतीनें न्यूनता येते असा मुळींच अर्थ नाहीं. दिल्लीश्वर पृथुराजाचा पराक्रम कोणत्या काल्पनिक गोष्टींतील पराक्रमाची बरोबरी करणार नाहीं? मेवाडाधिपति समरसिंगाची बुद्धि, कल्पकता, शौर्य, गांभीर्यादि गुण कोणत्या काल्पनिक कथानकांतील गुणास हार जातील? शिवाजीची स्वलोकनिष्ठा कोणत्या

सहृदय मनुष्याच्या डोळ्यांत प्रेमजल आणणार नाहीं ? सांगावयाचें काय कीं, ऐतिहासिक कादंबऱ्यांत अद्भुतादि सर्व रसांस मुळींच उणीव नसते. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, काल्पनिक कथा कितीही मनोरंजक झाल्या तरी त्या शेवटीं काल्पनिक आहेत असा विचार मनांत आला ह्मणजे त्या वाचून उत्पन्न झालेल्या आनंदाचा तात्काल विरस होतो ! परंतु ऐतिहासिक कादंबऱ्यांचें तसें आहे काय ? मुळींच नाहीं ! एखादा तत्वज्ञ गहन विचार करीत असतांना त्यास जसजसा जास्त विचार सुचत जाऊन जास्तच आनंद होत जातो, तद्वत् ऐतिहासिक कादंबऱ्या वाचीत असतांना जास्त जास्त आनंद होत जातो, व तो कधींही नाश पावत नाहीं. अशा प्रकारच्या कादंबऱ्यांपासून वर सांगितलेले फायदे होऊन मूळ मुद्दाही कायम राहतो ! ह्मणजे त्यांमुळें इतिहासवाचनाची अभिरुचि न समजतांच उत्पन्न होऊन देशाचा फायदा होतो. अशा प्रकारच्या कादंबऱ्या युरोपीय भाषांत बऱ्याच झाल्यामुळें इतिहासज्ञानसंपादनाकडे तेथील सामान्य जनांचीही प्रवृत्ति झाली आहे, व त्यांस राष्ट्राचा उत्तरोत्तर उत्कर्ष करून तें चिरायु करणाऱ्या अनेक गोष्टींचें यथार्थ ज्ञानही होऊं लागलें आहे. ही अभिष्ट स्थिति आपल्या देशासही प्राप्त व्हावी ह्मणून आह्मी '**ऐतिहासिक कथाकुसुममाला**' गुंफण्याचें योजिलें आहे.

कित्येकांचें असें ह्मणणें असतें कीं, इतिहास व कादंबरी हे परस्परविरुद्ध विषय होत. इतिहासांत साऱ्या सत्य गोष्टींचें सम्यक् निरूपण असावयाचें; व कादंबरी ह्मटली ह्मणजे येथून तेथून सारा कल्पनेचा बाजार! इतिहासकारानें आंखलेल्या ओळीबाहेर जातां कामा नये; कादंबरीकारास पाहिजे तेथें जाण्यास व पाहिजे तशी कल्पनासृष्टि उत्पन्न करण्यास सदर परवाना! तेव्हां ऐतिहासिक कादंबरी हें पदच मुळीं 'वंध्यापुत्रवत्' होय! या आक्षेपांत मुळींच अर्थ नाहीं असें जरी ह्मणतां येणार नाहीं, तरी त्यास उत्तर देण्यास जागा नाहीं असेंही केवळ नाहीं. प्रस्तुत आक्षेपांत विशेष अर्थ नाहीं असें सर वॉल्टर स्कॉटनें अनेक लोकप्रिय ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून कृतीनें सिद्ध केलें आहे. एवढें लांब कशाला? रा. बापट यांनीं मराठींतच लिहिलेल्या 'श्रीमंत छत्रपति संभाजीराव' पुस्तकास प्रस्तुत आक्षेप पुढें आणणारे काय नांव देतील? त्यास ते कादंबरीच्याच वर्गांत फेंकून देण्याचें धाडस करतील असें आह्मांस वाटत नाहीं. त्यास ऐतिहासिक कादंबरीच ह्मणावें लागेल. तर ऐतिहासिक कादंबरीस 'वंध्यापुत्राच्या' पंक्तीस बसविण्यांत शहाणपणा आहे असें मुळींच नाहीं. आतां एवढें खरें आहे कीं कादंबरीकारानें एखादें ऐतिहासिक प्रकरण हातीं घेतलें

असतां, तें मनोरंजक करण्यासाठीं कल्पनेची मदत घ्यावयाची ती बेतानेंच घेतली पाहिजे. आपण कादंबरी लिहीत आहों खरी, पण ती ऐतिहासिक आहे हें त्यानें नित्य ध्यानांत धरलें ह्मणजे झालें. असें झालें ह्मणजे सत्यापलाप किंवा सत्यगोपन केल्याचा आरोप येण्याचीही भीति नाहीं. शिवाय इतिहासास हृदयंगमता येण्यासाठीं कल्पनेचें साहाय्य घेतलें आहे असें तो उघडपणेंच ह्मणत असतो. तेव्हां ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या योगानें सत्य गोष्टींस मिथ्यास्वरूप मिळत नाहीं हें तर उघड सिद्ध होतें. शिवाय, त्यांपासून इतिहासास एका प्रकारें जबरदस्त साहाय्य होतें. कोणत्याही देशाचा इतिहास कळावयाचा ह्मणजे केवळ सन, तारखा, लढाया, सैन्यसंख्या, यांची माहिती नव्हे. इतिहासाची व्याप्ति फारच मोठी आहे. देशाची पूर्व स्थिति कशी होती, त्यांचे विचाराचार काय काय होते, त्यांत कलाकौशल्याची उन्नति किती झाली होती, लोकांचा स्वभाव कोणत्या प्रकारचा होता, स्त्रीवर्गाची स्थिति कशी होती, त्याच्या ऐहिक व पारमार्थिक विचारांत क्रांति कशी होत गेली, व तिचा परिणाम कसा होत गेला, इत्यादि हरएक प्रकारच्या माहितीचा अंतर्भाव इतिहासांत होतो. ही माहिती सूक्ष्मरीतीनें व विस्तारतः इतिहासग्रंथांत देणें अशक्य असल्यामुळें

त्यांवरून कोणत्याही देशाचें सत्य व मार्मिक ज्ञान होणें दुरापास्त आहे. आर्च डीकन हेअर ह्मणतो—" एखादा मनुष्य औषध किती वेळां घेतो यावरून जशी त्याच्या स्वभावाची पारख करतां यावयाची नाहीं, त्याप्रमाणें अमक्या अमक्या राजानें अमके अमके किल्ले घेतले, तो तमक्या लढाया लढला व त्यांत इतके लोक मारले गेले, इत्यादि गोष्टींच्या माहितीवरून राष्ट्राची स्थिति कशी होती हें समजावयाचें नाहीं." पण ऐतिहासिक कादंबऱ्यांत ही सर्व माहिती मनोरमपणानें पाहिजे तशी व तेवढी सहज आणतां येण्यासारखी आहे, व इतिहासाचें रहस्य ह्मणजे याच गोष्टींचें ज्ञान होय. तात्पर्य काय कीं, हें काम ऐतिहासिक कादंबऱ्यांकडूनच चांगल्या रीतीनें होणार आहे. तेव्हां त्यांचें महत्व कोणत्याही रीतीनें मुळींच कमी नसून एका प्रकारानें त्यांची योग्यता इतिहासग्रंथांपेक्षांही जास्त आहे हें अर्थात्च सिद्ध झालें.

आतां आह्मी जी 'माला' गुंफण्याचें योजिलें आहे तिच्याविषयीं या ठिकाणीं दोन शब्द लिहिणें योग्य होय.

या मालेंत दरवर्षी तीन ग्रंथकुसुमें गोंवण्याचा आह्मी विचार केला आहे. ह्मणजे चार चार महिन्यांनीं एक एक पुस्तक बाहेर पडावयाचें आहे. वर

जें इतिहासज्ञानाच्या महत्वाविषयीं व एकंदर आपल्या देशाविषयीं आह्मी थोडक्यांतच विवरण केलें आहे, त्यावरून या कादंबऱ्या नेहमीं आपल्या इतिहासांतील मनोरम व महत्वाच्या कथाभागसंबंधानेंच निघावयाच्या आहेत हें समंजस वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल.

येथपर्यंत आमच्यासंबंधानें आह्मीं विचार केला. आतां, या मालेसंबंधानें लोकांचें काय कर्तव्य आहे याचा विचार लोकांनींच केला पाहिजे व तो त्यांनीं अवश्य करावा अशी आमची सविनय विनति आहे.

सर मंगळदासची वाडी,<br>गिरगांव ब्याकरोड, मुंबई.<br>ता० ३० एप्रिल १८९५

गोविंद मंगेश कालेलकर.

# प्रस्तावना.

ही ऐतिहासिक कादंबरी प्रथम बंगाली भाषेंत लिहिली गेली. त्याचें भाषांतर हिंदी भाषेंत झालें. नंतर त्या हिंदी पुस्तकाच्या आधारावरून गुजराथी भाषेंत नुकताच एक ग्रंथ झाला. याच गुजराथी ग्रंथास आधारभूत धरून प्रस्तुत ग्रंथ लिहिला आहे. जो ग्रंथ इतक्या भाषादर्पणांतून प्रतिबिंबित झाला, त्याचें स्वरूप किती चित्ताकर्षक असेल याची कल्पना कोणासही सहज होणार आहे.

या भरतखंडांत परकीयांची सत्ता केव्हांपासून व कशी सुरू झाली हें या ग्रंथांत दाखविलें आहे. शेवटचा क्षत्रिय राजा पृथुराज याच्यावर शहाबुद्दीन घोरीनें स्वारी करून त्यास इ. स. ११९३ त पादाक्रांत केलें, व तेव्हांपासून येथें मुसलमानांची सत्ता स्थापन झाली. मुसलमानांपूर्वी या ठिकाणीं प्रथम इस्त्रायल व त्यांच्यामागून पारशी लोक आले होते. परंतु ते येथें आपलें प्रभुत्व प्रस्थापन करण्यास असमर्थ असल्यामुळें भरतखंडाचा स्वातंत्र्यकलानिधि मुळींच कलंकित झाला नव्हता. पण रजपुतांच्या कलहरतीमुळें यावेळीं त्यास कलंकित

व्हावें लागलें; आणि पुढें देखील ही कलहरति तशीच वाढत गेल्यामुळें त्यास जो ‘उपराग आला’ तो अद्यू-नही जशाचा तसाच कायम आहे!!

भरतखंडाचा स्वातंत्र्यनाश कसा झाला याविषयीं अनेकांचीं अनेक मतें आहेत. कोणी ह्मणतात हिंदु लोक ह्मणजे मूळचेच नेभळे. त्यांस शौर्याचीं कामें करणें ठाऊकच नाहीं. तेव्हां बाहुबलविशिष्ट व रण-शूर परकीयांनीं अशा लोकांच्या मानेवर पारतंत्र्याचें जूं लादावें यांत कांहीं नवल नाहीं. कोणी ह्मणतात जातिभेदानें आह्मी हा देश गमावला! तो जर का नसता तर आह्मी एकमेकांच्या मानेवर बसून आपल्या घरांत तिसऱ्याचा प्रवेश होऊं दिला नसता. कोणी ह्मणतात, हा सारा नाश केला तो केवळ आमच्या धर्मानें! असो. तर याप्रमाणें आमच्या पारतंत्र्यरोगाचें निदान करतांना कोणी भूतबाधा आहे ह्मणतो, कोणी देवाचा नवस फेडला नाहीं असें सांगतो, व कोणी जन्मपत्रिकेकडे बोट दाखवितो!! परंतु खरा प्रकार काय आहे तो यांपैकीं एकासही माहित नाहीं. या रोगाचा उद्भव खरोखर कोठून झाला याचा निर्णय प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनानें सहज होणार आहे व तो हाच कीं, पूर्वी ह्मट-ल्याप्रमाणें, या रोगास रजपुत लोकांचें आपापसांतील

वैमनस्य, व कांहीं व्यक्तींचा विश्वासघातच कारण झाली. असो. प्रस्तुत पुस्तकावरून, ऐक्याभावाचा परिणाम किती दारुण होतो हें वाचकांच्या लक्ष्यांत येऊन जुटीनें वागण्याविषयीं, त्यांची यत्किंचित् बरी प्रवृत्ति होईल तर माझ्या श्रमाचें साफल्य झालें असें मी समजेन.

शेवटीं, ही आवृत्ति कांहीं अपरिहार्य कारणानें घाईनें छापली गेल्यामुळें यांत कांहीं अशुद्धें राहिल्यास त्यांबद्दल सुज्ञ वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

सर मंगळदासची वाडी,<br>
गिरगांव ब्याकरोड, मुंबई.<br>
ता० २ मे १८९५.

**जगन्नाथ धोंडू भांगले.**

# दिल्लीवर हल्ला,

अथवा

# भरतखंडाच्या परवशतेचा प्रारंभ.

## प्रकरण १ लें.

### कुमारजन्म.

ज्याच्यावर निसर्गदेवतेची इतकी प्रसन्न मर्जी, कीं तिनें त्याचें संरक्षण करण्यासाठीं, काळाशीं टक्कर मारीत राहणाऱ्या नगाधिपति हिमालयाची उत्तर दिशेस योजना करून, पश्चिम व दक्षिण दिशेस भीमस्वरूप हिंदी-महासागरास ठेविलें, व पूर्वेस बंगालच्या उपसागराची स्थापना केली त्या चतुर्दिशांनीं संरक्षित असलेल्या आर्यावर्ताच्या प्रस्तुत दुर्धरावस्थेचें कारण काय बरें? दुसरें काय असणार! परस्परकलहाची प्रीति, ऐक्याचा अभाव, लोभाचा अतिरेक, व अत्यंत स्वार्थपरतेचें वर्तन हेंच आमच्या सध्यांच्या दुर्दशेचें मूळ आहे. दुसऱ्यास दुःख देऊन स्वतः सुख भोगण्याच्या

आशेनें जे अयोग्य कृत्य करतात व आपल्या लोकांचें अकल्याण करून दुसऱ्याचा तळीराम गार करण्याचा प्रयत्न करतात त्याच लोकांमुळें आज आह्मांस ही दशा आली आहे. बरें, ज्या देशद्रोही जनांनीं आपल्या अनेक देशबांधवांविषयीं मनांत तिळप्रायही विचार केला नाहीं, त्यांची तरी स्थिति बरी झाली काय? छे! असें कसें होईल! त्यांसही फार क्लेश भोगावे लागले, व आपल्या देशाशीं जे निमकहरामी करतात त्यांचा अंत अत्यंत दारुणावस्थेंत होतो हें आबालवृद्धांनीं नित्य ध्यानांत ठेवण्यासारखें महातत्व त्यांसही शेवटीं कळून आलें! तें कसें हें पुढील गोष्टीवरून कळून येईल.

आपल्या गोष्टीचा आरंभ ११७६ पासून आहे. भरतखंडांत यावेळीं दिल्लीच्या गादीवर चक्रवर्ती राजा पृथुराज राज्य करीत होता; व गुजराथेंत भीमदेव नामक भूपति राज्यकारभार चालवीत होता. भरतखंड पादाक्रांत करून लुटण्यास सांपडावें ह्मणून सीमेवरील अफगाणिस्थानांतील यवन फार आतुर झाले होते. ग्यासुदिनचा भाऊ शाहबुद्दिन घोरी याला तर, वेळ येतो केव्हां आणि भरतखंड वशाखालीं चालतो केव्हां असें झालें होतें.

एके दिवशीं संध्याकाळीं मेवाडची राजधानी जी चितोड, त्यांत मोठी धामधूम माजून राहिली होती. राजवाड्यांत मोठा उत्सव चालला होता. नगरांत नाना-

विध वाद्यांचा कर्णमनोहर ध्वनि ऐकूं येत होता. गल्लो-गल्लीं श्रीमान् लोक दरिद्री जनांस द्रव्यदान करीत होते. रात्र पडल्याबरोबर सर्व नगरांत दीपमालांनीं उज्ज्वल प्रकाश पाडला होता. सर्व रस्ते व चौक या प्रसंगीं मंगलमय भासत होते. नगरांतील सारा युवतिवर्ग सुस्वर गीतें गात होता. अमीरउमराव व मांडलिक राजे नाटकप्रेक्षणांत दंग झाले होते. गवयी, बजवय्यी, भाट, चारण आणि बंदिजन "समरसिंगाचें कुलभूषण चिरंजीव होवो" अशी साल्हाद गर्जना करून आपापलीं कामें करीत होते. शहरांत सर्व गृहांच्या पुरोभागीं केळिस्तंभ द्वारपालांप्रमाणें खडे उभे होते जिकडे तिकडे मंगलकलश दिसत होते. मंगलसूचक शंखनाद ऐकूं येतच होता. देवालयांनीं प्रार्थना चालल्या होत्या. राजवाड्यांत संगीत नर्तन सुरूच होतें. समरसिंगाच्या पुत्राचें मुख पाहण्यास उत्सुक झालेल्या स्त्रियांची राजवाड्यांत रांग लागली होती. सारांश कोणीकडे पाहिलें तरी उत्सवमय दिसत होतें!

चितोडचा राजा समरसिंग यास पुनः आज पुत्ररत्न झालें आहे! त्याच्या प्रथम पत्नीस तीन पुत्र झाले होते खरे, पण या चौथ्या पुत्राच्या वेळीं सर्व प्रजेस विशेष आनंद झाला. तीन पुत्र झाल्यावर पट्टराणी मरण पावली व त्यामुळें समरसिंगानें लक्ष्मीदे-

वीचें पाणिग्रहण केलें; पण तिला संतान नसल्यामुळें तिसऱ्या खेपेस त्यानें कमलादेवीबरोबर लग्न केलें. तिलाच हें पुत्ररत्न झालें आहे. तीन पुत्र असतांना समरसिंगानें तिसरें लग्न करण्याचें कारण काय बरें कारण हेंच कीं—पण नको! जें कथासूत्रानेंच कळणार आहे तें येथेंच सांगण्याची आवश्यकता ती काय!

राणी कमलादेवीस प्रसववेदना होत आहेत अशी बातमी कळतांच समरसिंग चिंताग्रस्त होऊन निपचिप बसला होता. चिंतेमुळें त्याचें सुंदर व तेजस्वी कपाळ थोडेंसें निस्तेज दिसत होतें. त्याच्या विशाल, स्थिर व प्रकाशमान् नेत्रांची गंभीर व मधुर दृष्टि शून्य झाली होती. त्याचें स्वरूप उत्तम कारागिरानें घडविलेल्या मूर्तीप्रमाणें होतें. अपार व अतुळ सागराची शोभा पाहत असतांना सर्वांच्या मनांत जसे अनेक विचार उत्पन्न होतात तसेच त्यास पाहतांना होत असत. ज्याप्रमाणें सागराची विशालता व गांभीर्य पाहून आनंद होतो, व त्याचे तरंगरंग पाहून हृदय आल्हादित होतें, पण क्षणांत भीतिभावही उत्पन्न होतो, त्याचप्रमाणें समरसिंगास पाहतांच भक्ति व प्रेम उत्पन्न होई, व त्याची ती भव्य वीरमूर्ति पाहून भीतिकंपही उत्पन्न होत असे. तो तेजस्वी पण अहंकारहीन, व कोमलहृदय पण दृढप्रतिज्ञ होता. त्याचें वय सत्वीस वर्षांचें

होतें, पण त्याच्या अंगाचा बांधा इतका मजबूत होता कीं, तो पाहून तो जास्त वयाचा असावा असें वाटत असे.

तो एका तक्यास टेंकून विचारग्रस्त होऊन बसला आहे, इतक्यांत एक सेवक येऊन ह्मणाला, "महाराजांचा जयजयकार असो! राजराणीस, सुंदर, मनोहर, भाग्यशाली पुत्र झाला." हें आनंदकारक वर्तमान ऐकतांच समरसिंगाची मुखचर्या एकदम बदलली. पूर्णचंद्राच्या उदयानें जसा विशाल सागर उचंबळूं लागतो, तद्वत् त्याच्या हृत्सागरांत आनंदलहरी उचंबळूं लागल्या. ही सुवार्ता आणणाऱ्या सेवकास सोन्याचें कडें बक्षीस देऊन राजा पुत्रमुख पाहण्यास प्रसन्नचित्तानें अंतःपुरांत गेला. त्या दिवशीं पौर्णिमा होती, व चंद्रोदयाबरोबरच पुत्रजन्म झाल्यामुळें प्रजेस व राजास अत्यानंद झाला. नंतर आपल्या तेजस्वी पुत्राचें चंद्रवत् मुख पाहून त्याचा जन्मयोग समजावून घेण्यासाठीं राजा राजमहालाजवळच्या बागांत गेला.

उद्यानांत एक ठिकाणीं राजज्योतिषी गुरुदेव श्रीमन् मंगलाचार्य हातांत ज्योतिषग्रंथ घेऊन एका दर्भासनावर बसला होता. त्यानें सुंदर पण साधीं वस्त्रें परिधान केलीं होतीं व कपाळावर रक्तचंदनाचें त्रिपुंड्र लावलें होतें. समरसिंग तेथें गेला त्यावेळीं तो पुत्राचा जन्मयोग पाहण्यांत गुंग झाला होता. तो मधून मधून

आकाशाकडे पाहत असे. आकाश अगदीं स्वच्छ होतें. मेघाचें चिन्हही दिसत नव्हतें. पूर्ण चंद्राच्या निर्मल प्रकाशामुळें तें उद्यान, सरोवर, वृक्ष, व महाल हीं सर्व कांहीं अलौकिक दिसत होतीं. या सुंदर प्रकाशामुळें नगरांतील दीपमाळा निस्तेज झाल्या होत्या. समरसिंगानें येऊन मंगलाचार्याकडे पाहिलें तों त्याच्या स्वाभाविक तेजस्वी मुद्रेवर विषादचिन्ह दिसूं लागलें! त्याबरोबर राजाचा आनंदनग एकदम खालीं बसला! तो शंकाकुल होऊन अत्यंत खिन्न झाला. तो ह्मणाला, "गुरुदेव, बालकुमाराचें भाग्य पाहिलें काय? तें कसें आहे? तो पुढें राजा होऊन ही चितोडची गादी शोभवील ना?"

गुरुदेव मंगलाचार्यानें गंभीर स्वरानें उत्तर, दिलें "होय, पण;-"

"अजूनही पणच! देव, हें काय बोलतां?" गुरुदेव अजून सर्व बोलला नाहीं तोंच राजा अधीर होऊन ह्मणाला, "यावेळींही पण? हाय हाय! माझ्या वंशाचें नांव राखण्यासाठीं सिंहासनारूढ होणारा पुत्र मला अजूनही होऊं नये, असें मी काय पाप केलें आहे कोण जाणे!! युवराज कल्याणसिंहाचा जन्मयोग पाहून आपण असें सांगितलें कीं, 'कल्याण जर सिंहासनारूढ होईल तर चितोडचें महद्भाग्य उदयास येईल.

असा सुपुत्र तुझ्या वंशांत अद्याप जन्मला नाहीं; पण कांहीं शापामुळें तो राज्यासनास पात्र होईपर्यंत जिवंत राहील कीं नाहीं याविषयीं संशय आहे. यासाठीं वत्सा, तूं ही राज्याधिप होण्याची आशा सोडून दे.' त्यानंतर 'हे गुरुदेव! कल्याणाची पीडा दूर व्हावी ह्मणून मी यात्रा, हवन, व यज्ञ करण्यास आपणास विनंति केली; पण त्यानेंसुद्धां शापशान्ति होणार नाहीं असें आपण सांगितलें. तेव्हां कल्याण राज्याधिप होईल अशी जी मला आशा होती ती मी सोडून दिली. कल्याणाचे दोन्ही लहान भाऊ राज्यपदास पात्र नाहींत; व ते गादीवर बसल्यास चितोडाचें वाइट होईल असें आपण शेवटीं सुचविल्यामुळें, आपल्या आज्ञेप्रमाणें मी दुसऱ्या खेपेस लक्ष्मीदेवीबरोबर लग्न केलें. पण तिच्यापासून अपत्य न झाल्यामुळें मी तिसऱ्या खेपेस कमलादेवीशीं विवाह केला. ती गर्भवती झाली तेव्हां आपण मला ह्मणालां कीं, 'यावेळीं आपणास जो पुत्र होईल तो सिंहासनारूढ होण्यास योग्य होईल.' हें ऐकून माझें हृदय, हे गुरुदेव, आनंदलहरींत गटंगळ्या खात होतें, व आपले व ईश्वराचे मी किती उपकार मानीत होतों हें आपणास ठाऊक आहेच. असें असतां आपण आज ह्मणतां कीं, 'हा राजा होईल, पण' ह्मणजे? पण गुरुदेव, माझें भाग्यच निष्ठुर आहे तेथें तुह्मी तरी काय कराल?"

गुरुदेव ह्मणाला, "वत्सा इतका अगदीं निराश होऊं नको. ज्याअर्थी विधात्याचा लेख कधींही मिथ्या होत नाहीं त्याअर्थी माझा या ठिकाणीं निरुपाय आहे ही गोष्ट तूं अवश्य ध्यानांत धरली पाहिजे. या कुमाराच्या ठिकाणीं सर्व राजलक्षणें आहेत, व हा राजा होईलही; पण तीन वर्षे यास एका ग्रहाची पीडा आहे. त्यापासून कुमारास मोठ्या सावधगिरीनें संभाळलें पाहिजे. हीं तीन वर्षें एकदां गेलीं ह्मणजे त्याच्या एका केंसासही धक्का लागणार नाहीं."

गुरुदेवाचें भाषण संपतें न संपतें इतक्यांत त्या बागेत कांहीं अंतरावर दोन तीन स्त्रिया गलबला करीत आहेत असें त्यांस दिसलें. त्यांपैकीं एकीच्या हातीं एक बालक होतें, व दुसऱ्या दोघी त्या बालकास तिच्यापासून सोडविण्याचा प्रयत्न करीत होत्या. पण ती कांहीं केल्या त्या बालकास न सोडतां त्यांस हिसका मारून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होती. त्यांची बोलणीं या दोघांच्या कानीं पडल्याबरोबर समरसिंग त्यांच्याकडे जाऊं लागला; पण त्या तिघीजणी तितक्यांतच तेथें आल्या. त्यांतील एक स्त्री समरसिंगास ह्मणाली, "महाराज! ही वेडी बालकुमारास घेऊन पळून आली आहे व कांहीं केल्या त्यास सोडीत नाहीं. बालकास कदाचित् धक्का बसेल ह्मणून तिच्याकडून

त्यास हिसकावूनही घेतां येत नाहीं. यासाठीं हिच्या हातांतून त्यास सोडवून आमच्या हवालीं करावें."

इतक्यांत गुरुदेव मंगलाचार्य ह्मणाला, "ही वेडी कोण आहे?"

समरसिंगानें उत्तर दिलें. "काय आपल्या बिन्दु नांवाच्या दासीचें आपणास स्मरण नाहीं? ही वेडी झाली आहे हें आपणास ठाऊक नाहीं काय?"

मंगलाचार्य ह्मणाला, "मी तीर्थाटन करून आल्यापासून हिच्यासंबंधानें कसलाच समाचार ऐकला नाहीं. शिवाय ही वेडी झाल्यामुळें हिचें रूप इतकें बदलून गेलें आहे कीं, मी हिला जरामुद्धां ओळखली नाहीं. पण ही वेडी झाली कशी?"

समरसिंगानें उत्तर दिलें, "जवळ जवळ सहा महिने झाले, हिला एक मुलगा झाला होता. दुर्दैवानें तीन महिन्यानंतर ही विधवा झाली, व त्यानंतर थोड्याच दिवसांनीं तो मुलगाही मरण पावला. त्या आघातामुळें ही वेडी झाली आहे. त्या वेळेपासून हिच्या मनांत इतकीच गोष्ट भरली आहे कीं, मी इचा नवरा आहें व आपला पुत्र मरण पावला नसून जिवंत आहे; पण त्यास कोणी तरी चोरून नेलें आहे. बाकी सर्व गोष्टींत ती सावध व शहाणी आहे."

इतक्यांत ती वेडी बिन्दु बालकुमारानें वारंवार

चुंबन घेत घेत महाराजाजवळ येऊन ह्मणाली, " प्राण-नाथ ! आज माझें चोरीस गेलेलें धन मला पुनः मिळालें आहे ! अहाहा ! ह्याच लाडक्यास कोणी चोरून नेलें होतें. आहे का ठाऊक कोण, चोर तो ? " असें ह्मणून ती समरसिंगास हलक्या स्वरानें ह्मणाली, " ही पहा ती चोर ! हीच ती रांड सवत ! हीच याला जवळ घेऊन आतां निजली होती. मी तेथून याला लगेच घेऊन आलें. अहाहा ! किती माझा लाडका ! किती सुंदर !" याप्रमाणें पुष्कळ बोलून ती हंसूं लागली.

समरसिंग ह्मणाला, "बिन्दु, हा तुझा मुलगा नव्हे. तुझा असता तर तो आज किती दिवसांचा झाला असता बरें ? तो बराच मोठा झाला असता. हा नुकताच झाला आहे हें तूं पाहत नाहींस काय ? "

वेडी बिन्दु रागाऊन ह्मणाली, "कायरे ! तूं सुद्धां हा पुत्र माझा नव्हे ह्मणतोस ? हाय हाय ! माझा धनी ही माझ्याशीं निर्दय झाला ! पण लक्ष्यांत ठेव याला मी कधीं कधीं पुनः देणार नाहीं. तुला पाहिजे तें तूं कर. माझें हरवलेलें धन मला मिळालें तें काय मी पुनः घालवूं ? चल, चल ! दूर हो. ह्या बाळास मी कधीं परत देणार नाहीं." नंतर ती वेडी बालकुमारास समरसिंगाच्या तोंडाजवळ करून ह्मणाली, "पहा ! पहा बाळाचें मुख तर पहा ! किती सुंदर आहे ! तुमच्या

सारखाच हा दिसतो! चला! चला! बाळावरसुद्धा नाहीं? प्रेम? या लाडक्याचा एक मुका तरी घ्या? अरे नशीबा! दोन बायकांच्या नवऱ्याशीं माझा विवाह झाला. आतां काय करावें? या नावडतीच्या मुलावर आतां कोण माया करणार?"

हें ऐकून समरसिंग म्हणाला, "आण, आण, त्याचें मी चुंबन घेतों."

वेडी म्हणाली, "जा जा! तुमच्या हातांत बाळास देऊं? पण घ्या घ्या, तुमचा झाला तरी पुत्रच ना? एकवार याचें चुंबन घेऊन त्याला माझ्याजवळच द्या."

समरसिंगानें राजकुमारास त्या वेडीच्या हातांतून घेऊन जवळ उभी असलेल्या दासीजवळ दिलें व तिला तेथून जाण्याची खूण केली. बालकास घेऊन ती जाऊं लागली तशी ती वेडी विस्मित होऊन तेथल्या तेथें उभी राहिली, व राजाजवळ एकसारखें पाहून रागानें म्हणाली, "रे विश्वासघातक्या! हेंच का तुझें कर्तव्य? आतां माझें रूप गेलें, रंग गेला, आणि मी वृद्ध झालें त्याबरोबर नव्या नव्या राण्यांवर तुझें प्रेम बसूं लागलें काय? हें बरें ना? कांहीं तरी लाज धरा! माझ्यावर प्रीति करणारा आतां माझा कोण आहे? माझा धनीच जर माझा नाहीं, तर आतां दुसरा कोण असणार?"

याप्रमाणें आणखीही बोलून बालकास घेऊन जाणाऱ्या दासीला शिव्या देत देत ती महालाकडे चालती झाली.

ती वेडी निघून जाईपर्यंत गुरुदेव मंगलाचार्य तिच्याकडे एकसारखा पहात राहिला होता. नंतर तो ह्मणाला, "वत्सा, तीन वर्षेपर्यंत या वेडीच्या हातीं बालकुमार न पडण्याविषयीं फार काळजी घेतली पाहिजे. एक तर ही वेडी आहे, तेव्हां हिच्या हातीं मुलास देणें जोखमाचें आहे. दुसरें, हिचे विचार घटकोघटकीं बदलतात. तेव्हां ही एखाद्या वेळीं मातृवात्सल्यानें त्याच्याकडे पाहून त्याचे लाड करील; पण एखाद्या वेळीं हा सवतीचा मुलगा आहे असें समजून यास फेंकून देण्यासही कमी करणार नाहीं. ही या बालकाविषयीं इतकी उत्सुक होते यावरून हिच्यापासूनच त्यावर संकट येईल असा दुर्विचार माझ्या मनांत येत आहे. त्यावर हिचा जो इतका मातृभाव आहे तो कदाचित् याच कारणामुळेंही असेल. यासाठीं तीन वर्षेपर्यंत हिच्याकडे त्यास क्षणभरही विश्वासतां कामा नये. कुमाराच्या गळ्यांत हें रक्षाकवच बांध ह्मणजे यास कोणतीही भीति राहणार नाहीं." असें ह्मणून त्यानें एक रक्षाकवच राजाजवळ दिलें. नंतर गुरुदेव ह्मणाला, "तीन वर्षे गेल्यावर कुमारास कसलीच भीति नाहीं. पुनः दुसरी एक गोष्टही लक्ष्यांत ठेव. लक्ष्मीदेवीला

काहीं संतान नाहीं. त्यामुळें सवतीचा मुलगा पाहून तिच्या मनांत मत्सर उत्पन्न होईल. तेव्हां तिच्या मनांत क्रोध किंवा दुसरा दुष्ट विकार न येऊं देण्याविषयीं अगोदरच तजवीज करणें जरूर आहे. यासाठीं कमलादेवीस सर्व हकीकत समजावून हा कुमार लक्ष्मीदेवीस अर्पण कर, व आजपासूनच त्याला तिचा दत्तक पुत्र कर. त्याचप्रमाणें राजमहालांतील सर्व लोकांस अशी आज्ञा कर कीं, आजपासून या बालकास कोणीही कमलादेवीचा मुलगा असें ह्मणूं नये, तर लक्ष्मीदेवीचा मुलगा असें ह्मणावें. असें झालें ह्मणजे लक्ष्मीदेवी संतुष्ट होऊन त्याचा मुळींच द्वेष करणार नाहीं, व त्याचें अनिष्ट करण्याचाही संकल्प करणार नाहीं." यानंतर दोघेही बागेंतून महालांत गेले.

गुरुदेव मंगलाचार्यानें आज्ञा केल्याप्रमाणें राजानें महालांत जाऊन सर्व काम केलें. राजकुमाराचें नांव करणसिंग असें ठेवलें. लक्ष्मीदेवी त्यास आपला पुत्र असें समजून आल्हादित झाली, व त्यावर फार प्रेम करूं लागली.

दिवस जात चालले त्याप्रमाणें तो कुमार मोठा होऊं लागला, व तो जसजसा मोठा होऊं लागला, तसतसें त्याचें सौंदर्य विशेष प्रकाशूं लागलें. बिन्दु दासी त्याच्यावर जरी फार प्रेम करीत असे, तरी

तिच्या हातीं बाळास देऊं नये अशी सर्व लोकांस राजाची सक्त ताकीद असल्यामुळें त्याला कोणीही तिच्या जवळ जाऊं देत नसत, व तिनें कितीही विनवणी केली तरी तिकडे कोणी पाहत नसे. असें झालें ह्मणजे ती फार रागावे, भांडे, रडे, व शिव्याही देई! पण त्यालाही कोणी दाद देत नसे!

दोन अडीच वर्षांचा झाल्यावर राजकुमार चालूं लागला, व त्यास तिसरें वर्ष लागतांच तो बोलूं लागला. हळूहळू त्यास धांवतांही येऊं लागलें. दासदासींस तो खूप गंमत करून दाखवूं लागला. आपण इतके वेळां विनवणी केली तरी एकदांही मुलास आपल्या स्वाधीन न केल्यामुळें आपणास तो आतां सांपडत नाहीं अशी बिन्दूची खात्री झाली होती. तरी आपली सवत त्या पुत्रास आपल्याजवळ निदान एकवेळ तरी देईल, तर त्याचें चुंबन घेऊन आपण संतुष्ट होईन असें वारंवार तिच्या मनांत येत होतें. एके दिवशीं हाच विचार तिच्या मनांत आला व त्याचवेळीं एका दासीजवळ तो राजकुमार खेळत असतांना तिनें पाहिलें. तेव्हां ती त्या दासीजवळ जाऊन त्या कुमारास एकवेळ आपल्याकडे देण्याविषयीं फार आग्रह व विनंति करूं लागली. पण दासीनें तिच्याकडे बिलकुल लक्ष्य दिलें नाहीं. तेव्हां तिनें आश्चर्यानें व दुःखानें

दीर्घनिश्वास टाकला. पुनः पुनः तिनें तिच्याजवळ पुष्कळ याचना केली, पण त्या दासीनें तिच्याकडे नुसती वर मान करूनही पाहिलें नाहीं. त्याबरोबर क्रोधवश होऊन ती म्हणाली, "रांड माझा पुत्र माझ्याकडे देत नाहीं! काय दुर्दैव! सवतीला वश होऊन स्वामींनीं हुकूम दिला म्हणून माझा मुलगा मला मिळणार नाहीं! हाय हाय! मालकांच्या सांगण्यावरून मी मुलगा दिला आणि तो मला आतां मिळत नाहीं! दाद कीं फिरयाद! अग दे, दे. नाहीं तर मारून टाकीन!" नंतर राजकुमाराकडे एकसारखें पाहून ती रडूं लागली, तरी त्या दासीनें तिच्याजवळ त्या मुलास दिलें नाहीं. शेवटीं जातेवेळीं ती म्हणाली, "ठीक! ठीक! माझ्या बाळास आज नाहीं देत तर कांहीं हरकत नाहीं; पण एकवेळ गुपचुप येऊन त्यास घेऊन जाईन त्यावेळीं तुम्हांस दिसेल! ईश्वरा! माझ्या बाळास एकदांचा माझ्याकडे दे कसा!" त्या वेडीचें हें बरळणें न ऐकतां ती दासी हांसत हांसत महालांत चालती झाली.

त्या दिवसापासून बिन्दु दासीनें राजमहालाचा परित्याग केला; पण सर्व असामी आपापल्या कामांतच चूर असल्यामुळें तिची कोणीच विचारपूस केली नाहीं.

———

# प्रकरण २ रें.

## कुमार गेला!

राजकुमार करणसिंग तीन वर्षांचा झाला, तेव्हां तो कोणाच्याच हातीं राहीना. तो कधीं कधीं बागांत जाऊन तेथें धांवत असे, कधीं फुलें तोडीत असे, कधीं हरिणादिक श्वापदांस पकडीत असे, व जवळ असणाऱ्या दासींनीं त्यास केव्हांही हरकत केली तर तो त्यांच्याशीं भांडतही असे! याप्रमाणें नानाप्रकारें क्रीडा करून तो थकला ह्मणजे दासीच्या कडेवर बसून बोबड्या बोलांनीं सर्वांचें रंजन करीत असे! बिन्दूनें राजमहाल सोडल्यावर कांहीं दिवसांनीं एकवेळ दासीबरोबर तो बागांत फिरावयास गेला होता, व ती त्याला हंसें येण्याजोग्या गोष्टी सांगून त्याचें रंजन करीत होती. गोष्टी चालल्या असतां एकदम आठवण झाल्यासारखें करून कुमार दासीस ह्मणाला, "ती पूर्वीची वेडी कुठें गेली? ती येत नाहीं कां?" दासीनें विचारलें, "तिच्याशीं तुझें काय काम आहे? ती

कशाला पाहिजे होती!" तो ह्मणाला, "आतांच मी धांवत जाऊन तिच्या कडेवर बसेन." दासी ह्मणाली, "पण मी जाऊं दिलें नाहीं तर!" कुमार ह्मणाला, "वा! काय ह्मणून नाहीं जाऊं देणार? मी धांवत तिच्या-जवळ जाईन, मग तूं काय करणार? ती माझ्यावर खूप माया करते." दासीनें विचारलें, "पण ती वेडी आहे; तिनें तुला मारलें तर?" कुमार ह्मणाला, "मला कशाला मारील? मला कोणी मारीत नाहीं. मी आपला धांवत जाऊन तिच्या कडेवर बसणार." दासी ह्मणाली, "तुला तिच्याकडे कधीं जातां येणार नाहीं, व मीही जाऊं देणार नाहीं."

मुलांचा असा स्वभावच आहे कीं, त्यांस जी गोष्ट करूं नको ह्मणून सांगावें ती करण्यास तीं अधिकच उत्सुक व तत्पर होतात. आणि जर त्यांस अटकाव करूं लागलें तर त्यांच्या मनास तें फार लागतें. दासीचें वरील उत्तर ऐकून तो कुमार मोठ्या जोरानें ह्मणाला, "बस, मी तिच्यापाशीं जाणारच!" त्याला फसवण्यासाठीं दासी ह्मणाली, "अरे! पण ती येथें नाहीं, आणि तूं जाणार कसा?" कुमार ह्मणाला, "बस बस, मी तर जाणार." त्या गोष्टीचा त्यास विसर पडावा ह्मणून ती पुनः ह्मणाली, "तें पहा किती सुंदर फूल फुललें आहे. जसें काय माझ्या बाळाचें

तोंडच!" या बोलण्यानें बिन्दू दासीची गोष्ट तो तत्काल विसरला, व ह्मणाला, "कुठें आहे?" दासीनें एका फुलाकडे बोट दाखवून सांगितलें, "तें पलीकडे पहा, तलावाच्या कांठाजवळच." कुमारानें पुनः विचारलें, "कोठें?" दासी पुनः ह्मणाली, "रे तें पलीकडचें. हें पहा पाण्यांत वर कसें तरंगत राहिलें आहे तें!" कुमार ह्मणाला, "चल, मला तें फूल घेऊं दे. मी जाऊन तें फूल आणतों." असें ह्मणून तिचा हात सोडून तो तलावाकडे धांवत सुटला. पण दासीनें घाबऱ्याघाबऱ्यानें धांवत जाऊन त्यास पकडलें, आणि ती ह्मणाली, "रे तें पलीकडच्या किनाऱ्यावर आहे. तें रे कसें तुला सांपडेल? पाण्यांत मात्र पडशील." दासीचा हात सोडवण्यासाठीं त्यानें आपल्याकडून खूप जोर केला, पण जेव्हां ती आपणास सोडीत नाहीं असें त्यानें पाहिलें, तेव्हां तो ह्मणाला, "मला हें फल पाहिजे. नाहीतर मी आईला सांगेन."

त्याला हातीं धरून ती दासी त्या तलावाच्या कांठीं गेली, पण तिला, कांठावरून पलीकडचें कमळ तोडतां येईना. तें जरा बऱ्याच अंतरावर होतें. तेव्हां जवळचें एक फूल तोडून ती त्यास ह्मणाली, "हें पहा त्या फुलापेक्षां किती सुंदर आहे!" तें फूल

फेंकून देऊन तो ह्मणाला, "चल, मला नको तें. मला तेंच फूल पाहिजे." शेवटीं थकून दासी ह्मणाली, "तर दरवाज्यावरील पहारेवाल्याला बोलावून त्याला फल तोडावयास सांगतें." कुमार ह्मणाला, "नाहीं, पहारेवाल्यानें दिलें तर घेणार नाहीं; तूंच दे." याप्रमाणें राजकुमाराची कोणत्याच रीतीनें समजुत घालतां येईना तेव्हां आपण फूल तोडून देण्याचें कबूल करून ती ह्मणाली, "ठीक आहे. मी तलावांतलें फूल तोडून आणतें, पण अगोदर तुला त्या पहारेवाल्याच्या स्वाधीन करतें."

चितोडचा राजमहाल हा किल्ल्याच्या आकारासारखा होता. त्याच्या चारी बाजूंनीं एक तट होता. मध्यें कुंजलता व उद्यानें होतीं. त्यांत लहान लहान तलाव, कारंजीं, व दुसरीं नानाविध जलयंत्रें केलेलीं होतीं. बागेमध्यें एक राजमार्ग बांधला होता त्यानें त्याच्या चारही दरवाजांवर जातां येत असे. प्रत्येक दरवाजावर एक एक पहारेकरी रात्रंदिवस पहारा करीत असे. या चार दरवाजांशिवाय राजभवनांत जाण्याचा दुसरा मार्ग नव्हता. महालाच्या बाहेरही चांगल्या चांगल्या बागा केल्या होत्या. पण बागांस तट नव्हता. फक्त लोखंडी जाळ्या जिकडे तिकडे ठेवलेल्या असून त्याचा दरवाजाही लोखंडाचाच होता. राजभवनास जसे

चार दरवाजे होते, त्याचप्रमाणें बाहेरच्या वाड्यालाही होते. शिवाय महालाच्या बागेच्या आंतील भागां-तही ठिकठिकाणीं दरवाजे असून तेथें पहारेकरी नेहमीं पाहरा करीत असत. मोठ्या दरवाज्यांतून बहुतकरून सर्वांस येण्याजाण्यास मोकळीक असे; परंतु तसेंच जरू-रीचें काम असलें तर दासदासी लहान दरवाज्यांतून बाहेरील किंवा आंतील बागांत व महालांत येत जात असत; पण परकी मनुष्यास मोठ्या दरवाजांशिवाय दुसऱ्या दरवाजानें जाऊं देत नसत. करणसिंग त्याच बागेंत परिचारिकेसहित फिरत होता. तो ज्या तला-वांतील फूल तोडून मागत होता, त्याच्या समोर एक दरवाजा होता. तिकडे येऊन पहारेकऱ्यास दासी ह्मणाली, "पलीकडील पुष्करणींतून मी एक फूल तोडून आणतें; तोंपर्यंत या मुलास संभाळ. हा इतका हट्टी झाला आहे कीं सांगतां सोय नाहीं." असें ह्मणून तिनें त्यास पहारेकऱ्याच्या हवालीं केलें व ती फूल तोडून आणण्यास गेली. पण कांठावर पाय ठेवून फूल तोडण्यासाठीं ती जरा जास्त वांकल्य बरोबर तोल जाऊन तलावांत पडली! पडतां पडतां तिनें आरोळी मारली व ती पहारेकऱ्याच्या कानीं पडतांच करणसिं-गास तेथेंच ठेवून त्यानें तलावाकडे धांव मारली. पण ती तलावांत पडली आहे असें पाहतांच त्यानें त्यांत

उडी टाकून तिला बाहेर काढलें. ती पाण्यांत पड-तांना भीतीनें बेशुद्ध झाली होती. ती जेव्हां सावध झाली तेव्हां राजकुमारावर रागावून ह्मणाली, "असला हट्टी मुलगा मी कधींच पाहिला नाहीं. जी गोष्ट एक वेळ ह्मणून ह्मणतो ती सोडीतच नाहीं! राजपुत्र पडला ह्मणून, नाहींतर एक चपराक दिली असती." पहारे-करी ह्मणाला, "चूप, चूप, असें बोलूं नको. नाहीं तर तुझें बोलणें कोणी तरी ऐकेल. असल्या गोष्टी मनांत-ल्या मनांत ठेवल्या पाहिजेत; बाहेर बोलतां कामा नयेत."

नंतर पहारेकरी तिला बरोबर घेऊन दरवाजावर येतो तों तेथें करणसिंग नाहीं! त्यांनीं आसपास लांबवर पाहिलें, पण तो दृष्टीस पडेना! करणसिंग कोठें आहे!

त्या मुलाच्या हट्टामुळें दासी अगोदरच त्रासून गेली होती. तशांत तलावांत पडल्यामुळें भयभीतही झाली होती. पण ज्या ठिकाणीं पहारेवाल्यानें करणसिं-गास ठेवलें होतें त्या ठिकाणीं तो नाहीं असें पाह-तांच दोघांसही अधिकच भीति उत्पन्न झाली. प्रथम त्यांस असें वाटलें कीं खेळतां खेळतां तो कुठें तरी आजूबाजूस गेला असेल. असा विचार मनांत आल्या-बरोबर दोघांनींही जिकडे तिकडे त्याचा शोध केला, पण तो कांहीं सांपडेना. पुनः त्यांस असें वाटलें कीं,

कार्यवशात् तिकडे कोणी दासी आली असेल, व कुमारास एकटा पाहून त्यास तिनें राजमहालांत नेलें असेल. पण कुमारास एकटा ठेवला ह्मणून कदाचित् राणी रागावेल या भीतीनें ती दासी कांपूं लागली. राणी रागावली तर काय उत्तर द्यावें याचा विचार करीत हळूहळू ती राणीपाशीं गेली व कंपित स्वरानें ह्मणाली, "बाई साहेब, माझा कांहीं दोष नाहीं. मी तर पहारेवाल्याजवळ देऊन गेलें होतें. पण–पण–" हें ऐकून कमलादेवी आश्चर्यानें ह्मणाली, "काय ग ? ही ह्मणते तरी काय ? वेडीबिडी तर झाली नाहीं ना?" राणी आपल्यावर रागावलेली नाहीं असें पाहतांच ती जरा धीटपणानें ह्मणाली, "बाई साहेब, मी शपथ घेऊन खरें सांगतें कीं, कुमारास पहारेवाल्याजवळ देऊन मी पुष्करणीवर फूल तोडण्यास गेलें होतें, पण इतक्यांत असें झालें त्यांत माझा अपराध कसला?" कमलादेवीही बावरी होऊन ह्मणाली, "काय काय ? काय झालें ? पहारेवाल्याजवळ होता तेव्हां तो पडला बिडला कीं काय ?" दासी ह्मणाली, "छे ! छे ! कुमार कसा पडेल ! मी मात्र पुष्करणींत पडून आज मरत होतें !" यावर तेथें बसलेल्या सर्वजणी म्हणाल्या, "तर तूं जिवंत आलीस कशी ?" दासीनें उत्तर दिलें, "मी ओरड केल्याबरोबर पहारेवाला धांवून आला व

बुडतां बुडतां मला त्यानें पाण्यांतून ओढून काढलें. आतां आपण सर्वजण सांगा बरें यांत माझा काय गुन्हा आहे तो ?" कमलादेवी म्हणाली, "अग, तुझा गुन्हा म्हणतें कोण ? पाण्यांत बुडत होतीस ती तुला पहारेवाल्यानें ओढून वर काढली यांत दोष कसला ?" दासी म्हणाली, "मी तरी तेंच म्हणतें कीं यांत माझा दोष कसला ? तरी आपण मला बोलाल म्हणून मी भ्यालें होतें." कमलादेवी म्हणाली, "यांत भिण्याचें कारण तें काय ? तूं मरतां मरतां वांचलीस हें ऐकून आम्हांला बरेंच वाटलें. तुला ठपका काय म्हणून देणार ?"

दासी ह्मणाली, "आपण माझे आईबाप आहां तुह्मीं दया करणार नाहीं तर कोण करणार ! बरें कुमार कोठें आहे ? त्याच्यासाठीं हें फूल तोडून आणलें आहे, आणि हें तोडीत असतांनाच मी पाण्यांत पडत होतें." कमलादेवी ह्मणाली, "कुमार कोठें आहे तो मला काय ठाऊक ! तूंच सांगतेस कीं त्याला पहारेवाल्याच्या स्वाधीन केलें होतें ह्मणून." दासी रडत रडत ह्मणाली, "हाय हाय ! मी समजलें होतें माझ्या अपराधाची आपण मला क्षमा केली असेल. माझा कांहीं अपराध नाहीं हें आपण जाणतांच, मग मला कां बरें रडवितां ! जरा तरी माफी करा ?" कमलादेवी रागा-

नें लाल होऊन ह्मणाली, "या बोलण्यावरून मला तर असें दिसतें कीं तुमच्या सर्वांच्या हलगर्जीमुळें कुमारास कांहीं तरी लागलें बिगलें असावें. काय झालें तें उघड सांग; 'क्षमा करा' हें तुझें बोलणें मला ऐकायला नको." दासी ह्मणाली, "नांहीं बाईसाहेब, कुमारास कांहीं झालें नाहीं." कमलादेवी ह्मणाली, "तर झालें काय ?" दासीनें उत्तर दिलें, "कुमारास एकटा ठेवून पहारेवाला मला पुष्करणींतून काढण्यास आला हें मी सांगतें." देवी ह्मणाली, "एकटा ठेवून गेला त्यांत काय झालें ?" दासी ह्मणाली, "दुसरें कांहीं झालें नाहीं, पण मी मात्र उगाच तोफेच्या तोंडीं पडलें." कमलादेवी ह्मणाली, "ती ग कशी ?" दासी ह्मणाली, "कुमारास एकटा पाहून माझ्यावर टपका देण्यासाठीं त्यास उचलून कोणीं आंत आणलें." कमलादेवी ह्मणाली, "मग तुला टपका काय ह्मणून ?" दासीनें उत्तर दिलें, "कुमार तुमच्याकडे आला तेव्हां ह्मटलें त्याला एकटा ठेवला ह्मणून तुह्मी मला बोलाल." कमलादेवी ह्मणाली, "येथें तर कुमारास घेऊन कोणी आलें नाहीं. कुमार आहे कोठें ?"

राणीच्या ह्या बोलण्यावर त्या परिचारिकेचा विश्वास बसेना. राणी आपली थट्टा करीत आहे असें वाटून ती ह्मणाली, "बाईसाहेब, माफ करा, माफ करा! आतां

केव्हांच कुमारास एकटा ठेवणार नाहीं. तो कोठें आहे मला सांगा. त्यास मी हें फूल देणार." राणी आश्चर्यान्वित व भयभीत होऊन ह्मणाली, "तूं कुमारास कोणाजवळ दिलें, आणि तो गेला कुठें हें मला कसें समजेल ?" हें ऐकून ती कमलादेवीच्या चरणांवर डोकें ठेवून रडत रडत ह्मणाली, "हे देवी, मला आतां पुष्कळ शिक्षा झाली ही ! आतां पुनः अशी चूक कधींही करणार नाहीं. कुमार कोठें आहे तो आतां तरी सांगा." तिच्या या वारंवार होणाऱ्या विनवण्यांवरून दोन्ही राण्या घाबरून गेल्या. दासीजनांचीही तीच अवस्था झाली. त्यांनीं तिला विचारल्यावरोबर सर्व वृत्तांत जसा होता तसाच तिनें त्यांस सांगितला. तो ऐकून सर्वांची पांचांवर धारण बसली. महालांत चोहींकडे त्या शोध करूं लागल्या, पण कुमार कोणासही सांपडेना. चोहींकडे तपास सुरू झाला. राजमहालांत कोलाहल होऊं लागला. कांहीं नोकर बागा तपासूं लागले, व कांहीं राजमार्गावर धांवले; पण कुमाराचा पत्ता लागेना. तो पुष्करणींत पडला असावा अशीही कित्येकांस शंका आल्यावरून सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें.

इतक्यांत हा समाचार महाराज समरसिंगाच्या कानावर गेला. तो धावऱ्या धावऱ्या महालांत आला व सर्वांच्या सांगण्यावरून बागेतील प्रत्येक पुष्करणी,

प्रत्येक वेलींचा गुच्छ, व महालाची प्रत्येक खोली त्यानें तपासून पाहिली. पण कोठेंही पत्ता लागला नाहीं. पुनः शंका आल्यावरून सर्व पुष्करणी पुनः पुनः तपासल्या, पण सर्व परिश्रम व्यर्थ झाला. होतां होतां संध्याकाळ झाली. तेव्हां समरसिंगानें त्या परिचारिकेस आपणाजवळ बोलावून सर्व वृत्तांत विचारला. पहारेवाला तुला पाण्यांतून काढण्यास धांवला त्यावेळीं कुमार कोठें होता? तुला पाण्यांतून काढण्यास किती वेळ लागला? इत्यादि अनेक प्रश्न त्यानें केले. पण दासीनें जो वृत्तांत प्रथम सांगितला होता त्याशिवाय तिच्याकडून जास्त कांहीं माहिती मिळाली नाहीं. त्याचें बोलणें चाललें असतांना तेथें कांहीं मनुष्यें येऊन ह्मणालीं, "दासी खोटें बोलते. ती फूल तोडायला गेली नव्हती, पहारेवाला गेला होता. पहारेवाल्याजवळ ती बोलत असतानां आह्मीं पाहिलें आहे. त्यावेळीं तिच्या हातीं कुमारही होता." दासीनें आश्चर्यानें विचारलें "हातीं केव्हां होता? बागांत असतांना मी फक्त त्याचा हात काय तो धरला होता. शिवाय फूल तोडायला मीच गेलें होतें. पाहिजे तर पहारेवाल्याला विचारा." नंतर पहारेवाल्याला विचारल्यावर तो ह्मणाला, "महाराज, माझ्याजवळ कुमारास देऊन दासी फूल तोडण्यास गेली होती. मी दासीला पाण्यांतून काढण्यासाठीं ह्मणून

गेलीं तेव्हां कोणी तरी कुमारास नेलें असावें, व तें पाहून या दासीच्याच हातीं मुलगा होता असें त्यांस वाटत असावें."

इतक्यांत एक पहारेवाला एकदम पुढें येऊन ह्मणाला, "आज ती वेडी बिन्दु आली होती. तिनें दरवाजावर एकट्या कुमारास पाहून त्यास नेलें तर नसेलना? " हें ऐकून कुमारास संभाळणारी दासी ह्मणाली, "होय होय, असेंच असेल ! एके दिवशीं कुमारास आपल्याजवळ देण्यासाठीं ती माझी पुष्कळ विनवणी करीत होती. पण मी तिचें न ऐकल्यामुळें ती रुसून रागानें ह्मणाली, ठीक आहे, पाहून घेईन; महाराज, तीच कुमाराला घेऊन गेली असावी. तपास करावा. " असें ह्मणून तिनें सर्व हकीकत समरसिंगास निवेदन केली. समरसिंगासही असेंच वाटलें कीं, ती वेडी बिन्दु कुमारास घेऊन गेली असावी खास. नंतर तिला महालांत येतांना ज्यांनीं पाहिलें त्यांनीं लगेच वर्दी कां दिली नाहीं असें विचारल्यावर त्या दासी ह्मणाल्या, "महाराज, तिला आह्मीं महालांत येतांना पाहिलें खरें, पण जातांना पाहिलें नसल्यामुळें तिचा मुळींच संशय आला नाहीं. कारण आह्मांला वाटलें कुमारास घेऊन वेडी जाऊं लागली तर पहारेवाल्याची तिच्यावर नजर पडेल. पण अंधारामुळें कोणी तिला जातांना पाहिलें नाहीं. तपास

केल्यावर असें कळलें कीं. एका दरवाजावर पहारेवाला नव्हता. त्या दरवाजावरून ती गेली तर नकळे.

हें ऐकून समरसिंग अत्यंत व्याकुळ झाला. व गुरुदेवानें जें भविष्य केलें होतें त्याचीही त्यास आठवण झाली. त्यानें पुष्कळ नोकरांस बिन्दूस पकडण्यास दवडिलें, व आपणही मंत्रिजनांस बरोबर घेऊन तिचा शोध करण्यास निघाला. वेडी बिन्दु राजकुमारास घेऊन पळून गेली असें ऐकतांच गुरुदेव मंगलाचार्य ह्मणाला, "कुमारास या वेडीच्या हातीं न देण्याविषयीं फाजील आग्रह धरला हें काम फार वाईट झालें. निषेध केल्यामुळेंच हें विपरीत झालें आहे."

---

## प्रकरण ३ रें.

### तुफान!

राजकुमारास संभाळणाऱ्या दासीबरोबर बोलाचाली झाल्यावर बिन्दूनें राजमहालाचा परित्याग केला होता. ती वनांत भटकत होती, व भिक्षा मागून उदरपोषण करीत होती. पण तिच्या मनांत असलेला करणसिंग तिळमा-

त्रही ढळला नाहीं. ती नित्य त्याचें स्मरण करीत असे. कांहीं दिवस याप्रमाणें भटकत राहिल्यावर एके दिवशीं करणसिंगास पाहण्याची तिला उत्कट इच्छा झाली; पण सवतीला भाळलेल्या पतीच्या घरांत पाऊल ठेवणें अपमानजनक आहे असा विचार तिच्या मनांत आला. तेव्हां मनांत विचार करकरून तिनें शेवटीं असें ठरविलें कीं, महालाच्या बाहेरूनच करणसिंगास पाहून मनाचें समाधान करून घ्यावें. याच दिवशीं बिन्दु, करणसिंगास पाहण्यासाठीं राजमहालासमीप फिरत होती. या वेळीं करण परिचारिकेबरोबर बागांत रमत होता, व बिन्दु त्याला दुरूनच पाहून आपलें समाधान करीत होती. त्याच्याजवळ जाण्याविषयीं तिचें मन उच्छृंखल झालें. ती राजमहालाकडे तर जाऊं लागलीच. सवतीला वश होणाऱ्या स्वामीचा तो महाल आहे हा विचार तिच्या मनांतून पार निघून गेला. ती दरवाजावर आली तेव्हां पहारेवाला ह्मणाला, “ काय ग वेडे, इतके दिवस कुठें भटकत होतीस? आज येथें कोठून आलीस?” ‘ वेडी ’ हा शब्द ऐकतांच क्रोधांध होऊन तिनें पहारेवाल्यास दोन चार शिव्या दिल्या, व ती जळफळत जळफळत आंत येऊन एका आसनावर बसली. ती आपणाशींच मोठ्यानें ह्मणाली, “ पहा तर खरें, काय चाकरडा थट्टा करतो ती! चाकर तो चाकर, आणि

राणीची थट्टा करतांना जरा तरी शरमत नाहीं! माझा पती सवतीला भाळून वाटेल तें बोलतो तें तर ठीकच आहे. पण हा चाकरडाही तसेंच करायला लागला!" नंतर आसनावरून उठून तिनें आसपास पाहिलें तरी तिला कुमार कोठें दिसेना. इतक्यांत दासीची ओरड तिला ऐकूं आली, व त्याच वेळीं तिचा बचाव करण्यासाठीं पहारेवाला धांवत गेला हेंही तिनें पाहिलें. पहारेवाला गेल्याबरोबर बंधनमुक्त अश्व जसा इकडे तिकडे फिरतो त्याप्रमाणें करणसिंगही इकडे तिकडे धांवूं लागला. यावेळीं कुमारास एकटा फिरतांना पाहून ती वेडी त्याच्याजवळ धांवत गेली व त्याला उचलून घेऊन त्याचें चुंबन घेऊं लागली. तत्क्षणीं तिच्या मनांत एकदम एक नवीच कल्पना उत्पन्न झाली. पुष्कळ दिवसांची आपली एक मनःकामना पूर्ण करण्याचें तिच्या मनांत आलें. त्या कुमारास दोन्ही हातांनीं धरून वारंवार त्याला मिठी मारीत ती ह्मणाली, "अहाहा! किती तरी सुंदर माझा बाळ! आणि त्यास माझ्याकडे देत नाहींत! बाबा, तूं माझा मुलगा, तूं माझें माणिक, माझें धन, माझें रत्न, माझें सर्वस्व. तुझ्यावर माझ्याहून कोणी जास्त माया करणारें नाहीं. समजलें ना! चल माझ्याबरोबर मी तुला एक सुंदर फूलवाडी दाखवितें. ती फार सुंदर आहे. बाळा चल, लवकर चल." कुमार

ह्मणाला, "पहारेवाला माझ्यासाठीं फूल तोडायला गेला आहे. तें फूल घेऊन मग येतों." वेडी ह्मणाली, "चल रे चल, त्या फूलवाडींत तर याहीपेक्षां चांगलीं फुलें आहेत. तेथें कसकसले मजेदार पक्षी, सरोवरें. आणि झाडें आहेत! तीं पाहून खरोखर तुला मोठी मौज वाटेल! चल, तुला मी सर्व दाखवीन." कुमार नाचत नाचत ह्मणाला, "तर चल मी येतों. ती कोठें आहे?" त्यांचें भाषण असें होत आहे इतक्यांत तीं दरवाजाच्या बाहेरही आलीं. मग ती कुमारास ह्मणाली. "बाळा, तूं रडूं बिडूं नको हो! रडशील तर पहारेवाला तुला माझ्याबरोबर फूलवाडी पहाण्यास येऊं देणार नाहीं." त्या वेडीच्या हातीं आपणास कोणी देणार नाहीं हें करणकुमारास ठाऊकच होतें. तेव्हां तो मान हालवून ह्मणाला, "नाहीं रडणार." वेडी ह्मणाली, "चल तर मग, फूलवाडी दाखवायला तुला धांवत घेऊन जातें." जातांना तिनें राजमार्गाचा त्याग करून निर्जन मार्ग धरला. ती धापा टाकीत टाकीत नदीच्या कांठीं आली. तेथें येऊन पाहते तों पुष्कळ होड्या नुकत्याच जात असून त्यांत बरेच उतारूही आहेत. तेव्हां तिनें एका होडीवाल्यास विचारलें, "होडी लावतोस का किनाऱ्याला? लावीत असल्यास लवकर, वेळ नको." कुमार ह्मणाला, "फूलवाडी कुठें आहे?"

वेडीनें उत्तर दिलें, " बाळा. या होडींत बसून फूल-वाडी पहायला जायचें आहे." तेव्हां तो उगीच राहिला.

होडीवाल्यानें विचारलें. " कोठें जाणार ? " वेडीनें उत्तर दिलें, " तूं जाणार तेथेंच." पण जलदी मात्र कर. वेळ लावूं नको. नाहींतर माझी सवत येऊन या बाळास माझ्याकडून हिसकून घेऊन जाईल." होडीवाल्यानें लागलीच किनाऱ्यास होडी लावली, व त्यांत ती वेडी कुमारास घेऊन बसली. होडी चालूं लागली. कांहीं वेळानें त्या वेडीनें होडीवाल्यास थोडेसे पैसे देऊन सांगितलें कीं, " पलीकडच्या किनाऱ्यास लवकर होडी लावशील तर आणखी पुष्कळ पैसे देईन."

होडी नदींत चालते आहे तों इकडे अंधकाराचीही तयारी चालली होती. इतक्यांत कुमार म्हणाला, " वेडे, फूलवाडी कुठें आहे ? " पण त्या वेडीनें, नदीच्या लहरी, तिचे दोन्ही तीर, व त्यांवर असणारे उंच वृक्ष-गण त्यास दाखवून त्यास त्या गोष्टीचा विसर पाडला. इतक्यांत संध्याकाळ झाली. पश्चिम व पूर्व दिशांस तारागण प्रकाशमान होऊं लागला. मन्दमन्द पवनानें उत्पन्न होणाऱ्या लहरी होडीशीं येऊन टक्कर मारूं लागल्या, व त्यामुळें ' भूं भूं ' असा ध्वनि निघूं लागला. होडीवाले रंगांत येऊन गाणी गाऊं लागले. थोड्याशा अवकाशानें ती होडी चितोडहून बऱ्याच

अंतरावर गेली. कुमारही ' फूलवाडी फूलवाडी ' करून थकल्यामुळें त्या वेडीच्या मांडीवर निद्रिस्त झाला.

. आज कृष्णपक्षांतील प्रतिपदा होती. चंद्रोदय अजून आला नव्हता. चंद्राचे शीतल किरणही जणुं काय अट-कून राहिले होते. आज शशधर आपले शीतल किरण इतस्ततः फेंकण्याची इच्छाच करीत नव्हता असें दिसे. पूर्व दिशेस चंद्रप्रकाशाच्या बदली मेघांचें नीलजाल पसरलें होतें. हां हां ह्मणतां चोहींकडे आकाश घनघोर होऊन बसलें. पवनही सोंसाट्यानें फूं फूं करीत वाहूं लागला, व त्याबरोबर नदीचे तरंगही अधिकाधिक उड्डाण करूं लागले. क्षणांत पवनगति अस्थिर झाली. क्षणांत पूर्वाभिमुख तर क्षणांत दक्षिणाभिमुख! क्षणांत उत्तरगामी तर क्षणांत पूर्वगामी ! आकाशांत तर मेघ-गर्जना होतच होती, व त्या नादाबरोबर विद्युन्नटी रंगांत येऊन आकाश रंगभूमीवर जणूं काय मधें मधें नर्तनच करीत होती ! या गडबडींत नावाड्यांस दि-शाही दिसेनाशा झाल्या. एकमेकांचें बोलणें एकमेकांस ऐकूं येईनासें झालें. इतक्यांत पवनाच्या प्रबळ वेगानें जलतरंगांतही प्रबळ वेग उत्पन्न होऊन एक होडी पाण्यांत बुडूं लागली. सर्व खलाशी तिला किनाऱ्यास आणण्यासाठीं खटपट करूं लागले, पणं व्यर्थ. विद्यु-ल्लतेच्या प्रमादानें मधून मधून उत्पन्न होणाऱ्या क्षण-

मात्र प्रकाशानें ती होडी किनाऱ्याजवळ आणण्याचा ते प्रयत्न करीत. पण होडी किनाऱ्याजवळ येत आहे तोंच दुसऱ्या एका मोठ्या लाटेनें तिला पुनः लांब नेऊन सोडावें असा प्रकार चालला होता. ती होडी त्या प्रबल पुरांत झोकांड्या खाऊं लागली. या गडबडीमुळें कुमार जागा झाला, व आपली आई जवळ नाहीं असें पाहून ओरडूं लागला; पण त्या वेडीनें त्यास थोपटून पुनः निजविलें.

झंझावातानें फारच तुफान होऊं लागलें तेव्हां, खलाशी लोक घाबरून गेले. पुनः होडी किनाऱ्यास लावण्याचा ते प्रयत्न करूं लागले. पण पुनः एक मोठी लाट आली, व त्यासरशी पुनः ती होडी लांब गेली. बिचारे खलाशी आतां तर निराश झाले, व उंच हात करून ईश्वराची प्रार्थना करूं लागले. इतक्यांत एकामागून एक अशा एक, दोन, तीन पर्वतप्राय लाटा येऊन ती होडी पाण्यांत उलथी झाली, व त्यांतील खलाशांबरोबर ती वेडी व करणसिंग पाण्यांत बुडालीं. तीं बुडते वेळीं वेडीच्या हातांतून कुमार सुटला होता. खलाशी लोक चांगले पोहणारे असल्यामुळें ते किनाऱ्यास लागले, पण कोणत्याही उतारूस मदत करूं शकले नाहींत.

इकडे राजगृहांत वेडीचा शोध लावण्यासाठीं सर्व जण निघाले. त्यांनीं तिचा शोध चालविला आहे तोंच

कांहीं वेळानें आकाश घनघोर झालें. वाऱ्याच्या सोसा-ट्यामुळें नाकाडोळ्यांत इतकी धूळ जाऊं लागली कीं कुमाराचा शोध लावण्याचें त्यांनीं सोडून दिलें एवढेंच नव्हे, तर आपलें स्वतःचें रक्षण करण्यास ते असमर्थ झाले. या धुळीच्या वावेटळींत जवळची वस्तु दिसण्यास मारामार पडूं लागली, तेथें लांबच्या वस्तूबद्दल बोला-वयासच नको ! तुफान होत आहे तों पर्जन्यानेंही बरेंच मनावर घेतलें ! घरें व झाडें खालीं पडूं लागलीं, आणि त्यामुळें बरींच मनुष्यें दगावलीं. असा प्रकार होऊं लाग-ल्यामुळें कुमारास शोधण्यासाठीं ह्मणून जे लोक गांवा-बाहेर गेले होते ते जेमतेम एकदां गांवांत आले. जुनीं घरें व झाडें कडकड आवाज करून पडूं लागलीं, व त्या आवाजासरशीं पुष्कळ लोक भयभीत होऊन इक-डून तिकडे तिकडून इकडे नाचानाच करूं लागले. कोणीं कोणास साह्य करूं शकेना. कोणी चुकलेला रस्ता वि-चारला तर त्यास उत्तर मिळेना. असें झाल्यामुळें कुमाराचा शोध तर एका बाजूसच राहिला, पण त्याचा शोध करण्यासाठीं जे बाहेर गेले होते ते, मोठ्या मारा-कुटीनें पुनः राजनगरांत आले. प्रत्येकास असें वाटलें कीं, कोणीना कोणी कुमारास शोधून आणलें असावें ! पण प्रत्येकानें येऊन महाराजांस असें सांगितलें कीं, कुमाराचा पत्ता कांहीं केल्या लागत नाहीं.

सर्व दास दासी शोध करून आल्या तरी करण-सिंगाचा थांग न लागल्यामुळें घोर मेघांनीं आवृत झाले ल्या आकाशाप्रमाणें समरसिंगाचें शांतिहीन हृदय चिंताकुल झालें. वारा व पाऊस यांच्या सपाट्यामुळें भर समुद्रांत पडलेली नौका जशी झोकांड्या खात असते तद्वतच त्याचें हृदय द्विधावृत्ति दिमत होतें. जलवर्षाव अझून चालूच होता. त्याचा आवाज जसजसा त्याच्या कानावर पडत असे, तसतसा पुत्राच्या विपत्तीच्या विचारानें त्यास परिताप उत्पन्न होत होता. तो जसा निराश होऊं लागला तसें त्याचें मनही भ्रमित होऊं लागलें. शेवटीं तो आपल्या कपाळावर हात मारून लहान बालकाप्रमाणें विलाप करीत ह्मणाला— "हे विधात्या! आज तुझी मनकामना पूर्ण झाली! रे दैवा! रे अदृष्टा! या दुर्भागी समराच्या पुत्रास नेऊन या हतभाग्याच्या सर्व आशेचा नाश केलास."

असा विलाप करीत करीत तो नदीतटावर आला. प्रशांत व मृदु शब्द करणारी नदी आज संहारक मूर्तीचें रूप घेऊन नाचत उडत होती. तिच्या पाटीवर एकही होडी दिसत नव्हती. किनाऱ्यावर होड्या बांधून बहुतेक खलाशी लोक पळून गेले होते. समरसिंगानें एका खलाशास विचारलें. "काय हो, या नदीपलीकडे कोणी बायको, एका सुंदर बालकास घेऊन

नतांना तुह्मी पाहिली काय ?" राम असल्यामुळें त्या खलाशानें राजास ओळखलें नाहीं. शिवाय त्याचा पोशाखही अव्यवस्थित असल्यामुळें तो कोणी तरी वेडा असावा अशी शंका येऊन तो खलाशी ह्मणाला, "कोण आहे रे ! वेडा बिडा तर नाहींना तूं ? येथून शेंकडों बायका बरोबर मुलांस घेऊन जातात. आह्मी कोणाला पहायला बसलों आहों ? तीं सुरूप असतात कीं कुरूप असतात, अमुक वर्षांचीं असतात, कीं तमुक वर्षांचीं असतात, हें पहाण्यास आह्मी बसलों नाहीं." समरसिंगानें आणखी दोन तीन असामींस असाच प्रश्न केला, पण त्यांच्याकडूनही असाच जबाब मिळाला. तेव्हां त्यानें दुसऱ्या खलाशांस विचारलें. ते ह्मणाले, "बाबा, आह्मी आपल्या जहाजांत असतों. किनाऱ्यावर कोण येतो आणि कोण जातो हें पहातो कोण ?" दुसऱ्या एका खलाशास विचारल्यावर त्यानें असें उत्तर दिलें, "महाराज ! आह्मी परदेशी आहों, या बाबतीसंबंधी आह्मांस काय माहिती असणार ? दुसऱ्या कोणाला विचारा, ह्मणजे तुमचें काम होईल." या प्रमाणें तपास केला तरी मुलांचा पत्ता लागत नाहीं हें पाहून राजा अत्यन्त निराश झाला. ती वेडी बिन्दु दासी कुमारास बरोबर घेऊन नदीपलीकडे गेली कीं काय हें समजण्याची त्यास फार इच्छा होती; पण त्याच्या प्रश्नाचें

कोणींच उत्तर दिलें नाहीं. तरी ती दासी कुमारास घेऊन चितोड सोडून जाईल असें त्यास मुळींच वाटलें नाहीं.

कोणत्याच रीतीनें कुमाराचा पत्ता लागेना तेव्हां तो आपल्या महालाकडे वळला. मायावी आशेनें त्याच्या हृदयांत असा आशाकिरण उत्पन्न केला कीं, "तूं विनाकारण येथें कां वेळ घालवितोस? घरीं जा. तुझा हृदयमणि दुसऱ्याच मार्गानें महालांत आला आहे. कुमार आपल्या आईच्या मांडीवर खेळत आहे राजभवनांत आनंदीआनंद चालला आहे, आणि तूं मात्र इकडे उगाच फिरतो आहेस. जा, लवकर जा. राजगृहांत तुझी वाट पाहत आहेत." अशा आशेनें राजा राजमहालांत आला. ज्याप्रमाणें शांत सागर पवनवेगास वश होऊन भयंकर दिसूं लागतो, तद्वत् आज ही शांत, गंभीर, व मनोहर मूर्ति शोकोन्मत्त झाली. वाटेत चालतां चालतांही राजा 'कुमार, कुमार' ह्मणून मोठ्यानें हांका मारीत होता; पण कुमार असेल तर ना तो त्या ऐकणार? महालांत आल्यावर खराप्रकार पाहून तो निराश झाला. कमलादेवीनें कंपित हृदयानें विचारलें, "माझा लाडका कोठें आहे?" समरसिंग कुमाराचा शोध लावून आणील असें तिला वाटलें होतें. पण त्यास एकट्याच आलेला पाहून ती 'हाय हाय' करीत मूर्छागत झाली!

राजमहालांत आणि नगरांत हाहाकार उडाला! सारें चितोड त्या रात्रीं निद्राहीन झालें. कुमाराचा शोध कसा करावा, कोठून करावा, आणि कोण करील या विचारांतच रात्र संपून गेली. एक ह्मणाला, "ती वेडी पर्वतावर जाऊन राहिली असेल." दुसरा ह्मणाला, "छे रे! ती पर्वतावर राहणारच नाहीं. ती पहिल्या प्रतीची भित्री आहे!" कोणी ह्मणाले, ती शहरांतच असेल; कोणीं ह्मणाले ती पळून गेली असेल. याप्रमाणें अनेक जण अनेक तर्क करूं लागले. पण होडींत बसून ती वेडी पळून जाईल असें कोणींच अनुमान केलें नाहीं! पहांट होतांच सर्व जण पुनः तपास करण्यास निघाले. तिसऱ्या दिवशीं कांहीं नोकर नदीच्या किनाऱ्यावर सांपडलेलें बिन्दु दासीचें प्रेत घेऊन आले. पण तें प्रेत पाहून समरसिंगाच्या वक्षःस्थळावर वज्राघातच झाल्यासारखें झालें. त्यानें कंपित स्वरानें सेवकांस विचारलें, "हें प्रेत कोठें मिळालें?" ज्यांनीं तें प्रेत आणलें होतें त्यांनीं उत्तर दिलें, "नदीच्या किनाऱ्यावर." राजानें विचारलें, "तेथें कुमार नव्हता काय?" सेवकांनीं उत्तर दिलें, "नाहीं महाराज." राजानें विचारलें, "तर ही वेडी कशी मरण पावली, आणि कुमाराचें काय झालें?" सेवकांनीं उत्तर दिलें, "ती वेडी कुमारास घेऊन होडींत बसली, व तुफान झालें त्यावेळीं ती बुडाली असेल असें वाटतें."

हें ऐकल्याबरोबर कुमार मरण पावला असावा असें समरसिंगास वाटलें. तेव्हां त्याचें प्रेत शोधून आणण्यास त्यानें पुष्कळ लोकांस पाठविलें, पण तें मिळालें नाहीं. मात्र ते, बुडलेल्या होडीचा पत्ता लावून आले. त्यानंतर त्यांनीं होडीवाल्यांचा शोध केला. त्यांच्याकडून असें कळलें कीं, एक स्त्री तीन एक वर्षांच्या सुंदर कुमारास घेऊन होडींत बसली होती खरी. खलाशांनीं त्या बाईचें व त्या कुमाराचें जें वर्णन केलें त्यावरून त्या होडींत बसणारी बिन्दु दासीच होती व तिच्याबरोबर करणसिंगच होता, याविषयीं कोणास शंका राहिली नाहीं. करणसिंग मिळण्याची आतां आशा करण्यांत अर्थ नाहीं, असें समरसिंगास वाटलें. तो प्रथम पासूनच जरी निराश झाला होता, तरी त्याच्या अंतःकरणांत थोडी तरी आशा होतीच; पण तीही आतां नाहींशी झाली! आशा हा एक मनुष्याचा प्रधान जीवनोपाय होय. आशेच्या आधारावर हा संसार चालत आहे. आशा नसेल तर पिता पुत्राचें अथवा पुत्र पित्याचें, माता अपत्याचें अथवा अपत्य मातेचें पालन मुळींच करणार नाहीं. 'आतां मला लेशमात्रही आशा नाहीं' असें आह्मी ह्मणतों त्या समयीं सुद्धां आशेचा जीर्ण बिन्दु कां होईना? पण तो हृदयांत असतोच हें कोणास सांगावयास नकोच! जेव्हां

सर्व श्रम विफल होतात तेव्हां आशेवर मात्र प्राणी जीवंत राहतो. पण जेव्हां सर्व आशा पार नाहींशी होते तेव्हां तो मरण पावतोच. याप्रमाणेंच, कुमाराचा शोध लागला नसतांही, तो कदाचित् जिवंत असेल, अशा आशेवर समरसिंग धीर धरून राहिला.

* * * * *

रात्रीचा वेळ. अंधकार काळाकभिन्न आकाश नीलवर्ण झालेलें. कोणी कोणास दिसेना. अशा वेळीं चितोड येथील एका चतुर्भुजा देवीच्या मंदिरांत एक मनुष्य हातांत खड्ग घेऊन उभा होता. चोंहींकडे शून्य दिसत होतें. पशुपक्ष्यांचाही स्वर ऐकूं येत नव्हता. मात्र मधून मधून शिवांचा अशिव रव ऐकूं येई; तरी त्या एकाग्रचित्त होऊन उभा राहिलेल्या मनुष्याच्या कर्णरंध्रांत तो शिरत नव्हता. त्याचे नेत्र झांकलेले व मुख खालीं केलेलें होतें. तो मुखानें प्रार्थना करीत होता; पण त्याचा शब्द कोणी अगदीं जवळ राहिला असता तरी त्यास ऐकूं आला नसता. असें होतें तरी तो मधून मधून जो दीर्घ निःश्वास सोडी त्याचा मात्र त्या मंदिराच्या गाभाऱ्यांत भयंकर प्रतिध्वनि निघत असे. कष्ट आणि निराशा यांमुळें त्या पुरुषाचें मुख अत्यन्त म्लान झालें होतें, व तो देवीच्या उपासनेंत लीन होऊन गेला होता. त्यानें कांहीं वेळ डोळे उघडले, देवीला

चंदनाचें गंध लाविलें, व तिच्यावर फुलें घातलीं. हा पुरुष कोण? हा चितोडाधिपति समरसिंग होय. यावेळीं त्याच्या मस्तकावर मुकुट नव्हता; त्याचप्रमाणें त्यानें कोणतेंही राजचिन्ह धारण केलें नव्हतें. तो सामान्य परिवेषानें उभा राहिला होता. त्याच्या म्लान मुद्रेवरून हा चितोडाधिपति आहे असें कोणासच वाटलें नसतें. त्यानें पूजन केल्यावर मोठ्या भक्तिभावानें देवीस साष्टांग नमस्कार घातला, व जवळ ठेवलेला मुकुट हातीं घेऊन देवीस संबोधून ह्मणाला, "हे चतुर्भुजे देवी! आज तुझ्या चरणकमलावर ह्या राज्यमुकुटाचा परित्याग करतों. आजपासून मी हा कधींही धारण करणार नाहीं. कोणताही वस्त्रालंकार अथवा राजचिन्ह—क्षत्रियास योग्य अशा शस्त्राशिवाय अन्य—धारण करणार नाहीं. या मस्तकावर फक्त जटाच धारण करीन, व आजपासून मला कोणी राजा ह्मणूं नये अशी ताकीद देईन. हे भगवति! माझ्या अंतःकरणांत जें वृथा अहंकारानें घर केलें आहे त्याचा त्याग करीन; परंतु ज्याच्या योगानें हा माझा अहंकार शांत झाला आहे, ज्यानें माझी बहु यत्न संचित आशा विफल केली आहे, त्याला विसरणार नाहीं. देवी! माझी ही इच्छा तूं पूर्ण कर. मी तुझा सदा दासानुदास आहें." एवढें बोलून समरसिंगानें देवीच्या चरणकमलावर मुकुट ठेवला व पुनः

तो राजमहालांत आला. या दिवसापासून त्याचें नांव योगीन्द्र असें पडलें, व यानंतर या कथाभागांत त्यास याच नांवानें आह्मी ओळखूं ह्मणजे झालें!

---

## प्रकरण ४ थें.

### पर्णकुटी.

यमुना नदी शांतपणें वहात होती. तिच्या लहरी अलवरच्या किनाऱ्यावर वारंवार आघात करीत होत्या. अलवरपासून थोड्या अंतरावर एका निर्जन स्थळीं एक आश्रम होता. त्यांत एक जोगी आणि एक कुमार रहात असत. मागें सांगितलेल्या गोष्टीस सात वर्षें होऊन गेलीं होतीं. सध्यां ११०३ शक चालला होता. प्रभातकालचा समय होता. पूर्व दिशेकडे नवयौवना उषा आपलें गौरव प्रकट करीत होती; पक्षी मोठ्या उल्हासानें कलरव करीत होते; त्रिविध समीर मंदमंद वाहून नवपल्लवयुत तरूंचें प्रेमानें चुंबन घेत होता; आणि त्याच्या प्रेमभरित चुंबनानें निद्रिस्त झालेली

दूलकलिका, अ ा रंगाच्या छटेनें नेत्र उघडून प्रेमभरानें त्याच्याकडे अवलोकन करीत होती!

अशावेळीं त्या एकांत आश्रमानजीक एक होडी येत होती. ती किनाऱ्याजवळ येतांच त्यांतील एक मनुष्य होडीवाल्यास म्हणाला, "होडी किनाऱ्यास लाव, मला येथेंच उतरावयाचें आहे." होडी, तरंगांमध्यें डुलत डुलत हळू हळू किनाऱ्यास येऊन लागली. नंतर त्यांतून एक प्रौढ पुरुष, एका बालिकेस घेऊन खालीं उतरला. त्या पुरुषाचें वय सरासरी चाळीस वर्षांचें होतें. त्याच्या डोक्याचे आणि दाढीचे केंस श्वेतवर्ण झाले होते व तोंडावर सुरकुत्या पडल्या होत्या. त्याच्या चेहऱ्यावरून त्याला कसली तरी मोठी घोर चिंता लागली आहे, असें कोणालाही सहज अनुमान करतां आलें असतें; पण युवावस्थेंत हा मनुष्य पूर्ण सुखाचा भोक्ता असला पाहिजे, असेंही त्याच्या मुद्रेवरून व्यक्त होई. त्याचीं वस्त्रें लाल रंगाचीं होतीं. त्याच्या बरोबर असलेली बालकन्या पांच वर्षांची होती. तिनें नवीनच वस्त्रें धारण केलीं होतीं. तिचे भ्रमरासारखे काळेभोर केश पाठीवर पडले होते. तिचें कपाळ तेजस्वी दिसत होतें. नेत्र सुकुमार पण चंचल होते, व त्यांतून बुद्धिरूप ज्योतीचा प्रकाश पडत होता. तिच्या अधरांवर शैशवावस्थेंतील कोमल आणि मधुर

हास्य प्रकट होत होतें. तिच्या स्वरूपाबरोबर बुद्धीच्या सौंदर्याचा समागम झाल्यामुळें तिचें मुखमंडल अधिकच शोभायमान दिसत होतें. त्या चन्द्रवदनेचीं वस्त्रें तिच्या पित्याप्रमाणें निस्तेज नव्हतीं. तर तिच्या वस्त्रभूषणावरून पहातां ती कोणी तरी धनसंपन्न पुरुषाची कन्या असावी असें स्पष्ट दिसत होतें.

ही कन्या व वृद्ध पुरुष होडींतून उतरून किनाऱ्यावर आलीं. नंतर त्या वृद्धानें आपल्या हातांतील पेटींतून कांहीं पैसे काढून होडीवाल्याला दिले. ह्या पैशांबरोबरच त्याच्या हातांत एक कागदाचा तुकडा आला. पुनः त्यानें आणखी दोन कागदाचे तुकडे पेटींतून काढून ते तिन्ही नदींत फेंकून दिले पण ते पाण्यावर तरंगत राहिले. नंतर तो पुरुष त्या कन्यकेस घेऊन किनाऱ्यावरच्या भागास आला. तेव्हां ती कन्यका ह्मणाली, "बाबा, घरीं येतांना?" तिचा पिता गंभीर स्वरानें ह्मणाला, "शैल ( हें त्या कन्येचें नांव होतें ) तुझ्या पित्याला आतां कोठलें घर!" तेव्हां त्या कन्येनें विचारलें, "तर मी कुठें राहूं?" तो वृद्ध पुरुष ह्मणाला, "वनांत, दुसऱ्या कोठें!" कन्या ह्मणाली, "चला तर वनांत, मी तेथें येतें. बाबा, वन कसें असतें?"

आपल्या पित्यावर कोणती विपत्ति आली आहे व तो घर सोडून वनवास करण्यास कां निघाला आहे हें

त्या अज्ञान कन्यकेस ठाऊक नव्हतें. तिचा पिता अगाध दुःखसागरांत गटंकळ्या खात होता, तरी पण आपल्या कन्येचे बोबडे बोल ऐकतांच आपल्या दुःखाग्नीवर शांतिजलाचा वर्षावच झाला असें त्यास वाटलें, आणि त्याचे नेत्र आनंदाश्रुपूर्ण झाले. नंतर खालीं वांकून त्यानें मोठ्या प्रेमानें तिचें चुंबन घेतलें, पण पुन्हा तो चिंताकुल झाला. हा वृद्ध खालीं दृष्टि देऊन चालला होता, पण कन्या आसपासचें सृष्टिसौंदर्य पहात होती. ती थोडेंसें चालून गेल्यावर ह्मणाली, "बाबा, तो पहा, तिकडून आपल्याकडे पहात कोण येत आहे." त्या पुरुषानें पाहिलें तो एक संन्यासी त्याच्या दृष्टीस पडला. तो प्रातर्विधि उरकून त्या वाटेनें चालला होता. त्यानें त्या पितापुत्रीचें सगळें भाषण ऐकलें होतें. थोड्या वेळानें तो त्यांच्या जवळच आला. संन्याशास पाहून त्या वृद्ध पुरुषानें त्यास प्रणाम केला. तेव्हां संन्यासी आशीर्वाद देऊन ह्मणाला,— "माझ्या बरोबर चला." संन्याशाचें तें अनपेक्षित भाषण ऐकून, त्या वृद्ध पुरुषास धास्ती पडली, आणि त्यानें त्याचें कारण विचारलें. तेव्हां संन्यासी ह्मणाला, "कारण विचारण्याचा अथवा सांगण्याचा हा वेळ नव्हे, मग सांगेन" तें ऐकून त्या वृद्धास अधिकच आश्चर्य वाटलें; पण कन्येबरोबर मुळींच भाषण न करतां तो हळू हळू संन्याशाच्या मागून चालला.

ह्या स्थळापासून थोड्या अंतरावर अलवरच्या सीमे-वर पर्वतांच्या एकसारख्या रांगा लागून गेल्या आहेत. त्यांपैकीं एका पर्वतावर ह्या संन्याशाची पर्णकुटी होती. तेथें तो त्यांस घेऊन चालला ह्या पर्वताजवळ जा-ण्याची वाट फारच बिकट होती. अपरिचित माणसास तर तेथून जाण्यास फारच प्रयास पडत असत. पण कित्येक प्रसंगीं तसेंच अगत्याचें काम असलें ह्मणजे मात्र ह्या दुर्गम रस्त्यावरून जाणारे कांहीं लोक आढ-ळत. अजमीरापासून दिल्लीस जे रस्ते जातात त्यांत हा सर्वांत लहान होय.

संन्याशाला झोंपडीकडे येतांना पाहून, एक दहा वर्षांचा कुमार हंसत हंसत त्याच्याकडे धांवून आला आणि "बाबा! बाबा!" असें बोलून त्याचा हात धरून ह्मणाला, "आपण ही झोंपडी सोडून कधींही बाहेर जात नव्हतां, आणि कालच रात्रीं मला एकटा टांकून कोठें गेलां? आणि आपणास इतका वेळ कां लागला? आतां मी तुह्मास मला एकट्याला सोडून जाऊं द्यायचा नाहीं. पण हे लोक कोण?" "ठीक, ठीक! आतां मी तुला एकट्याला सोडून जाणार नाहीं," संन्यासी ह्म-णाला; "आतांपासून मी तुला बरोबरच घेऊन जाईन. हे लोक आपले अतिथि आहेत, आणि त्यांना थोडे दिवस येथेंच रहावयाचें आहे." हें ऐकून त्या कुमारास

फार आनंद झाला, आणि अतिथींची सेवा करण्याकरतां तो लागलाच झोंपडींत धांवत गेला.

झोंपडीमध्यें थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर तो वृद्ध पुरुष संन्याशास ह्मणाला, "आपण आह्माला येथें कां बोलावून आणलें?" तेव्हां संन्याशानें विचारलें, "प्रथम आपण काठून आलां तें सांगा." तो वृद्ध पुरुष ह्मणाला, "महाराज, माफ करा, तें सांगण्यासारखें नाहीं." तें ऐकून संन्याशी ह्मणाला, "चिन्ता नाहीं. मी हें सहजच विचारलें. तुह्मी तें सांगणार नाहीं हें मला ठाऊकच होतें पण मला ठाऊक आहे कीं, आपण कोणी थोर मनुष्य असून येथें लपण्यासाठीं आलां आहां." " तो पुरुष ह्मणाला, "हें आपणास कसें समजलें?" संन्यासी ह्मणाला, "आपण ह्या कन्येबरोबर जें भाषण केलें त्यावरून मी हें ताडलें. पण आपण निर्धास्त रहा, आपणाप्रमाणें मीही पूर्वी सुखावस्थेंत होतों आणि आज ही दशा भोगीत आहें. मी सुद्धां गुप्तवेषानें फिरलों आहें. परंतु माझा देश मीं सोडला नाहीं. पण आतां या गोष्टीची काय गरज आहे? आपणास येथें लपून रहावयाचें आहे कीं नाहीं तें सांगा." "होय." तो वृद्ध पुरुष ह्मणाला.

संन्यासी ह्मणाला, "जर आपणास हरकत नसेल तर येथ खुशाल रहा. ही झोपडी अगदा एकांतांत

आहे, आणि ह्मणूनच मी आपणास येथें आणलें आहे." तो पुरुष अति दुःखानें ह्मणाला, "महाराज! आह्माला आश्रयरहित पाहून आपण येथें बोलावून आणलें, पण येथें रहाण्याची माझी इच्छा नाहीं. कारण, त्यापासून आपणास भीति आहे. साधु पुरुष हे उपकारी असतातच, पण सुहृद्य जनांनीं त्यांच्या त्या गुणांचा दुरुपयोग करतां नये."

हा पुरुष दुसऱ्याच्या अनुग्रहाची आशा करणारा नाहीं असें संन्याशानें जाणलें, तरीही तो स्वतः फार सुस्वभावी असल्यामुळें पुनः ह्मणाला, "तुह्मी आमचें वाईट होईल याबद्दलची काळजी सोडा; आमचें कोणाच्यानेंही वाईट करवणार नाहीं. आपली कोणाच्याही सहवासांत रहाण्याची इच्छा नाहीं हें मला समजलें. पण इतर कुटिल लोकांबरोबर तुह्मी माझी तुलना करूं नका. मी संन्यासी आहें. मी आपणास आपल्या पित्याप्रमाणें आहें. आपल्याजवळ रहाण्याची माझी इच्छा आहे. तेव्हां माझी इच्छा पूर्ण करा. मला दुःख होईल असें करूं नका." तो वृद्ध पुरुष संन्यासी व साधुसंतांचा मोठा उपासक होता. त्याला असें भय पडलें कीं, संन्याशाची विनंति जर आपण मान्य केली नाहीं तर कदाचित् तो शापही देईल, व त्यामुळें आपलें फार अनिष्ट होईल. ह्मणून संन्याशानें सांगितल्याप्रमाणें तेथें रहाण्यास तो कबूल झाला.

नंतर त्या संन्याशानें ह्या अतिथींची चांगल्या रीतीनें सेवाचाकरी केली, आणि तो वृद्ध पुरुषही भय सोडून संतोषानें तेथें राहिला. हा पुरुष कोण होता तें आपणास पुढें कळेल.

संन्यासीपुत्र आणि शैलबाला या दोघांची हळू हळू एकमेकांवर फार प्रीति जडली. एके दिवशीं तीं दोघें बालकें बरोबर खेळत होतीं व नानाप्रकारच्या गोष्टी करीत होतीं. इतक्यांत शैलबाला ह्मणाली, "येथें खालीं ही नदी आहे नव्हे? आमचें घर कांहीं असें नव्हतें." संन्यासीबाल ह्मणाला, "तर तुमचें घर कसें होतें?" शैलबाला ह्मणाली, "आमचें घर नदींतच होतें. तेथें आह्मी हातानें पाणी काढीत असूं, तरंगत असूं, आणि लांकडाच्या घरांत राहात असूं. त्या घरास होडी ह्मणतात." संन्यासीपुत्र ह्मणाला, "तूं आमच्यासारख्या घरांत कधींच राहिली नाहींस?" शैलबाला ह्मणाली, "नाहीं." संन्यासीबाल ह्मणाला, "पण असलें घर तूं कधीं पाहिलें तरी आहेस?" शैलबाला ह्मणाली, "कां नाहीं? याच्यापेक्षां मोठमोठीं घरेंदेखील पाहिलीं आहेत. मग यांतच मोठें तें काय? आमच्या होडींतून आह्माला पुष्कळ घरें दिसत." संन्यासीबाल ह्मणाला, "तर मग असलीं घरें पहाण्याची तुला इच्छा होत नाहीं?" शैलबाला ह्मणाली, "इच्छा तर हो-

तेच. मी बाबांना चला मला तें घर दाखवा, ह्मणून नेहमीं ह्मणत असें. पण त्यांनीं माझें कधींही ऐकलें नाहीं." संन्यासीबाळ ह्मणाला, "आतां तरी तुला तसल्या घरांत रहाण्याची इच्छा होते काय?" शैलबाला ह्मणाली, "होय, कां नाहीं होणार?" संन्यासीबाळ ह्मणाला, "तर मग तसलें घर सोडून तूं ह्या वनांत कां आलीस?" कन्या ह्मणाली, "बाबा आले ह्मणून मीही आल्यें." संन्यासीबाळ ह्मणाला, "मग तुला ही झोंपडी आवडत नाहीं तर." कन्या ह्मणाली, "जेथें बाबा रहातील तेथेंच मी राहीन. मला त्यांतच आनंद वाटतो." बालक ह्मणाला, "तर मग तुझा बाप गेला तर तूंही जाशील?" कन्या ह्मणाली, "यांत काय संशय?" नंतर तो ह्मणाला, "चल मी तुला माझा मोर दाखवतों. तो मोठी मौज करतो." असें ह्मणून तो शैलबालेस बरोबर घेऊन गेला. या संन्यासीबालकाचें नांव दिलीपसिंग होतें. तीं दोघेंही झोंपडीच्या मागच्या बाजूस गेलीं, तों दिलीपाचा मोर उडत असलेला शैलबालेच्या दृष्टीस पडला. त्यास पाहून ती ह्मणाली, "वाहवा! किती सुंदर पक्षी आहे! मी याला पकडतें," असें बोलून ती त्याला पकडण्यासाठीं धांवली. पण तिच्या पावलांचा शब्द ऐकतांच मोर उडून गेला, आणि एका झाडावर जाऊन बसला.

दिलीप ह्मणाला, " तो तुला सांपडणार नाहीं, मीं त्याला पकडून आणून तुला देतों. तूं धावूं नको." परंतु त्या कन्येनें तें ऐकलें नाहीं. ती धांवली व दिलीपही तिच्याबरोबर धावूं लागला. पर्वतावर चालण्याची संवई नसल्यामुळें शैलबालेस एक दगडाची ठोकर लागली, आणि ती खालीं पडणार इतक्यांत दिलीपानें तिला सांवरून धरली आणि विचारलें, " कांहीं लागलें बिगलें नाहींना ?" तिनें डोकें हालवून 'नाहीं' असें सांगितलें तेव्हां दिलीपास फार आनंद झाला. नंतर दिलीपानें, "चेटक! चेटक! इकडे ये," ह्मणून मोरास त्याच्या नांवानें हांक मारून जवळ बोलावलें, तेव्हां तो लागलाच त्याच्याजवळ आला. तें पाहून शैलबालेस फार आश्चर्य वाटलें. ती दुःखित होऊन ह्मणाली, "हा तुझ्याजवळ आला, आणि माझ्याजवळूनच कां पळून गेला? आतां मी याला हातदेखील लावणार नाहीं." हें ऐकून दिलीपास फार वाईट वाटलें आणि तो ह्मणाला, "तूं परकी आहेस, ह्मणून तो तुला ओळखत नाहीं. आतां तूं याच्याबरोबर खेळ, काय पाहिजे तें कर, तो उडून जाणार नाहीं." दिलीपाला वाईट वाटलें आहे असें पाहून शैलबाला ह्मणाली, "असें आहे तर मी खेळेन." नंतर दिलीपानें मोर पकडून शैलबालेच्या हातांत दिला. पण

तिच्या अपरिचित हाताचा स्पर्श त्यास होतांच तो पंख हालवून उडून गेला. हें पाहून शैलबाला ओशाळली आणि रागानें ह्मणाली, "आतां तर मी याला कधींच घेणार नाहीं." नंतर दिलीप त्या मोरास हातांत घेऊन ह्मणाला "चेटक! तूं कां उडालास? जा आतां मीदेखील तुला कधीं घेणार नाहीं." असें ह्मणून त्यानें त्याला उडवून लावला. तो लांब जाऊन एका झाडावर बसला आणि टूह टूह असा शब्द करूं लागला.

नंतर शैलबालेस आनंद व्हावा ह्मणून दिलीपानें "माझे दुसरे पशु तुला दाखवितों" असें ह्मणून तिला हरण, घोडे वगैरे दाखविले. घोडे पाहून शैलबाला ह्मणाली, "एवढ्या मोठ्या घोड्यांबरोबर तूं कसा खेळतोस?" दिलीप ह्मणाला, "मी यांच्यावर बसतों." शैलबालेनें पूर्वी कधींही घोडा पाहिला नसल्यामुळें तिला हें भाषण ऐकून फार आश्चर्य वाटून ती ह्मणाली, "तर मग तूं चढ, मी पहातें." लागलाच दिलीप घोड्यावर बसला, आणि त्यानें इकडे तिकडे दोन तीनदां त्याला फिरविलें. तें पाहून शैलबालेस अत्यानंद होऊन ती टाळ्या पिटूं लागली. नंतर ती धांवत धांवत आपल्या बापाकडे गेली आणि ह्मणाली "बाबा! बाबा! पहा, दिलीप कसा घोड्याबरोबर खेळत आहे. मी खेळूं का बाबा?" असें ह्मणून ती झोंपडीच्या बाहेर दिलीपाजवळ आली, तेव्हां दिलीपानें घोड्याची लगाम ढिली

करून तिला विचारलें, "तुला बसायचें आहे?" तें ऐकून शैलबाला भीतियुक्त स्वरानें ह्मणाली, "होय मी बसतें, तूं मला हात दे." दिलीप घोड्यावरून खालीं उतरला आणि शैलबालेस घोड्यावर बसवून ह्मणाला, "मी तुला धरतों, नाहींतर तूं पडशील." असें ह्मणून त्यानें तिचा हात धरला आणि हळू हळू तिला झोंपडीशेजारीं आणलें. झोंपडीजवळ येतांच शैलबाला ह्मणाली, "बाबा! बाबा! पहा, मी दिलीपाच्या घोड्यावर कशी सुरेख दिसतें!" तिची बोबडी वाणी ऐकून तिच्या वृद्ध पित्यास आणि संन्याशास हंसूं आलें.

---

## प्रकरण ५ वें.

## शैलबाला गेली!

ह्याप्रमाणें तो वृद्ध पुरुष तीन चार वर्षें त्या झोंपडींत सुखरूप राहिला. पण मनुष्यावर एकदां संकटें येऊं लागलीं ह्मणजे तीं त्याचा पुरा पिच्छा पुरवितात. हा वृद्ध पुरुष कोणालाही पीडा न करतां तेथें राहिला असतां अकस्मात् त्याला तेथून पळून जाणें भाग पडलें.

संध्याकाळचा वेळ होता, गगनमंडल मेघावृत झालें होतें, चोंहींकडे अंधकार पडला होता, क्षणोक्षणीं वीज चमकत होती, पावसाचा थेंबसुद्धां पडत नव्हता, तरी तो पडण्याचीं सर्व चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. दिवा पेटत असल्यामुळें त्या झोंपडींत मात्र प्रकाश होता. झोंपडीबाहेर त्या वृद्ध पुरुषाची नऊ वर्षांची कन्या खेळत होती. अशा वेळी संन्यासी आणि तो वृद्ध पुरुष दारावर उभे राहून बोलत होते.

संन्यासी ह्मणाला, "आकाश भयानक होऊन गेलें आहे, आणि त्याच्यावर काळी छटा पसरली आहे. आतां मोठ्या जोराचा पाऊस पडेल यांत संशय नाहीं." तो वृद्ध पुरुष ह्मणाला, "महाराज, वृष्टि होऊन गेल्यावर हा अंधकार नाहींसा होईल, पण माझ्या हृदयांत जो अंधकार वसत आहे तो कोणत्याच प्रकारें नाश पावणारा नव्हे." संन्यासी ह्मणाला, "महाशय, तुह्मी अशी चिन्ता करूं नका. दुःखदेखील ह्या मेघघटेप्रमाणेंच येतें व निघून जातें. काय, तुमचेंच दुःख अपार आहे असें तुह्माला वाटतें? अहो, या सृष्टीमध्यें नियंत्यानें दुःखच निर्माण केलें आहे. सुख हें आपण मानून घेतलें पाहिजे. सृष्टींत सुख हें नाहींच. जितकें जितकें दुःख कमी तितकें तितकें सुख जास्त, असें मानलें पाहिजे! ज्याप्रमाणें जन्म हाच मृत्यु, त्याचप्रमाणें

दुःख हेंच सुख होय. ह्या लोकीं सुख तें कसलें? येथील सुख ह्मणजे अस्थिर, चंचल, अशांत निराशा उत्पन्न करणारें, माझें तुझें ह्मणवणारें, मोहवश राखणारें आणि प्रियवस्तूच्या आवर्जनविसर्जनकालीं संताप देणारें आहे. तेव्हां अविद्येनें घेरलेलें हें जगत्, यांपैकीं सुख कशास समजतें? जो मनुष्य दुःखांत सुख मानतो तो ह्या लोकीं जरी नाहीं तरी परलोकीं सुख पावतो. आपण निराश होण्याचें कारण नाहीं. नळ, हरिश्चंद्र, राम, युधिष्ठिर इत्यादिकांच्या दुःखाचें वर्णन आपण ऐकलें नाहीं काय? मग त्यांच्यापुढें तुमची ती कथा काय? त्यांच्यापुढें तुह्मी कांहींच नाहीं. ह्मणून ह्मणतों तुह्मी धीर धरा, आणि आलेलें दुःख सहन करा. प्रभु सर्व कांहीं चांगलें करील."

ह्याप्रमाणें त्यांचें भाषण चाललें असतां मेघांचा गडगडाट सुरू झाला; टपटप पडणाऱ्या जलकणांचा शब्द ऐकूं येऊं लागला; व पर्जन्यवृष्टि होऊं लागली; मेघगर्जना आणि विद्युन्नाद यांच्या योगानें पृथ्वी कंपायमान होऊं लागली; चपला शीघ्र गतीनें आकाशांत इकडून तिकडे धावूं लागली; पृथ्वी अंधकारमय झाली; आकाश मेघावृत झालें; वृष्टिधारा अविश्रांत चालली. सारांश, निसर्गदेवतेनें भयानक स्वरूप धारण केलें. वारा सोसाट्याचा वाहूं लागल्यामुळें झोंपडीच्या दर-

वाजावर पावसाची झड येऊं लागली तेव्हां संन्याशानें दरवाजा बंद केला आणि ते दोघे एका ठिकाणीं जाऊन बसले. पण थोडा वेळ झाला नाहीं तोंच दरवाजा कोणी ठोठावीत आहे असें पाहून संन्यासी बसलेल्या ठिकाणावरूनच ह्मणाला, "कोण आहे रे?" बाहेरून उत्तर आलें, "मी प्रवासी आहें. पाऊस पुष्कळ पडत आहे आणि रात्र तर अंधारी, ह्मणून माझ्यानें पुढें जाववत नाहीं, तर कृपा करून मला आश्रय द्या." संन्याशानें दरवाजा उघडल्याबरोबर एक वृद्ध गृहस्थ आंत आला. त्याचें सर्वांग पाण्यानें चिंब भिजून गेलें होतें, त्याचे हातपाय कांपत होते, आणि थंडीमुळें ओंठ काळसर झाले होते. वृद्धावस्थेंत थोडी जरी सरदी झाली तरी त्यापासून त्रास फार होतो. पण धन्य त्या कृषिकारांची, कीं जे रात्रंदिवस शीतोदकांत राहून मनुष्यमात्राचें पोषण करण्याकरतां अन्न उत्पन्न करीत असतात! झोंपडींत आल्यानंतर संन्याशानें त्या वृद्ध प्रवाशास कोरे कपडे दिले. ते अंगावर घेऊन तो त्याच्या शेजारीं विस्तवाजवळ शेकत बसला.

त्या प्रवाशास पहातांच त्या वृद्ध पुरुषाच्या काळजांत एकदम धडकी बसली. त्यानें आपलें सर्वांग वस्त्रानें झांकून घेतलें, व तो दूर एका कोपऱ्यात जाऊन बसला. प्रवासी हात पाय शेकत असतां संन्यासी त्यास

ह्मणाला, “ महाराज, अशा भयंकर प्रसंगीं आपण कुठें चालला होतां ? ” प्रवासी ह्मणाला, “ महाराज, मी दिल्लीस जात आहें. कारण, माझा धनी चंद्रपति तेथें आहे. ” संन्याशानें विचारलें, “ पण सुगम मार्ग टाकून या विकट मार्गानें आपण कां आलां ? ” प्रवासी ह्मणाला, “काम फार घाईचें असल्यामुळें हा रस्ता धरावा लागला आहे.” संन्याशानें विचारलें “ असें उतावळीचें काम आहे तरी कसलें ? ” प्रवासी ह्मणाला, “ काय माझें कपाळ सांगूं ? आमचे स्वामी चंद्रपति यांचा विवाह होणार आहे. ” संन्यासी ह्मणाला, “ वाहवा ! ही तर मोठ्या आनंदाची गोष्ट आहे; मग आपणाला त्याबद्दल वाईट तें कां वाटतें ? ” प्रवासी ह्मणाला, “ असल्या गोष्टी आपल्यासारख्या तापसीजनांना कळत नाहींत. वाटेल त्या ठिकाणच्या वाटेल त्या कुळांतील एखाद्या कन्येबरोबर महाराज लग्न करतील. दोन चार दिवस झाले, कीं त्या राणीसाहेब आमच्यावर हुकूम फर्मावण्यास सुरवात करतील. हे जुने नोकर आहेत, तेव्हां यांना अयोग्य हुकूम कसा करूं हें त्यांच्या मनांतसुद्धां येणार नाहीं. मग आम्हाला वाईट वाटणें बरोबर आहे कीं नाहीं ? ” त्या प्रवाशाचें तें दुःखाचें कारण ऐकून संन्यासी मोठमोठ्यानें हांसूं लागला; तेव्हां प्रवासी मोठ्या करुणस्वरानें ह्मणाला

"महाराज, आपण हंसतां तें ठीकच आहे. आपणासारख्या जोग्यांस संसारी लोकांचें दुःख काय ठाऊक?"

संन्यासी हंसें दाबून पुनः ह्मणाला, "बरें तें असो. पण तुमचा धनी अजमीरचा असून त्याचा विवाह दिल्लींत कसा होणार ?"

प्रवासी ह्मणाला, "आमचा स्वामी दिल्लीश्वराचा परममित्र आहे, आणि दिल्लींतच मोठ्या थाटानें एका कन्येबरोबर लग्न करावयाचें अशी त्यांची इच्छा आहे. असें सांगतात की ती कन्या बारा वर्षांची असून स्वरूपानें फार सुंदर आहे. ती रूपानें रतीलाही लाजविणारी, बुद्धीनें सरस्वतीसही मागें टाकणारी, व शौर्यानें चंडिकेसही दिपविणारी अशी आहे ! आमचा स्वामी तिला पहातांच मोहित होऊन गेला. तेव्हां आतां आमचा मानमरातब रहाणार नाहीं. घरीं आल्यावर ती रूपवती काय करील आणि काय नाहीं याची कल्पना तरी करतां येते काय ?" संन्याशानें विचारलें, "दिल्लींत कसा समारंभ व्हावयाचा आहे ?" प्रवासी ह्मणाला, "चारी दिशांच्या राजांना आमंत्रण केलें आहे, व त्यांपैकीं बहुतेक तेथें येऊन दाखलही झाले आहेत. मात्र कान्यकुब्जपति जयचंद्र महाराज आले नाहींत. चितोडचा समरसिंग तर सहपरिवार आला आहे; पण राजाच्या पट्टराणीची नणंद कमलादेवी न

आल्यामुळें महाराजांस फार खेद झाला आहे." संन्याशानें विचारलें, " कमलादेवी कां आली नाहीं ? " प्रवासी ह्मणाला, " तिचा पुत्र करणसिंग बुडून मरण पावल्यापासून ती कसल्याच आनंदोत्सवास जात नाहीं. ती जरी जिवंत आहे तरी तिला जिवंत असून नसून सारखेंच असें वाटत आहे." संन्याशानें विचारलें, "काय ? समरसिंगाचा मुलगा पाण्यांत पडून मरण पावला अशी गोष्ट कशी झाली ? " हें ऐकून प्रवाशानें त्याला सर्व वृत्तांत सांगितला. नंतर तो ह्मणाला, " आतां ही गोष्ट बोलून विशेष फळ काय ? उलट तिच्या स्मरणानें उगाच खेद मात्र व्हावयाचा. ह्या समारंभाच्या वेळीं दिल्लीश्वर आमच्या स्वामीस 'कवीश्वर' हें पद देणार आहे." संन्यासी आश्चर्यानें ह्मणाला, "काय तुमचे महाराज कविही आहेत ?" प्रवासी विशेष आश्चर्यानें ह्मणाला, " कवि ! आपण इतके जवळ रहात असून आपणास ही गोष्ट ठाऊक नाहीं ! दूरदूरच्या देशांत देखील त्यांचें कवि हें नांव प्रसिद्ध झालें आहे, आणि तुह्माला हें कसें ठाऊक नाहीं ! ते तर मोठे अद्वितीय कवि आहेत." संन्यासी ह्मणाला, " ही गोष्ट मला ठाऊक नाहीं."

हें ऐकून प्रवाशास फार आश्चर्य वाटलें, पण हा संन्यासी एकमार्गी असल्यामुळें संसारसंबंधी गोष्टींवर

मन ठेवीत नसेल व ह्मणून ही गोष्ट त्यास कळली नसेल असें त्यास वाटून तो ह्मणाला, "ह्या विवाहप्रसंगीं दिल्लीश्वरानें चंद्रपतीला कवि पद दिल्यावर, तो केवळ राजाच नव्हे, तर कविही आहे हें प्रत्येक सामान्य मनुष्यास देखील कळेल, आणि महाराजाधिराज पृथुराजाच्या आज्ञेनें त्याला लोक कविचंद्र असेंच ह्मणूं लागतील. दिल्लीश्वर असें मानतात कीं जगतामध्यें राजांपेक्षांही कवि श्रेष्ठ असून त्यांच्या कीर्तिचंद्रापुढें राजांचा कीर्तिचंद्र लोपून जातो." संन्याशानें तें भाषण तेथेंच पुरें करवून पुनः विचारलें, "पण ह्या समारंभास कान्यकुब्जपति जयचंद्र कां आला नाहीं? पृथुराज आणि जयचंद्र यांचें कांहीं नातें आहे असें ही सांगतात; मग असें कां?" प्रवासी ह्मणाला, "कारण दुसरें काय असणार? लोभ आणि स्वार्थपरायणता. स्वर्गवासी दिल्लीश्वरानें जयचंद्रास गादी न देतां पृथुराजास दिली हेंच त्यांच्या वैराचें कारण. पृथुराज चक्रवर्ती राजा झालपापासून जयचंद्र द्वेषानें जळून भस्म होत आहे. आणि लोकांत अशीही बोलवा आहे कीं, या द्वेषामुळें जयचंद्र एक नीच कार्य करण्यासही तत्पर झाला आहे. जयचंद्राच्या पित्यानें त्याच्या मनांत काय भरवून दिलें आहे कोण जाणे. कारण, तो जेव्हां गादीवर बसला तेव्हांपासूनच तो दिल्लीश्वराचा द्वेष करीत आहे आणि कलहाला कांहीं तरी कारण शोधीत आहे."

याप्रमाणें भाषण चाललें असतां त्या प्रवाशाची दृष्टि त्या वृद्ध पुरुषावर गेली. तेव्हां तो ह्मणाला, "हा कोण बसला आहे?" संन्यासी ह्मणाला, "तो माझा शिष्य आहे." प्रवासी ह्मणाला, "मग हीं मुलें कोणाचीं?" संन्याशानें उत्तर दिलें, "तो बालक माझा पुत्र आहे आणि कन्या ह्या शिष्याची मुलगी आहे." प्रवासी हांसून थट्टेनें ह्मणाला, "ठीक, जोडी तर मोठी नामी आहे!" ह्या वेळीं बाहेर गुरगुर असा शब्द होऊं लागला. त्यामुळें त्यांस स्वस्थपणें गोष्टी करतां येईनात. तो शब्द कोठून व कोणाचा येत आहे तें पहाण्यासाठीं संन्याशानें दरवाजा उघडला, पण लागलाच झपाट्यानें बंद केला. तें पाहून प्रवासी व तो वृद्ध पुरुष ह्मणाले, "काय आहे? भयानें असे कांपतां कां?" संन्यासी ह्मणाला, "वाघ आला आहे वाघ! दरवाजे चांगले बंद करा." पण वाघाचें नांव ऐकतांच तो कदाचित् आपले घोडे व हरणें यांस इजा करील अशी दिलीपास भीति पडली. तो ह्मणाला, "बाबा, हा वाघ तबेल्यांत जाऊन घोड्यांना मारणार नाहीं काय? आणि एखाद्या प्रवाशास खाणार नाहीं काय? चला, चला आपणच त्याचा समाचार घेऊं या." तें ऐकतांच संन्यासी उठला आणि चौदा वर्षांच्या दिलीपास बरोबर घेऊन वाघास मारण्याकरतां झोंपडीच्या

बाहेर पडला. दोघांच्याही हातांत तेजस्वी तरवारी होत्या. त्यावेळीं शैलबाला "दिलीप! दिलीप!" ह्मणून रडूं लागली, पण तिच्या रडण्याचा आवाज ऐकण्यापूर्वींच दिलीप झोंपडीबाहेर जाऊन पोहोंचला होता. तो चालतां चालतांच ह्मणाला, "तूं रडूं नको, मी आतांच वाघास मारून येतों." दिलीप आणि संन्यासी यांच्याबरोबर तो प्रवासीही मैदानांत आला. दुसरा प्रसंग असता तर शैलबालेचा पिताही त्यांच्याबरोबर गेला असता; पण आज तो चिंतासागरांत बुडून गेला असल्यामुळें ह्या गोष्टीवर त्याचें मुळींच लक्ष नव्हतें. तो मनांत ह्मणाला, "खात्रीनें उद्यां सकाळीं हा मला ओळखल्याशिवाय राहणार नाहीं. मी तेजसिंह अशा गुप्तवेशानें अरण्यांत राहून काळ घालवीत आहें ही किती शरमेची गोष्ट आहे! मी शूर क्षत्रियाचा बच्चा असून साधुसंतांप्रमाणें एकांतांत रहात आहें ही किती शरमेची गोष्ट आहे! जर मला ही कन्या नसती तर ह्याप्रमाणें मी राहिलें नसतों. ह्या क्षणींच प्राणत्याग केला असता. पण आतां काय करूं? काय हा मला ओळखील? छे, छे; तसें करूं देणें बरें नव्हे. आज रात्रीं सर्वजण निजल्यावर कन्येस घेऊन पळूनच गेलें पाहिजे." इतक्यांत शैलबाला रडूं लागल्यामुळें त्याच्या विचारांत खळ पडला. तो ह्मणाला,

"शैल, काय झालें?" शैलबालेनें रडत रडतच उत्तर दिलें, "बाबा, दिलीप वाघास मारायला गेला आहे." तें ऐकतांच तेजसिंह तसाच उठला आणि त्यास मदत करण्यास निघून गेला.

संन्यासी आणि दिलीप मैदानांत येतांच गुरगुर असा शब्द करीत असलेला वाघ त्यांच्या दृष्टीस पडला. तो झोंपडीपासून थोडा दूर उभा असून मंदमंद गर्जना करीत होता. त्याला पहातांच संन्यासी व प्रवासी मागें सरले, पण दिलीप तरवार फिरवीत त्याच्याजवळ गेला. प्रवासी संन्याशास ह्मणाला, "महाशय! पुढें चला, हा बालक पुढें कां जात आहे हें आपण पहात नाहीं काय?" संन्याशानें उत्तर दिलें, "कांहीं फिकीर नाहीं! आपण दूर उभे असलों तरी हा वाघ या बालकास कांहीं इजा करूं शकणार नाहीं. दिलीप फार बलवान् आहे आणि अशा पुष्कळ वाघांस त्यानें धूळ खाण्यास लावलें आहे. उगीच याचा उत्साहभंग करण्याचें कांहीं कारण नाहीं. आपण येथेंच उभे राहूं आणि काय होतें तें पाहूं." हें ऐकून प्रवासी आश्चर्यानें अगदीं चकित होऊन गेला.

मनुष्यास पहातांच त्यास खाण्याच्या आशेनें वाघ जीभ चाटूं लागला, आणि विद्युल्लतेप्रमाणें त्यानें दिलीपावर अकस्मात् उडी मारली. पण तो सावध

असल्यामुळें, तरवारीचा एक झपाटा मारून त्यानें त्यास दूर फेंकून दिलें. त्याबरोबर वाघानें एवढ्यानें गर्जना केली, कीं त्यामुळें आकाश पाताळ दणाणून गेलें. तो घायाळ झाल्यामुळें अधिकच चिडला, आणि फिरून त्यानें त्याच्यावर उडी मारून त्याला धरण्यासाठीं आपलें तोंड उघडलें. इतक्यांत दिलीपानें मोठ्या समयसूचकतेनें त्याच्या तोंडांत तरवार खुपसली. ह्याप्रमाणें वाघ घायाळ व रक्तबंबाळ झाल्यामुळें क्रोधांध होऊन गेला. त्यानें मागें सरून आपल्या तोंडांतील तरवार काढून टाकली, आणि शांतपणें उभें राहून मोठ्यानें गर्जना केली. नंतर त्यानें आजूबाजूस दृष्टि फेंकली, पण उडी मारण्यास कोणालाच जागा नसल्यामुळें तो जमिनीवर शेंपूट आपटूं लागला. कांहीं वेळानें पुनः एकदां गर्जना करून त्यानें उडी मारली. ह्या वेळीं संन्यासी व प्रवासी ह्या दोघांसही दिलीपाबद्दल काळजी उत्पन्न झाली. तेव्हां आपल्या तरवारी घट्ट धरून ते त्याच्या मदतीस गेले; पण त्याचवेळीं वाघाची उडी चुकवण्याकरितां दिलीप मागें हटला. पण पावसानें चिकण झालेल्या मातीवरून त्याचा पाय घसरला व तो जमिनीवर पडला. तेव्हां वाघाचें आयतेंच फावलें ! पण तो त्याच्यावर उडी मारण्यास घुसतो आहे तोंच संन्याशानें त्याच्या पाठीवर असा सपाट्यानें वार केला कीं त्यास मोठ्यानें गर्जना करून मागें

ऱ्हावें लागलें. पुनः त्यानें संन्याशाकडे धांव मारली. इतक्यांत दिलीपानें उठून मोठ्या चपलाईनें त्याच्या मागच्या पायांवर वार केला. तेव्हां आरोळी मारून तो मागें वळला आणि दिलीपास पकडण्यास धांवला. दिलीपानें ह्या वेळीं त्याच्या मानेवर वार केला. पुष्कळ रक्त वाहून गेल्यामुळें अगोदर तो बहुतेक गतप्राण झालाच होता, तो ह्या वारानें जमिनीवर पडला, आणि आसपासचे पर्वत व दशदिशा यांस हालवून सोडणारी अशी एक भयंकर गर्जना करून मृत्यूच्या आधीन झाला.

दिलीप हर्षयुक्त होऊन मागें फिरत होता, त्याच वेळीं तेजसिंह झोंपडींतून बाहेर पडला होता. त्यानें दिलीपाच्या हातांतील तरवारीवर रक्ताचे डाग पहातांच त्यास फार आश्चर्य वाटलें. दिलीप झोंपडींत येतांच शैलबाला आनंदानें नाचूं लागली, आणि त्याच्याजवळ जाऊन ह्मणाली, "ओहो आपण तर आज वाघ मारला! शाबास!" ह्याप्रमाणें त्या बालकाचा पराक्रम पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें, पण तो प्रवासी तर चकितच होऊन गेला. थोड्या वेळानें सगळे निद्रावयास गेले. सकाळीं जेव्हां संन्यासी उठला, तेव्हां तेजसिंह आणि शैलबाला एकाएकीं झोंपडी सोडून निघून गेलीं असें त्यास आढळून आलें!!

---

# प्रकरण ६ वें.

## शैलबाला कोठें आहे?

काळाची गति विलक्षण आहे! तेजसिंहानें संन्याशाची झोंपडी सोडल्यास आज चार वर्षे होऊन गेलीं. इतक्या अवकाशांत जगद्रचनेंत अनेक फेरफार झाले. शीत, ग्रीष्म, व वर्षा ऋतूंनीं चार वेळ फेरे केले; सूर्याभोंवतीं पृथ्वीनेंही चार वेळ परिभ्रमण केलें. एवढ्या अवकाशांत दिल्लीश्वर व कनोजाधिपति यांमध्यें असलेल्या वैराची दृढ गांठ बसली, व या दोन्ही राजांमध्यें एक संग्रामही होऊन चुकला.

संवत ११९२ त कनोजाधिपति जयचन्द्र यानें चक्रवर्ति असें पद धारण करण्यासाठीं अश्वमेध यज्ञास आरंभ केला होता. जो सर्व राजांस जिंकतो त्याच राजानें अश्वमेध केला पाहिजे. जयचंद्रानें सर्व राजांस पराजित केलें होतें, पण पृथुराजास मात्र त्यास जिंकतां आलें नव्हतें. तेव्हां आपलें सार्वभौमपद स्थिर करावें, व पृथुराजाचा अपमान करावा या हेतूनें त्यानें यज्ञास आरंभ केला. सर्व लहान लहान राजांस आमंत्रण गेल्यामुळें ते हजर राहिले. मात्र दिल्ली व अजमीरचा

महाराज पृथुराज, चितोडचा महाराज समरसिंग, लाहोरचा राजा चंदपुडीर, आणि पंजाब, काश्मीर, व काशी येथील महाराज त्याला सार्वभौम असें न समजून त्या यज्ञास गेले नाहींत. जयचंद्रानें पृथुराजाचा अपमान करण्यासाठीं त्याची एक प्रतिमा केली, व द्वारपाळ जेथें उभा असतो तेथें ती ठेवली. पृथुराजास द्वारपाळ बनवावें याच इच्छेमुळें त्यानें असें केलें असें कांहीं नाहीं. तर दिल्लीच्या गादीच्या हक्काविषयीं जयचंद्राच्या मनांत वैर होतें. जयचंद्र व पृथुराज स्वर्गवासी दिल्लीपतीचे संबंधी होते. जयचंद्र हा वडील मुलीचा पुत्र होता, व पृथुराज धाकट्या मुलीचा होता. जयचंद्र हा रागीट, लोभी, स्वार्थी, व कार्यकारण न जाणणारा असा असल्यामुळें, व पृथुराजाच्या ठिकाणीं अनेक सद्गुणांचें वास्तव्य असल्यामुळें, दिल्लीचा अधिपति अनंगपाल यानें पृथुराजासच दत्तक घेतलें होतें. यामुळें त्यास अजमीर येथील त्याच्या पित्याचें राज्य मिळून, दिल्लींतीलही अनेक दुसरीं लहान राज्यें मिळालीं होतीं. याच कारणामुळें जयचंद्र त्याला स्पष्टपणें आपला शत्रुभाव दाखविणार होता. पण ती शत्रुता दाखविण्यासाठीं त्याला कोठेंच संधी सांपडेना. शेवटीं ती वेळ आतां आली.

जयचंद्र उद्धट झाल्यामुळें, व त्यानें अत्यन्त अपमान

केल्यामुळें पृथुराजास राग आला व त्यानें आपल्याबरोबर मोठें सैन्य घेऊन त्याच्यावर चाल केली. जयचंद्र व पृथुराज या दोघांमध्यें दारुण युद्ध झालें. त्यांत पृथुराज विजयशाली झाला. दोन्ही बाजूंकडील बऱ्याच लोकांचा संहार झाला. या वेळीं भरतखंडांतील लहान मोठे सर्व राजे कोणत्याना कोणत्या तरी पक्षास साहाय्य करीत होते. या रथीमहारथींमधील युद्धामुळें सर्व क्षत्रियसैन्य इतकें दुर्बल होऊन गेलें होतें कीं, परचक्र आलें असतें तर आपला बचाव करण्यास तें असमर्थ झालें असतें. आपला पराभव झाला, आपल्या अनेक लोकांचा संहार झाला, आणि पृथुराज विजयी झाला ह्मणून जयचंद्र मनांतल्या मनांत फार जळूं लागला व त्याच्या अपकर्षाचा मार्ग शोधूं लागला.

या युद्धाचा शेवट होतांच सर्व सैनिक आपापल्या तंबूंत चालले होते. इतक्यांत एक विलक्षण प्रकार घडला. युद्धसमाप्तीच्या दिवशीं दुपारीं बारा वाजण्याच्या सुमारास युद्धक्षेत्रांतून एक अस्त्रधारी पुरुष घोड्यावरून चालला होता. हा पृथराजाचा परममित्र कवि चंद होय. या पुरुषाचें वय चौतीस वर्षांचें होतें. त्याचें मुखारविंद सुंदर व प्रफुल्लित दिसत होतें. शरीर धष्टपुष्ट होतें. त्याची प्रभावश्री दीप्तिमान् दिसत होती. त्याच्या अंगावर युद्धोपयोगी सर्व शस्त्रें सज्ज

होतीं. मस्तकावर लोखंडी शिरस्त्राण होतें. अंगावर चिलखत होतें. पाठीवर ढाल लटकत होती. हातांत खंजीर होता, व कमरबंदाच्या डाव्या बाजूस तलवार शोभत होती. तो कांहीं कारणांमुळें एकटाच येत होता. इतक्यांत रणक्षेत्रांत पडलेल्या मुडद्यांमध्यें कोणाचा रडण्याचा स्वर त्याच्या कानीं पडला. जेथून आवाज आला तिकडे तो तावडतोब गेला तों मुडद्यांच्या ढिगामध्यें एक बारा तेरा वर्षांची बाला, "हाय! बाबा मला सोडून तुह्मी कुठें गेलां? आतां माझें कोण पालन करील?" असा विलाप करीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें! चंद कवीनें लागलेंच असें अनुमान केलें कीं, या रणक्षेत्रांत तिचा पिता मरण पावला असावा. या रणक्षेत्रांत ही बाला कशी आली? हिच्या बरोबर दुसरें कोणीच आलें नाहीं हें कसें? ही एकटीच आहे कीं काय? हिचें पालनपोषणकर्ता कोणीच नाहीं काय? हिचा मातापिता किंवा सगासोयरा कोणी असता तर त्यानें या भयंकर स्थलीं हिला कसें एकटें येऊं दिलें असतें? हाय! ही सुकुमार कुसुमकलिका आतां कोणाच्या आधारावर जीवित धरून राहील बरें? ही विचारी आजू अनाथ झाली ना? हाय! या सर्वांचें मूळ आह्मीच. कारण, हा घोर संग्राम झाला नसता तर ही बिचारी अनाथ कां झाली असती?" अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत आले.

चंद कवि फार धार्मिक, रसिक आणि दयाळु होता. त्याच्या मनांत वरील विचार येतांच त्यास फार दुःख झालें. तिची स्थिति समजून घेण्यासाठीं घोड्यावरून उतरून हळु हळु तो तिच्याजवळ गेला. घोड्याचीं पावलें ऐकून त्या मुलीनेंही येणाऱ्या गृहस्थाकडे वर मान करून पाहिलें. त्या कलेवरांच्या प्रचंड ढिगांत जिवंत मनुष्य पाहून चंद कवीचें उदासीन मुखमंडलही प्रफुल्लित होऊन गेलें. तिचें मुख पाहून, ही सुकुमार गुलाब कळी केव्हां तरी या जगांतील संताप हरण करून सर्वांस आनन्द देईल असें त्यास वाटून चुकलें.

चंद कवीनें जवळ जाऊन तिला विचारलें, "मुली! तूं कां रडतेस? हा तुझा कोण आहे? तूं राहतेस कोठें? तुला कोणी आप्त नाहीं काय?" मुलीनें उत्तर दिलें, "हा माझा पिता आहे."

ही बाला कोण? पूर्वीं जिचें वर्णन केलें आहे तीच ही शैलबाला होय! संन्याशाच्या पर्णकुटीचा परित्याग केल्यानंतर हिचा पिता तेजासिंह कांहीं दिवस देशो-देशीं फिरत होता. कनोजचें युद्ध होण्यापूर्वीं कांहीं दिवस अगोदर तो जवळच्या एका पर्वतावर येऊन राहिला होता. युद्धास आरंभ झाला असें पाहून, या असार संसारास कंटाळल्यामुळें, मृत्यु यावा ह्मणून तो युद्धांत सामील झाला. तेव्हां त्या ठिकाणीं त्याची इच्छा

पूर्ण झाली. जयचंद्राकडील सैन्यांतील एका वीराकडून तो घायाळ होऊन प्राणास मुकला. त्याचें सर्व शरीर रक्तबंबाळ झालें. जवळच त्याची तलवार पडली होती. त्याचे दोन्ही हात वक्षःस्थलावर पडले होते. दोन्ही नेत्र अर्धे झांकलेले होते. दोन्ही ओंठ अर्धे उघडलेले होते. त्याचें दुःखानें करपून गेलेलें मुख ईश्वराची प्रार्थना करण्याकरितांच कीं काय, जरासें उघडें राहिलेलें होतें. त्याची मुद्रा फारच चिताग्निदग्ध दिसत होती. त्याच्या अंगावर जरी भगवीं वस्त्रें होतीं, तरी त्याचें क्षत्रियतेज स्पष्ट दिसत होतें.

शैलबालेचें उत्तर ऐकून, व युद्धाच्या समयींही भगवीं वस्त्रें परिधान करणाऱ्या वीरपुरुषास पाहून चंद कवि सानंदाश्चर्यांत निमग्न झाला. तो क्षणभर तसाच राहून ह्मणाला, " मुली, तूं एकटी असतांना या समरांगणांत कशी बरें आलीस ? तुला कांहींच भीति वाटली नाहीं ?" शैलबालेनें उत्तर दिलें, "मला भय वाटत होतेंच; या मुडद्यांच्या ढिगाची मला मोठी भीति वाटते. पण भीतीहून प्रेम बळवान् नाहीं, काय ?" एवढ्या लहान मुलीच्या मुखांतून अशा प्रकारचे शब्द ऐकून चंद कवि तर चकितच झाला. तो म्हणाला, "तूं लहान आहेस, आणि या भयंकर स्थलीं आल्यास तुला पुष्कळ विपत्ति भोगावी लागेल याचा विचार

तुझ्या मनांत आला नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें. तुला जर यायचेंच होतें, तर आपल्या आईला कां बरोबर घेऊन आली नाहींस? तिनें तुला एकटें कसें येऊं दिलें?" शैलबालेनें उत्तर दिलें, "मला आई नाहीं आणि कोणी नाहीं." कवीनें विचारलें, "काय तुला कोणाचाच आधार नाहीं?" क्षणभर उगी राहून कवीनें पुनः विचारलें, "तुझ्या पित्याच्या मरणाची बातमी तुला कोणी सांगितली?" मुलीनें उत्तर दिलें, "कोण सांगणार? पर्वतावर उभी असतांना माझ्या पित्यास पडतांना मी पाहिलें, आणि लगेच मी येथें धांवत आलें." असें बोलत असतांना ती विलाप करून रडूं लागली. कवीनें विचारलें, "तुझा पिता रणांत येत होता त्यावेळीं त्यानें कांहींच सांगितलें नाहीं काय?" शैलबाला म्हणाली, "नाहीं." तेव्हां कवीनें प्रश्न केला, "तो युद्धांतच गेला आहे हें तुला समजलें कसें तर? आणि येथें युद्ध होणार हें तुला कसें समजलें?" ती ह्मणाली, "तो युद्धास जाणार आहे अशी बातमी मला कोणीच सांगितली नव्हती. पण आज युद्ध होणार आहे अशी मला खबर होती. पंधरा दिवसां-पूर्वीं, लढाईबिढाई होईल तर फार बरें होईल असें बाबांनीं ह्मटलें होतें. पण त्यावेळीं माझ्याकडे पाहून ते रडत होते. मी विचारलें तरी मला त्याचें कारण

त्यांनीं सांगितलें नाहीं. पण बाबा माझ्यासाठीं कारणवशात् दुःखी आहेत असें मला वाटलें होतें. गेल्या रात्रीं माझ्याजवळ एक पेटी देऊन ते मला ह्मणाले, 'वत्से आतां मी वृद्ध झालों आहें. अशा असहाय अवस्थेंत मला मृत्यु आला तर तुझी काय अवस्था होईल बरें? मी आतां कांहीं जास्त दिवस जगत नाहीं अशी माझी खात्री आहे. मुली, तुझा निर्वाह होण्यापुरतें द्रव्य या पेटींत आहे. तुला कोणी सत्पुरुष मिळेपर्यंत यांतून तूं खर्च कर. तूं लहान आहेस; तुला दुनियेच्या छलप्रपंचाची माहिती नाहीं! यासाठीं दुष्ट मनुष्यास भिऊन वाग, व त्याचा सहवास करूं नको. जोंपर्यंत तुझें लग्न होणार नाहीं, तोंपर्यंत कोणत्या तरी भद्र पुरुषाच्या आश्रयानें रहा. परंतु ज्याच्या आश्रयानें तूं राहशील त्याच्या ठिकाणीं असद्विचार उत्पन्न होतोसा वाटल्यास तत्काल त्याचा परित्याग कर.' असें बोलून ते रडूं लागले. आज प्रातःकाळीं उठतें तों ते नजरेस पडले नाहींत तेव्हां मला मोठी भीति उत्पन्न झाली. परंतु त्याच क्षणीं आजच्या युद्धाची मला स्मृति झाली. मी पर्वताच्या शिखरावर चढून पाहूं लागलें. तों पूर्वी मला जी आशंका उत्पन्न झाली होती तीच खरी ठरली." त्या मुलीला यापेक्षां जास्त बोलतां येईना. तिचा श्वास बंद पडला.

चंद कवि ह्मणाला, "तुझ्या पित्यास तुझी इतकी काळजी असतांनाही तो युद्धांत कां बरें शिरला?" तिनें उत्तर दिलें, "देशांत राहून देशाहितांसाठीं युद्धांतच शिरलें पाहिजे. प्राणं समर्पण करण्यास भिणें हा त्यांस अधर्म वाटत असे. ° माझ्यासाठीं त्यांनीं अधर्म करायचा होता कीं काय?" हे उद्गार ऐकून त्याच्या मनांत त्या मुलीविषयीं उच्च भाव उत्पन्न झाला. ती कोणा तरी मोठ्या कुलांतली असावी असें वाटून त्यानें अधिक उत्सुकतेनें तिला पुष्कळ विचारलें, पण त्याला जास्त कांहीं माहिती मिळाली नाहीं. ती फक्त आपल्या पित्याचें नांव काय तें जाणत होती. यापेक्षां तिला कांहींच माहित नव्हतें. तेव्हां चंद कवीनें विचारलें, "मुली, आतां तूं कुठें जाणार?" मुलीनें उत्तर दिलें, "जर मला कोणता रस्ता दिसला नाहीं, तर बाबांबरोबर मीही जाईन." कवीनें विचारिलें, "तूं माझ्याबरोबर येशील?" तिनें विचारलें, "कोठें?" कवीनें उत्तर दिलें, "माझ्या घरीं." तिनें विचारलें, "तेथें कोण आहे?" कवीनें उत्तर दिलें, "तेथें तुझ्यापेक्षां मोठी अशी एक तरुण स्त्री आहे. ती तुझ्याशीं बहिणीप्रमाणें वागेल." ती ह्मणाली, "असें असेल तर मी येईन. दुसरा एक माणुस मला बहिणीप्रमाणें मानीत होता." कवीनें विचारलें, "तो कोण होता?"

शैलबालेनें उत्तर दिलें, "तो एक मुलगा होता. आह्मी कांहीं दिवस त्याच्या झोंपडींत राहत होतों." कवीनें विचारलें, "त्याचें घर कुठें आहे?" तिनें उत्तर दिलें, "तें तर फार दूर आहे. त्या गांवचें नांवही मला माहित नाहीं. कांहीं दिवस तेथें आह्मी सुखरूप राहिलों. पण नंतर कांहीं कारणामुळें रातोरात तेथून पळून गेलों. त्या मुलाचें नांव दिलीप असें होतें. तूं मला सोडून जाऊं नको असें त्यानें मला सांगितलें होतें, पण आह्मी जात आहों हें त्याला कांहीं कळलें नाहीं."

ही गोष्ट सांगतांना शैलबालेच्या मुखावर एक प्रकारचा विशेष दुःखव्यंजक भाव दिसूं लागला. तेव्हां त्या मुलीवर दिलीप फार प्रेम करीत होता असें चंद कवीस वाटलें. नंतर तो त्या मुलीस घेऊन पृथुराजाच्या तंबूंत जाण्यास निघाला. वाटेंत शैलबाला आपल्या पित्यासाठीं फार रडूं लागली. तेव्हां चंद कवीनें तिची चांगली समजूत घालून सांगितलें कीं, "तुझा पिता क्षत्रिय आहे. तेव्हां माझ्या माणसांकडून त्यास येथून आणवून त्यास यथायोग्य अग्निसंस्कार द्यावयास लावीन. तूं कांहीं काळजी करूं नको, मी तुला मुलीप्रमाणें पाळीन." कवीनें नंतर तिला तिचें वय विचारल्यावर ती ह्मणाली "मला कांहीं माहित नाहीं. पण माझें वय बारा वर्षांचें आहे असें बाबा ह्मणत असत." याप्रमाणें बोलत

बोलत ती पृथुराजाच्या तंबूंत आली. त्यास पाहून पृथुराजानें विचारलें, "कवि महाराज! तुह्मास येण्यास इतका वेळ कां बरें झाला?" तेव्हां कवीनें शैलबालेचा सर्व वृत्तांत त्यास कथन केला. नंतर पृथुराज ह्मणाला, "उद्यां आपण आपल्या ठिकाणीं जावें असें माझ्या मनांत येतें. आपली इच्छा कशी काय आहे?" कवीनें उत्तर दिलें, "स्वामीची जशी इच्छा! आपला जय झाला आहे, व शत्रु काळें तोंड करून गेला आहे. तर आतां विलंब करण्याचें कारणच नाहीं." पृथुराज ह्मणाला, "तर आतां छावणी उठवा. तुमच्या अनुमतीशिवाय माझा निश्चय होत नव्हता. पण आतां सर्व राजांस आपापलें लष्कर मागें फिरविण्याची आज्ञा करा. ज्या राजांनीं मदत केली आहे त्यांचे उपकार दिल्लीस गेल्यावर प्रदर्शित करण्यांत येतील."

दुसऱ्या दिवशीं सर्व सैन्य कनोज सोडून दिल्लीकडे वळलें. सर्व राजे दिल्लीस गेले, पण चंद्रपति अजमिरास गेला. कारण, आपल्या जन्मभूमीवर त्याची फार प्रीति होती. युद्धासारखें तसेंच कांहीं महत्वाचें काम असलें तर मात्र तो दिल्लीस जात असे. अजमिरास जाऊन पोंचल्यावर त्यानें शैलबालेस आपली विवाहित स्त्री जी प्रभावती तिच्या स्वाधीन केलें. त्या ठिकाणीं ती प्रभावतीबरोबर मोठ्या आनंदानें राहूं ला-

गली. चंद कवीस एक गुलाब नांवाची बहीण होती. पण ती पृथुराजाच्या मुलीच्या सखिजनांपैकींच एक असल्यामुळें दिल्लीसच राहत असे. प्रभावती एकटीच असल्याकारणानें, शैलबालेचा समागम होतांच तिलाही फार संतोष झाला.

---

## प्रकरण ७ वें,

### रंगांत भंग.

अजमीर प्रांताशेजारीं, किनाऱ्याचें चुंबन घेणारी, घटकोघटकीं क्रीडा करणारी, व लाटांमध्यें लाटा घेऊन नर्तन करणारी यमुना नदी मोठ्या वेगानें वाहत होती. तिच्या सुंदर तटावर एक सुंदर बगीचा होता. त्या ठिकाणीं अनेक पुष्पांतून एकसारखा सुगंध वाहत होता. पवनाच्या संगतीनें वृक्षसमुदाय क्रीडा करीत होता. मधून मधून कोकिलांचा स्वर ऐकूं येत होता. चांदणें दुधासारखें शुभ्र पडलें होतें. अशा वेळीं एका मंचकावर बसून शैलबाला आणि प्रभावती नदीची शोभा पाहत होत्या. सन्ध्यासमीराच्या योगानें कम्पित झालेल्या वृक्षांमधून निघणारा मृदु व मधुर नाद नदीच्या

नादास मिळून एकसारख्या कल्लोळ करीत होता. ज्याप्रमाणें मातेच्या मांडीवर लहान बालकें क्रीडा करीत असतात, त्याप्रमाणेंच नदीच्या किनाऱ्यावर इकडे तिकडे होड्या तरंगमालांबरोबर नाचत होत्या.

जेथं त्या दोन्हीं सुकुमार नवयौवनवती बसल्या होत्या, तेथून थोड्या अंतरावरच एक मोठा वृक्ष होता. त्याच्या एका फांदीनें त्यांच्या मस्तकावर छत्र धरलें होतें! त्या डाहाळीवरील फूल तोडण्यासाठीं ह्मणून शैलबाला उठली, व तिनें एक पानासह फूल तोडलें. आतां शैलबाला पूर्वीप्रमाणें लहान नाहीं; तर ती विकास पावणाऱ्या गुलाबाची एक सुंदर कळी होऊन राहिली आहे. आतां ती दिलीपाची बालसखी नव्हे; तेजासिंहाची नयनानंदकारिणी, व पर्णकुटींत राहणारी कुसुमलतिकाही नव्हे. शैलबालेस आह्मी शेवटीं पाहिल्यास आज तीन एक वर्षे होऊन गेलीं. आतां ती अर्धविकसित गुलाब-कलिकेप्रमाणें अत्यंत मोहक दिसत आहे.

शैलबाला फूल तोडून प्रभावतीजवळ आली व तिच्या वेणींत तें गूंफूं लागली. चंद कवीची अथवा चंद्रपतीची अर्धांगी जी प्रभावती तिचें वय वीस वर्षांचें होतें. तिचें सौन्दर्य शैलबालेसारखें गुलाबाच्या विकसित पुष्पाप्रमाणें नव्हतें. तरी तें फार तेजस्वी

होती. तिचें यौवन विकास पावलें होतें. तिला एक-सारखें पाहत राहिल्यास नेत्रांस कधींही परिश्रम होत नसत. पाहणाऱ्याच्या मनाची कधींही तृप्ति होत नसे; तर तिला अधिकाधिक पाहण्याची उत्कंठा होत असे. सामान्यतः स्त्रियांशीं नेहमीं व्यवहार ठेवणाऱ्याच्या मनांत वाईट विकारांचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असतो. पण प्रभावतीस पाहून मनुष्य कधींही विकारवश होत नसे. उलट तो अत्यंत शान्त मात्र होत असे. शैलबाला पडली विनोदी; प्रभावती आहे गंभीर, आणि शान्त. पण दोघींसही एका ठिकाणींच पाहिल्यास दोघींपैकीं विशेष लावण्यवती कोण याचा निर्णय करणें कठीण पडत असे. शैलबाला मोठ्या विनोदानें प्रभावतीच्या वेणींत फूल गुंफूं लागली. पण तें खालीं पडलें. तिला तिचा वेणीचा झोंकही बरोबर वाटला नाहीं. ह्मणून तिनें तिची पुनः वेणी घातली व त्यांत फूल गोंवूं लागली. हें तिचें करणें प्रभावतीस बरोबर वाटलें नाहीं. पण शैलबालेचें मन अप्रसन्न करूं नको अशी पतीची आज्ञा असल्यामुळें ती तिच्याशीं विनोदानेंच बोलूं लागली. फूल वेणींत बरोबर बसत नाहीं असें पाहून तिनें तशा आणखी कांहीं फुलांचा गजरा करून तो तिच्या गळ्यांत घातला. नंतर ती प्रभावतीस ह्मणाली, "वा! आपण फक्कड दिसत

आहां. आपण इतक्यां सुरेख कधीं दिसलां नव्हतां. आज तर आकाशांतील चंद्र आणि पृथ्वीवरील चंद्र एकच झाला आहे!" हें ऐकून प्रभावती ह्मणाली, "ठीक.बाई ठीक! तूं लागेल तें ह्मण. मला तर बाई तुझ्या करण्याचें कीं नाहीं फार हंसूं येतें! काय ही रोजच्या रोज विटंबना मांडली आहेस! बरें पण मी आज तुझी वेणी घालून त्यांत फुल गोंवतें." शैलबाला ह्मणाली, "मी कोणासाठीं ह्मणून गोंवून घेऊं? माझा शृंगार पाहणार कोण?" प्रभावती हांसून ह्मणाली, "कोण ह्मणजे? मी पाहणार!" शैलबाला ह्मणाली, "अंहं, तें कांहीं होणार नाहीं. मी तुझीच वेणी घालतें." प्रभावती ह्मणाली, "अंहं. मला नाहीं ह्मणूं नको. तुझी वेणी आज घालणारच. तूंच माझी वेणी काय ह्मणून घालणार?" तें ऐकून शैलबाला ह्मणाली, "अग त्याला तसेंच कांहीं कारण आहे." प्रभावतीनें विचारलें, "काय कारण आहे?" शैलबालेनें उत्तर दिलें, "मी नाहीं सांगणार." प्रभावती ह्मणाली, "तुला माझी शपथ आहे!" शैलबाला खरी गोष्ट एकाच बाजूस ठेवण्याच्या उद्देशानें ह्मणाली, "ऐक तर एकदांची. माझा विवाह अजून झाला नाहीं ह्मणून मी दुःखी आहें तें तुला नाहीं का ग ठाऊक?" हें ऐकून प्रभावतीच्या मुखाचा रंग एकदम बदलून गेला. काय बोलावें हें तिला

सुचेना. पण थोड्या वेळानें ती ह्मणाली, "तुझ्या-बरोबर बोलणें ह्मणजे एक संकटच आहे." असें ह्मणून ती तोंड एके बाजूस करून बसली. तेव्हां शैलबाला ह्मणाली, "ओ हो हो! इतक्यांत राग आला कीं काय? बरें तर आतां मी खरी खरी हकीकत सांगतें हो. मी जेव्हां लहान होतें त्यावेळीं पर्वतावरील पर्णकुटींत राहणारा दिलीप नांवाचा मुलगा मला आजच्याप्रमाणेंच फुलें आणून देत असे, व ती माझ्या वेणींतही गोंवीत असे. आज तो माझ्याजवळच असता तर मीही त्याला फुलांनीं शृंगारून पाहिलें असतें. पण तो नाहीं तर तूं आहेस कीं नाहीं!" असें बोलून ती खूप हांसूं लागली. तेव्हां प्रभावती ह्मणाली, "वा रे वा!! तें मला समजतें हो! मी का तुझा दिलीप! काय ग पण तुझी आठवण ही! लहानपणची आठण एवढा वेळ राहिलेली मी आजच पाहिली! पण ही गोष्ट तूं मला पूर्वीं कधीं सांगितली नाहींस ती?" शैलबालेनें उत्तर दिलें, "त्याच्याबरोबर मी अशा प्रकारें क्रीडा करीत होतें ह्मणून नाहीं का ग तुला मी सांगितलें?" प्रभावती ह्मणाली, "होय, पण—" शैलबाला मध्येंच ह्मणते, "तर दुसरें समजायला काय कठीण आहे? तें सुद्धां सांगितलें पाहिजे कीं काय? वा! तूं तरी मला बरीच बनवीत आहेस ग!" प्रभावती ह्म-

णाली, "तुझी गोष्ट कोठें बाई! पण तो दिलीप कोण आहे, कोठें आहे कोणास ठाऊक! त्याच्यावर इतकें प्रेम तें कसलें? आतां तूं मोठी झाली आहेस. कांहीं तरी समज धर, आणि त्याची गोष्ट मनांतून काढून टाक. तो कोठें गेला-असेल याचा नेम कोणी सांगावा? कदाचित् तो येथें आलाच तर त्याच्याबरोबर तुझा विवाह करायचाच नाहीं. तूं अजून खरी मोठी झाली नाहींस, तेव्हां प्रीति कशास ह्मणताव हें तुला समजायचें नाहीं. तें कळूं लागलें ह्मणजे तुझी चुक तुला समजून येईल." हें ऐकून दीर्घ निश्वास टाकून शैलबाला ह्मणाली, "दिलीपाबरोबर माझें लग्न करायचें नाहीं असें तुझें ह्मणणें आहे त्याचें कारण मला समजून चुकलेंच आहे. तो कोण असेल कोणास ठाऊक, त्याचें कुलशील कोठलें त्याची आपणास कांहीं माहिती नाहीं, असेंच ना तुला वाटत आहे? पण तो जसा अज्ञात कुळाचा आहे, तशी मीही नाहीं काय? त्याला कोणी योग्य स्त्री मिळणार नाहीं, तर मग मलाच योग्य वर कसा बरें मिळेल?" तिची हकीकत ऐकून प्रभावती दुःखी होऊन ह्मणाली, "पण तुला आंपला जन्मवृत्तांत कांहींच कसा ठाऊक नाहीं?" शैलबाला दुःखित होऊन ह्मणाली, "ही गोष्ट किती वेळ ह्मणून विचारशील? मी आल्या दिवसापासून तूं हेंच विचार विचार विचा-

रीत आहेस, आणि मीही पण उत्तर देतच्च आहें. आणि आतां पुनः त्याचें काय? पण आतां ही गोष्ट असूंदे एकीकडे. दुसरें कांहीं तरी बोलूं. सांगतेस तर तुझी एक चांगली कविता ह्मणतें." प्रभावती ह्मणाली, "मनुष्याची कविता? छे! ईश्वराची स्तुति व गुणानुवाद ही काय ती कविता. जन्ममरणभोक्ता जो अल्पप्राणी मनुष्य त्याची कविता गाऊन फळ कसलें? मनुष्यास मनुष्याचा मोह आहे, व त्यामुळें तो ईश्वराची भक्ति करण्याचें सोडून मनुष्याच्या कृपेची इच्छा करतो. परंतु सुज्ञ मनुष्यसुद्धां जोंपर्यंत या जगांतलि देहेंद्रियादि मिथ्या पदार्थांच्या भ्रांतींत पडून अहंकारबुद्धीचा परित्याग करीत नाहीं, तोंपर्यंत तो सन्मार्गास लागून स्वकल्याणास अधिकारी झाला नाहीं असें समजलें पाहिजे. हा देह तर पडछायेप्रमाणें मिथ्या आहे. त्याच्या ठिकाणीं कोणत्याच्च प्रकारें आसक्ति राखतां कामानये. सर्व मनुष्यांनीं अहंभावास टाकलें पाहिजे. जे अज्ञान असतात तेच्च मी, माझें, बरें, वाईट असें मानीत बसले आहेत. पण तेंच या जगांतील दुःखाचें बीज आहे. यासाठीं प्रयत्न करून या क्षणभंगुर देहावरील प्रीति कमी केली पाहिजे. बाई, तुला चांगलें ज्ञान आहेच. तूंच ह्मणत होतीस कीं, 'मनुष्य मृत शरीरास भजतो ह्मणून तो पापी आहे, व क्लेश पावतो.

त्याच्या मनांतून जेव्हां देहवासना नाहींशी होते तेव्हां मात्र तो शुद्ध होतो;' असें अमतांना या देहावर तुझी इतकी काय प्रीति बसली आहे कोणास ठाऊक कीं त्याच्यावर कविता करण्यास तूं इतकी तयार!" इतक्यांत शैलबाला ह्मणाली, "बस बस, पुष्कळ झालें. तुला जसा काय संसाराचा कंटाळा आला आहे!"

प्रभावती ह्मणाली, "तूं नेहमीं ह्मणतेस तेंच गीत गा." शैलबाला ह्मणाली, "बरें आहे. तेंसुद्धां फार चांगलें आहे." असें ह्मणून तिनें सालाप गीत गाण्यास आरंभ केला.

तिनें गीताचा आरंभ प्रथम हळूहळू करीत सप्तम सुरापर्यंत मजल नेली. तिच्या मधुर ललितमय स्वरामुळें उद्यान, नदी, व वृक्ष तल्लीन होऊन गेले. नदींत डोलणाऱ्या नौका जणूं काय ताल धरून नर्तन करूं लागल्या. पवनही सौगंधिक होऊन झपाट्यानें वाहूं लागला. चंद्रमा हास्यमुख करून अधिकाधिक प्रकाशूं लागला. गाणें संपल्यावर प्रभावती ह्मणाली, "सखे, तुझें गीत फार उत्तम आहे. आणखी दुसरें कांहीं ह्मण." शैलबाला ह्मणाली, "आतां दुसरें काय गाऊं? तुझ्या नांवाची कविताच गातें!" प्रभावती ह्मणाली, "चल, हेंग काय भलतेंच!" तरी तिच्याकडे कांहीं लक्ष्य न देतां तिला उद्देशून शैलबालेनें एक पद ह्मटलें.

तें ऐकून प्रभावती फार चिडली व ह्मणाली "काय बाई, तुला रात्रंदिवस कविताच सुचत असते." शैलबाला ह्मणाली, "जिचा स्वामी इतका रसिक कवि, त्याच्या स्त्रीची कवितेवर अरुचि हें काय! पण तेंही खरेंच! जो सागरांत राहून मोठमोठ्या तरंगांवरोवर नेहमीं क्रीडा करीत असतो, त्याची नजर एखाद्या सामान्य जलाशयाकडे कशी वळेल? ज्यानें रात्रंदिवस कोकिलांचा कलरव ऐकत असावें, त्याचें मन कावळ्यांच्या कर्कश स्वरानें कसें रिझेल? पण कवीजवळ राहत असून तूं कवयित्री झाली नाहींस हें तरी एक नवलच ह्मणावयाचें!" प्रभावती ह्मणाली, "मी नाहीं झालें तर नाहीं बापडी, पण तूं तरी झालीस ना? कवीजवळ राहून तूं तरी चांगल्या कविता करायला शिकलीस!" शैलबाला ह्मणाली, "मर्जी असेल तर आणखी एक गीत गातें!" असें ह्मणून ती कवितेचे चरण रचावयास लागली. इतक्यांत तिची दृष्टि दुसऱ्या दिशेकडे वळली. तें पाहून प्रभावतीनेंही तिकडेच पाहिलें तों चंद कवि त्यांच्याकडेच येत होता तेव्हां प्रभावती शैलबालेस ह्मणाली, "आतां तुझें गीत जरा मोठ्यानें होऊं दे बरें! त्यांच्या तोंडावर कांहीं तरी बोलशील तर मी दिलीपाविषयीं तूं जें सांगितलें आहेस तें त्यांस सांगितल्यावांचून राहणार नाहीं." शैलबाला म्हणाली, "वाः! तुझे प्राण-

नाथ येथेंही पण आले ! तुझ्याशिवाय त्यांचा एक क्षणही रिकामा जात नाहीं. चंद्र प्रभेशिवाय एकटा कसा राहील ?"

"उगी रहा ग !" असें ह्मणून प्रभावतीनें शैलबालेस मागें सारून उगी करण्याचा प्रयत्न केला; पण त्यामुळें शैलबालेस अधिकच हंसें येऊन ती ह्मणाली, "यांत काय ग झालें ? प्रभेवांचून चन्द्र कसा राहील ? त्याची मग शोभा ती कसली ? मी काय खोटें ह्मणतें कीं काय इतकी रागावतेस ती !"

आतां तर प्रभावती फारच चिडली. तिनें शैलबालेचें तोंड हातानें दाबून धरलें, पण तें तिनें जोरानें उघडलेंच. इतक्यांत चंद्रपति तेथें येऊन पोंचला. तेव्हां दोघीही उगी राहिल्या. त्यावेळीं चंद कवीचें वदनकमल नेहमीं प्रमाणें प्रफुल्लित नसल्यामुळें या दोघींचाही आनंद एकदम नाहींसा झाला ! "रंगांत भंग" झाला ! क्षणभरानें शैलबालेनें विचारलें, "आज निष्कलंक चंद्रमा कलंकित कसा दिसतो ?" प्रभावतीही चंद्रपतीकडे पाहून ह्मणाली, "शैलबालेस तर नेहमीं थट्टाच करावीशी वाटते. खरेंच बाई, आज मला कसेंसेंच दिसतें. कांहीं अनिष्ट बातमी आहेशी दिसते" चंद्रपति ह्मणाला, "होय, तसेंच कांहीं सांगायचें आहे." प्रभावतीनें कांपत कांपत हळूच विचारलें, "असें आहे

तरी काय ?" चंद्रपतीनें उत्तर दिलें, "मी उद्यां दिल्लीस जाणार आहें. यवनांनीं पुनः चाल केली आहे असें महाराजांनीं लिहिलें आहे." शैलबालेनें विचारलें, "काय, तुह्मी मला ज्या वर्षी येथें आणलें त्या वर्षी ते पराजय पावून काळें तोंड करून गेले होते; आणि आतां तेंच काळें तोंड घेऊन आले ?" चंद्रपति ह्मणाला, "ते भरतखंडाच्या दुर्भाग्यामुळें आतां पुनः आले असें मला वाटतें! मोठ्या दुःखाची गोष्ट हीच कीं, या पराजित झालेल्या यवनांस, ही सुवर्णभूमि घेण्याची इच्छा असेल तर इकडे यावें ह्मणून महाराज जयचंद्र यानें निरोप पाठविला होता.! ज्या घरांत असा भेद आहे तें कसचें जय पावणार! या आर्यावर्ताच्या कमनशिबानें येथील राजेलोकांत परस्परकलह, लोभ, मानीपणा, मिथ्या आशा, वीर्याभाव, ऐक्याभाव इत्यादि दुष्ट विकारांनीं वास केला आहे, आणि ह्मणूनच यवन लोकांस ही संधी मिळाली आहे. शाहबुद्दीन घोरीचा पराजय व अपमान झाल्यामुळें तो मनांतल्या मनांत जळत होता. पण त्याचा उपाय चालण्यासारखा नव्हता. आतां त्यास जयचंद्र आश्रय देणार आहे अशी बोलवा आहे, व ती खरीही असण्याचा संभव आहे. त्यामुळें तो मूर्ख यवन मोठें सैन्य घेऊन सूड उगविण्यासाठीं येत आहे." शैलबाला ह्मणाली, "यांत कोणाचा जय होईल तें समजेलच. क्षत्रियनारी कांहीं

आज निःसत्व झाल्या नाहींत. त्यावेळीं त्यांस स्वातंत्र्य आणि जीवदान दिलें तें फार वाईट झालें. कपटी लोकांबरोबर कपटीच झालें पाहिजे." चंद्रपति ह्मणाला, "प्रिये, मी उद्यांच जाणार. आतां वेळ लावतां कामा नये." हें ऐकून प्रभावतीच्या नेत्रांवाटे अश्रुपात होऊं लागला. नंतर मोठ्या कष्टानें डोळे पुसून ती ह्मणाली, "प्राणनाथ! आपण स्वदेशरक्षणासाठीं जात आहां तेव्हां मी कांहीं हरकत करीत नाहीं. वीरपुरुषाचें हेंच कर्तव्य आहे. आपला जय व्हावा अशी मी ईश्वराजवळ शुद्धचित्तानें प्रार्थना करतें. बरोबर कोणाला न्यायचें?" चंद्रपति ह्मणाला, "आपल्या वृद्ध अनाथास." याप्रमाणें बोलत बोलत त्यांनीं महालाचा रस्ता धरला. रात्रीं सर्वजण निजले. पहांट होतांच चंद्रपति दिल्लीस चालता झाला. संन्याशाच्या पर्णकुटींत पाऊसानें चिंब भिजलेला जो पांथ आला होता तो चंद कवीचा सेवक अनाथच होय. हा पुष्कळ वर्षांचा प्रामाणिक सेवक होता, पण तो मानाचा फार भुकेला होता. तोही चंद्रपतीबरोबर दिल्लीस चालता झाला.

सृष्टि दुःखमयी आहे. सुख हें स्थिर राहत नाहीं. तें कोणत्या वेळीं नाहींसें होईल याचा नेम नाहीं. एका घटकेपूर्वीं शैलबाला आणि प्रभावती उद्यानांत विनोदलीन झाल्या होत्या; पण आतां निस्तेज झाल्या आहेत.

चंद्रपति दिल्लीस जाते वेळीं घाबरी होऊन प्रभावती मूर्छित झाली, पण शैलबालेनें तिला सांवरून धरून यथायोग्य उपचार केले. कांहीं वेळानें प्रभावती ह्मणाली, "प्राणनाथ केव्हां येतील?" शैलबाला ह्मणाली, "शाबास बाई! तूं वीरपत्नी असून अशा मंगल प्रसंगीं रडतसे हें काय?" प्रभावती ह्मणाली, "या वेळीं मला अमंगल वाटत आहे, काय असेल तें असो" असें ह्मणून ती पुष्कळ रडूं लागली. प्रभावती कोमल होती, कुलीन होती! तिनें चंद्रपतीस स्वेच्छेनें वरिलें होतें. तिचें त्यावरील प्रेम अगाध होतें. ती शूरही होती खरी; पण कोणत्या सच्छील भार्येस पतिविरह दग्ध करीत नाहीं बरें?

---

## प्रकरण ८ वें.

## अयोग्य मागणी.

भरतखंडाच्या दुर्दशेचा प्रारंभकाल इ. स. ११९३ त झाला. शाहबुद्दीन घोरी मजल दरमजल करीत, भरतखंडास कंपायमान करण्यासाठीं, त्यांतील राजबीजाचा अंत करण्यासाठीं, त्या भूमीस निस्तेज, निःसत्व, निर्भाग्यवती, क्षुद्र, ऐक्यहीन,

परवश, दास्यशृंखलाबद्ध करण्यासाठीं गिझनीहून लाहोरच्या रस्त्यानें आला होता. चक्रवर्ती पृथुराजही युद्धाची तयारी करीत होता. त्यानें चोहींकडील राजांस पत्रें पाठवून सार्वजनिक हितासाठीं युद्धास प्रवृत्त होण्याविषयीं विनंति केलीच होती. इकडे असा प्रकार चालला आहे तों एके दिवशीं दिल्लीच्या अंतःपुरांत राजकन्या उषावती, प्रधानपुत्र विजयसिंगाबरोबर एकांतांत गोष्टी करीत होती. अर्धरात्र झाली होती. चोहोंकडे शून्यमय दिसत होतें. जिकडे तिकडे सामसूम झालें होतें. मनुष्यव्यवहार बंद झाला होता. मात्र आकाशांत तारका झळकत होत्या. वायूशीं वृक्षांचा सामना होऊन मधून मधून आवाज होत होता. सर्वत्र निद्रादेवीचें साम्राज्य व्यापून राहिलें होतें.. अशावेळीं, अन्तःपुरामध्यें राजकन्या व मंत्रिपुत्र कोणत्या कारणासाठीं बरें विचार करीत बसलीं आहेत? जेव्हां सर्व निद्रावश झाले आहेत, तेव्हां पृथुराजाची कन्या, मोठी मानी व तरुणी अशी असून, तरुण, सुंदर, परपुरुष, आपला दास असा जो मंत्रिपुत्र त्याबरोबर एकांतांत बसून कसल्या बरें गोष्टी बोलत आहे?

राजकन्या सुवर्णजडित पलंगावर बसली होती, व मंत्रिपुत्र विजयसिंग खालीं किनरवाबाच्या तक्यास टेंकून बसला होता. राजकन्या सोळा वर्षांची सुन्दरी होती.

तिच्या गुणरूपाची चोहींकडे प्रशंसा होत होती. ज्याप्रमाणें चन्द्रप्रकाशामुळें सर्व वस्तु दीप्तिमान् होतात, तद्वत् राजकन्येच्या रूपकान्तीची ज्योती ज्याच्यावर ह्मणून पडे तो दीप्तिमान् दिसत असे. अप्सरांच्या केशांसही लाजविणारे तिचे केश खांद्यावरून वक्षःस्थळावर पडले होते. ते मधुलोभानें एकच झालेल्या भ्रमरपंक्तीप्रमाणें शोभत होते. तिनें अंगावर सफेद दुपाटा घेतला होता. तिच्या कर्णांत दोन कुंडलें लटकत होतीं. तिच्या लावण्यानें सर्व गृह देदीप्यमान दिसत होतें. अशी रंभारूप राजकन्या यावेळीं विचारसागरांत पडून स्तब्ध होती. ती जरासुद्धां हांसत नव्हती कीं बोलत नव्हती. तिनें डोळे मिटले होते. जरी तिच्या मुखावर उदासीनतेचा अन्धकार दिसत होता, तरी तिच्या रूपप्रकाशामुळें चोहींकडे प्रकाशच पडला होता.

राजकन्या व मंत्रिपुत्र स्वस्थ बसलीं होतीं. कोणीच बोलत नव्हतें. कांहीं वेळानें उषावती, विण्यांतून आलापस्वर निघतो कीं काय असा भ्रम उत्पन्न करणाऱ्या मधुर स्वरानें म्हणाली, "आपण काय सांगण्यास आलां आहां? आतां अर्ध रात्र झाली आहे व मी एकांतांत आहें हें तुम्हांला समजत नाहीं काय? कोणी आला तर काय बरें अवस्था होईल? काय सांगावयाचें

असेल तें सांगा आणि येथून चला." विजयसिंग म्हणाला, "यवन पुनः आले आहेत हें आपण ऐकलें का?" विजयाच्या या बोलण्यावरून तो सद्गुणी, सुशील, व नम्र होता असें कोणास वाटेल; पण जो त्याचा सूक्ष्म दृष्टीनें विचार करील त्यास, तो सद्गुणी नसून आपल्या वरवंरच्या सरळपणानें दुसऱ्यास फसविणारा होता असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. त्याचें बोलणें ऐकून राजकन्या म्हणाली, "जर तुम्ही हेंच सांगण्यासाठीं आलां होतां तर आतां चला. मला ही गोष्ट पुष्कळ दिवसांपासून ठाऊक आहे." विजय म्हणाला, "छे, छे! मी एवढेंच सांगण्यासाठीं आलों नव्हतों. दुसरेंही पण—" उषावतीनें विचारलें, "काय?" विजयसिंग म्हणाला, "जर यावेळीं महाराजांचा पराभव झाला तर तुम्ही काय कराल?" उषावती सक्रोध होऊन म्हणाली, "हें काय बोललां? पित्याचा पराभव होईल? ते जयचंद्राचा पराभव करून आले, व शिल्लक राहिलेल्या थोड्याशा सेनेनें त्यांनीं मुसलमानांची खोडकी मोडली हें तुम्ही विसरलां वाटतें?" जरा ओशाळून विजयसिंग पुनः बोलला, "प्रभूच्या कृपेनें त्यांस यावेळींहीं जय येवो. पण लढाईंत जयापजय कोणाच्या हातचा नाहीं. तेव्हां कदाचित् पराभव झालाच तर तुम्ही काय कराल?" उषावती गद्गदस्व-

रानें म्हणाली, “तें मी आतां काय सांगूं? पण जी दशा पित्याची तीच माझी. दुसरें काय?” हें ऐकून विजयसिंग गंभीरस्वरानें म्हणाला, “असें कसें होईल? तुम्ही एक तर स्त्री, तशांत राजकन्या, सुकुमार, यौवनवती, संसारव्यवहारांत अज्ञान. तुम्हांला कष्ट कसा सहन होईल?” उषावती क्रोधानें म्हणाली, “तुम्ही कपटी आहां म्हणून असल्या गोष्टी लावीत आहां. पण प्रथम यवन कसे पळून गेले होते त्याची आठवण करा. पहा मी पुरुष नाहीं. पण तुमच्यापेक्षां जास्त साहसी आहें. मी वीर पित्याची कन्या आहें, वीर मातेची अभिमानी आहें, वीर पतीस वरणारी आहें, वीरतेनें भरलेली आहें. मी कष्ट सहन करणार नाहीं असें मनांतही आणूं नका. कदाचित् आतां जर कोणी येऊन ‘तुझ्या मरणानें आज देश वांचतो’ असें ह्मणेल, तर तत्क्षणीं मी प्राणपरित्याग करतें कीं नाहीं पहा. पण मला असें वाटतें कीं, स्वदेशरक्षण हें आपल्या प्राणाहून विशेष नाहीं असें तुमच्या मनांत येतें, आणि ह्मणून अशा बायकी गोष्टी तुह्मी चालविल्या आहेत. मी तर प्राणांपेक्षांही देशास अधिक मानतें, समजलें?” उषावतीचीं वरील वाक्यें विजयसिंगाच्या काळजास फारच झोंबलीं. कारण, तो मागल्या युद्धप्रसंगीं रणक्षेत्रांतून पळून आला होता, व ती गोष्ट

त्यानें फक्त राजकन्येलाच सांगितली होती. त्याबद्दल राजकन्येनें टोमणा मारल्याबरोबर त्याला एकदम चटका लागल्यासारखा झाला. तशांत तो ज्या आशेनें पळून आला होता, तीही पूर्ण झाली नव्हती. तेव्हां यावेळीं त्याला फार क्रोध उत्पन्न झाला. पण तो दाबून तो शांतपणें ह्मणाला, "तुह्मी ही गोष्ट बोलून मला नेहमीं टोमणा मारतां. पण मला स्वदेशापेक्षां प्राण अधिक नाहीं. तुमच्या प्रेमास वश होऊनच मी रणक्षेत्रांतून आलों होतों. मेलों तर तुमचा मुखचंद्र कसा पाहण्यास मिळेल हा विचार मनांत येऊन मी कुंठित झालों होतों. ह्मणूनच तुमच्या चरणांच्या आशेनें मी प्राणाधिक रणक्षेत्राचा त्याग केला. पण आतां तुमच्या मुखांतून अशीं निर्दय वाक्यें ऐकावीं लागत आहेत. मग तुह्मी असें करणार हें जर मला पूर्वीच कळतें तर मी मृत्यूला सुखकर मानून रणक्षेत्रांतच प्राणांची आहुती दिली असती." हें ऐकून उषावतीस हें बरें झालें नाहीं असें वाटलें. तेव्हां पुनः ती ह्मणाली, "जर माझ्या बोलण्यानें आपणास दुःख होत असेल तर पुनः मी असें बोलणार नाहीं. पण तुह्मी जी गोष्ट केली ती क्षात्रियास लाजविणारी आहे. तुह्मी शूरवीर होऊन रणक्षेत्रांत लढलां असतां तर तुह्मांस मी पुष्कळ चाहिलें अ-

सतें. मला कोणी भाऊ नसल्यामुळें आपल्या मरणानें, वीर बंधूविषयीं जसें रुदन करावें तसेंच मी रुदन केलें असतें. पण त्यांत मला विशेष आनंद झाला असता. माझा भाऊ स्वदेश रक्षण करतांना मरण पावला, धन्य तो वेळ! धन्य तो दिवस! असेंच मी ह्मटलें असतें. तरी चिन्ता नाहीं. आतां तरी या प्रसंगीं आपलें वीरत्व दाखवावें ह्मणजे झालें." विजय ह्मणाला, "यावेळीं वीरत्व दाखविल्यास तुह्मी माझ्यावर प्रसन्न व्हाल असें तुमच्या मुखांतून ऐकल्यास मी आनंदानें प्राणदान करीन. आपण लहानपणीं एकमेकांबरोबर खेळत होतों. पण तुह्मी कोणत्याही वेळीं माझ्याशीं प्रेमानें बोललां नाहीं. मी तुमच्यासाठीं सर्वस्व अर्पण करण्यास तयार असतांनाही—" उषावती ह्मणाली, "तुह्मी माझ्यावर मिथ्या दोषारोप करीत आहां. तुमच्यावर मी प्रीति करीत नव्हतें काय? मी तुह्मांला पुष्कळ वेळ सांगितलें आहे कीं, तुम्हांला मी भावासारखा मानतें. आजही पण तेंच ह्मणतें—" विजय मध्येंच उठून म्हणाला, "काय तुमच्या प्रेमाचें स्वरूप नेहमीं एकसारखेंच राहणार? ठीक ठीक! मग मला व्यर्थ कां कष्ट देतां? यावेळींही मी युद्धांत वीरत्व प्रकट केलें, तरीही तुम्ही माझ्यावर प्रेम ठेवणार नाहीं त्या नाहींच, असेंच ना?"

उषावती घाबरून ह्मणाली, "तुह्मांला मी असें केव्हां सांगितलें आहे? मी तुह्मांस एकच गोष्ट सांगत आलें आहें कीं तुह्मीं ही गोष्ट मनांतून काढून टाका. आतां पुनः ऐका, मी खरी गोष्ट सांगतें. मी तशा प्रकारचें प्रेम तुमच्यावर कधींही करणार नाहीं." विजयसिंग ह्मणाला, "तर तुमचें कोणावर प्रेम आहे?" उषावतीनें उत्तर दिलें, "तें विचारण्याची तुह्मांला जरूर नाहीं." विजयसिंगानें विचारलें, "कां? तें सांगाल तर पुनः तुह्मांस या गोष्टी सांगून कधीं त्रास देणार नाहीं." असें ह्मणून उषावती काय उत्तर देते तें पाहण्यासाठीं तो स्वस्थ उभा राहिला. उषावतीनें नाखुषीनें तर खरें, पण गंभीरस्वरानें ह्मटलें, "मी पाहिजे त्यावर प्रीति केली ह्मणून त्यांत तुमचें काय?" हें ऐकून विजयसिंगाचा आशावृक्ष मुळासकट तुटून खालीं पडला. नंतर तो कंपितस्वरानें ह्मणाला, "तुमचें कोणा-वर प्रेम आहे तें सांगाल काय?" हा प्रश्न ऐकून उषावतीच्या मुखावर निराळ्याच प्रकारचा रंग उत्पन्न झाला. ती मनांत ह्मणाली, "हें विचारण्याचा या मूर्खा-स काय हक्क आहे? याला कसलाच अधिकार नाहीं, तेव्हां याला जबाबच देत नाहीं. दुसऱ्याच्या प्रेमाची गोष्ट ऐकण्यास कोणालाच अधिकार नाहीं. मग तो बाप असो, आई असो, किंवा एखादा मित्रही असो."

उषावती विजयसिंगावर प्रेम करीत नव्हतीच. तिचें प्रेम दुसऱ्याच एकावर होतें. विजयसिंगास अशी शंका पूर्वींच आली होती. ती आज खरी झाल्यामुळें त्याच्यावर वज्राप्रमाणें आघात झाला. चितोडाधिपति समरसिंगाचा युवराज कल्याणसिंग याच्याशीं उषावतीचा विवाहसंबंध होणार आहे असें त्यानें बऱ्याच दिवसांपूर्वीं ऐकलें होतें. त्याची प्रतीति करून घेण्यासाठींच तो तेथें आला होता. कल्याणसिंगाच्या ठिकाणीं उषावती अनुरागिणी न होण्याचा होईल तितका प्रयत्न करावा असेंही त्याच्या मनांत होतें. पण आपल्या शेवटच्या प्रश्नाचें तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं हें पाहून त्यानें तिच्याकडून अधिक उत्तराची आशाच केली नाहीं. तो ह्मणाला, "हे महाभाग्यशालिनी, तुमच्या प्रेमास जर मी पात्र नाहीं, तर युवराज इन्द्रसिंग[1] कीं रणवीरसिंग[2] तुमच्या प्रेमास पात्र आहे? अथवा भाग्यशाली भीमसिंग, कीं विरागवान लक्ष्मणसिंग[3], कीं दुसरा कोणी?" या वेळींही उषावती निरुत्तर झाली. तेव्हां विजयसिंग अधीर होऊन ह्मणाला, "वः! हें कसलें प्रेम आणि कसली आदर-

---

१ जयपुरचा कुमार २ लाहोरचा दत्तक ३ पुष्कळ लढाया मारून वैराग्यवान झालेला काशीचा राजा जरी उतरत्या वयाचा होता, तरी तो अजून अविवाहितच होता.

बुद्धि! माझ्या समक्ष त्याचें नांव घेण्यास तुह्मांस संकोच वाटतो, तेव्हां तुमचें प्रेम बरेंच शुद्ध आहे ह्मणायचें!" उषावती रोषमय होऊन बोलली, "रे उद्धट पुरुषा! त्यांपैकीं माझ्या प्रीतीस कोणी पात्र नाहीं हें तुला कसें समजत नाहीं? आतां मला जास्त प्रश्न करून उगाच त्रास देऊं नको. माझ्यावर तुमचें प्रेम शुद्ध असेल तर आतांच चालते व्हा." जर या सर्वांपैकीं हिच्या प्रणयास कोणीच पात्र नाहीं, तर दुसरा कोण असणार असा विचार करून विजयसिंग मृदुस्वरानें ह्मणाला, "रणवीरसिंग नव्हे, इन्द्रसिंगही नव्हे, तर तुमच्या योग्य दुसरा कोण आहे? हं! हं! कल्याणसिंगाचें तर ध्यान लागलें नसेलना?" कल्याणसिंगाचें नांव ऐकतांच राजकन्या घाबरली. तिच्या मुखावरचा भाव बदलला. तिचें अंग रक्त झालें. दृष्टि भूमीकडे वळली. ती सलज्ज झाली. आपला मनोभाव लपविण्यासाठीं तिनें सर्वांगावर वस्त्र घेतलें, व ती कपालावरील प्रस्वेद पुसूं लागली. विजयसिंगानें तें वस्त्र जरा एकीकडे केलें तों तिचा प्रत्यक्ष भाव तेव्हांच त्याच्या ध्यानीं आला. त्याच्या मनोभूमींत जो आशांकुर उत्पन्न झाला होता तो तत्काळ भस्मीभूत झाला. तो एकही शब्द न बोलतां तसाच महालाबाहेर पडला. त्याची ही वृत्ति पाहून राजकन्या विचारशून्य झाली. कांहीं वेळानें

तिनें आपली सखी जी गुलाब तिला हांक मारली. गुलाबेचें वदन अत्यंत उदास दिसत होतें, व तिच्या रक्त नेत्रांवरून ती रडत होती असें स्पष्ट दिसत होतें. पण राजकन्येचें लक्ष्य नुकत्याच झालेल्या प्रकारांत गुंतलें असल्यामुळें तिनें तिच्याकडे पाहिलें नाहीं. गुलाब येतांच ती तिला ह्मणाली, "सखे, मंत्रिपुत्रास तूं गुप्तद्वारानें येथें पाठविलेंस, पण जाते वेळीं तुला तो कांहींच बोलला नाहीं याचें काय कारण असावें बरें? मी पहिल्यापासून त्याच्याबरोबर बोलण्याचें नाकारलें होतें. तो चांगला मनुष्य नव्हे. पण तुझ्या विनंतीवरून मी एक वेळ परवानगी दिली. पण पाहिलें ना त्याचें फळ? हा फार विचित्र मनुष्य आहे. याच्या मनांतलि गोष्ट मला माहित होती ह्मणूनच मी नाहीं नाहीं ह्मणत होतें. तरी बरें झालें, कोणी पाहिलें नाहीं ह्मणून! पण आतां याचें कधींच ऐकूं नको व त्यास येथें येऊंही देऊं नको. जा, गुप्तद्वार बंद कर आणि नीज. रात्र फार झाली आहे."

## प्रकरण ९ वें.

### प्रेम गेलें आणि वैर आलें.

या संसारांतील प्रेमांत दोन प्रकार आहेत. कृत्रिम आणि अकृत्रिम. जो मनुष्य प्रणयिजनांचा सुखसाधनहेतु असूनही आत्मसुखाभिलाषाचें विसर्जन न करितां स्वात्मसुखपूर्त्यर्थ कठोरहृदयी होतो. व 'त्याचें प्रेम माझ्यावर नाहींना? बरें आहे, पाहून घेईन!' अशा प्रकारचा नीच संकल्प करतो, त्याचें प्रेम कृत्रिम होय. उच्च प्रणयी विरळ असतात. सामान्यतः परस्परांच्या स्वार्थसाधनांत एकाकडून हरकत येऊं लागली ह्मणजे दुसरा त्याच्या अकल्याणाची इच्छा करीत असतो. ज्या मनुष्याच्या प्रेमांत कार्यवशात् भंग होतो, अथवा आत्मसुखार्थच जो प्रेम करतो, त्याचें प्रेम 'प्रेम' या नांवास योग्य नव्हे. त्याला कांहीं तरी दुसरेंच नांव दिलें पाहिजे. असलें प्रेम वस्तुतः तिरस्कारासच पात्र होय. आतां, ज्याच्या मनांत प्रणयिजनांविषयीं कोणत्याच प्रकारें व कोणत्याही कारणानें निष्ठुर भाव उत्पन्न होत नाहीं, तर त्यांच्याविषयीं असलेल्या त्याच्या प्रेमाची वृद्धिच होत जाते,

ज्याच्या मनांत अशुद्ध भाव मुळींच उत्पन्न न होतां तो प्रणयिजनांचा उत्तरोत्तर अभ्युदय व्हावा अशीच इच्छा करितो, त्याच्या प्रेमास अकृत्रिम अथवा शुद्ध प्रेम ह्मणाण्यास कोणतीच हरकत नाहीं.

विजयसिंगाचें प्रेम पहिल्या प्रकारचें होतें. राजबाला अन्य व्यक्तीवर प्रेम करीत आहे, अन्यास भजत आहे, तिच्या हृदयस्थानांत अन्य व्यक्तीचा वास आहे, ती आपल्यावर प्रेम करीत नाहीं, तर ती अन्य पुरुषावर आसक्त झाली आहे, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हांच त्याच्या मनांत वैर आणि क्रोध यांनीं तंबू ठोकला! राजकन्येचें अकल्याण कसें होईल याच विचारांत तो पडला. पुष्कळ दिवसांपासून त्यानें सांठवून ठेवलेलें आशाधन मातींत गेल्यासारखें झालें. राजकन्येबरोबर लग्न झालें तर कोणत्या ना कोणत्या दिवशीं आपण दिल्लीपति होईन अशी त्यास पूर्ण उमेद होती. कारण, पृथुराजास पुत्रसंतान नव्हतें. पण हा सर्व हवेंतील किल्ला आहे, व आपल्या ठिकाणीं कल्याणसिंगाची स्वारी विराजमान होणार असें जेव्हां त्यास समजून चुकलें, तेव्हां त्याच्या मनांत दोघांविषयींही वैरभाव उत्पन्न झाला. त्याच्या अंगावर अग्निज्वाला आल्याप्रमाणें त्यास वाटूं लागलें. तो आवेशानें ह्मणाला, "ठीक, ठीक! कांहीं हरकत नाहीं. पाहून

घेईन! असें कध्धीं होऊं देणार नाहीं. मरेन नाहीं तर मारीन. पण असें होऊं नाहींच देणार!"

अशा प्रकारें विचार करीत विजयासिंग आपल्या घरीं आला. त्याचे नोकर त्याची वाट पहात राहिले होते. त्यानें त्यांच्याकडें नजरच न केल्यामुळें त्यांनीं मागें राहून त्यास सांगितलें, "आपणास महाराज हांक मारीत आहेत!" हें ऐकांतच त्यानें कांहीं वेळ उभा राहून थोडासा विचार केला, व मग तो आपल्या पित्याकडे जाऊं लागला. त्याचा बाप ऐशीं वर्षांचा होता. त्याचे सर्व केंस पांढरे झाले होते. मुख फार गंभीर दिसत होतें. त्याच्या वदनावरील आनंदश्रीच्या योगानें सर्वांच्या मनांत आनंद उत्पन्न होत असे. त्याचा स्वभावच असा होता कीं त्यास पाहतांच सर्वांच्या मनांत सद्भाव आणि भक्ति उत्पन्न व्हावी. त्यास पाहिल्यावर तो तरुणावस्थेमध्यें एक सुंदर व महात्मा पुरुष होता असें वाटल्यावांचून राहत नसे. विजयसिंगाच्या मुखाकृतींत व त्या वृद्ध मंत्र्याच्या मुखाकृतींत बरेंच सादृश्य होतें; पण त्यांच्या गुणांत मात्र आकाशपातालाइतकी तफावत होती.

पित्याच्या खोलींत प्रवेश करतांच वृद्ध मंत्री संग्रामसिंग व महाराजाचा एकांतिक भक्त व राजकार्यकुशल अमरसिंग दिव्याजवळ बसून पत्रें लिहीत आहेत

असें विजयसिंगानें पाहिलें. विजयसिंग आला तरी त्यांनीं पत्रें लिहिण्याचें बंद केलें नाहीं. त्यांनीं बोटानें खुण करून त्यास बसण्यास सांगितलें. कांहीं वेळानें पत्रें पुरीं झाल्यावर संग्रामसिंग विजयसिंगास ह्मणाला, "विजय, तूं कोठें गेला होतास? आज संध्याकाळपासून आह्मीं तुझी वाट पहात आहों, पण तुझा कोठें पत्ता नाहीं! तुला कांहीं गुप्त गोष्टी सांगावयाच्या आहेत." पित्याचें भाषण ऐकून विजयसिंगास आश्चर्य वाटलें. तो ह्मणाला, "बाबा, मी जेव्हां घरीं आलों, तेव्हां आपण मला शोधीत आहां असें नोकरांनीं कळविलें. तेव्हां मी लगेच इकडे आलों. आपली काय आज्ञा आहे?" संग्रामसिंग ह्मणाला, "तुला कांहीं अगत्याच्या कारणामुळें पहांटेसच बाहेर गांवीं गेलें पाहिजे. तूं लवकर तयारी कर." दुसऱ्याच दिवशीं आपणास देशांतरास जावें लागणार हें ऐकून विजयसिंगास विशेष आश्चर्य वाटलें. तें पाहून अमरसिंगानें त्यास कागद दाखविले व सांगितलें, "हे कागद पत्र मोठ्या महत्वाचे आहेत, व ते निरनिराळ्या राजांस पोहोंचवावयाचे आहेत. यासाठीं कोणातरी आपल्याच मनुष्याची गरज होती. तेव्हां संग्रामसिंगानें हें काम आपणाकडेच देण्याचें ठरविलें आहे. मागील युद्धांत पराभूत झालेला शहाबुद्दीन

घोरी घोर गर्जना करीत आपणावर येत आहे हें आपणास ठाऊक असेलच. त्याच्याशीं युद्ध करण्यासाठीं सर्व मांडलिक राजांची मदत मिळविण्यासाठीं हीं पत्रें तयार केलीं आहेत. अद्याप आपण कसलीही तयारी केलेली नाहीं. कारण, महाराजांस असें वाटलें होतें कीं यवन लोकांचा पूर्वीं पराभव व अपमान झाला आहे त्याची आठवण ठेवून ते पुनः इकडे येणार नाहींत. पण आज अशी खबर मिळाली आहे कीं, तो मजल दरमजल करीत पुढेंच येत आहे. आमची अशीही समजूत होती कीं, आपलें सैन्य पुष्कळ आहे. पण यवनांचें सैन्य विशाल असल्यामुळें आपणास जास्त साहाय्याची आवश्यकता आहे. शाहाण्या राजानें शत्रूस बलहीन समजून स्वस्थ बसून राहणें बरोबर नव्हे. त्यानें साधारण युद्धांतही सावध राहिलें पाहिजे. आणि हा शत्रु तर मोठा आहे. तशांत आपलेच क्षत्रिय त्याला सहाय आहेत अशी बोलवा आहे. तेव्हां आपली सर्व बाजूंनीं तयारी करणें अधिकच अगत्याचें आहे. आपला शत्रु तो शत्रूचा मित्र असणें स्वाभाविकच होय. कनोजचें युद्ध झाल्यावर मुठी इतक्या सैन्यानिशींही मुसलमान लोकांस धूळ खात मागें लावलें होतें. तेव्हां यावेळीं सर्व सेनेस समरांगणांत आणावी लागेल कीं काय हा तरी एक

प्रश्नच आहे; पण काम नांव ठेवण्याजोगें होतां कामा नये. जयचन्द्र आपला शत्रु आहे, व शत्रूचा एक दूत आज अशी खबर घेऊन आला आहे कीं, जयचन्द्र शत्रूस साहाय्य करण्यास तत्पर झाला आहे. यासाठीं तुह्मी हीं पत्रें घेऊन आपल्या मांडलिक राजांकडे जावें, व ते आपापलीं सैन्यें घेऊन साहाय्य करण्यास निघून येतील असें करावें. हें काम मोठ्या शहाणपणानें, सावधगिरीनें, दृढतेनें व विश्वासानें केलें पाहिजे. कारण चोहींकडे मुसलमान लोकांनीं आपलीं ठाणीं देऊन नाकीं धरलीं आहेत. साधारणशा दूताकडून हें काम होण्यासारखें नसल्यामुळें या ठिकाणीं तुमचीच योजना करण्याचें ठरविलें आहे. शत्रूच्या हातीं सापडल्यास आपला बचाव कसा करावा हें सामान्य दूतास समजावयाचें नाहीं. पण तुह्मी विलक्षण बुद्धिमान् असल्यामुळें तेव्हांच सुटून जाल! दूतकार्यामध्यें जे साहसादि गुण लागतात ते सर्व तुमच्यामध्यें आहेत. यासाठींच श्रीमन्महाराजांनीं या कार्यानिमित्त तुमची योजना केली आहे. आतां आपली तयारी करा, आणि मार्गांत येणारीं संकटें वाटवून काम फत्ते करा." अमरसिंगाचें भाषण पुरें झाल्यावर विजयसिंगाचा वृद्ध पिता ह्मणाला, "पुत्रा! तूं माझा आहेस, मला प्राणापेक्षांही तूं अधिक आहेस; परंतु त्याहूनही स्वदेश व स्वदेश-

प्रेम मला अधिक होय. देशरक्षणासाठीं पुत्र तर काय, पण हे प्राणही अर्पण करण्यास मी विलंब लावणार नाहीं. जर मी वृद्ध झालों नसतों, तर या कामासाठीं मी तुला पाठविलें नसतें. मी स्वतःच गेलों असतों." असें बोलतां बोलतां त्या वृद्ध वीराचे नेत्र अश्रुपूर्ण झाले. विजयसिंगही जाण्याची तयारी करण्यासाठीं निघून गेला.

विजयसिंग हा संग्रामसिंगाचा एकुलता एक मुलगा होता, व तोही त्याच्या पंचावनाव्या वर्षी झाला असल्यामुळें त्याचा फारच लाडका होता. त्यानें विजयसिंगास राजकार्याचें आणि युद्धकार्याचें संपूर्ण शिक्षण दिलें होतें. तो युद्धांत शिरला असता तर त्यानें खरोखरच मोठें नांव केलें असतें. पण तो स्वभावानें फार भीरु व दीर्घद्वेषी होता. पुत्रास पाठविल्यावर संग्रामसिंग अमरसिंगास ह्मणाला, "अमरसिंगजी, पुत्रास पाठविण्याचा ठराव तर केलाच. पण ज्या कार्यासाठीं तो जात आहे त्यांतून बचावण्यापेक्षां मरण्याचाच जास्त संभव आहे. तो जर मरण पावला तर मग मला कोणच राहिला नाहीं. या वृद्धावस्थेंत माझें कोणच नाहीं, हा एक पुत्रच आहे. हा जर परत आला नाहीं, तर मी जीवंत कसा राहूं? असें झालें तर माझी काय दशा होईल?" त्या वृद्ध वीरास असा विचार पडला खरा,

पण त्याची स्वदेशावर परमप्रीति असल्यामुळें तो पुनः ह्मणाला, "पण हा माझा देश! ही माझी भूमि! ही काय यवनांच्या हातीं जाणार! हाय! हाय! असें झालेंच तर मग पुत्र आणि कलत्र असून काय उपयोग? नाहीं, नाहीं! अमरसिंगजी, मी देशासाठीं सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार आहें. हें माझें धन आणि हें माझें शरीरही अर्पण करण्यास मी तयार आहें. देशाचें रक्षण करण्यासाठीं अजूनही माझ्या हातीं तरवार द्या, ह्मणजे किती यवनांचीं काळिजें चिरतों तें दिसून येईल. तलवार, तलवार! मुसलमानांस मारा, कापा, तोडा, शिर उडवा, बस, मला दुसरें कांहीं सुचत नाहीं. पुत्र कोण? हा आज आहे तर उद्यां नाहीं. जन्मला तो मरणारच. पण हा तर देशाच्या कल्याणासाठीं, स्वदेशाच्या रक्षणासाठीं, आपल्या स्त्रियांच्या अभिमानासाठीं, अनेक स्त्रियांच्या सौभाग्यासाठीं, बालकांची विपत्ति हरण करण्यासाठीं, खाल्लेल्या अन्नास जागण्यासाठीं मरेल! धन्य वेळ! धन्य दिवस! यवन येऊन आपल्या धर्माचा विध्वंस करणार नाहींत काय? मग त्याच्यापेक्षां एका पुत्राची किंमत जास्त कीं काय? ज्या मनुष्यानें या देवभूमींत जन्म घेऊन देशमातेची सेवा केली नाहीं, देशाचें लेशमात्रही कल्याण केलें नाहीं, एक दिवसही हातांत समशेर घेऊन शत्रूचें

काळीज चिरलें नाहीं, शत्रुस्त्रीचें सौभाग्य हरण केलें नाहीं, तर रणसंग्रामांत भीरुताच दाखविली, आणि क्षत्रिय नांवाला लांच्छन लाविलें, तो पुरुष नव्हे, तर, फत्तरच जन्मला ह्मणून समजावें. माझा पुत्र देशकल्याणासाठीं आपले प्राण अर्पण करण्यास तत्पर आहे हें माझें भाग्य होय. आणि अशा कामांत त्याची श्रीमन्महाराजांनीं योजना केली आहे हें ऐकून मला धन्य वाटतें."

याप्रमाणें विजयसिंगाचा पिता विचार करीत आहे तों इकडे विजयसिंग अंथरुणावर इकडून तिकडे तिकडून इकडे लोळत पडला आहे! निद्रा सर्व चिन्तेचा परिहार करील असें त्याच्या मनांत होतें, परंतु निद्रादेवी त्याच्यावर यत्किंचित्‌ही कृपा करीना. पित्याचें दिव्य मुख पाहून त्यास क्षणभर उषावतीचा व कल्याणसिंगाचा विसर पडला होता. परंतु तो एकटा झाला त्याबरोबर त्यास त्यांची पुनः आठवण झाली. पण जसजसी ती चिन्ता—तो विचार—तें वैर—ती दुष्ट इच्छा, तो हिंसक विचार दूर करण्याचा तो प्रयत्न करूं लागला व निद्रादेवीची आराधना करूं लागला, तसतसी ती विशेष रोष करून, जणुं काय या पाप्यास सुखच देऊं नये, यास चिन्ताग्नींत तसाच जळूं द्यावा, असा विचार करून त्याच्यापासून दूर जाऊं लागली. राजकन्येक-

रोवर झालेलें भाषण त्याच्या कर्णरंध्रांत घुमघुमूं लागलें. त्याच्या अंगाची आग होऊं लागली. तो अंथरुणावरून उठला, पुनः बसला, पुनः उठून फिरूं लागला, खिड-कीजवळ गेला, बस, त्याच्या मनांत वैराचाच विचार येऊं लागला. "काय करूं, कोठें जाऊं, वैर! वैर! 'हे पापिणि राजकन्ये! तूं माझा परित्याग करून चितोडचा युवराज कल्याणसिंग त्याचवर प्रीति ठेवलीस काय? कांहीं हरकत नाहीं, तुला याचें फळ दिसून येईल!" याप्रमाणें तो मोठमोठ्यानें बोलूं लागला. त्याचा आवाज ऐकून नोकर लोकही आश्चर्य करूं लागले कीं, हें आहे तरी काय! हा वेडा तर झाला नसेलना? विजयसिंग तसाच कांहीं वेळ फेऱ्या मारीत मारीत पुनः शय्येवर जाऊन पडला. पण ती यावेळीं त्याच्या अंगास कंट-कासारखी टोंचूं लागली! तो तसाच शय्येवरून उठला व तडक बागेमध्यें चालता झाला. तेथें फिरतां फिरतां त्याच्या मनोमार्गावर अनेक विचार व नानाविध कल्पना यांची एकसारखी रहदारी चाललीच होती! शेवटीं तो एका मंचकावर स्वस्थ विचार करीत बसला; पण इत-क्यांत अत्यन्त हर्षित होऊन हा कसा एकदम उभा राहिला आहे पहा!

त्याच्या मनांत असा विचार आला कीं, " राजक-न्येच्या महालांतून आपण बाहेर जात असतांना दूर-

दाजावर कोणी उभें होतें, पण चित्ताच्या अस्थिरतेमुळें आपण मागें वळून पाहिलें नाहीं. तरी ती गुलाबच असेल यांत शंका नाहीं. पण ती गुपचुप उभी राहून काय बरें ऐकत होती? तिनें आमच्या सर्व गोष्टी ऐकल्या तर नसतीलना?" विजयसिंग जेव्हां बाहेर जात होता तेव्हां गुलाब पुरुषजातीची निंदा करीत होती, आणि तशी निंदा करण्याचें तिला कांहीं कारणही झालें होतें. राजकन्येबरोबर विजयसिंगाचें झालेलें संभाषण ऐकून ती मनांतल्या मनांत जळत होती. कारण ती विजयसिंगावर मनापासून शुद्ध प्रेम ठेवीत होती. एक दुसऱ्यावर प्रीति करतो तर दुसरा तिसऱ्यावर प्रीति करतो, आणि तिसरा चौथ्यावर प्रीति करतो असा हा विलक्षण सृष्टिनियम चालला आहे! गुलाब विजयसिंगावर प्रीति करते, विजयसिंग उषावतीवर प्रीति करतो, आणि उषावती कल्याणसिंगावर प्रीति करते!

विजयसिंगास असा विचार सुचला कीं, गुलाब आपल्यावर फार प्रेम ठेवीत आहे. तेव्हां तिला आपल्या हातीं घेऊन तिच्या साहाय्यानें कंटकरूप कल्याणाचा चांगलाच सूड उगवावा, व उषावतीस नेहमींची दुःखी करावें. हा विचार त्यास इतका कांहीं मानवला कीं, तो मनांत आल्याबरोबर तो तावडतोब हर्ष हो-

ऊन उभा राहिला. उभा राहून एक दोन मिनिटें झालीं न झालीं तोंच हिताहिताचा कांहींच विचार न करतां तो विद्युद्वेगानें राजमहालाकडे येऊन गुप्त द्वारानें बागेंतही शिरला.

गुलाब कोठें निजत असे, कोठें फिरत असे हें सर्व कांहीं विजयसिंगास ठाऊक होतें. त्याचप्रमाणें कोणत्या रस्त्यानें जाणें निर्भय आहे हें त्यास पक्कें ठाऊक असल्यामुळें अंधाराअंधारांतून चालत चालत गुलाबेच्या खोलीजवळ येऊन तो उभा राहिला. खोलीमध्यें कोणत्या रीतीनें जावें याचा तो विचार करीत होता. इतक्यांत कोणाचीं पावलें वाजलेलीं त्यास ऐकूं आलीं. त्याबरोबर तो चपापून मागें सरला, व तो कोणी तरी पहारेवाला असला तर त्यास आपणाला जबाब देतां येणार नाहीं या भीतीनें एका वृक्षाच्या सावलींत जाऊन उभा राहिला. पण त्यानें आपल्या कल्पनेनें उत्पन्न केलेला पहारेवाला त्याच वृक्षाकडे येऊं लागला! विजयसिंगाची पांचांवर धारण बसली! आतां काय करावें! मोठी पंचाईत झाली! तो पहारेवाला वृक्षाखालीं येऊन बसलाही! पण विजयसिंगाची भीति दूर होऊन तो मोठ्या आनंदानें त्या पहारेवाल्याच्यापुढें येऊन उभा राहिला! कारण, तो पहारेवाला ह्मणजे विजयसिंगावर अत्यंत शुद्ध प्रेम ठेवणारी उषावतीची सखी गुलाबच होती!!

राजकन्येबरोबर बोलून विजयसिंग राजमहालांतून निघून गेल्यावर गुलाब बिछान्यावर जाऊन पडली; पण तिला झोंप येईना. तिच्या मनांत असा विचार येऊं लागला कीं, विजयसिंग हा चमत्कारिक आणि निर्दय आहे! जी राजकन्या त्याच्यावर प्रेम ठेवीत नाहीं, त्याचा धिक्कार करते, तिच्याजवळ तो प्रेमयाचना करतो; आणि मी मनापासून त्याच्यावर प्रेम ठेवीत असतां, त्याला आपला शिरोमणि करण्यास तत्पर असतां, माझी अवगणना करतो—माझ्याकडे पाहत सुद्धां नाहीं. तेव्हां ती आपल्या शय्येचा त्याग करून शीतळ पवनाचा आस्वाद घेण्यासाठीं बागेंत आली.

ज्या हेतूनें विजयसिंग तिकडे आला तो अनायासेंच सिद्ध झाल्यामुळें अत्यंत आनंदित होऊन तो गुलाबेच्या पुढें येऊन उभा राहिला. पण गुलाब विचारमग्न असल्यामुळें पुरुषाची चाहूल लागतांच एकदम महालांत पळून जाऊं लागली. तेव्हां विजयसिंग जरा मोठ्यानें ह्मणाला, "भिऊं नको! भिऊं नको! प्रिये, अशी पळतेस कां? मी तर तुझा विजयसिंग आहें. तूं अशी पळून जाशील तर माझ्यावर भलतेंच संकट मात्र येईल." त्याचा शब्द ऐकतांच गुलाब मागें फिरली व त्याच्याजवळ आली. जरी तो कोणत्या कारणामुळें

तेथें आला होता हें तिला मुळींच माहित नव्हतें, तरी त्याच्यावर तिचें शुद्ध प्रेम असल्यामुळें त्याचा वचन-कलरव कर्णांत पडतांच ती आनंदित झाली. परंतु तो भाव लपवून ती ह्मणाली, "एवढ्या मोठ्या रात्रीं तुम्ही येथें कशासाठीं आलां आहां?" विजयसिंगानें उत्तर दिलें, "तुझ्यासाठीं." गुलाब क्रोधित होऊन म्हणाली, "चला, असल्या गोष्टी मला चांगल्या कळतात बरें! ही वेळ कांहीं थट्टा करण्याची नव्हे." विजयसिंग म्हणाला, "मी थट्टा करतों असें तुला वाटतें ना? छे, छे! मी खरोखरच सांगतों, तसें कांहीं नव्हे." गुलाब म्हणाली, "असें एवढें कसलें तें काम?" विजयसिंग म्हणाला, "प्रिये! मी उद्यां परदेशीं जाणार आहें." गुलाब म्हणाली, "हेंच का? पण 'प्रिये, प्रिये' असें मला म्हणत जाऊं नका हो, सांगून ठेवतें."

विजयसिंगास वाटलें कीं ती जागा अशा गोष्टी बोलण्यास योग्य नव्हे. तेव्हां तो गुलाबेस बरोबर घेऊन दुसऱ्या एका मोठ्या वृक्षाखालीं जाऊन बसला. नंतर तो म्हणाला, "मी तुला एक गोष्ट विचारण्यास आलों आहें ती सांगशील का?" गुलाब म्हणाली, "मला माहित असेल, आणि सांगण्याजोगी असेल तर सांगेन. तुम्ही राजकन्येविषयीं बोलणार ना? पण नुकतीच ती आपणास समक्ष भेटली, आणि खरें काय

तें तिनें कळविलेंच. मग आतां आणखी काय विचारावयाचें आहे? तिचें तर युवराज कल्याणसिंगावर प्रेम आहे. तुम्ही तिची आशा सोडून द्या. व्यर्थ भलत्याच आशेंत कशास पडतां?"

एवढ्या मोठ्या रात्रीं त्यास राजमहालांत येण्याचीं जीं कांहीं कारणें होतीं त्यांपैकीं उषावती कल्याणसिंगावर प्रेम ठेवते कीं नाहीं याची खरी माहिती सांपडावी हेंही एक होतें. तें गुलाब सहजासहजीं बोलून गेल्याबरोबर विजयसिंग ह्मणाला, "छे छे, मला ती गोष्ट नकोच आहे मुळीं. माझें काम तुझ्याजवळच आहे." हें ऐकून गुलाब आश्चर्यान्वित होऊन ह्मणाली, "माझ्याजवळ? माझ्याजवळ काम आहे? काय काम आहे?" विजयसिंगानें उत्तर दिलें, "होय होय, तुझ्याजवळच काम आहे. आज दारावर उभी राहून तूं काय बोलत होतीस? माझ्या प्रेमास पात्र कोण आहे? तूंच कीं नाहीं?" आपण दरवाजावर जे कांहीं शब्द उच्चारले ते सर्व त्यानें ऐकले असा समज होऊन ती लज्जित झाली, व मान खालीं करून उभी राहिली. कांहीं वेळ विचार करून ती ह्मणाली, "सगळें ऐकून तर झालेंच आणि विचारायचें तें कशाला?" विजयसिंग ह्मणाला "तर माझा तर्क बरोबर झाला ह्मणावयाचा. तूं माझ्यावर शुद्ध प्रेम ठेवतेस काय?" गुलाब झणकारून

ह्मणाली, "मी शुद्ध ठेवितें कीं ठेवीत नाहीं हें कळून आपणाला काय करायचें आहे? तुमचें तर माझ्यावर प्रेम नाहींना? तुमच्या मनांत तर दुसरीच रमणी आहे. मग मला विचारण्यांत तें हांसील कसलें?" विजयसिंग ह्मणाला, "छे, छे, हें काय बोलतेस? मी तुझ्यावर शुद्ध प्रेम ठेवतों." हें ऐकतांच गुलाबेचें मुखकमल हर्षानें किंचित प्रफुल्ल दिसूं लागलें. पण क्षणांतच तें पुनः पुर्वस्थितीवर आलें. हा बोलतो तरी काय? जो थोडक्याच वेळापूर्वी राजकन्येसाठीं वेडा होऊन गेला होता, तोच इतक्यांत दुसरविर प्रेम करतो? हा कपट तर करीत नसेलना? मला फसवीत तर नाहींना? हा अस्थिरप्रेमी तर नसेलना? तसें असेल दुसरीवर हा शुद्ध प्रेम कसा ठेऊं शकेल?" असा मनांत विचार करून ती विजयसिंगास ह्मणाली, "विजयसिंगजी, तुह्मी हें काय बोलतां? तुह्मी काय माझ्यावर प्रेम ठेवतां? नुकतेच तर राजकन्येवर फिदा झालां होतां; आणि याच घटकेस माझ्यावर प्रीति करतां? छे, हें मला खरें वाटत नाहीं. तुमचें प्रेम चंचल आहे, विजेसारखें आहे, अस्थिर आहे. तुह्मी आज माझ्यावर प्रेम ठेवाल, आणि उद्यां दुसरीवर ठेवाल. तुमचा नेम काय?"

असल्या बोलण्यानें गुलाब फसावयाची नाहीं, ती

किती झाली तरी चंद कवीची बहीण आहे, असा विचार करून विजयसिंग करुणस्वरानें ह्मणाला, "काय? तूंही माझ्या प्रेमाचा धिक्कार करतेस ना? हाय! काय हें माझें दुर्दैव! जी माझ्यावर सद्भावानें प्रेम करीत असे तीही माझा धिक्कार करून, माझा संशय घेऊं लागली! हाय! मी किती दुःखी आहें! मला कोणी मित्र नाहीं! गुलाब! गुलाब! तूं सुवासमय असून अंगावर हे दुष्ट कटक कां धारण करतेस? राजकन्येनें माझा धिक्कार केला असतांही मी आतां तिच्यावर प्रीति करूं? आणि माझ्यावर जी प्रेम ठेवते तिला सोडून देऊं? तुझ्यावर माझें जें प्रेम आहे तें मी आज स्पष्ट सांगितलें, हा मी अपराध केला कीं काय? हाय, हाय! अबलाजातीचें हृदयच कठोर आहे. ती पुरुषास पीडारूपच आहे." विजयसिंग असें बोलत असतांना इकडे गुलाबीचे नेत्र अश्रुपूर्ण झाले होते. सरलहृदया गुलाब! बिचारीला विजयसिंगाची ही चातुरी, हें कौशल्य, हें छलकपट मुळींच समजलें नाहीं! स्त्रीजातीचा हा एक स्वाभाविकच गुण आहे. जेव्हां तिची स्तुति करणारा कोणी पाठकगण समीप असतो, तेव्हां ती त्याच्या सपाट्यांत सांपडून तात्काल फसते. तिचें हृदय कोमल असतें. ती विश्वासशील असते, ती सरलहृदया असते. प्रेम पाहतांच प्रेम करणारी असते.

स्वतः सुन्दर असून सुन्दर विचार करणारी असते. रमणी असून रमविणारी असते. धूर्त गोष्टी समजण्यास असमर्थ असते. कपटी लोकांस ओळखणारी नसते. गुलाबही तशीच होती. ती एकनिष्ट व विचारवंत असूनही आज एका धूर्ताच्या कपटजालांत सांपडली!

विजयसिंगाचें भाषण ऐकून तिचें कोमल हृदय तात्काल द्रवलें. राजकन्येनें त्याचा तिरस्कार केला होता हें गुलाबीला ठाऊकच होतें. तेव्हां विजयसिंगानें तिचा नाद सोडून दिला असावा अशी तिची खात्री झाली. ती ह्मणाली, "वीरपुत्र विजयसिंगजी! तुह्मी असें बोलूं नका. माझ्याकडून झालेल्या अपराधाची क्षमा करा." गुलाबीच्या मनावर आपल्या बोलण्याचा इष्ट परिणाम झाला हें पाहून विजयसिंगास आनंद झाला. विजयसिंग आनंदित झाला असें पाहून गुलाब मनांत असें समजूं लागली कीं, आपण आपलें प्रेम दाखविल्यामुळें त्यास आनंद झाला असावा!

इतक्यांत "रंगांत भंग" झाला! त्यांस पहारेवाल्याचीं पावलें ऐकूं आलीं. तेव्हां गुलाब विजयसिंगास ह्मणाली, "आतां लवकर निघून चला. नाहींतर भलताच प्रसंग गुदरेल." विजयसिंग ह्मणाला, "बरें आहे-

मी जातोंच. पण माझें काम झाल्यावर पुनः मी इकडे येईनच." विजयसिंग तसाच चालता झाला. त्यास कोणी पाहिलें नाहीं. पहारेवाला गुलाबीजवळ आला. पण ती सहज बागेंत फिरावयास ह्मणून आली असावी असें समजून तो कांहीं बोलला नाहीं.

विजयसिंग तर घरीं जातां जातां आनंदसागरांत तरंगूं लागला. गुलाबीनें त्याची प्रिय—गृहिणी होण्याचें कबूल केलें हें त्याच्या आनंदाचें कारण होतें असें नाहीं. तर राजकन्या व कल्याणसिंग यांचा सूड उगविण्याच्या कामांत जय मिळविण्याची त्याची जी आशा होती, ती आतां दृढतर झाली हेंच तें खरें कारण होतें. त्यास झोंप लागते न लागते तोंच प्रभातकाल तर येऊन ठेपला! त्याची झोंप उडून गेली. पहांटेचा शीतल, सुखदायक पवन अंगस्पर्श करूं लागला. त्या शीतल समीरानें व सूड उगविण्याच्या दृढाशेनें त्याचें मन प्रसन्न झालें. तो लगेच उठला व पित्यानें सांगितलेलें काम करण्यासाठीं अश्वारूढ होऊन विदेशीं चालता झाला.

———

# प्रकरण १० वें.

## संन्याशाचा परलोकवास.

रात्र गंभीर आणि निःशब्द आहे, व
चंद्रोदय न झाल्यामुळें पृथ्वी भयंकर
दिसत आहे, चहूंकडे अंधकार
पसरला आहे, आस
तशींगें भीतिजनक कोमल हृदय
उलूकांचा कठो तिरस्कार केला
ऐकूं येत आहे, प्राणिमात्र घोर । तेव्हां विजयसिं-
जणुं काय एक प्रकारच्या मृत्यूला वा अशी तिची
दिलीप आणि सुखानंद यांवर मात्र निद्रा सिंगजी!
कृपा केली होती. एका ठिकाणी संन्यासी ज्वरा
दीर्घ श्वास टाकीत पडला होता, व दुसऱ्या ठिकाणी
उदास व निःसत्व असा दिलीप दोन्ही पायांत डोकें घालून बसला होता. पांच दहा मिनिटांच्या अंतरानें संन्याशाकडे दृष्टि करून "बाबा, कांहीं पाहिजे काय ?" असें तो विचारी व संन्याशानें कांहीं नको म्हटलें म्हणजे खिन्न वदन करून उगी राही. त्या अनाथ पुत्राचें पित्यावर फार प्रेम असल्यामुळें त्याची मर्जी नसली तरी तो त्यास आग्रह करून औषध देत असे. संन्यासी पाणीच मागे. ह्या वेळीं दिलीपाचें

वय बावीस वर्षांचें होतें. अजून त्याला संसारांतील सुखदुःखांचें मुळींच ज्ञान नव्हतें. पण आज मात्र त्याचें मुख विषादपूर्ण आणि म्लान झालें होतें. पित्याच्या दुखण्यामुळें आपलें पुढें काय होईल याची त्यास मोठी भीति पडली होती. इतक्यांत संन्यासी म्हणाला, "पाणी." त्याबरोबर दिलीपानें त्यास पाणी पाजलें व तो म्हणाला, "औषध घ्यायचा वेळ झाला आहे, आणूं का?" संन्यासी म्हणाला, "आतां औषधाची गरज नाहीं." दिलीप म्हणाला, "आपण असें काय म्हणतां? आपण परलोकीं गेल्यावर या अनाथाचे काय हाल होतील तें आपणास ठाऊक नाहीं काय?"

हें ऐकतांच तो एकदम दचकला व ह्मणाला, "मुला, मी तुझा पिता नव्हें, तेव्हां आतां 'बाबा' ह्मणून ह्या पापी प्राण्यास हाक मारूं नको. आजपर्यंत मी तुला पुत्राप्रमाणें पाळून वाढविलें आहे, पण आतां तुला अज्ञानांत ठेवणें योग्य होणार नाहीं." दिलीप भयभीत होऊन ह्मणाला, "आज आपण मलासुद्धां कसे विसरलां?" संन्यासी ह्मणाला, "नाहीं, बाबा, मी ज्ञानशून्य झालों नाहीं. जेव्हां तूं सर्व हकीकत ऐकशील तेव्हां तुला खरें काय तें कळेल. पण थोडें पाणी." दिलीपानें प्रेमानें त्यास पाणी पाजलें व तो ह्मणाला, "बाबा, धीर धरा, मला हकीकत ऐकण्याची जरूर

नाहीं. तुमची प्रकृति विशेप बिघडत आहे त्याचें मला भय वाटतें. आतां निजा."

संन्यासी ह्मणाला, "पाणी पिऊन मी शांत झालों आहें. आतां मला कसली अडचण नाहीं. पण आतां बोलतांना मध्यें तूं मला अडवूं नको, नाहीं तर मी शक्तिहीन होऊन जाईन. मी बोलतों तें तूं ऐक. मी चितोडच्या एका श्रीमान् ब्राह्मणाचा मुलगा आहें. माझा पिता पुष्कळ धनसंचय करून मरण पावला, आणि मीदेखील व्यापारांत बराच पैसा मिळविला; पण दुर्दैवानें एक दोन वर्षें पुष्कळ खोट येऊन माझा सगळा पैसा गेला. माझें घरदार सगळें कांहीं गेलें. मी अगदीं अनाथ झालों. जरा पाणी दे पाहूं." दिलीप पाणी देऊन म्हणाला, "बाबा, आतां पुरे करा. तुम्ही माझे जन्मदाते नाहीं हें मला समजलें. पण आतां तुम्ही निजाल तर बरें होईल." संन्यासी ह्मणाला, "नाहीं, तसें नाहीं होणार. तुला अजून माझा विश्वास वाटत नाहीं, पण माझ्यावर तुझें प्रेम असल्यामुळें तूं मला बोलूं देत नाहींस." जरी संन्याशाच्यानें बोलवत नव्हतें, व त्याचा आत्मा परब्रह्मस्वरूपांत लीन होत होता तरी त्यानें पुनः बोलण्यास सुरवात केली. "त्यानंतर, हें दुःख जरा कमी होत आहे नोंच माझा एकुलता एक मुलगा मरण पावला व

त्याच्या दुःखानें माझ्या गृहिणीनेंही देहत्याग केला. त्या एकामागून एक आलेल्या दुःखांमुळें मी वेडा झालों व जिकडेतिकडे भटकूं लागलों. पण माझ्या पूर्व पुण्याईनें एका सद्गुरूशीं माझा समागम झाला.' इतक्या बोलण्यानेंच संन्याशाला फार श्वास लागला. त्याच्यानें पुढें बोलवेना. पितातुल्य संन्याशाचा हा दुःखप्रद वृत्तांत ऐकून दिलीपाचे नेत्र अश्रुपूर्ण झाले. थोड्या वेळानें पुनः संन्याशानें बोलण्यास सुरवात केली. "त्या गुरूनें माझ्या मनांत शल्याप्रमाणें टोंचणाऱ्या आणि अनेक कष्ट देणाऱ्या मायेचा नाश केला. धन्य त्या सद्गुरूची! त्याच्याच प्रतापानें आज मी जीवनमुक्त झालों आहें. रज्जूच्या ठिकाणीं सर्पाची भ्रांति होती ती नाहींशी झाली, व त्या दिवसापासून मी संसारांतही नाहीं व साधूंतही नाहीं. तर अद्वैत ब्रह्मांत लीन होऊन मी पवित्र स्थळीं फिरूं लागलों. एक दिवस अंधाऱ्या रात्रीं पाऊस पडत असतां मी जवळच्या नदीतीरावर ब्रह्मस्तवन करीत फिरत होतों, इतक्यांत तीराच्या एका ठिकाणीं मृतप्राय पडलेला एक बालक मला दिसला; पण त्यास मृतप्राय पाहून मी संकुचित झालों नाहीं. मी त्याला उचललें आणि पाहिलें तों त्याचा श्वास कांहीं बंद पडला नव्हता. तेव्हां मला आज माझ्या हातून एका जीवाचें रक्षण

झालें ह्मणून फार आनंद झाला. नंतर मी त्या बाल-कास सज्ञान करण्याचे उपाय आरंभिले, आणि त्यांतूनही पार पडलों. तोच बालक तूं, दिलीपसिंग, तोच तूं. थोडें पाणी!"

दिलीपानें पाणी दिल्यावर संन्यासी ह्मणाला, "ज्या वस्त्रांत गुंडाळलेला तूं मला मिळालास तें वस्त्र मी राखून ठेवलें आहे. त्यावरून पुढें मागें तुला आपल्या मातापित्यांचा शोध करतां येईल. तूं मिळाल्यामुळें मला माझ्या पुत्राचें पुनः स्मरण झालें. ममतेमुळें नाहीं तर दयेमुळें मी तुझें पालन केलें, तुला वाढविलें, तुझ्या बरोबर राहिलों. आज तुलाच नाहीं, तर ह्या मायेनें आवरण केलेल्या जगतास सोडून अविनाशी लोकांत मी जात आहें." इतकें बोलतां बोलतां तो संन्यासी अगदीं निस्तेज पडला. जास्त बोलण्यास त्यास शक्ति राहिली नाहीं दिलीप रडत रडत ह्मणाला, "बाबा, आपण आतां जास्त बोलूं नका. तुह्मी जरी माझे जन्मदाते नाहीं तरी मला पित्याप्रमाणेंच आहां. ही हकीकत ऐकण्यापूर्वी माझें आपल्यावर जितकें प्रेम होतें त्याहून तें आतां अधिक झालें आहे. कारण, माझ्या मातापित्यांनीं मला जें कांहीं केलें असतें त्याहून आपण विशेष केलें आहे." संन्यासी ह्मणाला, "वत्सा, जरी मला त्या संसारमायेचा लेशही नाहीं, तरी दयेमुळें मी तुझ्या

आईबापांचा शोध केला नाहीं हा तुझा मी मोठा अपराध केला आहे." "माझ्या खऱ्या पित्यास आपण जाणत नव्हतां काय?" दिलीपानें विचारिलें. संन्यासी म्हणाला, "नाहीं, मी जाणण्याचा यत्नही केला नाहीं. यत्न केला असता तर कदाचित् शोध लागता. पण तुला दुसऱ्या कोणा लबाडाच्या ( कारण कोणी अपुत्रवान् मनुष्य छलकपटानें आपणच पिता आहे असें ह्मणूं लागल्यास कसें ओळखावें?) हातीं देण्याची मला इच्छा झाली नाहीं. तुझ्या गळ्यांत एक कवच आहे त्यावरून तुझ्या पित्याची कांहीं बातमी लागती, पण मी त्याबद्दल विचारच केला नाहीं. तूं जर तुझ्या पित्याच्या घरीं असतास तर फार सुखी झाला असतास." दिलीप ह्मणाला, "हें आपण कशावरून ह्मणतां?" "मला अमुक व्यक्ति तुझा बाप असेल ह्मणून शंका आली होती, पण प्रथम पाणी पाणी!' दिलीपानें प्रेमानें त्यास पाणी पाजलें. संन्याशाचें मरण जवळ आलें होतें. त्याचा आत्मा ब्रह्मांत लीन होत होता. तो ह्मणाला, "सुवर्णकवचांत तुझें यथार्थ नांव आहे. चितोड!—" इतकें बोलतांच त्याचा श्वास बंद पडला आणि त्याचा आत्मा ह्या मायिक जगताचा त्याग करून अमायिक अविनाशी सुख भोग-

ण्यासाठीं ब्रह्मलोकास गेला. ही त्याची अवस्था पहातांच दिलीप मूर्च्छित झाला.

तो शुद्धीवर येतांच मोठमोठ्यानें विलाप करूं लागला— "बाबा! तुम्ही मला सोडून गेलां ना? माझ्या यथार्थ मातापित्यांनीं तर माझा संभाळ केला नाहींच, पण आपणही आज मला सोडलें! आतां मला कोणाचा आधार आहे! बाबा, जरा तरी बोला! मला रस्ता तरी दाखवा! मी कुठें जाऊं, माझे लाड आतां कोण करील, मला कोण पाळील?" ह्याप्रमाणें विलाप करीत असतां त्याच्या नेत्रांतील जल सुकून गेलें. नंतर त्यानें प्रेतसंस्कार करण्याची तयारी चालविली. तो उठला आणि एक स्वच्छ सफेत वस्त्र घेऊन त्यानें तें त्या शवावर घातलें. मग अंतेष्टि क्रिया करण्यासाठीं तो पर्णकुटीच्या बाहेर आला, आणि पर्वतावर योग्य स्थळीं चिता रचून, शव नेण्यासाठीं पुनः पर्णकुटींत आला. पण तें फार जड झाल्यामुळें त्याला उचलतां येईना. तेव्हां सकाळीं कोणी उत्तम मनुष्य शोधून आणून त्याची क्रिया करावी असा विचार करून तो प्रभातकालच्या शीतल पवनलहरींत झोंपीं गेला.

——

# प्रकरण ११ वें.

## चंद आणि दिलीप.

मध्यान्ह झाला आहे. ऊन कडकडून पडलें आहे. रस्त्यांतून चालणाऱ्याच्या शरीरावरून प्रस्वेदबिंदु टपटप खालीं पडत आहेत. तरी कामाच्या मनुष्यांस आपलें काम करावें लागतच आहे. त्यांस तापाची कीं कशाची पर्वा करून चालतच नाहीं! अशा वेळीं अजमीरचा महाराज आणि जगताचा चन्द्र, चंद्रपति किंवा चंदकवि एका सेवकाबरोबर दिल्लीकडे भरधांव घोडा चालवून जात आहे. त्याचें शरीर घर्मस्त्रावानें चिंब झालेलें आहे, घोडा थकून गेला आहे, व त्यावरील स्वाराचीही तीच स्थिति झाली आहे. तेव्हां चंद्रपतीचा सेवक अनाथ ह्मणाला, "कविवर! जवळच एका संन्याशाचा आश्रम आहे तिकडे चलावें. तेथें थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर आपण पुढें जाऊं. तेथें पाण्याची वगैरे सोय चांगली आहे. चंद कवीनें विचारलें, "तो आश्रम कोठें आहे?" अनाथानें बोटानें एका पर्वताकडील दिशा दाखविली, तेव्हां तो त्याच्याबरोबर तिकडे जाऊं लागला. थोडेसें

चालल्यावर आश्रम दिसूं लागला. नंतर कांहीं वेळानें दोघेही त्या पर्णकुटीजवळ आले. कुटीचें द्वार उघडेंच होतें. तेव्हां अनाथाच्या हातीं घोड्याची लगाम देऊन चंद्रकवीनें कुटींत प्रवेश केला. आंत एका मोठ्याशा खोलींत एक मनुष्य निजला आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. पण घरधन्याच्या हुकुमावांचून त्या आश्रमांत मुकाम करणें बरोबर नव्हे, म्हणून त्यास उठविण्यासाठीं कवीनें बराच प्रयत्न केला. त्याची प्रार्थनाही केली; पण तो कांहीं केल्या जागा होईना. कवीनें विचारलें, 'महाराज, स्वामीजी! मी पथिक आहें. आपल्या पर्ण-कुटींत कांहीं वेळ विसांवा घेण्यास द्याल काय?' पण या प्रश्नास कांहींच उत्तर मिळालें नाहीं.

कांहीं वेळानें त्यानें मोठ्या स्वरानें त्यास हाक मारली. तरी त्यास कांहीं जबाब मिळेना. स्वामीची निद्रा दूर होईना. पुनः चंदकवि मोठ्यानें म्हणाला, "महाराज! एक पथिक श्रान्त होऊन विश्रामस्थल मिळावें म्हणून प्रार्थना करीत आहे. आपण उठावें." त्याच्या ओरडण्यामुळें कुटींत बराच मोठा प्रतिध्वनि झाला. पण स्वामीची निद्रा कायम ती कायमच! त्या बिचाऱ्यास निरंतरची निद्रा लागली होती, तो जागा होतो कसचा! चंदकवीस विचार पडला कीं ही कसली जबरदस्त निद्रा! चिरकालची तर निद्रा नसेलना?

असा विचार करीत त्यानें त्या मनुष्याच्या तोंडावरील वस्त्र एकीकडे सारलें तों त्याच्या मुखाच्या व नेत्रांच्या चमत्कारिक स्थितीवरून आपण एका प्रेतासच हांका मारीत होतों अशी त्याची खात्री झाली! इतक्यांत घोड्यांस एका ठिकाणीं बांधून अनाथ आंत येऊं लागला. पण कवीनें त्यास बाहेर जाण्यास सांगितल्या-वरून तो तसाच बाहेर गेला; व कवीनेंही तसेंच केलें.

इकडे पहांट होतांच दिलीप जागा झाला व पित्याचा अग्निसंकार करण्यासाठीं कोणी तरी मनुष्य शोध-ण्यास बाहेर निघाला. तरी दुपारपर्यंत त्यास कोणच मनुष्य भेटला नाहीं. तेव्हां तो कुटीकडे येऊं लागला. जेव्हां चंद्रपति पर्णकुटींतून बाहेर निघाला तेव्हां त्यानें तिकडेच येणाऱ्या दिलीपास पाहिलें. तो रडत रडत येत होता. दिलीपास पाहतांच अनाथ म्हणाला, "वा! हा तर तोच बाळ! पण आतां तो बराच मोठा झाला आहे! त्यास येथें पाहिलें नसतें तर त्यास दुसऱ्या ठिकाणीं ओळखलेंच नसतें." दिलीपानेंही अनाथास तावडतोब ओळखलें. दिलीप जवळ येतांच अनाथानें विचारलें, "दिलीप, तुझा पिता संन्यासी व त्याचा शिष्य कोठें आहे?" चंद्रपतीनें विचारलें "तुम्हीच या पर्णकुटीचे मालक आहांत काय? तुमच्या आज्ञे-

शिवाय आह्मी आंत गेलों याची क्षमा करा. आह्मी प्रवासी आहों. थोडासा विसांवा घ्यावा ह्मणून येथें आलों आहों." चंद कवीच्या बोलण्याकडे लक्ष्य न देतां दिलीप अनाथास ह्मणाला, "तुह्मी मागें आलां होतां त्यावेळची आज स्थिति नाहीं! तो शिष्य तर आपल्या कन्येस घेऊन पुष्कळ दिवसांमागें चालता झाला. आणि हाय! पिताही काल स्वर्गलोकाच्या यात्रेस गेला! आतां मी एकटाच आहें." असें ह्मणून तो डोळ्यांतून एकसारखें पाणी काढूं लागला व त्याचा शोक पुनः जागृत झाला.

कांहीं वेळ गोष्टी झाल्यावर त्या तिघां जणांनीं मिळून त्या संन्याशाच्या प्रेतास अग्निसंस्कार दिला व जवळच्या ओढ्यावर स्नान करून ते तिघेही पर्णकुटींत आले.

दिलीपास पाहून चंद कवीच्या मनांत अनेक विचार उत्पन्न झाले. त्यास असा विचार पडला कीं हा तरुण राज्यभवनाचा स्वामीच होण्यास योग्य असून या पर्णकुटींत कसा आला? खरोखर हा कोणी तरी भद्रकुलोत्पन्न पुरुष असून गुप्त वेशानें येथें राहिला असावा. मी यास ओळखीत नाहीं, व हा आपणास ओळखीत नाहीं. तेव्हां अशा कांहीं तरी गोष्टी बोलूं कीं त्यांवरून त्याची खरी माहिती साधारण

पणें तरी समजतां येईल. त्यानें दिलीपास विचारलें, "महाराज! मला असें वाटत आहे कीं तुह्मी गुप्त वेशानें येथें राहत आहां. हें ठिकाण कांहीं आपलें मूळस्थान नसावें. आपण येथें किती वर्षें राहत आहां?" दिलीपानें उत्तर दिलें, "महाराज! मी लहानपणापासूनच येथें रहात आहें." कवीनें विचारलें, "तर आपला जन्मही येथेंच झाला काय?" दिलीपानें उत्तर दिलें, "नाहीं महाराज. माझें जन्मस्थान कोठें आहे हें मला माहित नाहीं." चंद्रपतीनें विचारलें, "तर काय आपला पिता जो संन्यासी त्यानें आपणास हें सांगितलें नाहीं?" दिलीपानें उत्तर दिलें, "त्यांच्या तोंडांतून मी जें कांहीं ऐकलें आहे त्यावरून तो माझा खरा पिता नव्हे, तर पारमार्थिक पिता होता. मी असहाय अवस्थेंत असतांना त्यांस सांपडलों. त्या वेळेपासून त्यांनीं माझें पुत्राप्रमाणें लालनपालन केलें. यापेक्षां मला जास्त कांहींच माहिती नाहीं." चंद कवीनें आश्चर्यानें विचारलें, "तर मग आपला खरा पिता संन्यासी नव्हेच?" दिलीपानें उत्तर दिलें, "नव्हेच." चंद्रपतीनें विचारलें, "तर आपला खरा पिता कोण?" दिलीपानें उत्तर दिलें, "तें समजण्याचें माझ्याजवळ साधनही नाहीं. पिता मृत्यूच्या वेळीं मला सांगत होता, पण श्वास बंद झा-

त्यामुळें त्यास बोलतां आलें नाहीं." यापेक्षां जास्त माहिती मिळण्याचा संभव नाहीं असें चंद कवीसही वाटून चुकलें. कांहीं वेळानें कवीनें पुनः विचारलें, "संन्यासी मरण पावल्यामुळें आपण आतां येथें एकटेच झालांना?" दिलीपानें उत्तर दिलें, "होय." तेव्हां चंद्रपति ह्मणाला, "मला बोलण्यास जरा संकोच वाटतो. पण असें असतांही आपणास एक गोष्ट विचारतोंच. जर आपलें येथें कोणी नाहीं तर येथेंच कशासाठीं ह्मणून तुम्ही राहणार?" दिलीप ह्मणाला, "माझा तर असा विचार होतो खरा. पण जावें तरी कोठें?" चंद कवीनें सहर्ष होऊन उत्तर दिलें, "जर तुमची इच्छा असेल, तर माझ्याबरोबर दिल्लीस चला." त्या तरुण पुरुषानें त्या गोष्टीस आपली संमति देऊन विचारलें, "पण तेथें जाऊन मी काय करावें?" कवीनें उत्तर दिलें, "जशी आपली इच्छा असेल तसें करावें. जर आपणास युद्ध करतां येत असेल, तर आतां लौकरच होणाऱ्या युद्धांत आपणास सेनापतिपदही मिळूं शकेल." युद्ध व्हावयाचें आहे अशी बातमी दिलीपास मुळींच लागली नव्हती. तेव्हां चंद कवीनें त्याविषयीं सर्व हकीकत त्यास खुलासेवार सांगितली. तेव्हां दिलीप ह्मणाला, "मला अस्त्रविद्या तर येत नाहीं. पण शस्त्र धारण करण्यास येतें. मला यु-

द्धाविषयीं जितकी माहिती आहे तितक्यावरून युद्धांत भिण्याचें मला कांहींच कारण दिसत नाहीं!" याप्रमाणें गोष्टी होतां होतां चंद्रपतबिरोबर दिल्लीस जाण्याचा दिलीपानें निश्चय केला.

चंद कवीनें विचारलें, "आपलें नांव काय?" दिलीपानें उत्तर दिलें, "पित्याच्या घरचें नांव काय माहित नाहीं. पण आतां तर मला दिलीपासिंग असें ह्मणतात." हें नांव ऐकतांच कवीस मोठें आश्चर्य वाटून 'हाच तो दिलीप' असे शब्द त्याच्यां तोंडांतून एकदम बाहेर पडले. दिलीपानें कवीस आश्चर्य झालें असें पाहतांच त्यानें त्याचें कारण विचारलें. पण कवीनें त्याचें कांहीं उत्तर दिलें नाहीं. नंतर त्यानें थोड्या वेळानें विचारलें, "आपल्या आश्रमांत एक कन्या आपल्या पित्याबरोबर राहत होतीना?" दिलीप व्यग्रचित्त होऊन ह्मणाला, "होय, होय! तिचें काय झालें? कांहीं वर्षं ती आपल्या पित्याबरोबर येथें राहत होती हें तुह्माला कसें समजलें? तिचें काय झालें? ती कोठें आहे? आह्मी लहान होतों तेव्हां एकमेकांबरोबर खेळत होतों." कवि ह्मणाला, "तिचा पिता युद्धांत मरण पावला." दिलीप ह्मणाला, "तर काय तीही माझ्याप्रमाणेंच मातापिताहीन झालीना? तीही माझ्या प्रमाणेंच दुःखी! पण ती आहे

कोठें?" कवीनें उत्तर दिलें, "अजमीर येथें." दिलीपानें विचारलें, "अजमिरास कोणाच्या इथें?" कवीनें उत्तर दिलें, "एका पुण्यपुरुषानें ती अनाथ आहे असें पाहून तिला आपल्या इथें ठेविलें आहे." हें ऐकून दिलीप चपापला व ह्मणाला, "पण तिचा विवाह झाला आहे काय?" त्याच्या मनांतील भाव समजून कवि ह्मणाला, "नाहीं. विवाह तर अजून झाला नाहीं. पण तिचा पालक तिचें लग्न करून देण्याच्या विचारांत आहे." हें ऐकतांच दिलीपाचें तोंड खरकन् उतरलें.

दिलीपाच्या मनांतील भाव कवीस स्पष्टपणें कळून आला. नंतर कांहीं वेळ स्तब्ध राहून तो ह्मणाला, "तिचा विवाह झाला तर तुह्मांस वाईट वाटेल कीं काय?" आपल्या मनांतील भाव व्यक्त न होण्याविषयीं प्रयत्न करून दिलीप ह्मणाला, "वा! आपल्या मनांत असा विचार आला तरी कसा?" चंदकवि ह्मणाला, "मला असें वाटलें कीं, बाल्यावस्थेंत जर एकमेकांचें इतकें प्रेम असेल तर असें होईलच! यांत आश्चर्य तें कसलें?" दिलीप किंचित् लज्जित होऊन ह्मणाला, "जरी आपलें ह्मणणें खरें असलें, तरी त्याचा उपयोग काय? इतक्या अवकाशांत जर तिचें लग्न झालें असेल, तर मग परस्त्रीचा विचार केल्यासारखें

होणार नाहीं काय?" चंद कवि ह्मणाला, "ती अज्ञात कुलशीलाची असल्यामुळें तिचा विवाह कोठें व कसा करावा या विचारांत तिचा पालक पडला आहे." दिलीप ह्मणाला, "त्यांत हरकत कसली? शैलबाला तर जाणती झाली असेलच! आणि विवाह करण्याचा तिचा विचारही असेल." कवि ह्मणाला, "छे, छे, ती आपला विवाह करण्यास आतां कबूल नाहीं." हें ऐकून दिलीपास एक प्रकारें आनंद झाल्यासारखा वाटला.

दुसऱ्या दिवशीं पहांटेस दिलीपानें विचारलें, "कां चलतांना?" दिलीपानें 'होय' ह्मणतांच कवीनें पुनः विचारलें, "बरोबर कांहीं घ्यायचें असेल तर घ्या." तेव्हां संन्याशानें मृत्यूच्या वेळीं सांगितलेले आपणाबरोबर पाण्यांत सांपडलेले कपडे घेऊन दिलीप ह्मणाला, "जें कांहीं घ्यायचें होतें तें घेतलेंच. आणखी कांहीं घेण्याजोगें राहिलें नाहीं. दुसरी एक प्रिय वस्तु आहे, पण ती पर्णकुटीच्या बाहेर आहे." कवीनें विचारलें, "ती कसली?" दिलीपानें उत्तर दिलें, "माझा भीम." कवीनें आश्चर्यानें विचारलें, "भीम कोण?" दिलीपानें उत्तर दिलें, "तो माझा घोडा आहे." याप्रमाणें बोलत बोलत ते आश्रमाबाहेर आले. अनाथ व चंद्रपति आपापल्या घोड्यावर ब-

सले, व दिलीपही आपल्या भीमावर स्वार झाला. तिघेही दिल्लीकडे चालते झाले.

आकाश निर्मल होतें. वाटेंत एकही वाटसरु दिसत नव्हता. मध्यान्ह झाला होता. ऊन कडकडून पडलें होतें. अशा वेळीं वर सांगितलेले तिघे स्वार दिल्लीकडे चालले होते. मध्येंच चंद कवि ह्मणाला, "दिलीपसिंगजी! मी दिल्लीस जाण्याचा विचार रहित केला आहे. आज मी गुप्तवेशानें यवनांच्या छावणींत जाईन, आणि तेथें काय चाललें आहे याचा तपास करून मग दिल्लीस जाईन. या कामास मला जास्त वेळ लागणार नाहीं. तुह्मी आतां दिल्लीस चला, तेथें माझा परममित्र पृथुराज आपली चांगली बडदास्त ठेवील. त्याला एक पत्र देतों तें घेऊन चला." नंतर त्यानें दिलीपाजवळ एक पत्र दिलें, व दिलीप दिल्लीस चालता झाला. नंतर अनाथास पुनः अजमिरास जाण्यास सांगून चंद्रपति स्वतः गुप्तवेशानें यवनाच्या छावणींत प्रवेश करण्यासाठीं निघून गेला. याप्रमाणें तिघांनींही तीन वाटा धरल्या.

---

## प्रकरण १२ वें.

### मातृद्रोही कीं देशद्रोही ?

शतद्रु नदीच्या सुन्दर तटावर पांढऱ्या व काळ्या रंगाच्या तंबूंच्या एकसारख्या हारी लागून राहिल्या आहेत. घोडे मधून मधून खिंकाळत आहेत. अनेक अफगाण शिपाई निश्चिंतपणें खुशाल पडले आहेत. तंबूंच्या रांगांमध्यें एक मोठा तंबु आहे, व त्यावर महंमद पैगंबराचा निळा बावटा फडकत आहे. सेवक घोड्यांस संभाळीत आहेत, व धन्याची आज्ञा काय होते याची वाट पहात, व उद्यां मुक्काम कोठें करावा लागणार आहे याचा विचार करीत राहिले आहेत. कांहीं ठिकाणीं शिपाई लोक गाणीं गात आहेत. कित्येक आकाशांतील काल्पनिक परींविषयीं गोष्टी सांगत आहेत. कित्येक "किदर है जानेमंद" असें मोठमोठ्यानें ह्मणत आहेत. कित्येक "अल्लाह बिसमिल्ला" करीत आहेत. कित्येक तंबुरा वगैरे वाद्यें वाजवीत आहेत. कित्येक, युद्धांत जय मिळाला तर आपणास पुष्कळ लूट सांपडेल या आशेनें आपल्या प्रिय माशुकास कसें खुष करावें या विचारांत

आहेत. अशा वेळीं शाहबुद्दिन ऊर्फ महम्मद घोरीचा तंबु मंत्रिमंडळीनें भरून गेला आहे.

दिल्लीवर स्वारी करण्यासाठीं महंमद घोरी आला होता. आपण दोन वेळ पराजय पावून गेलों, व हिंदु-लोकांत जर अजून फाटाफूट झाली नसेल, तर कदाचित् या तिसऱ्या खेपेसही आपल्यावर तसाच प्रसंग येईल, अशा विचारांत तो पडला होता. याच कारणामुळें त्यानें आपल्या मंत्रिमंडळास एके ठिकाणीं बोलावलें होतें. सूर्यनारायण अस्ताचलावर जात होता, उष्णता कमी झाल्यामुळें शीतल वायु वाहत होता. इतक्यांत गप्पा मारीत मारीत, दाढीस हात लावीत लावीत, हळुहळु सर्व मुसलमान अधिकारी आले, व आपापल्या आसनांवर जाऊन बसले. शाहबुद्दीन ४० वर्षांचा होता. त्याच्या शरीराची काठी जोमदार होती, तोंड गोलदार होतें, पण अंगास जरा सुरकुत्या पडलेल्या होत्या. बाहु बलवान् दिसत होते. त्याच्या मुखावर साहसचिन्ह सहजीं व्यक्त होत होतें. तो वर्णानें अगदीं गोराही नव्हता व काळाही नव्हता. तो एका आसनावर बसला होता. सर्व अधिकारी आल्यावर त्यांमध्यें पुढें लिहिल्याप्रमाणें संभाषण झालें.

महम्मद—आह्मी जी तजवीज केली आहे त्यावरून यावेळीं आह्मांला खात्रीनें जय मिळणारच. हिंदु-

लोकांबरोबर धर्मयुद्ध चालवून आपणाला सहज जय मिळणें अशक्य आहे. तथापि आमच्या युक्तीनें या वेळीं काम फत्ते होणार यांत संशय नको.

हें भाषण ऐकून सर्व सभासदवर्ग महम्मद घोरीच्या विचाराशीं एकमत होऊन ह्मणाला, "जी हां हुजूर! हुजुरांच्या युक्तीनें या लढाईत आपली फत्ते होणारच होणार."

महम्मद.--हिंदु लोक जसे युक्तींत वस्ताद आहेत तसेच ते जोतिःशास्त्रांत व गणितशास्त्रांत निपुण आहेत. परंतु व्यवहारज्ञानांत ते मुर्खशिरोमणिच आहेत! दगाबाजी केल्यापासून किंवा खोटें बोलल्यापासून काय काय फायदे आहेत हें त्यांस मुळींच समजत नाहीं. आजपर्यंत असें झालें आहे कीं, त्यांच्या प्राणावरही जरी पाळी आली तरी त्यांनीं खोटें अक्षर तोंडांतून काढलेंच नाहीं. बरें, ही गोष्ट एका बाजूस ठेविली तरी दुसरी मूर्खपणाची गोष्ट ह्मटली ह्मणजे लढाईतसुद्धां सर्व जण धर्माच्या रीतीनेंच वागतात. कोणत्याही वेळीं कां होईना? त्यांच्याबरोबर योग्य रीतीनें, दगाबाजी न करतां लढूं लागलें तर कोणासच जय मिळण्याची आशा नको. पहा शिकन्दर बादशाहानें पारसांचा मुलूख जिंकला असतांही पुरु नांवाच्या हिंदु राजाबरोबर योग्य रीतीनें लढण्याची त्यास हिंम्मत

झाली नाहीं. तेव्हां निरुपाय होऊन त्याच्याबरोबर दगाबाजी करूनच जिंकावें लागलें. आह्मी यांना जिंकणार ते तरी दगाबाज़ी किंवा दुसरीच कांहीं तरी लपंडावी करून!

कुतुबुद्दीन–महाराजांनीं जें सांगितलें तें रास्त आणि दरोबस्त आहे. इमान न सोडल्यामुळेंच हे हिंदु लोक आपोआप पराभव पावतील.

इतक्यांत एक पहारेवाला आला व ह्मणाला, "गरीबपरवर खुदाविंद! एक हिन्दु आला आहे तो हुजुरांची मुलाखत होण्याची इच्छा करतो. त्यांस हेर समजून आह्मी पकडलें आहे."

महम्मद––जर तो हेर असेल तर त्यास कैद करून ठेवा, येथें आणण्याची गरज नाहीं.

पहारेवाला–– खुदावंद, कैदी ह्मणतो कीं आपण हेर नाहीं.

महम्मद––जर तो खरा हेर असला तर तो आपण हेर आहें ह्मणून कसा सांगेल? तो हेर असो किंवा नसो, आमचा मतलब साधण्यासाठीं सांपडतील तेवढ्या हिंदु लोकांस पकडलें पाहिजे. तूं जा, आणि त्यास नजर कैदेंत ठेव.

इतकें ऐकल्यावरही पहारेवाला तेथून जात नाहीं हें पाहून पुनः

महम्मद—आणखी दुसरें काय ?

पहारेवाला—कैदी ह्मणतो कीं आपणास पकडून कैदखान्यांत टाकल्यापासून आपलें कधींही कल्याण होणार नाहीं, उलटें नुकसान मात्र होईल.

महम्मद ( सक्रोध )—याला कैद केल्यापासून आमचें काय नुकसान व्हायचें आहे ?

पहारेवाला—तो ह्मणतो कीं आपणास युद्धांत जय मिळणार नाहीं.

महम्मद—युद्धांत ? त्याच्याशीं संबंध काय ?

पहारेवाला—तो ह्मणतो कीं आपण तुह्मांस जय मिळवून देण्यास समर्थ आहें.

महम्मद—तो कसा ?

पहारेवाला—तें कांहीं त्यानें सांगितलें नाहीं. पण तो ह्मणतो तें हुजुरांसमक्ष सांगेन. आह्मी त्याला पुष्कळ धमकावण्या दिल्या, पण त्यानें इतकेंच काय तें सांगितलें. आतां हुकुम होईल तर त्यास हुजुरांपुढें आणतों.

महम्मदानें क्षणभर विचार करून कैदीस आपल्यापुढें आणण्याचा हुकुम दिला. तेव्हां तो त्यास लवकरच तेथें घेऊन आला. हा कैदी ह्मणजे मंत्रिपुत्र विजयसिंग होय. महम्मदानें त्यास एका आसनावर बसावयास सांगून विचारलें, "आपण येथें कशासाठीं आलां आहां ? आणि आपलें नांव काय ?"

विजय—मी मंत्रिपुत्र विजयसिंग. मीं आपल्यावर उपकार करण्यासाठीं आलों आहें.

महम्मद—आपण हिंदु असतांना मुसलमान लोकांवर उपकार करण्यासाठीं आलां ह्मणतां, पण हें संभवेल तरी कसें? आपण उपकार कशास ह्मणतां?

विजय—खुदावंद, आपणाला माहितच असेल कीं दिल्ली जिंकणें आणि यमलोक जिंकणें सारखेंच अशक्य आहे. हे तर नुसते मनांतीलच मांडे आहेत. गेल्यावेळीं आपण दैवयोगानेंच बचावलां, पण या वेळीं आपण कधींही बचावणार नाहीं. दिल्ली जिंकण्यास गेल्यावर पुनः जिवंत परत येण्याची आशाच करूं नये.

महम्मद—हें तर आह्मी पूर्णपणें जाणूनच आलों आहों. पण आह्मांस भीति घालण्यासच का तुह्मी येथें आलां आहां?

विजय—छे छे! आपणास या स्थितींतून कसें बचावावें हें मला माहित आहे, व तेंच सांगण्यासाठीं मी येथें आलों आहें.

महम्मद—बरें आहे. आपण आह्मांस कोणत्या रीतीनें मदत करूं शकाल?

विजय—एक विधर्मी मनुष्य केवळ स्वार्थशून्य होऊन दुसऱ्यांच्याच कल्याणाठीं येथपर्यंत आला आहे असें आपण समजतां कीं काय?

महम्मद—नाहीं! असें मुळींच नाहीं. आमचा फायदा केल्यावर आपलाही फायदा करून घ्यावा असें आपल्या मनांत असलेंच पाहिजे.

विजय—मग आपणास या युद्धांत यश मिळाल्यास आपण मला काय द्याल?

महम्मद—आपणच सांगा. आपणास काय पाहिजे?

विजय—सिंहासन.

महम्मद—मग आह्मा लोकांस या युद्धापासून फायदा तो कसला? पुष्कळ लोकांचा रक्तपात करण्यांत आह्मांस आनंद होतो असें का तुह्मांला वाटतें?

विजय—छे छे! पण प्रथम तर आपला एक फायदा असा आहे कीं, आपला या लढाईंत जय झाला ह्मणजे पूर्वीं झालेल्या अपमानाचा मोबदला दिल्यासारखा होईल. शिवाय आपणास पुष्कळ द्रव्य स्वदेशीं नेण्यास सांपडेल ही निराळीच गोष्ट. पण माझी मदत नसेल तर आपला कोणत्याच रीतीनें फायदा होणार नाहीं.

महम्मद—(हंसून) या वेळीं हिंदुलोकांच्या फौजेपेक्षां किती तरी जास्त फौज आह्मी आणली आहे हें पाहत असून आपण हें काय बोलतां! आपली मदत नसली तरी एवढ्या फौजेनेंही या लढाईंत आह्मांस जय न मिळणें अशक्यच आहे.

विजय—आपल्या जवळ दिल्लीश्वराच्या फौजेहून दसपट जरी फौज असली, तरी माझ्या साहाय्याशिवाय आपला जय व्हावयाचाच नाहीं. तथापि आपणास जर माझ्या साहाय्याची गरज नसेल तर मी आपला जातों. ( असें ह्मणून तो उठला तेव्हां )

महम्मद—बरें, आपलें ह्मणणें खरें आहे असें कबूल केलें! पण आपणास गादीच पाहिजे कीं काय? गादीऐवजीं दुसरें कांहीं दिलें तर आपण राजी व्हाल कीं नाहीं?

विजय—नाहीं खुदाविंद!

हें ऐकतांच महम्मद घोरीचें मुख रक्त झालें, व कपालावर सुरकुत्या चढल्या. नरम झाल्यानें कांहीं वळायचें नाहीं असें त्यास वाटलें!

महम्मद—( क्रोधानें ) जरी आह्माकडून आपलें ह्मणणें कबूल केलें जात नाहीं, तरी तुह्मी आह्मांस मदत करण्यास तयार व्हा. कारण, या वेळीं आपण आमच्या लोकांच्या ताब्यांत आहां, आमचे लोक आपल्या ताब्यांत नाहींत. आपण आह्मांस मदत करणार नाहीं तर आपण आह्मांस मदत करण्यास आलां आहां अशी आतांच पृथुराराजास खबर देतों. शिवाय अशा स्थितींत आपणास आपल्या मुलुखांत जाण्यास मिळणार नाहीं. पण आह्मास मदत कराल तर आपणास कोणाकडूनही कसलाच त्रास होणार नाहीं.

महम्मदाचें हें भाषण ऐकून विजयसिंग घाबरून गेला. कारण त्या वेळीं तो शत्रूच्या हातीं होता. क्रोध, हिंसा आणि लोभ यांस वश झालेल्या विजयसिंगास, महम्मदाचें बोलणें ऐकून, चालण्याचीसुद्धां शक्ति राहिली नाहीं. तो मनांत ह्मणाला, "जर मी येथें आलोंच नसतों तर बरें झालें असतें. कदाचित् हा काफर जर मला महाराजांकडे पाठवील, तर एका पळांतच प्राणास मुकावें लागेल." नंतर तो ह्मणाला, "बरें तर खुदाविंद, आपणास जें बरोबर वाटेल तें करा. आपण नाहीं ह्मणतां तर मी जातों." धमकावणी दिली तरीही तो ऐकत नाहीं असें पाहून महम्मद त्यास ह्मणाला; "बरें कांहीं हरकत नाहीं. आपणास राजासुद्धां करूं! आतां आपण आमच्या लोकांस कोणत्या रीतीची आणि कशी मदत करणार तें सांगा पाहूं?"

विजय--मी युद्धांत सेनापति होणार आहें. तेव्हां युद्धाच्या वेळीं माझ्या सेनेस दूर ठेवीन, ह्मणजे आपणास सहजच जय मिळेल.

महम्मद--ही तजवीज कांहीं उमदी नाहीं.

विजय--तर कांहीं नवीन उपाय शोधून काढून तो पंधरा दिवसांच्या आंत खुदाविंदांस कळवीन. पण आपल्या वचनाचा विश्वास काय?

महम्मद—मी मंजूर करतों.

या ठिकाणीं आपण फसलों खरे, तेव्हां येथून कशी तरी आपली एक वेळ सुटका करून घेतली पाहिजे. यावेळीं याच्याविषयीं आपला अविश्वास दाखविला तर घरीं जिवंत जाऊन पोंचणार नाहीं; बाकी मुसलमान लोकांचें "मंजूर" तर ठीकच आहे! कदाचित् आपली गोष्ट महाराजांस कळली तर मरावें लागेल, या सर्व गोष्टींचा विचार करून विजय नम्रतेनें म्हणाला, "तर सर्व गोष्ट आपणास कबूल आहे?" महम्मद ह्मणाला, "हां, मंजूर आहे. लढाईत जर आ मची फत्ते झाली, तर कराराप्रमाणें आपणास राज करूं. तथापि आपण या कामांत गफलत केली किंवा कांहीं दगा दिला, तर आपणास मी बेशक सज देईन. शिवाय आपली दगाबाजी राजाच्या कानां घालण्यासही कमी करणार नाहीं." असें म्हणून मह म्मदानें आपल्या मनांत असा विचार केला की "ज्याअर्थी या मूर्खानें आपल्या अन्नदात्याबरो दगलबाजी केली आहे, त्याअर्थी मी याच्याशीं दगा बाजी केली तर अल्लाचा गुन्हेगार होणार नाहीं. ज मिळाल्यावर हा सिंहासन मागणार! हः! या तर याच्या पराक्रमाचें चांगलेंच इनाम मिळेल! जा आशा करण्याचें याला कारणच राहणार नाहीं!"

नंतर विजयसिंग चालता झाला. पृथुराज, त्या

मंत्री संग्रामसिंग, व कार्यदक्ष अमरसिंग यांनीं ज्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवला, त्यानेंच असा विश्वासघात केला! विश्वासघाती हा महापापी होय, व त्यास त्याच्या पापाचें फळ कधींना कधीं मिळाल्याशिवाय राहणार नाहीं.

विजयसिंग गेल्यावर पठाणांचा अधिपति ह्मणाला, "महाराज आपण यास सिंहासन देण्याचें तर कबूल केलें. मग दिल्ली जिंकून आमचा तो फायदा कसला?" तें ऐकून महम्मद घोरी ह्मणतो, "अगोदर याच्या मदतीनें आमचा जय तर होऊं द्या, त्यास बादशाही देण्याची गोष्ट मागाहूनची आहे कीं नाहीं? पाहतां येईल!" इतक्यांत एक दुसरीच चमत्कारिक गोष्ट घडून आली.

चंदकवि मुसलमानांच्या छावणींत काय काय प्रकार चालत आहे हें पाहण्यास निघाला होता हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं त्या छावणीपासून बऱ्याच दूर अंतरावर असलेल्या एका पर्वतावर तो चढला, व उभा राहून छावणींतील सर्व प्रकार पाहूं लागला. तो असें करीत आहे इतक्यांत हिंदूचा पोशाख धारण केलेल्या विजयसिंगास महंमदाच्या तंबूंत जातांना त्यानें पाहिलें. हा हिंदु कोण असावा असा चंद कवीस मोठा विचार पडला. तो तेथें कशासाठीं आला असावा अशी

त्यास मोठी जिज्ञासा उत्पन्न झाली. या वेळीं सूर्यप्रकाश पाहिजे तसा असल्यामुळें त्यानें विजयसिंगास पूर्णपणें पाहिलें. तो कोण व तेथें कोणत्या कामासाठीं आला याचा नीट पत्ता लावावा या उद्देशानें तो पर्वतावरून खालीं उतरला, व कांहीं एक न बोलतां हळुहळु, लपत लपत, मागें पुढें पाहत पाहत तंबूजवळ आला. एवढ्यांत संध्याकाळही झाली. तंबूच्या जवळ एक मोठें वडाचें झाड होतें त्यावर तो चढला. त्या वेळीं अंधकार असल्या कारणानें वृक्षावर चढण्यास त्यास कोणतीच हरकत आली नाहीं. त्या वृक्षावर चढल्यावर तो तंबूवरच आलेल्या एका फांदीवर जाऊन बसला. नंतर तरवारीच्या टोंकानें हळुच तंबूस एक भोंक पाडून आंत पाहूं लागला, तों मुसलमान मंडळीच्या मध्यें बसलेला विजयसिंग त्याच्या दृष्टीस पडला. त्यास पाहतांच कवीस अत्यंत आश्चर्य झालें. [illegible] त्याच्या ज्या गोष्टी झाल्या त्या त्यानें साद्यंत ऐकल्या. विजयसिंगाचा दुष्ट विचार ऐकून चंद्रपतीस फार क्रोध आला. त्याचे केशान् केश सरकन् उभे राहिले. तंबूंत एकदम शिरून त्याचा तात्काळ शिरस्छेद करावा असाही त्याच्या मनांत प्रथम विचार आला. पण लागलाच असाही विचार आला कीं, तसें केलें तर आपलें शिर देखील

सलामत राहणार नाहीं. तो वृक्षाखालीं उतरूं लागला; पण त्याच्या मनांत क्रोध, उद्वेग, व तिरस्कार, भिनून गेल्यामुळें तें अत्यंत अस्थिर झालें होतें, आणि त्यामुळें त्याचा पाय बरोबर टिकला नाहीं. त्याचा पाय जरासा घसरला, त्या झाडाची फांदीं जरा हालली, पानें खळखळलीं, आणि त्यामुळें पहारेवाल्यांचें लक्ष्य त्या झाडाकडे सहजच गेलें. ते वृक्षाजवळ गेले. भरत-खंडाच्या दुर्भाग्यामुळें यावेळीं चंद्राचाही उदय झाला. तेव्हां घाबरून जाऊन चंद्रपतीनें झाडावरून खालीं उडी टाकून पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण त्या-च्यामागें पांच पंधरा शिपाई लागले. चंद्रपतीनें तरवार उपसण्याचा विचार केला, पण अनेकांपुढें एकाचें बळ किती वेळ चालणार? तो शिपायांस मारावयास गेला असता तर त्याचेच तुकडे झाले असते. तेव्हां या वेळीं वांचलों तर कोणत्या ना कोणत्या तरी युक्तीनें सुटून जाऊन पृथुराजाचा बचाव करीन असा विचार करून तो उगी राहिला. चंद्रपति यवनांच्या हातीं सांपडला!

भरतखंडाच्या
परवशतेच्या प्रारंभाचा
हा दुर्भाग्य-अंधकारमय
पहिला दिवस होता.

शिपाई चंद्रपतीस पकडून महमंदाजवळ नेत आहेत तोंच त्यास विजयसिंग दरवाजावर दृष्टीस पडला. कवीच्या अंगांत एकदम क्रोधपिशाचिकेचा संचार होऊन, कांहीं विचार न करतां तो ह्मणाला, "अरे चांडाळा! अरे मातृद्रोह्या! अरे पाखंड्या! धिक्कार असो तुला! तुझ्या मातेच्या उदरावर दगड पडला असता तर आज असा दिवस आला नसता. राज्यलोभानें तूं अनिष्ट कर्म करण्यास प्रवृत्त झाला आहेस, पण आठवण ठेव, तूं हाल हाल भोगून मरशील." असें बोलून कवीनें तरवार उपसली, पण शिपायांनीं धक्का मारून त्याच्या हातांतून ती खेंचून घेतली.

चंद कवीनें कांहीं वेळ मौन स्वीकारलें असतें, महम्मदाबरोबर विजयसिंगाचें झालेलें भाषण आपण ऐकलें असें त्यानें बोलून दाखविलें नसतें, तर भरतखंडाच्या पूर्वप्रकाशित वैभवसूर्याचा प्रकाश द्विगुणित झाला नसता काय? पण दुर्भाग्याची गोष्ट! त्यास आपला क्रोध आवरतां आला नाहीं. तो जर नुसता एक तास उगी राहिला असता तर विजयसिंगाच्या विनंतीवरून महम्मदानें त्यास सोडून दिलें असतें. पण कवीचें चातुर्य या वेळीं त्याच्या उपयोगीं पडलें नाहीं. झालेली गोष्ट छपवून ठेवण्यास कोणती हरकत होती? पण तसें झालें नाहीं. त्यानें खऱ्या गोष्टीचा सर्वांसमक्ष

परिस्फोट केल्यामुळें विजयसिंगानें पुनः येऊन कवीस कधींही सोडून देऊं नये असें महम्मदास सांगितलें. कारण, कवीची सुटका ह्मणजे आपलें मरण, हें त्याला पक्कें ठाऊक होतें. असो. विजयसिंगाच्या सांगण्यावरून महम्मदानें चंद कवीस सक्त कैदेंत ठेवलें.

---

## प्रकरण १३ वें.

### दरबार.

दिल्ली! भरतखंडाची राजधानी दिल्ली! विदेशीयांस मोहित करणारी, चक्रवर्तींना निरंतर शोभारूप, शत्रूंस भयंकर, धनधान्यानें परिपूर्ण, शूरवीरांस आनंद देणारी, केवळ नामश्रवणानेंच अंगांत वीर्यवृद्धि करणारी दिल्ली! या वेळीं या दिल्लीचें ऐश्वर्य आणि रमणीयता पूर्णपणें उच्च स्थितींत होतीं. राजमहाल व वीरक्षत्रियांचीं भवनें नेहमीं देदीप्यमान दिसत होतीं. जिकडे तिकडे उद्योग उद्योग गाजून राहिला होता. व्यापारी लोक ऊठ धांव करीत होते. कारागीर उत्तम प्रकारच्या वस्तु तयार करण्यांत गुंतले होते. आपल्या स्वाधीन असलेल्या सैन्यास समरांग-

णांतील उत्तम शिक्षा देण्याविषयीं सैनिक लोक सदा तत्पर होते. युद्धाचें नांव कानीं पडल्याबरोबर क्षत्रियांच्या हृदयांत अत्यंत आवेशाविर्भाव उत्पन्न होत होता. सर्व प्रजा सुखी होती. ग्रामवासी लोक महाराजाच्या जयाचीच इच्छा करीत असत. जमिनीचा वसूल इतका थोडा होता कीं त्याबद्दल कुरकुर करण्याचें कोणासच कारण नव्हतं. कराचें तर नांवच नव्हतें ह्मटलें तरी चालेल—मात्र जमिनीच्या उत्पन्नांतून राजाचा व्यवहार चालत असे. पृथुराजाच्या पराक्रमाविषयीं प्रजाजनांची इतकी खात्री होती कीं, यवन लोक आपल्यावर चाल करून येत आहेत अशी खबर त्यांनीं ऐकली असतांही त्यांच्या मनांत कोणत्याच प्रकारची भीति उत्पन्न झाली नाहीं. कोणताही प्रबळ शत्रु या भीमपराक्रमी पृथुराजापुढें क्षणभरही टिकाव काढावयाचा नाहीं हें प्रत्येकास ठाऊकच होतें. देशांत जरी बराच परस्परकलह माजला होता, तरी त्यामुळें आपल्या देशावर संकट गुदरण्याचा संभव आहे असें कोणासच वाटत नव्हतें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र आपापल्या धर्मप्रमाणें यथायोग्य वर्तत होते, व त्यांबरोबर चक्रवर्तीचे मांडलिकही राजाचें श्रेय इच्छून, कार्यवशात् साहाय्य देण्यासही मागेंपुढें सरणारे नव्हते. सारें सामंतमंडळ राज्याचें नेहमीं कल्याणच इच्छीत असे.

अशा दिल्ली नगरींत, अति सुशोभित अशा दरबाराच्या वाड्यांत, भारतास आनंदरूप असा पृथुराज, गगनमंडलांतील तारागणांत शोभायमान होणाऱ्या शशिकराप्रमाणें राजसभेंत शोभत होता. त्याच्या शरीराची काठी जोमदार, ललाट प्रकाशमान, व नासिका चंपककलिकेसमान दिसत होतें. त्याचें मुख साधारणपणें जरी कृष्णवर्णाचें होतें, तरी तें पूर्णपणें मांसल व तेजस्वी दिसत होतें. त्याचे नेत्र कमळासारखे दीर्घ व उज्वल होते, व त्यांत दृढतेचा सुगंध पूर्णपणें भरला होता. सरलता व सरलतेबरोबरच क्षात्र तेज या दोन गुणांमुळें त्याच्या मुखाच्या प्रभावश्रीवर एक नवीनच प्रकाश दिसत असे, व त्यामुळें तो अलौकिक सौन्दर्यवान् दिसे. त्याचें वय या वेळीं केवळ पसतीस वर्षांचें होतें.

पृथुराजाच्या सिंहासनासमीपच दुसऱ्या सिंहासनावर कुशासन मांडून त्यावर वीरमुकुटमणि योगीन्द्र समरसिंग बसला होता. देशांत यवन आले तरी हा वेळपर्यंत पृथुराजानें लढाईची कांहींच तयारी केली नव्हती. तो निश्चिंत बसला होता. तथापि आपल्या परममित्रास साहाय्य करण्याच्या हेतूनें आपलें अफाट सैन्य घेऊन समरसिंग दिल्लीस आला होता. आज हा पूर्वींचा समरसिंग नव्हे. कालाच्या परिवर्तनाबरोबर

त्याच्या ठिकाणींही परिवर्तन झालें होतें. तो आतां जवान नाहीं; यावेळीं तो ४८ वर्षांचा झाला आहे. करणसिंग यमुना नदींत पडल्यावर त्यानें चामुंडा देवीच्या चरणकमलावर आपला मुकुट ठेवून जटा धारण केली होती. ती आज बरीच वाढून त्याच्या मस्तकापासून खांद्यावर पडली होती. त्याचप्रमाणें त्याच्या विशाल दाढीनें त्याचा वक्षोभाग झांकला होता. मस्तकावरील केश व दाढी हीं पांढरीं शुभ्र झालीं होतीं. चिन्ता ही खरोखरच मोठी दुःखदायी आहे, आणि तशांतही पुत्रशोक तर दुःखाची सीमाच करून सोडतो यांत संशय नाहीं. योगीन्द्राच्या गळ्यांत कमलाक्षाची माला होती ती महादेवाच्या गळ्यांतील सर्पाच्या मालेप्रमाणें शोभत होती. त्याची मुखचर्या जरी बरीच बदलली होती, तरी त्याच्या शारीरिक व मानसिक सामर्थ्यांत कोणत्याही प्रकारें न्यूनता आली नव्हती. त्याच्यावर दुःखाचा पर्वत पडल्यामुळें त्याची मुखमुद्रा गंभीरतर झाली होती. त्याच्याकडे नीट लक्ष लावून पाहिलें ह्मणजे पाहणाऱ्याच्या मनांत त्याच्याविषयीं जसा भक्तिभाव उत्पन्न होत असे, तशीच त्याची भीतिही वाटत असे. मस्तकावर जटा, कंठांत माला, स्थिर व गंभीर मुद्रा, या तीन गोष्टींमुळें तो एखाद्या तेजस्वी ऋषीप्रमाणें दिसे. सारांश, समरसिंग हा

नानागुणविभूषित होता असें ह्मटल्यास कोणत्याही प्रकारें अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण, त्याच्या सर्व सद्गुणराशी कोणाच्याही ध्यानांत सहज व स्पष्टपणें येत असत.*

---

* कविचंद्र असें लिहितो कीं, "समरसिंग रणक्षेत्रांमध्यें बहु साहसिक, धीर, कुशल व निपुण होता; सभेमध्यें अत्यंत विचारी, सुविवेचक, व सद्वक्ता होता; व स्वभावानें शांत व अति धार्मिक होता. प्रत्येक वेळीं त्याचा धर्मभाव व समाजप्रेम प्रत्यक्ष दिसत असे. त्याचे ताबेदार राजे व सेनेंतील लोक त्याच्यावर फार प्रीति करीत असत. पृथुराजाची सेना व सामंत त्याच्याशीं भक्तिभावानें वागून त्यास चांगला सन्मान देत असत. युद्धयात्रेंत समयलक्षण जाणणारा त्याच्यासारखा दुसरा कोणी बहाद्दर नव्हता. रणक्षेत्रांत जबरदस्त व्यूह कसा रचावा हें त्यालाच चांगलें ठाऊक होतें. तो अस्त्रविद्येंतही निपुण होता. युद्धास आरंभ करण्यापूर्वी समरसिंगाच्या तंबूंत सर्व राजे जमत असत व त्याच्या अगाध ज्ञानानें चकित होऊन त्याच्या यथार्थ व मधुर शब्दांनीं संतुष्ट होत असत. चंद कवि ह्मणतो कीं, राज्यशासन, मंत्रिनिर्वाचण, व राज्यदूतप्रेरण इत्यादि कार्यांत पृथुराज जो इतका निपुण झाला होता, त्याचें सर्व श्रेय समरसिंगासच दिलें पाहिजे. ज्या ज्या वेळीं त्याची गांठ घेण्याचा प्रसंग येई त्या त्या वेळीं समरसिंग त्यास कर्तव्यानुष्ठान, विशेषतः रजपूतांची राजनिष्ठा, व प्राणार्पण यांविषयीं उत्तम शिक्षण देत असे. समरसिंगाचे हे सर्व गुण आणखी एका गुणविशेषामुळें फारच शोभत असत. तो गुणविशेष ह्मणजे त्याचा निरहंकार होय. पृथुराजजयचन्द्रप्रभृति भारतवर्षीय राजे वृथा युद्धास व विवादास प्रवृत्त होत

पृथुराज व समरसिंग परममित्र होते हें मागें सांगितलेंच आहे. अर्थात् समरसिंग पृथुराजास मदत करण्यासाठीं दिल्लीस आला हें योग्यच होय. प्रत्येक युद्धप्रसंगीं समरसिंगानें पृथुराजास मदत केली होती. तो आतां येत आहे अशी खबर लागतांच त्यास सत्कारपूर्वक आणण्यासाठीं पृथुराज आपल्या लोकांस बरोबर घेऊन साडेतीन गांव पुढें गेला. तेथें दोन्ही मित्रांची भेट झाल्यावर रजपूतांनीं पृथुराजाचा व समरसिंगाचा मोठ्यानें जयजयकार करून आकाश गर्जवून सोडलें. भेट झाल्यावर दोघांनींही एकमेकांस प्रेमालिंगन दिलें. पृथुराजानें कांहीं वेळ गोष्टी केल्यावर युद्धाविषयीं विचार करण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं सभा भरविण्याचें ठरविलें.

पूर्वीं ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सर्व सामंतांची सभा भरली होती, व त्या ठिकाणीं पृथुराज बसला होता. समरसिंग, पृथुराज, अमरसिंग, वृद्धमंत्री संग्रामसिंग, चंदपुडीर, सामंत भागासिंग, विलाससिंग,

---

असत; परंतु समरसिंगास स्वार्थ ह्मणजे काय हें ठाऊकच नव्हतें. जरूर पडली तर युद्धास जावें, नाहीं तर कोणासही साहाय्य करावें हा त्याचा नेम होता. कर्नल टॉड हासुद्धां त्याची फार स्तुति करितो. दक्षता व वीरता या दोन गुणांत मेवाडच्या सर्व राजांपेक्षां तो श्रेष्ठ होता पृथुराजानें जी राजनीति सांगितली आहे ती समरसिंगाचाच उपदेश होय.

चञ्चसिंग, व विजयासिंग ही मंडळी तेथेंच बसली होती. इतक्यांत यवनदूत निरोप घेऊन आला आहे असें पहारेवाल्यानें येऊन सांगितलें. पृथुराजानें त्यास तावडतोब सभेंत आणण्याविषयीं आज्ञा दिली.

ज्या वेळीं महमद घोरी दिल्ली जिंकून आपला सूड उगवावा यासाठीं आला होता त्याचवेळीं त्यानें या दूतास पृथुराजाकडें पाठविलें होतें, व त्याच्याकडून असा निरोप कळविला होता कीं, "आपण गजनीच्या महाराजाचें आधिपत्य मान्य करून त्यांस दंड द्यावा एक, किंवा राज्य आमच्या हवालीं करावें एक, असें सिपेहसालार (सेनापति) महम्मद घोरी विनयपूर्वक कळवीत आहे." या निरोपावर पृथुराजानें असा जबाब दिला होता– "हे दूता! तूं जाऊन महम्मद घोरीस असें सांग कीं, विनाकारण अग्नींत उडी कशाला टाकतोस? पूर्वीच्या अनुभवावरून थोडासा तरी बोध घे, आणि निमूटपणें गिजनीस चालता हो. पहिल्या युद्धांत तुझ्यावर दया करून मी तुला जीवदान दिलें. तरी मूर्खाप्रमाणें पुनः लढण्यासाठीं आलास! तर यावेळीं तूं क्षमा माग म्हणजे तुला मी जिवंत जाऊं देईन." आज या जबाबावर दुसरा निरोप घेऊन यवनदूत आला आहे.

पहारेवाल्यानें यवनदूतास राजसभेंत आणल्यावर त्यास सामंत सूरसिंगानें विचारलें, "हे दूता! महम्मद

घोरीस महाराजांनीं जो निरोप पाठविला होता त्याचें त्यानें काय उत्तर दिलें?" दूतानें हात जोडून नम्रतापूर्वक उत्तर दिलें, "महाराज! महम्मद घोरीनें असें कळविण्यास सांगितलें आहे कीं, आपण कांहीं खलिफ नव्हें; तर त्याचा सिपेहसालार आहें. आपण त्याच्या आज्ञेप्रमाणें वागणार. खलिफ साहेबांनीं मला युद्धाकरितां पाठविलें आहे, व माझ्या देहांत प्राण असेल तोंपर्यंत मी युद्ध करण्याचा निश्चय केला आहे. आपण जर निमूटपणें दंड देण्यास कबूल असाल तर माघारी जाण्याचा विचार होईल. नाहीं तर शेवटपर्यंत लढणें भाग पडेल." दूताच्या तोंडून वरील जबाब ऐकतांच पृथुराज सगर्व होऊन ह्मणला, "तर काय महम्मद घोरी आपल्या हातानेंच आपला नाश करून घेणार ना? कांहीं हरकत नाहीं. त्याला जाऊन सांग तुला लागेल तेव्हां युद्धास ये, आणि क्षत्रियांच्या हातांतील तरवारीचा चांगला आस्वाद घे."

इतक्यांत सभेंतील एका कोंपऱ्याकडे एक मनुष्य उभा राहून दूतास ह्मणाला, "हे दूता! महम्मद घोरीस जाऊन सांग कीं, पूर्वींच्या लढाईंत मुसलमान लोकांचा पराजय झाला असतांही आमच्या आर्यरीतीप्रमाणें त्यावर दया करून त्यास जिवंत जाऊं दिलें, पण आतां तसें होणार नाहीं. बिचारा पुनः आगीत

पडण्यास कशाला आला ? यावेळीं त्याला योग्य तीच शिक्षा होईल. त्याला बजाऊन सांग कीं तुझ्या पराभवाची खबर मागें घेऊन जाण्यासाठींसुद्धां एकही मनुष्य जिवंत राहूं देणार नाहीं."

ज्या बाजूनें हा शब्द निघाला त्या बाजूकडे सर्वांची दृष्टि वळली. पृथुराजही आश्चर्यचकित होऊन ह्मणाला, "अरे हा कोण? विजयसिंग? आपण केव्हां आलां? ज्या कामासाठीं आपण गेलां होतां तें झालें कीं नाहीं? आणि आपल्याबरोबर हा अपरिचित मनुष्य कोण आहे?" विजयसिंग सुखरूपपणें मागें आला हें पाहून वृद्ध मंत्री संतुष्ट झाला. विजयसिंग महाराजास ह्मणाला, "कामाबद्दलची हकीकत मग सांगेन. प्रथम या दूतास उत्तर देऊन जाऊं द्यावें हें बरें." पृथुराज ह्मणला, "ठीक आहे." नंतर विजयसिंगानें दूतास विचारलें, "महमद घोरीची केव्हां लढण्याची मर्जी आहे?" दूतानें उत्तर दिलें, "एक महिन्यानें." मग पृथुराज ह्मणाला, "फार चांगलें आहे. आह्मी त्याची इच्छा पूर्ण करण्यास तयार आहों. त्याला जाऊन सांग कीं आजपासून बरोबर एक महिन्यानें आह्मी ठाणेश्वरीं* त्याची वाट पहात रहातों. आ-

---

* पंजाबांतील अंबाला जिल्ह्याच्या दक्षिण भागास जी सरस्वती–शतद्रु नदी आहे तिच्या कांठीं ठाणेश्वरचें पवित्र स्थळ

णखी त्यास विशेषेंकरून असें सांग कीं, ज्याअर्थी तूं खलीफाचा सेनापति आहेस, व त्याच्या आज्ञेनें युद्धास प्रवृत्त झाला आहेस, त्याअर्थी एवढें ध्यानांत ठेव कीं, पूर्वींच्या लढाईत तुला जिवंत जाऊं दिलें तें खलीफाकडे पाहून नव्हे, तर तुझ्या दीन दशेकडे पाहूनच दिलें; आणि आतां जो तुला देहदंड करावयाचा आहे तो खलीपासाठीं नव्हे, तर तुझ्यासाठींच."

---

आहे. त्याच्या मध्यभागींच जगद्विख्यात **कुरुक्षेत्र** आहे. या ठिकाणींच **कौरवपांडवां**चें महायुद्ध झालें होतें. चिनी प्रवासी **हियंग-ट्संग** हा सातव्या शतकांत या देशांत **बौद्ध** धर्माचीं पवित्र स्थळें पाहण्यासाठीं आला होता. त्याचें असें ह्मणणें आहे कीं, त्यावेळीं **ठाणेश्वर**चें स्वतंत्र राज्य होतें, व त्याचा विस्तार ११६७ मैल होता. **ठाणेश्वर** व **कुरुक्षेत्र** यांमधील पवित्र स्थलांच्या दर्शनासाठीं व "**शतद्रु**" नदींतील पाणी ज्यांतून वाहतें अशा एका कुंडांत स्नान करण्यासाठीं दरवर्षी त्या ठिकाणीं हजारों भाविकांची मोठी यात्रा भरत असते. हें कुंड फार प्राचीनकाळीं बांधण्यांत आलें असून त्यांत स्नान करणाऱ्यांचीं सर्व पापें विनाश पावतात असा लोकसमज आहे. प्रत्येक चंद्रग्रहणाच्या वेळीं या कुंडांत सर्व तीर्थें येतात असाही समज असल्याकारणानें त्यास भारी महत्व आलें आहे. **महम्मद** गिझनी व **शाहबुदीन** घोरी यांनीं या कुंडाची दुर्दशा केल्यामुळें हल्लीं त्याचें बांधकाम नवीन झालें आहे. त्या ठिकाणीं **कौरव पांडवां**च्या वेळच्या कांहीं संज्ञा अजूनही आढळांत येतात. सध्यांचें **ठाणेश्वर** फार लहान आहे. पुराणांत वर्णिलेल्या भपक्याचीं चिन्हें तेथें मुळींच दिसत नाहींत!

पुनः महाराजास नमस्कार करून, आश्चर्यचकित झालेला दूत चालता झाला. नंतर राजपुतान्यांतील राजे लोकांची आपण घेतलेली भेट, त्यांनीं केलेला आदरसत्कार, युद्धास येण्याविषयीं त्यांनीं दाखविलेला उत्साह, व सैन्याची केलेली तयारी यांविषयीं इत्थंभूत हकीकत निवेदन करून विजयसिंग पुढें ह्मणाला, "मला या तरुण पुरुषाची गांठ वाटेंत पडली. हा राजकवि चंद्रपतीकडून आला आहे. वाटेंत हा दिल्लीचा रस्ता विचारूं लागल्यावरून यास माझ्याबरोबर आणलें आहे." पृथुराजानें त्या तरूण पुरुषास विचारलें, "आपलें नांव काय? आणि चंद्रपति कोठें आहे?" त्या तरुण पुरुषानें उत्तर दिलें, "महाराज, या दासाचें नांव दिलीपसिंग असें आहे. चंद्रपति मुसलमानांच्या छावणींत गेले आहेत. ते दोन तीन दिवसांत इकडे येतील." एवढें बोलून झाल्यावर त्यानें चंद्रपतीच्या हातचें पत्र महाराजाच्या हवालीं केलें. तें वाचल्यावर पृथुराजानें दिलीपसिंगाची सर्व सोय करण्याचें चंदपुडीरास सांगून तो सभासदांस ह्मणाला, "मुसलमानांच्या छावणींत जाऊन इतके दिवस झाले तरी चंद्रपति अजून कां येत नाहीं? त्याच्यावर कांहीं तरी प्रसंग गुदरला असावा अशी मला शंका येते. तो यावेळीं येथें असता तर

फार चांगलें झालें असतें." नंतर अकस्मात्च त्यानें विजयसिंगास विचारलें, "विजयसिंग! तुह्मांला चंद्रपतीविषयीं कांहीं ठाऊक आहे का?" "नाहीं महाराज पण-" इतक्यांत चंदपुडीर मध्येंच ह्मणाला, "चंद्रपतीविषयीं आपण एवढीसुद्धां काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. तो कैद होण्याचें स्वप्नींसुद्धां आणायला नको. आतां दैवयोगानें तसा प्रसंग आलाच तर त्यांतून तो आपली सुटका करून घेतल्याशिवाय राहणार नाहीं."

इकडे हा प्रकार चालला आहे तों समरसिंगाच्या मनांत कांहीं नवाच विचार चालला होता. दिलीपास पाहून त्याचे नेत्र तटस्थ झाले; त्याचें हृदय उचंबळूं लागलें; मन विचारांत मग्न झालें; शरीर कांपूं लागलें. तो मनांत ह्मणाला, "हा सुंदर तरुण पुरुष कोण आहे? हा कोणा भाग्यशालीचा पुत्र असावा. यास पाहून माझ्या करणाची मला कशी आठवण होते? हा करणासारखा दिसतो." क्षणभर थांबून तो पुनः विचार करूं लागला कीं, "जर करण जिवंत असता तर या वेळीं तो याच्या एवढाच दिसला असता. तो स्वरूपानेंहीं इतकाच सुंदर होता. पण पूर्वजन्मींच्या पातकामुळें असलें पुत्ररत्न मला पारखें झालें! हाय!" याप्रमाणें पूर्वींच्या गोष्टीची आठवण होऊन त्याचा शोक पुनः

जागृत झाला. करणसिंगाची लहानपणची बालक्रीडा, धांवणें, बोलणें, हांसणें सर्व कांहीं प्रकार त्याच्या डोळ्यांपुढें दिसूं लागले. करणसिंगासाठीं चाललेला शोधाशोध, तो न सांपडल्यामुळें सर्व नगरांत होत असलेला विलाप, इत्यादि गोष्टींच्या विचारांत तो इतका लीन होऊन गेला कीं, त्याचें प्रेत नदींत सांपडलें असून राणी फार शोक करीत आहे असें त्यास वाटलें, व तिचा शब्द त्यास स्पष्टपणें ऐकूं आल्यासारखा वाटल्यामुळें "हाय! हाय!" असे शब्द मुखावाटे काढीत काढीत तो मूर्च्छागत झाला.

सर्व घाबरून गेले. सेवकांनीं व स्वतः पृथुराजानें त्यास सावध करण्यासाठीं पुष्कळ परिश्रम केले. तो सावध झाल्यावर पृथुराजानें विचारलें, "असें काय झालें? आपणास इतक्यांत मूर्च्छा कशी आली?" यावेळीं समरसिंगाचा शोक थोडासा कमी झाला होता. तो ह्मणाला, "या तरुण पुरुषास पाहून मला माझ्या करणाची आठवण झाली. तो याच्याच सारखा सुंदर समवयस्क, चंचल आणि मोहक होता." समरसिंगाचें बोलणें ऐकून पृथुराजानें पुनः त्या तरुणाकडे पाहिलें तों त्यासही तसेंच वाटलें. पण समरसिंगाच्या बोलण्यास आपली संमति दिल्यास कदाचित् तो त्यास आपलाच पुत्र ह्मणून समजेल या भीतीनें तो समरसिं-

गास ह्मणाला, "गेल्या गोष्टीचा शोक करून आतां काय उपयोग? जें या मृत्युलोकांत नाहीं त्याची पुनः पुनः आठवण केली तरी फळ कसलें? आपला करण जर मरणाधीन झाला नसता तर यास पाहून हा करणच आहे असें मीसुद्धां ह्मटलें असतें. पण करण पाण्यांत बुडून मरण पावला ही गोष्ट जर आपणास पक्की ठाऊक आहे, तर त्याची पुनःआशा काय ह्मणून करावी?" पृथुराजाचें हें बोलणें ऐकल्यावर समरसिंग दीर्घ निश्वास सोडून ह्मणाला, "तें तर बरोबरच आहे. त्याची आशा नाहीं हें मी जाणतोंच. तरी तो मरण पावला नसावा असेंही माझ्या मनांत कधीं कधीं येतें. तो अझूनही जिवंत सांपडणार नाहीं कशावरून?" याप्रमाणें कांहीं वेळ गोष्टी झाल्यावर सर्वजण युद्धाच्या विचारास लागले.

मागच्या वेळीं आपला जय झाला त्यावरच विश्वास ठेवून बाकीचे मांडलिक राजे आपल्या मदतीस आले नाहींत तर पुढें काय करावें असा विचार पृथुराजाच्या मनांत आला; तेव्हां त्यानें चंदपुडीरास विचारलें, "तुह्मी युद्धाविषयीं काय सल्ला देतां?"

"महाराज!" चंदपुडीर* ह्मणाला, "मला तर या

---

* कथासूत्र अभंग रहावें ह्मणून चंदपुडीरास हयात ठेवण्यांत आलें आहे. वस्तुतः तो या प्रसंगापूर्वी दोन वर्षें अगोदर मरण पावला होता. तो लाहोराधिपति होता.

वेळचें चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं. कारण, आपला कट्टा शत्रु जयचंद्र यानें मुसलमानांस मुद्दाम बोलावून आणलें आहे. यामुळें सिसोडिया शिवाय करून बाकी ठिकाणचे राजे आपल्या मदतीस येतील असा संभव दिसत नाहीं. या प्रसंगीं आपलें बळच आपल्या उपयोगीं पडेल तर पडेल. आपली सर्व सेना सज्ज करून लौकरच ठाणेश्वरीं नेली पाहिजे. सेनेचे चार भाग करून प्रत्येक भागावर एक एक सरदार नेमला पाहिजे, व त्यांनीं एकमेकांच्या सल्ल्यानें वागलें पाहिजे. युद्धामध्यें शत्रूस अटकून ठेवणें, घेरणें, व त्यांच्या अन्नपाण्याची पंचाईत करणें हे मुख्य उपाय आहेत. यासाठीं शत्रुसेनेवर एकदम हल्ला करून तिला घाबरवून सोडलें पाहिजे. सेनेच्या तीन भागांनीं या हल्ल्यांच्या कामास लागावें, व चौथ्या भागानें लागेल त्यास मदत करावी. सेनेच्या एका भागाची सरदारी महाराजांनीं स्वीकारावी. दुसऱ्या भागावर महाराज समरसिंग आहेतच. पण दुसरे दोन सरदार कोण होतात? दुसरे राजे आले नसल्यामुळें त्यांवर विश्वास ठेवून आपली व्यवस्था लागणार नाहीं. एका भागावरची सरदारी पत्करण्यास मी तयार आहें."

"छे, छे, अशी गोष्ट होणारच नाहीं." समरसिंग ह्मणाला, "युद्धामध्यें जयापजयाचा नेम नसतो. कदा-

चितू दुर्दैवानें आपला पराजयच्च झाला तर दिल्लीचें रक्षण कोण करील याचा कांहीं विचार करा!"

"मलाही तोच विचार पडतो." पृथुराज ह्मणाला.

"तर दुसरे सरदार कोण आहेत?" चंद्रपुडीरानें विचारलें.

"एका भागाची सरदारी घेण्यास कल्याणसिंग योग्य आहे." वृद्धमंत्री ह्मणाला, "या जवानाच्या अंगीं युद्धास लागणारे सर्व कांहीं गुण आहेत, व तो मोठ्या शौर्यानें लढेल यांत संदेह नाहीं."

"आणि चंद्रपति येथें असता तर दुसऱ्या भागावर त्यासच्च सरदार नेमलें असतें" पृथुराज ह्मणाला, "पण दुर्दैवानें तो कोठें आहे हें कांहीं समजत नाहीं."

चंद्रपतीचें नांव ऐकून व आपलें नांव कोणच घेत नाहीं हें पाहून विजयसिंग मनांतल्या मनांत फार जळूं लागला. या युद्धांत जर आपण सेनापति झालों नाहीं तर आपल्या सर्व आशा व्यर्थ होत अशी त्याची खात्रीच होती. त्याला सरदारी मिळाली नसती तर फारच चांगलें झालें असतें. पण छे, भरतखंडाच्या नशिबीं दासत्वच्च लिहिलें होतें तें चुकेल तरी कसें? त्याच्या दुर्दैवामुळें सर्वच्च विपरीत प्रकार घडून येऊं लागले. चौथ्या भागावर कोणास सरदार नेमावें या विचारांत बराच वेळ गेला. शेवटीं एका कोनांत उभा

राहून विजयसिंग ह्मणाला, "विचार करण्याचें कांहीं कारण नाहीं. या सामंतांमधून, आपल्या राजाची सेवा करीत असतांना आपल्या प्राणाचीही पर्वा न करणारा असा कोणी तरी सरदार शोधून काढा ह्मणजे झालें."

ठाणेश्वरचा सामंत देवीसिंग ह्मणाला, "असा कोण आहे तो तुह्मीच दाखवा."

"अहो आपले विजयसिंगच!" पृथुराज ह्मणाला, "दूतकार्यांत यांनीं आपलें पुरें कौशल्य दाखविलें आहे. वृद्ध मंत्री परवानगी देतील तर यांस आपण गुप्तसेनेची ( reserved army ) सरदारी देवूं."

वृद्ध मंत्री ह्मणाला, "आपल्या राजाची सेवा करीत असतांना मरण पावण्यासारखें माझ्या पुत्राचें महद्भाग्य कोठें आहे?" याप्रमाणें पित्याचीही अनुज्ञा मिळतांच विजयसिंगाचें मनःकमल प्रफुल्लित झालें. इकडे सभासदांसही संतोष झाला. सर्वांच्या संमतीवरून कल्याणसिंग व विजयसिंग यांस सरदार नेमावें असा ठराव झाला. महाराजांची आज्ञा होतांच विजयसिंग उभा राहून बोलला, "महाराजाधिराज! आपण आज जो मला मान दिला आहे तो ध्यानांत धरून मीं आपली प्राणांत सेवा बजावीन, व आपल्या मातेस वीरमाता ह्मणवीन." हें बोलणें ऐकून सर्व सभासद खुष झाले. नंतर सभा विसर्जन पावली.

सभा बरखास्त झाल्यावर महाराज पृथुराज यानें कल्याणसिंगाबरोबर अपणास कांहीं बोलावयाचें आहे ह्मणून त्यास आपल्याकडे पाठवून दे असें विजयसिंगास सांगितलें.

---

## प्रकरण १४ वें.

### प्रेमप्रवास.

युवराज कल्याणसिंग यापूर्वी दोन तीन वेळ दिल्लीस आला होता. त्याला पाहून राजकन्या मोहित झाली होती, आणि युवराजही तिच्यावर आसक्त झाला होता. या वेळीं युवराजाचें वय चोवीस वर्षांचें होतें. हल्लीं तो दिल्लीस आला तेव्हा त्याच्या मनांत नवीव नवीन भावना उत्पन्न होऊं लागल्या. उषावतीचें सौंदर्य, विनय, सुस्वर इत्यादिकांनीं तो प्रेमांध होऊन गेला. उषावतीशिवाय दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न केल्यास आपणास सुख होणार नाहीं असा त्याच्या मनाचा पक्का ग्रह बनून गेला.

एक दिवस पिता पुत्र बसले होते. दोघेही विचारग्रस्त दिसत होते. पण कल्याणाचें मन विचारापेक्षां

विकारानेंच विशेष ग्रासलें होतें असें ह्मटल्यास चालेल. उषावतीवर आपलें प्रेम बसलें आहे ही गोष्ट बापाच्या कानावर घालण्यासाठीं तो येथें आला होता. त्यानें अत्यंत लज्जाकुल होऊन त्यास ती गोष्ट कळविली; पण युद्धास जावयाचें असल्यामुळें, बोलतां बोलतां तूर्त ती इच्छा एकीकडे ठेवण्याविषयीं समरसिंगानें त्यास बोध केला. जों जों समरसिंग त्यास हा नाद सोडून देण्यास सांगूं लागला तों तों त्याचें अंतःकरण खिन्न होत चाललें. कल्याणसिंग ह्या युद्धांतून जिवंत परत येईल अशी समरसिंगास आशा नसल्यामुळें, त्यानें त्याच्या ह्मणण्यास रुकार दिला नव्हता, व ह्याच कारणामुळें त्यानें अजूनपर्यंत त्याचा विवाह केला नव्हता. पण कल्याणसिंगाचा विवाह करण्याचा पक्का निश्चय झाला होता. तो उघड रीतीनें ह्मणाला, "बाबा, माझें जर आतां लग्न होणार नाहीं, तर मी जिवंत राहीन असें मला वाटत नाहीं." कल्याणाचें हें बोलणें ऐकून समरसिंगास करणसिंगाचें पुनः स्मरण झालें, आणि तो मनांत ह्मणाला, "त्याला वेदीजवळ जाऊं देण्यास प्रतिबंध केला त्याचें फळ मला काय मिळालें? कदाचित् कल्याणाचेंही तसेंच झालें तर मग मी काय करूं? कल्याणाची राजकन्येवर फार प्रीति आहे, व तिच्यावांचून तो जिवंत राहूं शकणार नाहीं हें खरें, पण

भविष्य काय खोटें होईल? त्याचें मरण तर लग्न होण्यापूर्वीच आहे, मग हें खोटें होईल काय?" हा विचार मनांत येतांच तो घाबरला, पण मागून त्याच्या मनांत असा विचार आला कीं, "कदाचित् याचें लग्न केल्यास हा जिवंतही राहील; कोणी सांगावें हा जिवंत रहाणार नाहीं ह्मणून? गुरुदेवानें तर असें सांगितलें होतें कीं, 'कल्याणसिंग लग्न होण्यापूर्वीच मरण पावेल,' पण एकदां लग्न होऊन गेलें मग तर गुरुजींचें ह्मणणें खोटें ठरेल? काय? असें होईल? सत्यवादी मनुष्यानें वर्तविलेलें भविष्य कधीं खोटें होतें काय? सत्यापुढें सर्व वस्तूंचें तेज फिकें पडतें, व विधात्याचा लेख कधीं खोटा होत नाहीं. मग असें कसें होईल?"

वर लिहिल्याप्रमाणें समरसिंग तर्कवितर्कांत गुंग झाला. लग्न केलें तर पुत्र वांचेल हाच विचार दिवसें दिवस त्याच्या मनांत दृढ होऊं लागला. तेव्हां मोठ्या जलदीनें तो लग्न करण्यास तयार झाला.

हें युद्ध समाप्त झाल्यावर उषावती चितोडची पट्टराणी होणार ही बातमी विजयास समजतांच तो मनांत ह्मणाला, "उषावती कल्याणाची पट्टराणी होईल कीं नाहीं ही गोष्ट पुढची आहे, पण युद्धांत कल्याण जिवंत तर राहूंद्या?"

पृथुराजानें आपल्या लाडक्या कन्येच्या क्रीडेसाठीं

आणि यमुनेची शोभा पहाण्यासाठीं तिच्या किनाऱ्या-वर एक स्तंभ उभारला होता. त्याचें नांव यमुनास्तंभ *ठेविलें होतें. ह्या स्तंभावर सर्वोत्तम नक्षीनें काम केलें होतें. त्याच्या शिखरावरून यमुना नदीची लीला स्पष्ट-पणें दूरवर दृष्टिगोचर होत असे.

संध्याकाळ झाली आहे. राजभवनांत नौवती झडत आहेत, दिल्लीची अधिष्ठात्री आशापूर्णा देवी हिच्या

---

* यमुनास्तंभ अथवा सांप्रत ज्याला कुतुबमिनार ह्मणतात तो मुसलमानांचा नाहीं. तो हिंदूंनीं बांधलेला आहे. पण हिंदु-राज्याचा लोप आणि मुसलमानी राज्याचा आरंभकाल यांच्या दरम्यान तो बांधला गेल्यामुळें, आणि तो मुसलमानांच्या ग्रंथांतून सर्वत्र कुतुबमिनार ह्या नांवानें प्रसिद्ध असल्यामुळें, तो मुसल-मानांनीं बांधला असावा असाच सर्वत्र समज आहे. परंतु दिल्लीच्या आसपासचे सर्व लोक, जनरल मेटकाफ, हियबरादि लेखक आणि कित्येक मुसलमान लेखकही स्पष्टपणें ह्मणतात कीं, हा स्तंभ पृथुराजानें आपल्या कन्येच्या विनोदार्थ बांधविला होता. ह्या स्तंभावर चढून उषावती नित्य संध्याकाळीं यमुनेची लीला पहात असे. मुसलमान लोकांची स्तंभ बांधण्याची रीत व या स्तंभाची रचना यांवर विचार करून बेंगाल रॉयल एशि-याटिक सोसायटीच्या १८५४ च्या ३३ व्या पुस्तकांत, कर्नल कनिंगहॅमनें आर्चिऑलॉजिकल सर्व्हेच्या ४ थ्या भागांत व अलिगडच्या सय्यद अहमदानें, हा स्तंभ मुसलमानांचा नाहीं तर हिंदूंचा आहे असें ह्मटलें आहे. ह्या स्तंभाची सर्व बांधणी हिंदु पद्धतीची आहे. मात्र द्वेषामुळें कुतुबुद्दिनानें त्याचें शिखर तोडून तें मुसलमानी तऱ्हेचें बांधलें होतें, ह्मणूनच तो कुतुबमि-नार ह्या नांवानें प्रसिद्ध आहे.

मंदिरांत संध्यार्तीचा शंखनाद होत आहे, चहूंकडे मनुष्यांचा कोलाहल चालला आहे, पक्षीगण वृक्षांवर मन्दमन्द कल्लोल करीत आहेत; अशा वेळीं यमुनास्तं-भाच्या शिखरांवरच्या गच्चीवर एका बाजूस उभा रा-हून कल्याणसिंग ही अनुपम शोभा पहात होता, पण त्याचें मन स्थिर नव्हतें. दुसऱ्या बाजूस उषा-वती खालीं मान करून उभी होती. क्षणांत कल्याण यमुनेची शोभा पाहून तल्लीन होई, व क्षणांत तिच्या-हूनही उत्तम अशी शोभा पाहण्यांत गर्क होई. तो घटकेंत राजकन्येचे चरण पाही, घटकेंत तिच्या वदन-कमलाकडे टक लावी, व पुनः यमुनेच्या जलाकडे दृष्टि फेंकी. पण यमुनेच्या जलांत काय पाहण्यासारखें होतें? ती कालिंदी आहे; तिचें जलही काळें आहे. त्यांत चंद्र-प्रकाश पडला होता ह्मणून ती शोभायमान दिसत होती. पण त्याहूनही उत्तम प्रकाश उषावतीच्या मुखापासून पडत होता. यमुनेचें उदक दोलायमान होऊन राहिलें होतें, पण उषावतीचें लावण्य त्याहूनही विशेष दोला-यमान दिसत होतें. तिचा मुकुट नक्षत्रांच्या प्रकाशा-मुळें विशेष चमकत होता. प्रेमपूरित विशाल नेत्र, कपोलप्रदेशावर व्यक्त होणारा प्रफुल्ल गुलाबकळीचा भाव, आणि विचारशील वदन या सर्वांमुळें ह्या समयीं उषावती अधिकच कांतिमान दिसत होती.

ह्या सर्व लीलांपुढें यमुनेची लीला ती काय? उषावतीचें सौंदर्य पाहून कल्याणाच्या मनांत नवीन नवीन तरंग उठूं लागले. उषावतीकडे तो एकसारखा पहात राहिला. कोणी चित्रकार ह्या दोन अद्भुत मूर्तींचें चित्र काढील काय? सौंदर्याचें हें केवढें भांडार! दोघेंही चित्राप्रमाणें उभीं होतीं, पण स्तंभाच्या दरवाजावर आपला कोणता शत्रु उभा आहे हें दोघांपैकीं एकाच्याही दृष्टीस पडलें नाहीं. आपलें भाषण कोणी ऐकेल याचें भानही त्यांस राहिलें नाहीं. एकाच्याही मुखांतून शब्द निघेना. बोलूं लागलों तर उषावतीचें सौंदर्य यथार्थ पहावयास मिळणार नाहीं अशी कल्याणास भीति पडली होती काय? होय; आणि ह्मणूनच पुष्कळ वेळ झाला तरी तो कांहींच न बोलतां उभा राहिला होता. प्रथम कोणी बोलावें? कोणी विचारावें? ह्या विचारांतच दोघेंही उभीं तीं उभींच!

शेवटीं कल्याण दीर्घ निश्वास टांकून ह्मणाला, "उषे! प्रिये उषे! प्रियतमे! तूं कसला विचार करते आहेस? तुझें तोंड कां उतरलें आहे?" उषावतीनें कल्याणाचा सुस्वर ऐकून त्याच्याकडे दृष्टि केली. तिला बोलावेंसें वाटलें, पण कांहीं केल्या तिच्या तोंडावाटे शब्दच बाहेर पडेना. तेव्हां कल्याण पुनः ह्मणाला, "काय? प्रिये! कांहीं बोलत नाहींस! कसल्या

विचारांत आहेस?" उषावती नम्रपणानें ह्मणाली, "प्राणनाथ! मी कसलाच विचार करीत नाहीं, पण आपण कसला विचार करीत आहां?" कल्याण ह्मणाला, "प्रिये! मी विचारांत इतका तल्लीन होऊन गेलों होतों कीं जणुं काय मला स्वप्नच पडल्यासारखें झालें, आणि त्यांत उषावतीच माझी प्रिया होती. हें स्वप्न खरें होईल काय?" उषावती ह्मणाली, "आपला विश्वास तरी कधीं बसणार प्राणनाथ! लढाई पुरी होतांच आपलें लग्न मोठ्या थाटानें होईल हें ठाऊक असतां आपणास अशी शंका कां येते?" कल्याण ह्मणाला, "तुझ्यासारखें रत्न हातीं येण्यास कांहीं अडचण येईल ह्याच शंकेनें माझें मन अस्थिर झालें आहे. आणि ती अडचण हीच कीं मी युद्धांत मरेन, आणि तुझ्यासारखें अमोल्य रत्न कोणी दुसऱ्याच भाग्यशाली पुरुषाच्या हातांत जाईल." हें ऐकतांच उषावतीच्या नेत्रांतून खळखळ अश्रु वाहूं लागले. ती रडत रडत ह्मणाली, "हें काय बोलतां? निर्दय दैवानें कदाचित् असें केलें तर मग मी विधवाच! आपण माझें—" इतकें बोलते आहे तोंच तिचा कंठ सुकून गेला, जीभ कोरडी पडली, तोंड बंद झालें, गात्रें शिथिल झालीं! आणि पुढें तिला एक शब्दही बोलतां येईना. रडण्यामुळें तिचे डोळे लाल झाले. तेव्हां कल्याण ह्मणाला,

" पण तुझ्या पित्यानें तुझें लग्न दुसऱ्याबरोबर केलें तर तूं काय करशील?" उषावती ह्मणाली, "मी प्राणत्याग करून स्वर्गांत आपल्याबरोबर राहीन, पण आपणास अप्सरांच्या हातीं जाऊं देणार नाहीं. प्राणनाथ! स्त्रियांचें प्रेम कसें असतें तें आपणास काय ठाऊक? प्रेमापुढें त्यांनां प्राणही तुच्छ असतात. मी वीरपत्नी आहें, चक्रवर्तीची कन्या आहें, एकवचनी आहें, आपणच माझें सर्वस्व आहां, आपणालाच मी प्राण अर्पण केला आहे, आपणास ज्यांत आनंद त्यांतच मला आनंद! आपल्यावांचून मी एक क्षणभरही राहूं शकणार नाहीं, मग दुसरी ती कथा काय?"

हें ऐकतांच कल्याणाच्या हृदयांत एक नवीनच ऊर्मि उठली, आणि मोहवश होऊन त्यानें उषावतीचे दोन्ही हात धरून चुंबन घेण्यासाठीं तिला जवळ ओढलें. राजकन्या झट्दिशीं आपले हात सोडवून ह्मणाली, "वाहवा! राजकुमार!" तिचें हें उच्च पातिव्रत्य पाहून कल्याणसिंग लज्जित होऊन ह्मणाला, "प्रिये! तुझें निःस्वार्थ प्रेम पाहून मी मोहवश झालों यांत कांहीं अपराध झाला असल्यास क्षमा कर. तूं पुरुषांची निंदा करतेस, पण ह्या चतुर्भुजा देवीसमक्ष प्रतिज्ञा करतों कीं, तुझ्या शिवाय कोणीही स्त्री माझ्या प्रेमाची अधिकारी होणार नाहीं. मी मात्र तुला

आणि--" इतक्यांत एका दासीनें त्यांच्या आनंदाचा भंग केला. ती तेथें येऊन ह्मणाली, "राजकुमार, आपणास महाराज बोलावीत आहेत असें विजयसिंग सांगत आहे."

---

## प्रकरण १५ वें.

### कपटजाल.

रंगांत भंग होऊन गेला. दोन्ही प्रेममूर्ति जवळ होत्या त्या दूर झाल्या. विजयाचें नांव ऐकतांच राजकन्या चमकली, आणि ज्या रात्रीं विजय चोरदारानें तिच्या शय्यागृहांत आला होता त्या रात्रीचें त्याचें भाषण तिला आठवलें. ती मनांत फार घाबरली, थरथर कांपूं लागली, तिच्या अंगास घाम सुटला, व तिनें डोळे मिटले. तें पाहून कल्याण ह्मणाला, "अशा कांपतां कां?" राजकन्येच्या मनांत असें आलें कीं एक वेळ सर्व गोष्ट त्यास सांगून टाकावी, पण स्त्रीजातीच्या स्वभावसिद्ध लज्जेमुळें तिच्यानें तसें करवलें नाहीं. तिनें 'मी कुठें कांपतें?' असें उडवाउडवीचें उत्तर दिलें. जाण्याची घाई असल्यामुळें कल्याणसिंगही पुढें कांहीं न बोलतां निघून गेला.

बागेंतून जात असतांना त्याच्या कानावर पुढील शब्द आले–"काय पण उषावती! जरासुद्धां लाज नाहीं! बिचारा कल्याणसिंग इतकें प्रेम करीत असतांना त्याला फसवून विजयसिंगाच्या नादीं लागली आहे! मोठ्या लोकांचें हें असेंच!"

अशाप्रकारचें विष कानांत पडतांच कोण सरळ हृदयाचा मनुष्य धीर धरूं शकेल बरें? कल्याणसिंगाचें हृदय तर चूर्ण होऊन गेलें. क्रोधानें त्याचें अंग थरथरां कांपूं लागलें. महाराजाजवळ जाण्याचें एकीकडे ठेवून प्रथम तो ते शब्द जेथून आले त्या दिशेकडे तडक चालता झाला. तो एका लतामंडपांत गेला तों तेथें गुलाब बसली होती. तिच्याजवळ जाऊन कल्याणसिंगानें विचारलें, "तूं आतां काय ग बोलत होतीस?" गुलाबीनें उत्तर दिलें, "कांहीं नाहीं." कल्याणसिंग ह्मणाला, "काय, पापिणी! मुखावाटे अभद्र शब्द काढून राजकन्येस कलंक लावीत नव्हतीस काय?" गुलाब धीर करून ह्मणाली, "माझें ज्यावर प्रेम आहे त्याच्यावरच जर राजकन्या प्रेम करूं लागली तर मी कां ह्मणून असें बोलूं नये?" कल्याणसिंग ह्मणाला, "संभाळ! असें धाडस करूं नको!" गुलाब ह्मणाली, "मी कांहीं धाडस करीत नाहीं, समजलें? विजयसिंग आणि राजकन्या प्रेमाच्या गोष्टी बोलतांना ह्या माझ्या

कानांनीं ऐकलें आहे." कल्याणसिंग ह्मणाला, "खोटें बोलून पाप घेऊं नको बरें!" गुलाब ह्मणाली, "मग तुह्मला साक्षी हवे असतील कदाचित्!" कल्याणसिंग ह्मणाला, "आधाराशिवाय मी कोणतीच गोष्ट खरी मानणार नाहीं." गुलाब ह्मणाली, "एवढेंच असेल तर विजयसिंगाच्या हातांत राजकन्येच्या हातांतील आंगठी आहे ती पहा ह्मणजे झालें!" कल्याणसिंग ह्मणाला, "त्यानें ती चोरून नेली असली तर?" गुलाब ह्मणाली, "पण तसें करण्याचें त्याला काय कारण आहे?" कल्याणसिंग ह्मणाला, "तें मला काय माहित? तूं पाहिजे तें भक, पण डोळ्यांनीं पाहिल्याशिवाय मी कानानें ऐकलेलें खरें मानणार नाहीं." गुलाब ह्मणाली, "कांहीं हरकत नाहीं. माझें बोलणें खरें ठरण्याचा वेळ कधींना कधीं आल्याशिवाय राहणार नाहीं." एवढें बोलून गुलाब चालती झाली. कल्याणसिंगाच्या मनः-सागरांत मात्र अनेक तर्कवितर्कांच्या लहरींनीं कहर करून सोडला! तो ह्मणाला, "असें कसें होईल? एवढ्या सरळ, पवित्र आणि निर्मल स्त्रीच्या मनांत पाप असेल? छे! हें अगदीं खरें नव्हे. गुलाबीच्या मनांत खरोखर तिच्याविषयीं कांहीं तरी वैरभाव असला पाहिजे. पण असा खराच प्रकार असला तर माझ्या जन्मांत सुख तें काय? तसें असेल तर मी या युद्धांत

प्राणत्याग केल्याशिवाय राहणार नाहीं. पण छे! उषावती पवित्र, निष्कलंकिणी, सरळ, आणि पतिव्रता आहे.”

कल्याण उषावतीशीं अनुरागीच राहिला. वर्षाकालांतील वादळ शरत्कालांत नाहींसें झालें. तो आनंदानें महाराजापाशीं गेला. एकांतभवनांत गेल्यावर आपणास युद्धांत सेनापतिपद मिळालें आहे हें ऐकून त्यास अत्यानंद झाला.

एकांतभवनांत महाराजवळ दिलीपसिंग, समरसिंग, व आणखी सामंत बसलेले होते. दिलीपास पाहतांच तो बराच चमकला. त्यानें आपल्या पित्याचें मुख पाहिलें, दिलीपाचें पाहिलें, पुनः पित्याचें, पुनः दिलीपाचें याप्रमाणें दोघांचेंही मुख पाहिलें. त्यास दोघांच्या मुखाकृतींत सादृश्य दिसून आलें. त्यास परमाश्चर्य वाटलें. दिलीपावर त्याची अकारण प्रीति बसली, व थोड्याच दिवसांत ते जिवश्च कंठश्च मित्र झाले. गोष्टी बोलतां बोलतां दिलीपसिंगास आपल्या मातापित्यांविषयीं कांहीं माहिती नाहीं ही गोष्ट कल्याणसिंगास समजून चुकली.

---

## प्रकरण १६ वें.

### कपटजाळ ( पुढें चालू. )

पृथुराजानें कल्याणसिंगास बोलविण्यासांठीं विजयसिंगास पाठविलें तेव्हां तो त्याच्या महालाकडे जाऊं लागला. पण नोकरांच्या सांगण्यावरून राजकन्या कल्याणसिंगाबरोबर यमुनास्तंभावर गेली आहे, व तिच्याबरोबर तिची सखी गुलाब ही आहे असें त्यास कळतांच तो तिकडे जाऊं लागला. पण बागांत गुलाब एकटी बसलेली पाहून राजकन्या कल्याणसिंगाबरोबर स्तंभावर गेली असावी, व तिनें आपल्या सखीस तेथें राहण्यास सांगितलें असावें असा त्यानें तर्क केला. तो गुलाबीजवळ येतांच ती दचकून उठून आनंदानें ह्मणाली, "वाः! इतके दिवस माझी आठवण झाली नाहीं वाटतें!" विजयसिंगास हा प्रश्न ऐकून आनंद झाला नाहीं. कारण, त्यावेळीं कल्याणसिंग व राजकन्या यांविषयीं त्याच्या मनांत असलेला वैराग्नि प्रदीप्त झाला होता. पण आपलें काम साधून घेण्यासाठीं तो शांतपणें ह्मणाला, "प्रिये! तूं मला विनाकारण दोष देतेस! मी आज आलों तो वरीं-

सुद्धां गेलों नाहीं. प्रथम तुझी भेट घेण्यासाठीं आलों. पण तुझा रोष आहे तो आहेच! काय करावें? तूंसुद्धां मला दुर्लभ होणार ना?" गुलाब ह्मणाली, "वा! आज माझी बरीच थट्टा मांडली आहे ह्मणायची! मी तुमच्यावर एवढें प्रेम करीत असतांना मी आपणास दुर्लभ कशी झालें?" विजयसिंग ह्मणाला, "तूं माझ्यावर प्रेम ठेवतेस हें काय मला माहित नाहीं? पण एकमेकांची प्रीति असली ह्मणजे लग्न होतेंच कीं काय?" गुलाब ह्मणाली, "तसें तर नाहींच. आई-बापांस विचारलेंच पाहिजे. तुह्मी सांगितलें तर माझ्या-बरोबर लग्न करूं नको असें कांहीं आपले वडील ह्मण-णार नाहींत. मी चंद्रपतीची बहीण आहें हें त्यांस चांगलें ठाऊक आहे." कल्याणसिंग ह्मणाला, "बाबा नाहीं ह्मणायचे नाहींत हें मला माहित आहेच." गुलाब ह्मणाली, "तर कोण तुह्मी?" विजयसिंग ह्म-णाला, "मी कसा बरें ह्मणेन?" गुलाब ह्मणाली, "मग नको ह्मणणार तरी कोण?" विजयसिंगानें कपटजाल पसरण्यास आरंभ केला. तो ह्मणाला, "प्र-तिज्ञेचें बंधन मला फार नडतें हें तुला ठाऊक असेलच. मी प्रतिज्ञा पूर्ण करण्यास सदा तत्पर असतों. ती पुरी झाल्याशिवाय मी काय करूं? ज्याचें वचन गेलें त्याचें सर्वस्व गेलें! तशांत मी क्षत्रियाचा बच्चा. तेव्हां वचन-

भंगाचा दोष येणें माझ्यासारख्यास मुळींच शोभत नाहीं." गुलाब ह्मणाली, "पण त्या प्रतिज्ञेशीं माझा संबंध काय?" विजयसिंग ह्मणाला, "जी स्त्री माझें एक काम करील तिच्याशींच मी विवाह करीन अशी मी प्रतिज्ञा केली आहे." गुलाब ह्मणाली, "असें तें कसलें काम आहे तें मला सांगा, ह्मणजे कितीही अडचणी आल्या तरी तें केल्याशिवाय राहणार नाहीं." विजयसिंगानें कपटजाल आणखी पसरलें. तो ह्मणाला, "काम कांहीं मोठें नाहीं, मात्र हिंमत पाहिजे." गुलाब ह्मणाली, "तर तें बोला एकदा." गुलाबेचा इतका सरळपणा पाहून कपटी विजय क्षणमात्र स्तब्ध झाला. तिला आपण फसवीत आहों असें त्यास वाटलें. त्याचें पापी अंतःकरण बरेंच द्रव पावलें. पण ज्याप्रमाणें तप्त झालेल्या तव्यावर जलबिंदु पडतांच तो क्षणभरही राहत नाहीं, तद्वत् पापी व कपटी मनुष्याच्या मनांत सद्बोध टिकत नाहीं. विजय बोलत नाहीं असें पाहून गुलाब ह्मणाली, "बोलत कां नाहीं? कांहीं वाईट काम तर नाहीं ना?" विजयसिंग ह्मणाला, "प्रथम काय तें ऐक, आणि मग बरें कीं वाईट याचा विचार कर. ज्या दिवशीं मी राजकन्येच्या शयनगृहांतून रागानें चालता झालों त्याच दिवशीं मी अशी प्रतिज्ञा केली कीं, 'ज्यावर राजकन्या प्रीति

करते त्याचा तिच्याशीं वियोग करींतोंपर्यंत विवाह करणार नाहीं.' मी क्षत्रिय असेन तर ही प्रतिज्ञा पुरी केल्याशिवाय राहणार नाहीं. सर्व धन कृष्णार्पण करीन, तुझ्या प्रेमासही मुकेन, माझ्या प्राणाचाही परित्याग करीन, पण प्रतिज्ञाभंग करणार नाहीं." गुलाब ह्मणाली, "पण युवराज आणि राजकन्या यांचा वियोग मला कसा पाडतां येईल?" विजयास यावेळीं आनंद झालासें दिसलें; कारण, त्याच्या कपटजालांत गुलाब हळुहळु सांपडत आहे अशी त्याची खात्री झाली. तो ह्मणाला, "तो कसा तो मी सांगेन; पण मी सांगेन त्याप्रमाणें तूं केलें पाहिजे." गुलाब ह्मणाली "काय केलें पाहिजे तें सांगा." विजयसिंग ह्मणाला, तुझ्याजवळ राजकन्येचा एखादा दागिना आहे काय? असेल तर माझ्याजवळ दे." गुलाब ह्मणाली, "हो, बरी आठवण झाली. ती निजली असतां तिच्या हातांतील आंगठी खालीं पडली होती ती तिला देण्यासाठीं मी उचलून घेतली होती. पण मी द्यायला विसरलें. तुह्मांला ती कशास पाहिजे?" नंतर गोष्टी बोलतां बोलतां विजयसिंगानें ती आंगठी तिच्याजवळून घेतली व राजकन्या व युवराज यांचा वियोग कसा करावा हें तिच्या कानांत सांगितलें. तें ऐकून गुलाब दचकून जरा मागें हटली. तिचें धार्मिक आणि कोमल हृदय

तें काम करूं नको असें तिला सांगूं लागलें. ती रडत रडत ह्मणाली, "विजयसिंगजी! असलें कुकर्म माझ्या हातून करवूं नका. माझ्याकडून तें होणार नाहीं. राजकन्या माझ्यावर इतका विश्वास ठेवते, इतकें प्रेम करते, त्याचा मोबदला मी या रीतीनें देऊं काय? ही गोष्ट सोडून द्या. दुसरें कांहीं असेल तर तें मी करीन."

विजयसिंग क्रोधांध झाला. तो ह्मणाला, "हेंच का माझ्यावर तुझें प्रेम? कांहीं हरकत नाहीं! आतां मी चाललोंच. आजपासून मी तुझें नांवही घेणार नाहीं." हें ऐकतांच गुलाब व्याकुळ होऊन रडूं लागली. तिच्यानें कांहींच बोलवेना. ती विजयाच्या प्रेमाचें कारण समजली. त्याची प्रीति स्वार्थमय होती, तो कुटिल, कपटी, कृष्णकर्मे करणारा होता, या गोष्टी तिच्या लक्ष्यांत येऊन तिनें विजयसिंगास आपल्या हृत्प्रांतांतून क्षणभर हद्दपारही केलें!

पण प्रेम पडलें आंधळें! विजय आपणास वरणार नाहीं असा विचार तिच्या मनांत आल्याबरोबर तिचें सरल, प्रेममय, शुद्ध हृदय त्याच्याकडे पुनः वळलें! तिनें शेवटीं आपल्या मनांत अशी तोड काढली कीं, विजयसिंगाच्या सांगण्याप्रमाणें वागून आपलें अगोदर काम साधून घ्यावें व नंतर झालेली सर्व गोष्ट राजकन्येस व युवराजास सांगून त्यांची क्षमा

मागावी. असें केलें ह्मणजे आपणही सुखी होऊं व राजकन्याही सुखी होईल. असा बेत करून ती विजयाकडे वळून ह्मणाली, माझ्यावर तुमचें खरें प्रेम नाहीं हें मला समजलें बरें? पण तुमच्या ह्मणण्याप्रमाणें वागलें ह्मणजे तरी माझ्याशीं विवाह कराल ना?" विजयसिंग ह्मणाला, "या चंद्रसूर्यासमक्ष सांगतों कीं, माझें काम झाल्यावर गुलाबेबरोबर मी आनंदानें विवाह करीन!" गुलाब ह्मणाली, "तर तुमच्यासाठीं हें पापकर्मसुद्धां मी करीन." गुलाब आपलें काम करण्यास कबूल झाली तेव्हां विजयसिंगास फार आनंद झाला. नंतर तो तिच्याशीं गोड गोड गोष्टी बोलूं लागला. शेवटीं तो ह्मणाला, " महाराजांनीं कल्याणसिंगास पाठवून देण्यासाठीं मला पाठविलें होतें; पण तुझ्याबरोबर गोष्टी बोलतां बोलतां मी तें विसरूनच गेलों!" गुलाब ह्मणाली, "मी त्यांना येथें बोलावून आणूं का?" विजयसिंग ह्मणाला, "पण त्यांच्या काय गोष्टी चालल्या आहेत त्या तरी ऐकूं या!" गुलाबेस त्याचा हेतु बरा वाटला नाहीं. तरी ती त्याच्या भीतीमुळें उगीच राहिली. मनुष्यानें एखादें वाईट कृत्य केलें ह्मणजे त्याच्या हातून दुसरें वाईट कृत्य व्हावयाचेंच. यासाठींच कोणतीच धर्माज्ञा मोडूं नये असें ह्मटलें आहे. विजयसिंगाची दुष्ट

इच्छा पुरी करण्यास गुलाब कबूल झाली नसती, तर यावेळीं तिला उगी राहावें लागतें नसतें. असो.

तो यमुनास्तंभावर गेला व द्वारावर लपून राहून त्यानें राजकन्या व युवराज यांमध्यें चालत असलेल्या सर्व गोष्टी ऐकल्या! तो जागच्या जागींच क्रोधाग्नीनें जळूं लागला! प्रत्येक शब्दाबरोबर त्याच्या अंगावर ज्वाला येऊं लागल्या! तो तसाच रागानें तडफडत तडफडत खालीं उतरून गुलाबेस ह्मणाला, " गुलाब, जें काम मी सांगितलें आहे तें करण्याचा हाच वेळ आहे. महाराज बोलावीत आहेत असें सांगून दासीस मी कल्याणसिंगाकडे पाठवून देतों. तूं बागांतल्या मंचकावर बसून कल्याणसिंगास ऐकुं येईल एवढ्या मोठ्यानें बोलावयास विसरूं नको." विजयसिंगाच्या सांगण्याप्रमाणें गुलाबेनें कपटजाल कसें पसरलें हें मागल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे.

———

# प्रकरण १७ वें.

## कपटजाल ( पुढें चालू. )

दिल्लींत युद्धाची तयारी चालली आहे! सेनेस सर्व प्रकारचें सामान पुरविण्यासाठीं सर्व कारागीर आपल्या कामास लागले आहेत. या युद्धांतून आपण बचावून येऊं कीं नाहीं अशा शंकेमुळें सैनिक लोक आपापल्या कुटुंबाची भेट घेऊन येत आहेत. त्यांस एकसारखा पोशाख तयार करून देण्यांत सर्व शिंपी गुंतून राहिले आहेत. मोठमोठ्या कारखान्यांतून बंदुका व तोफा* तयार होत असून दारु गोळा तयार

* भरतखंडांतील महाभारतयुद्धांत अग्न्यस्त्रादिकांचा उपयोग करण्यांत येत असे असें काव्य-इतिहासादिक ग्रंथांवरून दिसून येतें. कित्येकांचा असा समज आहे कीं, तोफा प्रथम चीन देशांत तयार होऊन मग त्यांचा प्रसार युरोपांत झाला. चंद कवि आपल्या कनोजखंडांत ह्मणतो:—

नृप पंग नयन छूटे अराव, कोटहि कंगुर चाढि चढि;
सिताव जंबूर तोप छूटहि भुनकि, दस कोस जाय गोळा भनकि;
सिरदार भार बाराह रोह, लगी अभंग बरह नै कोह.

यावरून असें दिसतें कीं पृथुराजाच्या वेळीं तोफांचा उपयोग होत असे. या तोफांचा इतका मोठा ध्वनि होत असे कीं तो दहा कोस लांब ऐकूं येत असे. चंद कवि आणखी एका

करण्यासाठीं पांच हजार मनुष्यें कामास लागलीं आहेत. दुसरीकडे धनुष्यबाण तयार होत आहेत. सर्व लोक रात्रंदिवस कामांत गुंतले आहेत. पहांटेस पृथुराज आणि समरसिंग सैन्याची व्यवस्था पाहत आहेत. क्षत्रियांस उत्साहपूर्ण पाहून ते निश्चिंत होऊन, शाहबुद्दीन घोरी यावेळींसुद्धां काळें तोंड करून मागें जाईल अशी त्यांस खात्री वाटत आहे!

इकडे दिलीप व कल्याण यांची मैत्री दृढतर झाली.

---

ठिकाणीं असें लिहितो, 'तोफा व दारुगोळा ठेवण्यास तीन कोस जागा लागत असे.' सर हेनरी इलियट यांचें असें ह्मणणें आहे कीं बाबरच्यावेळीं या देशांत तोफा होत्या. १३१२ मध्यें आफ्रीकेंतील मूर लोकांजवळ तोफा होत्या, व त्यांनीं त्या आरब लोकांपासून घेतल्या होत्या. आरबी लोकांनीं ज्याप्रमाणें अनेक विद्यांचा अभ्यास भारतवासीयांकडूनच केला, त्याचप्रमाणें तोफा तयार करण्याचा अभ्यासही त्यांकडूनच केला, व त्या द्वारानें त्यांचा प्रसार युरोपखंडांत झाला असें कित्येक विद्वानांचें ह्मणणें आहे. हेलहेड लिहितो कीं, "Gunpowder has been known in China as well as Hindustan far beyond all periods of investigation." अर्थात् हिंदु व चिनी लोकांस ज्या काळीं बंदुकीची दारु तयार करतां येऊं लागली त्या काळाचा निर्णय करणें अशक्य आहे. निदान इतकें तरी खरें आहे कीं, युरोपियन लोकांस बंदुका, तोफा, व त्यांची दारु तयार करतां येऊं लागण्यापूर्वीं हजारों वर्षे त्यांचा उपयोग भरतखंडांत होत होता.

एकमेकांस भेटल्याशिवाय त्यांचा एक दिवसही जाईना. सांप्रदायाप्रमाणें त्यास भेटण्यासाठीं दिलीपाच्या इथें करणसिंग जाण्यास निघाला.

दिलीप दुसऱ्याच एका विचारांत गुंतला होता. आपण कोण? आपले वडील कोण? हाच विचार त्यास पडला होता. त्यानें आपले जुने कपडे काढून ते उलट सुलट तपासले, पण पत्ता लागेना. इतक्यांत कल्याण तेथें आला. त्यानें ते कपडे पाहिले, व तीं राजवस्त्रें असून आपण तीं पूर्वीं कधीं तरी पाहिलीं असावीं असें त्यास वाटलें. त्यानें दिलीपास विचारलें, "हीं वस्त्रें कोणाचीं आहेत?" दिलीप-"तीं माझ्या बाळपणचीं आहेत असें मला संन्याशानें सांगितलें होतें." कल्याण-"मी तीं पूर्वीं पाहिलीं असावींसें वाटतें. शिवाय तुमचा माझा कांहीं संबंध असावा असेंही मनांत येतें. कारण, तुमचें व माझें मुख एकसारखें आहे. पण तुमच्याजवळ संन्याशानें एक रक्षाकवच दिलें होतें ना?" दिलीप—"होय. पण तें पाहण्यास मला सवडच झाली नाहीं." कल्याणसिंगास असें वाटलें कीं, दिलीपसिंग हा आपला दुडालेला बंधु करणसिंग असावा. पण तेथेंच त्याविषयीं बोलण्यापेक्षां त्यास आपल्या इथें आणवून बोलावें असा विचार करून दिलीपास दुसऱ्या दिवशीं आपल्या इथें येण्यास

सांगून तो उतावळीनें राजकन्येच्या महालाकडे चालता झाला.

महालाच्या दरवाजावर गुलाब उभी होती. तिला कल्याणसिंगानें विचारलें, "कां, आज तरी प्रमाण दाखविशील कीं नाहीं?" गुलाब ह्मणाली, "हातच्या कांकणास आरसा कशाला हवा? आतांच विजयसिंग महालांत यायचा आहे." कल्याणसिंग ह्मणाला, "आज जर विजयसिंग आला तर तुझी गोष्ट खरी मानीन." गुलाब—"बरें आहे." कल्याणसिंग राजमहालांत आला तों एका सुवर्णजडित पलंगावर हात टेंकून उषावती पडली आहे असें त्यानें पाहिलें. तिचें मुखकमल म्लान दिसत होतें, व नेत्र अश्रुपूर्ण झाले होते. कल्याणसिंग तर ती भव्य व कांतिमान मूर्ति पाहून थक्कच झाला. इतक्यांत तिच्या मंदिराच्या द्वारावर एकदम एक पुरुष आला! त्यास कल्याणसिंगानें पाहिलें. पण वाघास पाहिल्याबरोबर हरिण जसें पळत सुटतें, त्याप्रमाणें कल्याणसिंगास पाहून तो पुरुष बावरल्यासारखा होऊन तसाच पळून गेला. तो विजयसिंग होता. राजपुत्रानें त्यास ओळखलें! त्याच्या अंगांत क्रोधविष भिनून गेलें!

लांकडामध्यें स्वभावतःच अग्नि असतो; पण त्याचें घर्षण केलें ह्मणजे तो व्यक्त होतो. कल्याणसिंगाचें

तसेंच झालें. त्याचें मन अगोदरच शंकित झालेलें, त्यांत आणखी विजयसिंगास पाहतांच काय विचारावयाचें आहे? गुलाबेचें सांगणें त्यास तात्काल खरें वाटलें. त्याला सर्व ब्रह्मांड पेटत आहे असें वाटूं लागलें. त्याच्या डोळ्यांपुढें वीज चमकूं लागली. सर्वांग कंपायमान झालें. त्याची सुंदर मूर्ति रुद्ररुप झाली. तो उषावतीस ह्मणाला, "पापिणी! मी युद्धास जाणार ह्मणूनच तूं रडत आहेस असें मला दाखवितेस काय? ठीक ठीक! पापिणी? विजयसिंगासाठीं रडून माझ्याशीं असें कपट करतेस काय! दुश्चरिते! अगोदरच मला तुझ्या मोहांत पाडलें नसतेंस तर तुझा काय तोटा होणार होता? विजयसिंगाच्या हातांत तुझी आंगठी कशी गेली? प्रेमामुळेंच ना? कांहीं हरकत नाहीं. मी आतां या युद्धांत खुशाल प्राणत्याग करीन! मी आतां पुनः तुझें दर्शन घेणार नाहीं. ईश्वराजवळ तुला कांहीं जबाब द्यावयाचा असेल तर केल्या कर्माचा अझून पश्चात्ताप कर." एवढें बोलून कल्याणसिंग तडक चालता झाला. इकडे त्याचें हें निर्दय भाषण ऐकत उभी राहिलेली उषावती धाडकन् भूमिवर पडून मूर्च्छागत झाली.

एकीकडे राहून हा सर्व प्रकार गुलाब पाहत होती. राजकन्या मूर्छित होतांच ती घाबरून गेली. कल्याणसिंगास सर्व खरा प्रकार निवेदन करावा असें तिच्यां

मनांत आलें. पण त्याच वेळीं, आतां ती गोष्ट सांगितल्यास कल्याणसिंगास खरी वाटणार नाहीं, शिवाय त्याच्याबरोबर बोलत राहिल्यास राजकन्येस सांभाळण्यास कोण नाहीं, असा विचार तिच्या मनांत आला. तिनें राजकन्येजवळ जाऊन तिच्या मुखावर गुलाबपाणी शिंपडलें. तेव्हां ती जागृत झाली, पण पुनः तिला मूर्च्छा आली. तेव्हां गुलाब फार घाबरून गेली. तिनें हा वृत्तांत उषावतीच्या आईस कळवितांच ती घाबऱ्या घाबऱ्या तेथें आली, व कन्येची अशी अवस्था पाहतांच शोक करूं लागली. सर्व दासी तिच्या अशा स्थितीचें निदान करूं लागल्या. कोणी कांहीं, कोणी कांहीं कारण सांगूं लागल्या. शेवटीं एक दासी ह्मणाली, "या सगळ्या गोष्टींत कांहीं अर्थ नाहीं. नुकतेच युवराज कल्याणसिंग महालांतून जात होते. ते युद्धास जाणार असल्यामुळें भीतीनें हिला मूर्च्छा आली असावी." सर्व दासींस व खुद्द राणीससुद्धां तिचें ह्मणणें खरें वाटलें. राणीनें आपला शोक आवरून राजवैद्यास बोलावणें पाठविलें.

राजवैद्य आला. तो वृद्ध व चिकित्साप्रवीण होता. राजकन्या भूमीवर पडली त्यावेळीं तिच्या डोक्यास जखम झाली होती. ती त्यानें पाहिली. त्यानें तीवर मलम लावलें, व तिला औषध देऊन तो चालता झाला

अझून तिची मुर्च्छा गेली नव्हती. तिची ती स्थिति पाहून राणी विलाप करूं लागली, व आहारनिद्रा-त्याग करून तिची सुश्रुषाही करूं लागली.

---

## प्रकरण १८ वें.

### शैलवाला कोण?

कल्याणसिंग निघून गेल्यावर पुनः दिलीपसिंगानें आपलीं वस्त्रें हातांत घेतलीं. तो विचार करूं लागला कीं, “कल्याण ह्मणतो आपण हीं वस्त्रें पूर्वी पाहिलेलीं असून तीं राजवस्त्रें आहेत! हें आहे तरी काय? या वस्त्रांवरून मी कोण आहें हें कसें कळेल?” असा विचार करीत करीत तो एक वस्त्र टाकून दुसरें, दुसरें टाकून तिसरें उचलीत होता. पण त्यांवरून कांहींच पत्ता लागत नाहीं असें पाहून तीं त्यानें जोरानें दूर फेंकून दिलीं. पण फेंकतांना त्यांतून तीन कागद खालीं पडले. या पत्रांतून आपल्या जन्मासंबंधीं कांहीं तरी आपल्यास कळेल अशी दिलीपाच्या मनांत आशा उत्पन्न होऊन त्यानें ती पत्रें मोठ्या आनंदानें उघडून वाचलीं:—

"महापुरुष, शांतचित्तवृत्तिवान्, प्रबलप्रतापी,
कुमार तेजसिंह.

"महाराज,

"आपल्या बंधूचा पुत्र महाराज जयचंद्र आपल्यावर कांहीं
"कारणामुळें क्षुब्ध झाला आहे, व तो आपलें अहित कर-
"ण्याचा उपाय शोधीत आहे. आपण सावध राहावें. विशेष
"कांहीं असलें तर कळवीन."

"आपला शुभाकांक्षी श्री—"

दिलीपसिंग ह्मणाला, "याचा अर्थ काय? यांत माझ्या संबंधानें कांहींच लिहिलेलें नाहीं; यांत दुसरीच गोष्ट आहे. पण या दुसऱ्या पत्रांत काय आहे तें पाहूं." असें ह्मणून तो दुसरें पत्र वाचूं लागला:—

"महापुरुष प्रबलप्रतापी— * * *
* * * तेजसिंह.

"महाराज जयचंद्राचा क्रोध अजून शांत झाला नाहीं. आपणास हद्दपार करण्याचा त्यानें पक्का निश्चय केला असून तो उघड उघड असें बोलूनही दाखवीत आहे. आपण दुःखी झालां ह्मणजे तें पाहून...... ........इच्छा "..........

"आपली कन्या शैलबाला हिला माझ्याजवळ सोंपवून आपण
"देश सोडून पळून जावें. कदाचित् प्राणावरही प्रसंग येईल.
"पण प्राणापेक्षां प्रतिष्ठेचें संरक्षण करणें विशेष अग-
त्याचें आहे."

शैलबालेचें नांव ऐकतांच दिलीपसिंग आश्चर्यांत तल्लीन होऊन गेला. "ज्या दिवशीं शैलबाला व तिचा पिता आश्रमांत आलीं होतीं त्या दिवशीं संन्या-

शाच्या हातांत कांहीं कागदाचे तुकडे होते खरे, बाबा स्नान करण्यास गेले होते त्यावेळीं शैलबालेच्या पित्यानें होडींतून उतरतांना कांहीं कागद पाण्यांत फेंकून दिले होते तेच हे कागद असावे. ते बाबांनीं संभाळून ठेवले ह्मणून त्या कुमारिकेचा आज पत्ता मिळाला. कोणत्या तरी प्रसंगीं दुःख व विरागवृत्ति यांत लीन होऊन, स्वहिताहित मनांत न आणतां कोणत्याही वस्तूस निरुपयोगी ठरवून मनुष्य फेंकून देतो, पण ती संग्रहास ठेवली तर दुसऱ्या प्रसंगीं तिचा फार उपयोग होतो ही गोष्ट ध्यानांत धरून बाबांनीं हे कागद राखून ठेविले असावे. त्यांनीं ते वाचले असावे कीं नाहीं हें कांहीं समजत नाहीं. कारण, मरणाच्यावेळीं त्यांनीं त्याविषयीं मला कांहींच सांगितलें नाहीं. कदाचित् आजारीपणामुळें ही गोष्ट ते विसरलेही असतील." असा विचार करीत असतां तो आपल्याविषयीं विचार करीनासाच झाला! शैलबाला ही उत्तम कुलांतील कन्या आहे हें पाहून तो आनन्दांत निमग्न झाला. शैलबाला कुमारश्री तेजसिंगाची कन्या! राजकुलांगना! महाभाग्यशालिनी! हाच विचार त्याच्या मनांत येऊं लागला. त्यानें तिसरें पत्र वाचून पाहिलें, पण त्यांत विशेष कांहीं नव्हतें. तरी तो पुनः पुनः सानन्द चित्तानें तीं पत्रें वाचूं लागला. त्यांवरून तेजसिंह हा

शैलबालेचा पिता व जयचंद्राचा काका होता अशी त्याची खात्री झाली. दोघांमध्यें कांहीं वादविवाद होऊन जयचंद्रानें तेजसिंगाचा अपमान केला, व तेजसिंगासारख्या महापुरुषास अपमान हा वज्राहूनही असह्य वाटल्यामुळें तो बरोबर मुलीस घेऊन देशोदेशीं गुप्तवेशानें भटकत राहिला अशी त्यानें कल्पना केली. तो पुनः पत्रें वाचूं लागला, व शैलबाला राजकन्या आहे असें पाहून त्याच्या नेत्रांतून आनन्दाश्रु बाहेर येऊं लागले. शैलबालेची शैशवक्रीडा त्याच्या डोळ्यांपुढें उभी राहिली, व त्याचें मन अस्थिर झालें. त्यानें पुनः तीं पत्रें वाचलीं, पण शैलबालेच्या पित्याबरोबर जयचंद्रानें वैर धरण्याचें कारण त्यास समजलें नाहीं.

जयचंद्राचा प्रपितामह अनंतपाळ यास तीन राण्या होत्या. पट्टराणी मोतीबा हिचा पुत्र वीरसिंग व मधलीचा तेजसिंग होता. कनिष्ट राणी नावडती असल्या कारणानें तिला कांहीं अपत्य झालें नव्हतें. वीरसिंग हा समरांगणामध्यें कृतांतकाळ होता. तरी तो इतका धर्मशील होता कीं, त्याच्यावर सर्व प्रजाजनांचें पूर्ण प्रेम होतें. तो सर्व धार्मिक पुरुषांचा आधार व विद्वानांचें शिरच्छत्र होता. तो स्वतः विद्वान् असून त्याच्या राजभवनांत नेहमीं विद्वानांच्या सभा भरत

असत. त्याची राणी दिल्लीश्वर अनंगपाळ याची कन्या वनमालिका होय. ती सद्गुणसंपन्न, विवेकी, रसिक व विनोदी होती. ती एवढी भाग्यशाली होती तरी तिला गर्वाचें वारेंही नव्हतें. सर्व प्रजाजन तिला पुत्ररत्न व्हावें अशी इच्छा करीत होते. बरेच दिवस तिला संतान झालें नाहीं तेव्हां तिनें एका योग्याची प्रार्थना केली. त्यानें तिला थोडी विभूति देऊन असें सांगितलें कीं, तूं ही प्राशन कर, ह्मणजे तुझी आशा पूर्ण होईल. दुर्दैवानें नावडत्या राणीच्या कानावर ही गोष्ट गेली तेव्हां तिनें कपट करून मोठ्या युक्तिनें ती विभूति अपवित्र केली. त्यामुळें वीरसिंगानें अयोग्य वेळीं ऋतुदान देतांच वनमालिकेस भारतवर्षाचें अकल्याण करणारा पुत्र झाला!

तेजसिंग फार पवित्र होता, व तो राज्यासनाचा स्वामी जयचंद्र यास वारंवार धर्मोपदेश करीत असे. परंतु तें जयचंद्राच्या मंत्रिमंडळास पसंत पडेना. सर्व मंत्री दुष्ट होते, व त्यांनीं राज्यांत हाहाःकार उडवून सोडिला होता. ही गोष्ट तेजसिंगास समजतांच त्यानें जयचंद्रास एकांतांत उपदेश केला, पण तो त्याच्या शिलातुल्य हृदयांत शिरला नाहीं. त्यास तेजसिंग ह्मणाला, "जोंपर्यंत या दुष्टमति लोकांस तूं रजा देणार नाहींस तोंपर्यंत तुझी स्थिति बरी न होतां

राज्यांत विपरीत प्रकार उत्पन्न होतील. आपल्या सवन नगरींतील पवित्र स्त्रियांची मर्यादा न संभाळणें, दिवसाढवळ्या घरें लुटीस जाणें, अयोग्य शासन होणें, न्यायास थारा न मिळणें, हें सद्धर्मी व प्रजाप्रतिपालक राजास लांछनरूप आहे. राजा हा प्रजेच्या सुख-दुःखांचा विभागी आहे, व प्रजा ही राजाच्या सुख-दुःखांची विभागी आहे. असा परस्परसंबंध असतां तूं दुष्ट मंत्रिजनांच्या दुरुपदेशानें आपल्या प्रजाजनांस त्रास देतोस हें विनाशाचेंच मूळ आहे." हीं सद्वाक्यें ऐकून जयचंद्रास क्रोध आला. त्यावेळीं त्यास तो कांहीं बोलला नाहीं. तरी त्यावेळेपासून त्याची मुलाखत त्यानें बंद केली, व त्यास राजसभेंत येण्याचीही बंदी केली. मागून जयचंद्राचा क्रोध जास्तच वाढला, व त्यामुळें त्यानें तेजसिंगाच्या तीन गांवांपैकीं एक गांव जप्त केला. तरी धर्माचारी तेजसिंगास त्याचें मुळींच वाईट वाटलें नाहीं. ज्याप्रमाणें अमर मनुष्य विषाचें सेवन प्रेमानें करतो, तद्वत् त्यानें या अपमानाचें सेवन सहजच केलें.

दिवसेंदिवस जयचंद्राच्या दुष्ट मंत्र्यांचा उपद्रव जास्त होऊं लागला. तेव्हां सर्व नागरिकांनीं तेजसिंगास अशी विनंति केली कीं, त्या दुष्ट मंत्रिमंडळास कामावरून लवकर काढून टाकावें; असें न होईल तर

नगरांत बंडावा झाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रजा याप्रमाणें दुःखी झाली आहे हें पाहून तेजसिंगास फार वाईट वाटलें. पण बिचारा करतो काय? त्यानें त्यांस एवढेंच उत्तर दिलें कीं, वेळ आली ह्मणजे सर्व व्यवस्था होईल. ही गोष्ट त्या दुरात्म मंत्र्यांस समजतांच तेजसिंगाची उचलबांगडी करण्याचा त्यांनीं निश्चय केला व त्यासाठीं ते उपाय शोधूं लागले. पृथुराज व तेजसिंग यांमध्यें पत्रव्यवहार वारंवार चालत असून प्रसंग आल्यास तो त्यास साहाय्य दिल्याशिवाय राहणार नाहीं असा विचार जयचंद्राच्या मनांत भरविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, पण तो कांहीं केल्या सिद्धीस जाईना. शेवटीं असा एक प्रसंग येऊन ठेपला कीं त्या वेळीं मंत्र्यांनीं सांगितलेली गोष्ट त्याच्या मनांत पूर्णपणें भरून गेली!

तेजसिंग अगदीं निष्कपटी व धर्मज्ञाता होता. जयचंद्रानें जरी त्याचा अपमान केला तरी त्यानें तें मनास लावून घेतलें नाहीं. तथापि तो क्षत्रियवीरच होता. कधीं कधीं त्यास त्याचा राग येत असे. पण पारमार्थिक व धार्मिक वृत्तींच्या साहाय्यानें आत्मसंयमन करून तो साधुसंतांच्या समागमानें कालक्षेप करूं लागला. कनोजापासून जवळच्याच एका पर्वतावर एक आश्रम होता. त्या ठिकाणीं एका पवित्र संन्याशाचा समागम

झाल्यामुळें त्यास गुरु मानून तो त्यापासून नित्य धर्मोपदेश ऐकत असे, व रात्रौ त्याच्या आश्रमांत जात असे.

संध्याकाळची वेळ; आकाश निरभ्र झालें आहे; आरती होत असल्यामुळें नगरांतील देवालयांत गडबड चालली आहे; पक्षिगण अदृश्य झाला आहे; प्रकाश व अंधकार यांच्यामध्यें प्रचंड युद्ध चाललें आहे; प्राची दिशेस चंद्रलेखा दुर्बल व निस्तेज होऊन राहिली आहे; अशा वेळीं तेजसिंग गुरूजवळ धर्मवचनें ऐकत बसला होता. चोहींकडे शांति होती; मात्र अरण्यांतील वृक्षांचीं सुकीं पानें खळखळाट करीत होतीं, व दूर असणाऱ्या दरींमधून भयंकर प्राण्यांचा मधून मधून होणारा शब्द ऐकूं येत होता. याशिवाय या दोघांच्या गोष्टींत विक्षेप करणारा दुसरा कोणी नव्हता. संसार, स्नेह, लक्ष्मी, ऐश्वर्य, कीर्ति आणि दुसऱ्या मायिक वस्तूंवरील प्रेमभाव, मनुष्याचें कल्याण करणारा नसून अकल्याण करणारा आहे, व पारमार्थिक प्रवृत्ति मात्र कल्याणकारी, निरंतर कल्याणकारी, चिरकाल कल्याणकारी व मुक्ति देणारी आहे, असा सद्बोध ऐकून तेजसिंगाची वृत्ति बदलून गेली होती. त्यास परब्रह्माचाच ध्यास लागला होता. तो त्यास पाहत होता, त्यासच गात होता, त्याचीच प्रार्थना करीत होता.

त्यानें मायेचा बंध तोडून टाकला होता. त्याची वृत्ति परब्रह्ममयींच झाली होती. प्रपंच ह्मणजे काय याचेंही त्यास भान राहिलें नव्हतें !

मूढ जयचंद्र, दुष्ट मंत्र्यांच्या प्रपंचजालांत सांपडून आजच या पर्वतावर आला होता. पृथुराजानें पाठविलेल्या संन्याशाबरोबर गुप्तपणें गोष्टी करण्यासाठीं तेजसिंग रात्रीं तेथें जातो असें मंत्र्यांनीं त्यास सांगितलें होतें. त्याची प्रतीति घेण्यासाठीं तो आला होता. आश्रमांतील सद्बोधकथा समाप्त झाली होती, व तेजसिंग समाधिस्थाप्रमाणें स्वस्थ बसला होता. इतक्यांत एका अपरिचित मनुष्यानें संन्याशाच्या आश्रमांत प्रवेश केला. तो ह्मणाला "महाराज ! मी प्रवासी आहें. मला आजची रात्र येथें पडूं द्या." क्षणभर विचार करून संन्याशानें रुकार दिला नाहीं. तेव्हां दयावान् तेजसिंग ह्मणाला, " बिचारा थकला भागला असेल; पडेना का ओसरीवर ?" संन्यासी ज्ञाता होता तो क्षणभर विचार करून ह्मणाला, " मला तर कांहीं भय नाहीं; पण तुह्मांला आहे." हें मर्मवाक्य न समजून तेजसिंग ह्मणाला, " मला कशाचें भय आहे ? दया केली तर त्याच्या बदली दयाच मिळेल. भल्या गृहस्था, जा तूं खुशाल ओसरीवर पड." कर्तव्याकर्तव्य व योग्यायोग्य विचार न करतां तेजसिंगानें त्यास परवानगी दिली हें

पाहून संन्यासी हांसून ह्मणाला, "ठीक आहे, तुझ्या मर्जीप्रमाणेंच कां होईना? पण कमी अधिक कांहीं झालें तर त्याचा दोष मात्र माझ्याकडे नाहीं!"

हें एकमेकांचें बोलणें तो प्रवासी निश्चल मनानें ऐकत होता. जेव्हां त्याचें बोलणें संपलें तेव्हां तो संन्याशाजवळ आला, व विचारल्याशिवाय ह्मणाला, "जयचंद्राच्या त्रासामुळें प्रजा दुःखी झाली आहे, तेव्हां दिवसें दिवस त्याचा पडता काळच येणार आहे." दोघांपैकीं एकही कोणी बोलत नाहीं असें पाहून त्या प्रवाशानें पुनः आपलें कथासूत्र लांबविलें—"राजा तो पृथुराजच!" याच वेळीं जयचंद्र हलक्या पावलांनीं चालत चालत झोंपडीच्या दाराजवळ आला व त्यानें पृथुराजाचें नांव ऐकलें. प्रवासी ह्मणाला, "त्याच्या राज्यांत सर्व प्रजा सुखी, धनधान्यानें संपन्न, व उल्हासी असून त्याची सेना त्यावर सुप्रसन्न आहे. तो एकवेळ येथें आला तर सर्व नष्टभ्रष्ट करून टाकील." प्रवाशाचें अशा तऱ्हेचें भाषण ऐकून संन्यासी लागलाच सावध झाला, व आत्मरक्षणबुद्धीनें ह्मणाला, "जो करील तो भोगील, त्याचें आपणाला काय? न्याय अन्याय पाहणारा ईश्वर आहेच." हें ऐकून जयचंद्र दुष्टमंत्र्यांस ह्मणाला, "तुह्मी ह्मणतां तें बरोबर आहे. तेजासिंगाशिवाय हा दुसरा कोण बोलत अ-

सणार?" पण हें बोलण्यांत गुंतल्यामुळें त्या मूर्खानें संन्याशाचें पुढील वाक्य ऐकलें नाहीं—"बाबा, या ठिकाणीं धर्मबोधाच्या गोष्टी चालतात. तुझी राज्य-प्रपंचाची गोष्ट ऐकण्याची ही जागा नव्हे. ती कोणत्या तरी दुसऱ्या ठिकाणीं कर." पुनः जयचंद्र कान देऊन ऐकूं लागला तर संन्याशाचें बोलणें जारीनेंच चाललें होतें—"ईश्वर सर्वांचा न्यायदाता आहे. तेव्हां तूं आपल्या आत्म्याचा संभाळ कर. या जगांत सर्व दुष्ट प्राण्यांस शासन झाल्याशिवाय राहणार नाहीं." पुनः जयचंद्र मंत्र्यांबरोबर बोलूं लागला तेव्हां त्यानें पुढील बोलणें ऐकलें नाहीं—"यासाठीं तूं आपल्या आत्म्याचें रक्षण करून त्याच्या यथार्थपणाचा विचार कर, आणि या अन्य गोष्टींचा परित्याग कर." पुनः जयचंद्रानें लक्ष्य दिलें तों त्याच्या कानावर पुढील बोलणें पडलें—"जगांत दुष्ट व पापी मनुष्य सुख भोगतो खरा, पण कालेंकरून त्याचा नाश हा आहेच!" जयचंद्र रागानें ह्मणाला, "हं! माझा नाश! भल्या जोगड्या, तुझ्यापासून माझा नाश आहे काय रे! तूं जिवंत राहिलास तर ना पुढील गोष्ट? हा बडबडतो तरी काय? आणखी काय भकतो तें तरी ऐकूंया." हें त्याचें आत्मगत भाषण चालल्यामुळें त्यास पुढील भाषण ऐकूं आलें नाहीं.—"परनिंदा, राजद्रोह-

वचन, व स्वजनांचे अवगुण न ऐकणें हें संत पुरुषांचें लक्षण आहे." जयचंद्रानें पुनः कान दिला तों त्यास हे शब्द ऐकूं आले—"धीरच धर!" जयचंद्र मनां म्हणाला, "कोण धीर धरणार? तेजसिंग? ठीक! त्यास चांगलाच धीर धरूं देईन!" असें बोलत असतांना त्यानें संन्याशाचें हें बोलणें ऐकलें नाहीं—"तूं आत्मज्ञानाचा शोध कर, परनिंदा करूं नको, व या ठिकाणीं राज्यप्रपंचाच्या गोष्टी बोलूं नको; बोलावयाच्या असल्यास येथून चालता हो." इतक्यांत तेजसिंगाची घरीं जाण्याची वेळ झाली म्हणून तो संन्याशास नमस्कार करून उठला व घरीं जाऊं लागला. त्याचीं पावलें ऐकूं येतांच जयचंद्र व मंत्री जरा एकीकडे झाले. तेजसिंग इकडे तिकडे न पाहतां नीट आपल्या घरीं चालता झाला. त्यानें कोणास पाहिलें नाहीं, पण जयचंद्रानें त्यास पक्कें ओळखलें.

तेजसिंग निघून गेल्यावर तो प्रवासी एकही शब्द बोलला नाहीं. मंत्री व जयचंद्र हळू हळू पर्वत उतरून चालते झाले. तिसऱ्या दिवशीं पहांटेस तेजसिंग कार्यवशात् संन्याशाच्या आश्रमांत गेला, पण त्यानें तेथें त्या संन्याशाचा मुडदा पडलेला पाहिला! या गोष्टीमुळें तेजसिंगाच्या हृदयांत अत्यंत उदासीनता उत्पन्न झाली, व ती त्याच्या अंतकालापर्यंत नाहींशी झाली नाहीं.

जयचंद्र राजसभेंत बसला असतां एक वेळ असें म्ह-णाला, "शाबास! तेजसिंग काका, शाबास! धृतराष्ट्र काकांसारखेच आपणही आहां! माझ्या शहाण्या, धार्मिक, पंडित काकाजी! तुह्मींसुद्धां शत्रूस आश्रय देऊन माझा नाश करणार अं? आजपर्यंत मी नम्रप-णानें वागलों त्याचेंच का हें फळ? ठीक आहे, मीही क्षत्रिय वीर आहें. तुमच्याकडून माझें कांहींही हो-णार नाहीं. तुमची वेळ जवळ आली आहे." ही गोष्ट राजसभेंतील एका सभासदानें गुप्तपणें तेजसिं-गाच्या कानावर घातली. पण निष्कपटी, असायिक, सुदृढ, धर्मशील तेजासिंग जरासुद्धां डगमगला नाहीं. ईश्वराच्या मनांत असल्याशिवाय कांहींच होणार नाहीं अशी त्याची खात्री होती. जयचंद्रास आपला क्रोध आला आहे हें ऐकल्यामुळें प्रतिक्षणीं तो कोणत्या ना कोणत्या तरी अरिष्टाची अपेक्षा करीत होता. आपल्या ऐश्वर्याची तो मुळींच पर्वा करीत नव्हता. मात्र कीर्ति आणि धर्म आणि एकुलती एक लहान कन्या हीं त्याचें सर्वस्व होतें. जयचंद्राचें भाषण कळल्यावर तो कांहीं दिवस बाहेरच पडला नाहीं. त्याची नीज व भूक नाहींशी झाली. जयचंद्राच्या मनांत असें होतें कीं, संन्याशाच्या मरणामुळें भयभीत होऊन तेजसिंग आपणास शरण येईल; पण सुदृढ, अचल तेजासिंगानें

असा विचार मनांत आणला कीं, पापी मनुष्यास शरण काय जावयाचें आहे? ज्यानें सन्मार्गी, एकनिष्ठ प्रभूची हत्या केली त्यास शरण जावें? शरण जावें तर ईश्वरासच. जसजसा तेजासिंग जयचंद्रापासून दूर राहूं लागला तसतसा जयचंद्राचा क्रोधाग्नि प्रज्वल होऊं लागला. तो एकवेळ सभेंत म्हणाला, "ठीक आहे. काका, तुम्हांस रानोरान भटकावयास लावीन तरच मी वीरसिंगाचा पुत्र जयचंद्र!" ही गोष्टही पूर्वीच्या मित्रानें तेजासिंगाच्या कानावर घातली. तेव्हां आणखी स्वस्थ बसल्यास आपला मानभंगही होण्यास चुकावयाचा नाहीं ह्मणून तो आपल्या मुलीस बरोबर घेऊन एके दिवशीं प्रातःकाळीं स्वभूमीस शेवटचा नमस्कार करून चालता झाला. त्यासच आह्मी संन्याशाच्या पर्णकुटींत कथारंभीं पाहिलें होतें!

दिलीपसिंग विचारांत पडला कीं, जयचंद्राचा काका तेजासिंग यास देशत्याग करण्याचें कारण काय झालें असावें? त्या कागदांवरून तर त्यास कांहींच समजेना. स्वतःविषयीं तर कांहींच माहिती कळेना. तेव्हां त्यानें दुसऱ्या दिवशीं कल्याणसिंगाच्या येथें जाण्याचा निश्चय केला.

— —

# प्रकरण १९ वें.

## करणसिंग कोठें ?

दिल्लीच्या विलासभवनांत एकांत ठिकाणीं कल्याणसिंग मूर्च्छा येऊन पडला होता. त्याच्याजवळ कोणीही नव्हतें. त्याची छाती इतक्या जोरानें उडत होती कीं, तिच्यावर एखादा हलका पदार्थ ठेवला असता तर तो खालीं पडला असता. त्याच्या डोळ्यांतून निघणारे अश्रु गालांवर पडून शय्येवरही पडले होते. जवळ कोणीच मनुष्य नसल्याकारणानें त्यास सावध कोण करणार? तरी तो थोडक्या वेळानें आपोआपच सावध झाला. तो बसण्यासाठीं प्रयत्न करूं लागला, पण त्याचीं गात्रें शिथिल झालीं असल्यामुळें तो निर्फल झाला. अनपेक्षित स्वप्न पडतांच, किंवा कधींही दृष्टीस न पडणाऱ्या मनुष्याचें अकस्मात् दर्शन होतांच जसा एकप्रकारचा हृदयस्तंभ होतो, तद्वत् त्याचें हृदय स्तंभित झालें होतें. थोड्या वेळानें तो मोठ्या मारामारीनें उठून बसला व ह्मणाला, "हाय! ज्या आशेवर मी जिवंत राहिलों ती माझी आशा आज विफल झाली! आतां या जीवाचें काय करावयाचें

आहे? हे उषे, आजपासून मी तुला मुकलों बरें! मी तुझें स्मरण स्वप्नांतसुद्धां करणार नाहीं. आतां या जीवाचें काय प्रयोजन आहे? जें जीवित नेहमीं दुःखमय, ज्यांत सारी निराशाच, प्राप्य पदार्थांच्या विनाशापासून ज्यांत सारा संतापच, तें असलें जीवित काय कामाचें! उषावती! माझ्या प्रेमाचा बदला तूं अशा रीतीनें द्यावा ना? तूं कांहींच विचार करूं नये ना? हे दुश्चारिते! तूं कांचन सोडून कथिल सेवन करीत आहेस याचा तुला तिळप्रायही कसा विचार नाहीं? बरें तसें असलें ह्मणून काय झालें? मला तरी तूं कां फसविलेंस? तूं माझ्यावर प्रीति करीत नाहींस हें प्रथमच कां नाहीं सांगितलेंस? मी तरी आज खुशाल राहिलों असतों! पण आतां असा विचार करून काय फळ? ह्मणलेंच आहे कीं—

पिता गेला! माता गेली! बंधु मित्रही पार!
नारीसाठीं सगळे गेले! अंतीं गेली नार! ॥ १ ॥

हाय हाय! उषावती! तुझ्या फंदांत पडलों नसतों तर किती बरें चांगलें झालें असतें! तूंही दुःखी झाली नसतीस व मीही दुःखी झालों नसतों! तुझा प्रियतम तुला केव्हांच मिळाला असता! पण तो कोण? तूं कोण? मी कोण? चितोडचा प्रतापी समरसिंग याचा युवराज! तूं प्रतापी पृथुराजाची कन्या! आणि

तो कपटी! प्रपंची! विषयांध! आतां जगांत सत्य कोठें राहिलें? चितोड, तेथून दिल्ली, तेथें उषावती! पण आतां सर्व व्यर्थ! आतां मी निश्चितपणें युद्धांत प्राणपरित्याग करीन! तेथेंच मला सुख मिळेल. उषावती, तूं एवढी कपटी, छद्मवेशी, अमृतरूपी विष आहेस अं?"

कल्याणसिंग या प्रकारें बोलत असतां भानावर मुळींच नव्हता. उषावतीचें काल्पनिक कपट, युद्धांत प्राणार्पण करण्याविषयीं आपला निश्चय, व त्यामागून आपल्यासाठीं साऱ्या चितोडांत होणारा विलाप, ह्याच गोष्टी त्याच्यापुढें होत्या. तो कांहीं वेळ विचार करीत स्तब्ध राहिला, व मग एकदम दुःखाचें भरतें येऊन तो ह्मणाला, "पण बाबांची अवस्था काय होईल! मी तर त्यांच्या वृद्धावस्थेचें जीवन, जीवनाचें सुख, सुखाचा सूर्य! तोच सूर्य मावळला ह्मणजे त्यांस साराच अंधकार! माझ्यामागें त्यांस कोण आहे? करणसिंग असता तर मला इतकी काळजी वाटती ना. तो असता तर बाबा माझ्यासाठीं इतके दुःखी झाले नसते. त्याच्यावर त्यांची प्रीति, आशा व विश्वास होता. पण तो आहे कोठें! हाय हाय!" अशा प्रकारच्या हृद्विदारक विचारांत तो लीन झाला, शून्यवत् झाला, परितापानें जळूं लागला, दुःखानें पीडित, स्नेहानें मूर्छित, चिंतेनें व्याकुळ होऊं लागला! तो चित्राप्रमाणें तटस्थ

झाला, त्याचे डोळे मिटले, व तो अकस्मात् स्वप्नावस्थेंत पडला!

क्षितिजावर सूर्यनारायण बराच उंच आला तरी करणसिंगाच्या विचारांत निद्रित झालेला कल्याणसिंग जागा झाला नव्हता. दिलीपसिंग मात्र सकाळींच त्याच्या येथें येऊन तो उठण्याची वाट पाहत होता. थोड्या वेळानें तो जागृत होतांच प्रथम दिलीपसिंग त्याच्या दृष्टीस पडला. दिलीपास पाहतांच कल्याणसिंग हांसत बोलत असे, पण आज त्याची उदासीन मुद्रा पाहून दिलीपास आश्चर्य झालें.

कांहीं वेळानें कल्याणसिंगानें पलंगावरूनच विचारलें "कां, तुह्मी आज येथेंच कसे आलां? मीच तुमच्या येथें येणार होतों. पण ठीक झालें, आतां तें तुमचें रक्षाकवच दाखवा पाहूं?" दिलीपानें तें कवच त्याच्या हातीं दिलें, व त्यांत त्यास 'करणसिंग' असें नांव दिसतांच तो आश्चर्यानें थक्कच झाला. त्यानें आपला भाव प्रकट न करितां त्यास विचारलें, "संन्याशानें तुह्मांस आणखी कांहीं सांगितलें होतें काय?" दिलीप ह्मणाला, "त्यानें मला एवढेंच सांगितलें होतें कीं, एके दिवशीं मोठें वादळ सुटलें होतें, व त्याच दिवशीं आपण चितोडच्या नदीवर फिरत होतों. इतक्यांत त्या नदीच्या तीरावर तूं मला मूर्छित झालेला

सांपडलास. तेव्हां तुला माझ्याबरोबर ठेवून मी तुझें लालनपालन केलें. तुझ्या गळ्यांत जें कवच आहे त्यांत तुझें नांव आहे. दिलीस आल्यावर मी हें कवच तपासलें. पण त्यावरून मी करणसिंग एवढाच पत्ता लागला. एवढ्यावरून माझ्या मात्यापित्यांचा कसा पत्ता लागेल?"

ही हकीकत ऐकून कल्याणसिंगाचा आनंद पोटांत मावेना. गेल्या रात्रींच ज्याच्या हृदयांत निराशाविष भिनलें होतें, त्याच्याच हृदयांत आज एकदम आशामृताची वृष्टि झाली! तो आनंदानें ह्मणाला, "तुह्मी कोण हें मी समजलों! तूं माझा प्रिय बंधु, कमलादेवीचा पुत्र, बाबांचा नयनानंद, चितोडचा युवराज करणसिंग बरें!" एवढें बोलून त्यानें करणसिंगास—यापुढें दिलीपसिंगास आह्मी करणसिंगच ह्मणूं—दृढालिंगन दिलें!!

कांहीं वेळ दोघेही बंधु स्तब्ध राहिले. नंतर कल्याणसिंग ह्मणाला, "चतुर्भुजा देवीनें आज माझी मनःकामना पूर्ण केली! मी मेलों तर चितोडचें काय होईल, बाबांचें काय होईल, याच चिन्तेंत मी होतों, पण आतां निश्चिंतपणें मरेन." त्याचे शेवटचे शब्द ऐकून करणसिंगास आश्चर्य वाटलें. त्यास झालेला हर्ष तात्काळ दुःखरूप झाला. स्वच्छ आकाशांत आकस्मात

मेघघटा पसरली. शांत चित्तांत एकदम अग्निज्वाला निघूं लागल्या. त्याची अशी स्थिति पाहून कल्याणसिंग ह्मणाला, "तुला एवढें आश्चर्य कां वाटलें? मी या युद्धांत खरोखरच मरणार आहें. याकरितां तूं चितोडास जा. आपण दोघेही कदाचित् मरण पावलों तर बाबांचें कसें होईल?" हें ऐकून करणसिंगास इतकेंच वाटलें कीं, युद्धांत मरण प्राप्त होईल या भीतीनेंच तो असें बोलत असावा. तो कल्याणसिंगास ह्मणाला, "तुला भीति वाटत असेल तर तूं चितोडास जा, मी रणक्षेत्रांत जाईन. पण समरसिंगाच्या पुत्रास, क्षत्रियास, वीरपुरुषास रणांत जाण्याचें भय कसलें? मी तर हा एक अद्भुतच प्रकार समजतों!" हें ऐकून तो क्षणभर स्वस्थ राहिला. खरी गोष्ट यास सांगावी कीं न सांगावी या विचारांत तो पडला. शेवटीं तो ह्मणाला, "मला मृत्यूची भीति नाहीं, तर मी मृत्यूची इच्छाच करीत आहें." करणसिंगानें आश्चर्यान्वित होऊन विचारलें, "काय? युवराज कल्याणसिंग आज मृत्यूची इच्छा करतो? ह्मणजे याचा अर्थ तरी काय? आज तुला तुझा कंटाळा कां आला? भाऊ, अशी गोष्ट बोलून मला दुःखी करूं नको."

गरीब, निस्तेज, बापडा, खंडितप्रेम, हताश, भग्नहृदय कल्याणसिंग! त्याच्या हृदयसागरांत पुनः दुःख-

लहरींनीं कहर उसळून दिला! तो निस्तेज झाला. तो कांपूं लागला. त्याचें चित्त स्थिर राहूं शकेना. तो खालींच पाहूं लागला. त्याचे नेत्र सजल झाले. थोड्या वेळानें मन स्थिर करून तो ह्मणाला, "प्रिय बंधु करणसिंगा! जर तुझी माझ्यावर प्रीति असेल तर माझ्या सुखाची गोष्ट माझ्याजवळ बोलूं नको. मरणांतच मला आनंद, दुःखाचा नाश व सुखाची आशा आहे. आज एखादा भिकारीही माझ्यापेक्षां सुखी आहे." तो पुनः ह्मणाला, "भाऊ! तुझें कोणावर प्रेम बसलें होतें काय? आणि तुला निराश व्हावें लागलें आहे काय? तसें असेल तर माझें दुःख तुला समजेल." यावेळीं त्याच्या नेत्रांतून खळखळ पाणी वाहूं लागलें. तें पाहून करणसिंगाचें कोमल हृदय छिन्नभिन्न झालें. तो ह्मणाला, "उषावतीबरोबर तुझें लग्न होण्याचें ठरलें आहे ना? उषावती आतां तुझ्यावर प्रेम करीत नाहीं कीं काय?" कल्याणसिंग क्रोधानें रुद्ररूप होऊन, ह्मणाला "होय होय! तीच पापिणी! तीच कुलटा! तीच विश्वासघातिनी! तीच दुश्चरिता! तीच माझें अकल्याण करणारी झाली आहे!" या बोलण्यावरून राजकन्येविषयीं कल्याणसिंग पूर्णपणें शंकाशील आहे अशी करणसिंगाची खात्री झाली तरी त्याची मुद्रा पाहून त्यास पुढें कांहीं विचारण्याचा त्यास धीर झाला नाहीं. त्यावेळेस

ती गोष्ट त्यानें तेथेंच संपवून, मोठ्या दीनपणानें, पुष्कळ आर्जवानें, विशेष प्रेमानें, डोळ्यांत आंसवें आणून, युद्धांत प्राणत्याग करूं नये असें त्यास पुष्कळ सांगितलें. पण कल्याणसिंगाचा निश्चय तिळमात्र ढळेना. उलट कल्याणसिंगानें त्यास दिल्ली सोडून चितोडास जाण्याविषयीं आग्रह केला तोच त्यास मान्य करावा लागला. तेव्हां करणसिंग ह्मणाला, "असें असेल तर मी चितोडास जातों, व आईस भेटतों. पण मला एक गोष्ट करण्यास आज्ञा मिळाली पाहिजे. चंद कवि मुसलमानांच्या छावणींत कैद झाले आहेत, त्यांची सुटका करण्यासाठीं मला जावयाचें आहे." कल्याणसिंग दीनस्वरानें ह्मणाला, "खुशाल जा. मात्र तूं युद्धास जातां कामा नये. चंद्रपतीस सोडविण्यास गेलास तर तुला भिण्याचें कारण नाहीं. भगवती चतुर्भुजा तुला साहाय्य करील. हा वृत्तांत ऐकून बाबांस आनंद होईल, व त्यांस सुखी पाहून मी सुखानें प्राणत्याग करीन. पण आज ही तुझी माझी शेवटचीच भेट काय?" करणसिंग ह्मणाला, "नाहीं नाहीं. युद्धास अजून बराच वेळ आहे. तोंपर्यंत मी तुझ्याबरोबर राहीन, आणि—"त्याच्यानें पुढें बोलवेना!

पितृवत्सल पुत्र, बन्धुवत्सल बन्धु, चितोडाचीं रत्नें, सिसोडियाची शोभा, असे ते दोघे बन्धु, दुःखा-

मुळें, दयेमुळें, प्रेमामुळें, वात्सल्यामुळें सद्गदित होऊन एकाच ठिकाणीं एकमेकांस मिठी मारून, जलान्ध नेत्रांनीं एकमेकांस पाहत राहिले!!

---

## प्रकरण २० वें.

### आनंद.

वृद्ध झाला असतांही शूर, असा समरसिंग चिंतातुर बसला आहे, इतक्यांत कल्याणसिंगानें येऊन दिलीपसिंग हा दुसरा कोणी नसून आपला बंधु करणसिंगच आहे असें त्यास सांगितलें. ही सुवार्ता ऐकतांच त्याच्या गंभीर शिवरूपतुल्य मुखमंडलावर फार दिवसांनीं आनंदश्री दिसूं लागली, आणि त्यानें करणास घेऊन ये अशी सेवकास आज्ञा केली. हें अकल्पित आनंदजनक वर्तमान ऐकतांच त्यास आपण मोठे भाग्यशाली आहों असें वाटलें. तो मोठ्या उत्सुकतेनें करणाची वाट पाहत राहिला. तो येतांच त्यानें त्यास जवळ घेतलें, आणि तो एकसारखा त्याच्याकडे पाहत राहिला. आनंदातिशयानें त्याचें देहभान क्षणमात्र नाहींसें झालें, तो विव्हल झाला, हर्षसागरांत

मग्न झाला, चित्रवत् झाला! त्याच्या मुखावाटे एकही शब्द निघेना!

नंतर कल्याणसिंगानें त्यास हळू हळू करणाचा जीवनवृत्तांत सांगितला. करण संन्याशास कसा व कोठें मिळाला, त्यानें त्याचें कोणत्या प्रकारें लालन-पालन केलें, मरणसमयीं त्यास काय सांगितलें, आणि तो बुडाला त्यावेळीं त्याबरोबर असलेलें, वस्त्र व सुवर्ण-कवच यांवरून त्याची ओळख कशी पटली, वगैरे इत्थंभूत हकीगत ऐकल्यावर समरसिंगाचें आश्चर्य कमी झालें. अनेक वर्षेपर्यंत ज्याच्या नित्य स्मरणानें तो शोकाकुल होत असे, तोच आज भेटतांच त्यास अत्यानंद झाला! त्या गंभीर राजर्षीचा आनंद गुप्त राहूं शकेना. त्यानें विव्हल चित्तानें वारंवार करणास आलिंगन दिलें, त्याचें चुंबन घेतलें आणि शीतल आनंदाश्रूंनीं त्यास न्हाऊं घातलें.

जेव्हां योगींद्र शांत झाला तेव्हां कल्याण ह्मणाला, "करणास चितोडास मातोश्रीकडे पाठवावें अशी माझी इच्छा आहे. कमलादेवी जी निरंतर शोकमग्न आहे, तिला ह्यास पाहून आनंद होईल. हा युद्धांत आल्यापासून कांहीं उपयोग होणार नाहीं. कारण, युद्धोचित अस्त्रविद्येचें यास ज्ञान नाहीं. आणि बाबा! कदाचित् ह्या घोर युद्धांत आह्मी दोघेही जर मरण

पावलों तर आपल्या शोकास सीमा राहणार नाहीं. तेव्हां मला असें वाटतें कीं यास चितोडास पाठवून द्यावें." समरसिंगानें विचार केला कीं, "करण फार वर्षांनीं मिळाला आहे, तो जर युद्धांत मरण पावला तर मिळून न मिळून सारखाच. तेव्हां यास चितोडास पाठवून द्यावें हेंच बरें." असा विचार करून त्यानें कल्याणाच्या बोलण्यास अनुमोदन दिलें व दोन दिवसांनीं करणास चितोडास पाठविण्याचा ठराव केला. चितोडास जाण्यापूर्वी चंद्रपतीची सुटका करण्याविषयीं करणसिंगानें बापाची परवानगी मागितली, व कल्याणाच्या सांगण्यावरून समरसिंगानें त्यास रुकार दिला.

हें वर्तमान समजतांच दिल्लींत जिकडे तिकडे आनंद होऊन गेला. समरसिंगास करणसिंग बावीस वर्षांनीं मिळाल्यामुळें पृथुराजानें मोठा उत्सव केला. शहरांत सर्व ठिकाणीं धामधूम माजून राहिली. पण ज्याच्यामुळें इतका आनंदोत्सव चालला होता त्याचें मन दुसऱ्याच ठिकाणीं गुंतलें होतें! करणसिंगाचें मन यावेळीं, शैलबालेचें पर्णकुटींत आगमन, तिची शैशवक्रीडा, मधुर वाणी, मनोहर रूप, व आपल्यावरील तिचें प्रेम यांची आठवण होऊन, तिकडेच रममाण होऊन गेलें होतें. पण थोड्याच वेळांत तो ह्या सुखनिद्रेंतून जागृत झाला. तो मनांत ह्मणाला, "शैलबाला कोठें आहे? तिचें लग्न झालें असेल काय? बरें लग्न

झालें नसलें तरी पर्वतावरील झोंपडींत राहणाऱ्या दिली-पाबरोबर ती लग्न करील काय? पण मी चितोडचा राजकुमार आहें असें कळल्यावरही ती मला वरणार नाहीं? जशी मला तिची आठवण होते तशी तिला माझी आठवण होत असेल काय? तिचा विवाह जर पूर्वीच झाला असला, तर मग मला सुख तें कसलें?" याप्रमाणें अनेक विचार त्याच्या मनांत येऊं लागले. त्याचें मन अत्यंत उदास झालें. तो विव्हल झाला. पण प्रथमच अजमिरास जाऊन तिचा शोध करावा हा विचार त्याच्या मनांत आला नाहीं! प्रथम चंद्रपतीची सुटका करण्याचाच विचार त्यानें कायम केला. अगोदर चंद्रपतीची सुटका, मग अजमीर आणि नंतर चितोड! याशिवाय सर्व कल्पना व्यर्थ!

---

## प्रकरण २१ वें.

### कपटपरिस्फोट.

दिल्लींतील मनोहर, रम्य, विशाल, चंद्रप्रभेप्रमाणें शोभणाऱ्या महालाच्या पूर्वेकडील बाजूच्या एका खिडकीजवळ एक पुरुष उभा आहे, त्याचें मुख म्लान दिसत आहे, त्याच्या मनांत अनेक दुःखद विचार येत आहेत, तो अत्यंत उत्साहहीन दि-

सत आहे, चिंतेनें त्याचें हृदय चूर्ण झालें आहे! तो विचारांत इतका गढून गेला आहे कीं, आपल्या आसपास काय चाललें आहे याचेंही त्यास भान नाहीं. हा पुरुष दिल्लीचा अधिपति, भरतखंडाचें भूषण, रजपुतांचा शिरोमणि, यवनांचा काल, आजानुबाहु चक्रवर्ती पृथुराज होय. युद्ध कसें करावें, मुक्काम कोठें करावा वगैरे विचारांत तो गुंग झाला आहे. शत्रूचा पराभव कसा करावा, व दया केली असतांही अशा रीतीनें त्याचा मोबदला देणाऱ्या शहाबुद्दीनास कसें शासन करावें हाच विचार विशेषतः त्याच्या मनांत प्रमुख होता.

थोड्याच वेळानें तेथें मंत्री आला, पण महाराजांस याप्रमाणें विचारग्रस्त पाहून तो कांहीं बोलला नाहीं. पण पृथुराजाच्या तो दृष्टीस पडतांच तो ह्मणाला, "मंत्रि, ठाणेश्वरास जाण्याची आपण आतां लवकर तयारी केली पाहिजे. येत्या आठवड्यांत सगळी सेना तयार करा. राणीदेखील राजकन्येस बरोबर घेऊन तेथें येणार ह्मणत आहे." मंत्री नमन करून ह्मणाला, "जशी महाराजांची आज्ञा! सर्व तयारी आहे." तें ऐकून पृथुराज प्रसन्नवदन होऊन ह्मणाला, "उषावती फार आजारी आहे ह्मणून रणक्षेत्रांत तिला बरोबर घेऊन जाण्याची माझी इच्छा नव्हती. पण राणी

अत्यंत दीन स्वरानें ह्मणाली कीं, 'एक तर कन्या अत्यंत दुःखी आहे, तशांत आपण गेलां ह्मणजे कांहीं तरी अमंगल होईल या भीतीनें ती विशेष दुःखी होईल; पण आपण सर्व एके ठिकाणीं असलों ह्मणजे तिला जरा बरें वाटेल.' ह्मणून मी तिचें ह्मणणें कबूल केलें आहे. उषावतीला पालखींतून नेली ह्मणजे झालें. पण चंद्रपतीचें कसें? त्याला सोडविण्याची काय तजवीज केली आहे? प्रथमपासून मला त्याच्याबद्दल भीति वाटत होती. पण तुह्मी सर्वांनीं धीर दिल्यामुळें मी स्वस्थ राहिलों. पण अजून ज्याअर्थीं त्याचा पत्ता लागत नाहीं त्याअर्थीं मला वाटतें, कीं यवनांनीं त्याला कैद केलें असावें. कोणत्याही उपायानें अगोदर त्याची सुटका केली पाहिजे. ह्या वेळीं मला चहूंकडे अमंगलसूचक चिन्हें दिसत आहेत. या युद्धांत मला उत्साह वाटत नाहीं. उषावतीच्या दुखण्यामुळें मला मुळींच चैन पडत नाहीं. पण नाहीं, मी क्षत्रियवीर आहें. माझा उत्साहभंग कधींही होणार नाहीं. चला, उद्यां सकाळीं सैन्याची कवाईत करण्याचें ठरवा. मी व समरसिंग दोघेही पाहण्यास येऊं." याप्रमाणें बोलून तो उषावतीची खबर घेण्यासाठीं चालता झाला. मंत्रीही आपलें काम पाहण्यास निघून गेला.

दोन दिवस राहून पिता व बंधु यांची आज्ञा घे-

ऊन करणसिंग चंद्रपंतींची सुटका करण्यास निघाला. तो गेल्यावर कल्याणाच्या मनांत पूर्वींचे विचार पुनः घोळूं लागले. तो ह्मणाला, "आतां मी मेलों तरी कांहीं हरकत नाहीं. पित्याला चितोडबद्दलची जी चिंता होती ती आतां दूर झाली आहे, पण गुलाबला मी जें वचन दिलें आहे त्याचें काय करूं? मी तिला सांगितलें होतें कीं, राजकन्या विजयाला वश झाली आहे हें जर तूं सिद्ध करशील तर तुझ्यावर कांहीं उपकार करीन. तें वचन पाळलें पाहिजे. पण तिच्यावर कोणता उपकार करावा?" त्यानें पुष्कळ विचार केला, पण कांहींच न सुचल्यामुळें तो चिंताकुल झाला. इतक्यांत गुलाब रडत रडत त्याच्याजवळ आली.

राजकन्येची स्थिति दिवसेंदिवस विशेष बिघडत आहे असें पाहून, कोमलहृदया, निष्प्रपंची, स्वार्थामुळें चुकलेली, मिथ्या वचनानें फसलेली, विजयाचें कपट न जाणणारी अशी ती गुलाब अत्यंत दुःखी झाली. राजकन्येच्या दुखण्याचें व कल्याणसिंगाच्या शोकाचें कारण आपणच आहें असें ती मानूं लागली. तिनें राजकन्येजवळ जाऊन सर्व कपटजाल निवेदन करण्याचा यत्न केला, पण ती बेशुद्ध असल्यामुळें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ह्मणून तें कल्याणसिंगास सांगण्यासाठीं ती त्याच्याकडे आली होती.

कल्याणसिंगाच्या एकांतभवनांत ती कापत कांपत मोठ्या भीतीनें आली, आणि त्याच्या पायां पडून ह्मणाली, "युवराज, क्षमा करा. मी आपला मोठा अपराध केला आहे. माफ करा, मला जीवदान द्या." गुलाबेची ही दीन वाणी ऐकून कल्याण आश्चर्यचकित होऊन ह्मणाला, "तूं काय अपराध केला आहेस? गुलाब! ऊठ, आणि तुला जें काय सांगावयाचें असल तें मोकळेपणानें सांग." गुलाब घाबऱ्या घाबऱ्या ह्मणाली, "मी काय अपराध केला आहे ह्मणून विचारतां? युवराज! मी पापिणी, विश्वासघातिनी, तुमच्या सुखाचा नाश करणारी, लोकांवर मिथ्या दोषारोप आणणारी आहें. मी तुमचें सुख हरण केलें आहे!" राजपुत्र ह्मणाला, "गुलाब, माझें सुख हरण केलें असें ह्मणून तूं क्षमा मागतेस! छे, भलतेंच कांहीं तरी. तूं माझ्यावर उपकारच केले आहेस. मी विषास अमृत समजून त्याचें पान करीत असतां मला तूं त्यांतून बचावलें आहेस. मी तुला कसली क्षमा करणार? उलट मीच तुझी क्षमा मागितली पाहिजे. कारण, प्रथम मी तुझें बोलणें खोटें मानून तुझा धिःकार केला होता." गुलाब रडत रडत पुनः त्याच्या पायांवर मस्तक ठेऊन ह्मणाली, "युवराज, मी आपणास इतकीच विनंति करतें, कीं यावेळीं माझें बो-

ल्णें खोटें मानून माझा धिःकार करूं नका. ह्या सर्व प्रपंचांत मीच दोषी आहें." नंतर तिनें ज्या कारणामुळें हें कपट केलें तें आद्योपान्त राजकुमारास सांगितलें. तें ऐकतांच कल्याणाच्या अंतःकरणावर वज्राघात केल्यासारखें झालें. पण गुलाबेच्या बोलण्यावर त्याचा विश्वास बसला नाहीं. ज्या विश्वासाचें मूळ हृदयांत आरपार गेलेलें असतें, तें सहसा निघून जात नाहीं. ज्या विश्वासानें त्याच्या सुखाचा नाश केला, व त्यास प्राणत्याग करण्यासही तत्पर केलें, तो विश्वास एका क्षणांत कसा निघून जाईल? तो ह्मणाला, "गुलाब, तूं काय मला लहान बालक समजतेस? तूं हें असें कां बोलत आहेस तें मला पुरें ठाऊक आहे." गुलाब दचकून ह्मणाली, "युवराज, मी खरेंच सांगत आहें. पाहिजे तर विश्वास ठेवा अगर ठेवूं नका. मर्जी आपली. तुमचा तरी यांत काय अपराध? मीच पडलें दुष्ट पापिणी! बरें, माझ्यावर विश्वास नाहीं तर नाहीं. पण या पत्रांवर तरी बसेल कीं नाहीं?" असें ह्मणून तिनें त्याच्याकडे कांहीं पत्रें दिलीं. हीं सर्व पत्रें विजयसिंगानें गुलाबेला लिहिलीं होतीं. त्यांतील एकांत खालीं लिहिल्याप्रमाणें मजकूर होता.

"प्राणाधिक प्रिय रमणी गुलाब !

"आज राजपुत्र राजकन्येस भेटण्यास जाणार आहे अशी खबर मला लागली आहे. हें जर खरें असेल तर गुप्त द्वार उघडें ठेव, ह्मणजे मी त्यांतून आंत जाईन. मी तसा आलों कीं राजकन्या घाबरेल व राजपुत्राच्या मनांत संदेह उत्पन्न होईल. इतकें झालें कीं बस ! मला पहातांच युवराजाच्या मनांत क्रोधाग्नि उत्पन्न होऊन त्याचा व उषावतीचा चिरकाळचा वियोग होईल. मला निराश करून राजकन्या युवराजावर प्रेम करीत आहे त्याचें फळ तिला मिळालें पाहिजे. ह्या जन्मांत तिच्या सुखाचा नाश झालेला पाहून मला आनंद होईल, आणि तसें झालें ह्मणजे, माझी प्रतिज्ञा पूर्ण होईल, व मी तुझ्याबरोबर विवाह करीन.

तुझा प्रियतम विजयसिंग."

कल्याणानें जितकीं पत्रें वाचलीं त्या सर्वांत याच आशयाचा मजकूर होता. तीं वाचतां वाचतां तो रोमांचित होऊन गेला. त्याच्या नेत्रांपुढें अंधेर आला, मन भ्रमण करूं लागलें, हृदय चूर्ण झालें! तो निःसत्व होऊन गेला. विजयाचें कपट त्याला पूर्णपणें समजलें! त्याची विचारशक्ति क्षीण झाली, शरीर शून्य झालें, सर्वांग विकल झालें! इतक्यांत गुलाब "युवराज !" असें ह्मणाली, त्यासरसा तो सावध होऊन ह्मणाला, "अरे, हें काय झालें? खरोखरच उषा निर्दोष आहे काय? प्रिये उषे! मी तुला आतां कसें तोंड दाखवूं? मी तुला किती तरी दुःख दिलें, तुला

झिडकारलें, तुझा अपमान केला! गुलाब! उषावती निर्दोष आहे काय? कीं मी हें सर्व स्वप्न पाहत आहें?" गुलाब ह्मणाली, "युवराज! खरोखरच ती महासाध्वी आहे आणि मी पापिणी आहें."

कल्याण सद्गदित स्वरानें ह्मणाला, "गुलाब! यांत तुझा कसला अपराध! किती झालें तरी तूं स्त्री. त्याच्या कपटजालांत सांपडलीस यांत नवल तें कसलें? आतां मी उषावतीजवळ जाऊन तिच्या पायां पडेन, आणि तिची क्षमा मागेन. ती फार कोमलहृदयी असल्यामुळें मला क्षमा केल्याशिवाय राहणार नाहीं."

दीर्घ निःश्वास टाकून, छातीवर हात मारून गुलाब ह्मणाली, "युवराज, आपल्या बोलण्यावरून मला वाटतें कीं राजकन्या कोणत्या स्थितींत आहे हें आपणास ठाऊक नाहीं. आपण राजकन्येचा त्याग करून गेल्यापासून ती निचेष्ट पडली आहे. तिचें हृदय भग्न झालें आहे. तें पुनः कशानेंही सांधणार नाहीं. ती जगेल असें मला मुळींच वाटत नाहीं." कल्याण राजकन्येजवळून निघून गेल्यावर काय काय झालें तें सर्व गुलाबीनें त्यास सांगितलें. तें ऐकून त्याचें हृदय विदीर्ण झालें. राजकन्येच्या दुःखाची गोष्ट सांगत असतां गुलाबेचें वदन अगदीं निस्तेज होऊन गेलें, तिच्या डोळ्यांतून अग्निज्वाला निघूं लागल्या, अंग थरथरां

कांपूं लागलें. शेवटीं ती ह्मणाली, "राजकन्या कधींही जगणार नाहीं; पण हाय! तिच्या हत्येचें पातक कोणाच्या शिरावर आहे?" आपल्या छातीवर जोरानें हात मारून ती ह्मणाली, "ह्या पापिणीच्या! ह्या राक्षसीच्या!" असें बोलून रडत रडत ती निघून गेली, व राजकुमार तेथल्या तेथेंच विचारांत गर्क होऊन राहिला.

---

## प्रकरण २२ वें.

### ठाणेश्वरीं प्रयाण.

विजयफाटकाच्या* वायव्य दिशेस एक विशाल मैदान आहे. पूर्वेस यमुना नदी वाहत आहे. महाराज पृथुराजाचें ग्रीष्मऋतूंतील विशाल भवन याच दिशेजवळ आहे, व दुसऱ्या दिशेजवळ प्रतापी दुर्गा आशापूर्णेश्वरीचें मोठें मंदिर आहे. मैदानाच्या एका नाक्यावर यमुनास्तंभ आकाशाबरोबर गोष्टी करीत आहे, महालाचीं रुप्याचीं दारें, सूर्यप्रकाश नसतांही, चकाकत आहेत. नगरांत बाल, तरुण, व वृद्ध मनुष्य सर्व उत्साहानें ही शोभा पाहत आहेत.

* आतां त्यास 'लाहोर-फाटक' असें ह्मणतात.

आज ठाणेश्वरीं चतुरंग सेना जावयाची आहे. महाराजास जय यावा ह्मणून लोक देवीची प्रार्थना करीत आहेत. नूतन वस्त्रें परिधान करून सेना मैदानांत आली आहे. नेमाप्रमाणें युद्धयात्रेस प्रयाण करण्यापूर्वी सर्व सैनिक आशा देवीच्या मंदिरांत जाऊन तिची पूजा करून, व तिला नमस्कार करून येत आहेत, कित्येक अगोदरच आले आहेत, कित्येक पूजा करीत आहेत, व कित्येक पूजेसाठीं जात आहेत.

थोड्याच वेळानें सेनेनें सर्व मैदान भरून गेलें. सर्व रजपूत वीरांच्या कंठांत भवानीच्या प्रसादरूप लाल फुलांच्या माला लटकत होत्या व कपाळावर रक्त चंदनाचें त्रिपुंड्र शोभत होतें. प्रत्येकाच्या कमरेवर तेजदार तरवारी लटकत होत्या. प्रत्येकांचा पोशाख एकसारखा होता. लोखंडाचा टोप, लोखंडाचें कवच, व आंत साधा पण मजबुत अंगरखा होता. हा सैनिकांचा भयंकर देखावा काळासही कांपविणारा होता. तरवारीवर सूर्यकिरण पडून व त्यामुळें प्रकाशपरिवर्तन होऊन सर्व मैदानभर चकचकाट पडला होता. मैदान या वेळीं भयानक झालें होतें. तो गंभीर व भयंकर देखावा, हजारों हत्ती, घोडे, व पायदळ ही सामुग्री पाहून, आज काय ही सेना पृथ्वीला रसातळास नेते, किंवा हिमगिरीचीं शिखरें तोडून खालीं पाडते, किंवा तीं पडत अ-

सतां त्यांस अवरोध करते, असा भास होत होता ! !

सैन्याचे चार भाग केले होते, व त्यांवर पृथुराज, समरसिंग, कल्याणसिंग, व विजयसिंग हे सेनापति झाले होते. स्वारांच्या पाठींवर ढाला, हातांत बरच्या, व कमरेस तरवारी लटकत होत्या. एका बाजूनें लढवय्ये होते. दुसऱ्या बाजूनें हत्तीची रांग उभी होती, व त्यांवर तोफा चढविलेल्या होत्या. मोठ्या तोफा उंटांच्या गाड्यांवर लादल्या होत्या. तिसऱ्या बाजूकडील सामानाच्या गाड्यांत बैल, घोडे, व पालख्या होत्या. त्यांत लष्करच्या निर्वाहाची सामुग्री भरलेली होती. त्याचें रक्षण करण्यासाठीं निराळ्याच तुकडीची योजना केली होती.

ही रचना पाहण्यासाठीं नगरांतील सर्व माणसें आलीं होतीं. कित्येक तर झाडांवर चढून हा प्रकार पाहत होते. इतक्यांत रणवाद्यांचा आवाज झाला व "जय महाराज पृथुराजकी जय!" "जय मेवाडपति समरसिंगकी जय!" "जय महाप्रतापी कालिकाकी जय!" असा मोठा जयध्वनि झाला. राजमहालाचें शिखर घुमघुमलें, व तो आवाज यमुनास्तंभावर गेला. यमुनास्तंभावरून तो नभोमंडलांत गेला, तेथून तो सर्व दिशांनीं पसरला, व त्याचा भयंकर प्रतिध्वनिही झाला. हा ध्वनि होत आहे इतक्यांत चार

सेनापति विजेप्रमाणें सेनेंत येऊन दाखल झाले. युद्धवाद्यांचा घोरघोष कर्ण बधिर करूं लागला. नागरिकांचीं हृदयें नाचूं लागलीं व उत्साहतरंगांत तें सारें मैदान पोहूं लागलें!

मध्यभागाच्या सेनेपुढें जो सेनापति होता त्याच्या मस्तकावर हिरेजडित मुकुट प्रकाशमान होत होता. त्याच्या कानांत मोत्यांचीं कुंडलें, व दोन्ही हातांत कडीं होतीं. सर्व अंगावर चिलखत होतें. पाठीवर ढाल व तीर होते. देवदानवांच्या युद्धांतील कुमार कार्तिकस्वामी वीरवेष धारण करून आला असावा असा त्याच्या वेषावरून भास होत होता. त्याच्या दृढ, चंचल, व नीलवर्ण नेत्रांतून अग्निकण बाहेर पडत आहेत असें वाटत होतें. हा महाप्रतापी वीर, भरतखंडाचें ऐश्वर्य, स्वतंत्रतेचा बांधव, आर्यावर्ताचा सुपुत्र महाराज पृथुराज होता! त्याची कन्या वेडी झाली आहे, राणी शोकमग्न आहे, पण त्याचा त्यास आतां लेशही विचार सुचत नाहीं. शोकभावाबद्दल वीरभाव त्याच्या सर्वांगावर व्यापून राहिला आहे!

पृथुराजाच्या उजव्या बाजूकडील सैन्यभागावर समरसिंग होता. त्याचें विशाल ललाट चिन्तातुर दिसत होतें, पण दृष्टि हृदयभेदिनी होती. त्याचा युद्धवेष सामान्य होता. शिरावर वज्रमय टोप व

अंगावर लोहकवच होतें. छातीस झांकणारी त्याची शुभ्र दाढी वाऱ्यानें उडत होती. त्याची मोठी जटा टोपांतून निघून दोन्ही खांद्यांवर पडली होती. योगिभाव व वीरभाव मिश्रित झाल्यामुळें त्याच्या मुखमंडलावर कांहीं अपूर्व शान्ति दिसत होती. ब्रह्मतेज व क्षात्रतेज एकत्र करून तो ब्रह्मांडाचा नाश करण्याच्या विचारांत आहे कीं काय असा भास होत होता! त्याच्या गंभीर, व अचल भावावरून तो साक्षात् महादेवच असावा असें वाटत होतें!

पृथुराजाच्या डाव्या बाजूस युवराज कल्याणसिंग, पृथुराजप्रमाणेंच पोशाख करून, आपल्या सैन्याकडे शून्य दृष्टीनें पहात होता. त्याच्या मुखावरील भाव वारंवार बदलत होता. त्यावर एकवेळ वीरता, व एकवेळ शोक दृग्गोचर होत होता.

चौथ्या भागावरील सेन्याध्यक्ष विजयासिंग. त्याच्या हृदयांत काय काय संकल्पविकल्प आहेत हें कोणास कळेल काय? हो, त्याची वळलेली भ्रुकुटी व क्रोध आला असतांही किंचित् हास्य करणारे ओंठ पाहून, हा कांहीं तरी महादुष्ट हेतु साध्य करण्याचा संकल्प करीत आहे असें कोणासही वाटलें असतें. तो क्षणोक्षणीं तिरळ्या दृष्टीनें व कटु भावानें कल्याणसिंगाकडे पाहत होता, पण कल्याणसिंग त्याच्याकडे दृष्टिसुद्धां करीत नव्हता.

चारही सेनापति आपापल्या भागावर आल्याबरोबर पृथुराजानें नेत्रसंकेत करतांच रणसिंगाचा नाद झाला. त्याबरोबर सर्व सैन्य तेथल्या तेथें उभें राहिलें. कोलाहल, जयध्वनि, रणवाद्य सर्व कांहीं बंद झालें. नंतर पृथुराज सर्व सेनेस बोलला—

"सेनापतींनों! क्षत्रियवीरांनों रणधुंरधरांनों! आर्यवीरांनों! जे दुष्ट यवन, दृशद्वती नदीच्या तीरावर गेल्या वर्षीं क्षत्रिय वीरांच्या खड्गांचा स्वाद व तीक्ष्ण तरवारींचा घाव घेऊन गेले होते, ज्यांचा सेनापति काफर-चांडाळ शाहबुद्दीन घोरी दोन वेळ कैद होऊन आपल्यापुढें आला असतांही, आर्यवीरांच्या रीतीप्रमाणें त्यास आह्मी स्वदेशीं जिवंत जाऊं दिलें, ते दुरात्मे यवन, आज आर्यभूमीस कलंक लावण्याची हौस धरून आले आहेत. वीरांनों! आर्यमातेच्या भक्तांनों! देशरक्षणकारांनों! त्यांस खुशाल पुढें येऊं द्या. क्षत्रियांच्या भाल्यापासून, बरच्यांपासून, व तरवारींपासून त्याच्या काळजांत जे पूर्वी घाव झाले होते ते आतां ताजे करूं या. सेनापतींनों! जर आर्यनांवाचा गौरव व अभिमान राखण्याची तुमची इच्छा असेल, क्षत्रिय नांवाचें तेज प्रकाशित करण्याची उमेद असेल, व यवनांच्या पायांखालीं आपणास तुडवून घेण्याची इच्छा नसेल, तर तुमच्या प्राणांहूनही प्रिय अशा

आपल्या स्त्रियांचें, पुत्रांचें, या दुष्ट म्लेच्छांपासून रक्षण करण्यास उत्सुक व्हा! आर्यधर्मावर व आर्यदेवांवर जर तुमची यत्किंचित् श्रद्धा असेल, देवी आशापूर्णेची आशा पूर्ण करण्याची तुह्मांस इच्छा असेल, तर थोडीसुद्धां दया न करतां, जरासुद्धां शांति न धरतां, अत्यंत क्रोधपूर्वक, शत्रूंचीं काळजें चिरावयास लागा! विलंब न लावतां ह्या पाखंडी, विधर्मी, दुराचारी मुसलमानांस अशी शिक्षा करा कीं, पुनः या आर्यभूमींत पाय ठेवण्याची गोष्ट त्यांच्या स्वप्नांतसुद्धां येऊं नये. काय, तुमच्यामध्यें असा कोणी आहे--" हें भाषण ऐकतांच सैन्यांत इतकी गडबड झाली कीं तिच्या योगानें पुढचें बोलणें ऐकूं येईनासें झालें. पृथुराजाचा जयजयकार होऊन सर्व कोलाहल शांत झाल्यावर तो ह्मणाला, "काय, तुमच्यामध्यें असा कोणी भितरा, नपुंसक, बायक्या, अक्षत्रिय, अनार्य आहे काय, कीं माझ्या शब्दांनेंच त्यास उत्तेजन मिळालें पाहिजे? पाखंडी म्लेंच्छ यवनांचा पराजय करावा हाच तुमचा उद्देश आहे, हाच तुमचा धर्म आहे. स्वदेशरक्षण हें तुमच्यासारख्या शूरांचें व्रत आहे. वीरचूडामणि समरसिंग तुमचा सहकारी आहे. नुसत्या त्याच्या स्मरणानेंच तुमचें रक्त तप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. सेनापतींनो! व्यूहपतींनो!

सेनाध्यक्षांनों! आपलें वीरतेज बरोबर घेऊन चला, आणि यवनांचीं मस्तकें चिरा, त्यांच्या सैन्याचा फडशा पाडा! चला, उत्साहानें चला! जिवंत राहिलां तर तुमच्या स्त्रिया तुह्मांस भेटतील. युद्धांतच मरण पावलां तर, आपला वीरभर्ता केव्हां येतो ह्मणून ह्या पहा इंद्राच्या अप्सरा तुमची वाट पहात आहेत! पुढें व्हा, व उत्साह, धर्म, व आर्यत्व दाखवून पापी म्लेच्छांचें निकंदन करण्यास लागा! जय आशापूर्णाकी जय!"

पृथुराजाचें भाषण पूर्ण होतें न होतें तों पुनः आकाश गर्जनेनें व्यापून गेलें! पूर्वीप्रमाणेंच शस्त्रांचा खणखणाट व घोड्यांचा हणहणाट होऊं लागला. रणवाद्यांच्या घोरशब्दांनीं मैदान गाजूं लागलें. "जय महादेवी कालिका! जय आशापूर्णा! हरहर महादेव! जय पृथुराजकी जय! जय समरसिंगकी जय!" या आवाजाच्या गडगडाटामध्यें चारी सेनापतींनीं आपापले घोडे आपापल्या भागाकडे नेले. प्रजेनें जयजयकारानें आकाश भरून टाकलें. सेनापतींमागून घोडेस्वार, त्यांच्यामागून पायदळ, दोन्ही बाजूंनीं हत्ती व उंट यांवरून तोफा, व सर्वांमागून सामानाच्या गाड्या चालूं लागल्या. आकाश धुळीनें झांकून गेलें! प्रजेनें पुनः जयजयकार केला, सेनेनें त्याचा प्रतिघोष केला, व त्या योगानें नभोमंडळ दुमदुमून गेलें!!

———

# प्रकरण २३ वें.

## शोकाकुल प्रभावती.

चंद्रपतीचा सेवक अनाथ यानें चंद्रपति मुसलमानांच्या छावणींत गेला आहे अशी त्याच्या घरीं खबर दिल्यास बरेच दिवस झाले; तरी त्याच्याकडून एकही पत्र न आल्यामुळें प्रभावती अतिशयित चिन्तातुर झाली. त्याच्यावर संकट गुदरलें असावें या शंकेनें ती रात्रंदिवस व्याकुल होऊं लागली. तिनें शैलबालेस आपल्या मनाची स्थिति साधारणपणें निवेदन केली. तेव्हां ती इतकेंच ह्मणाली कीं, "चंद्रपतीविषयीं भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यांच्यासारख्या वीरपुरुषावर संकट येणें अशक्य आहे. कांहीं तरी तशाच महत्वाच्या कामामुळें त्यांस वेळ मिळाला नसावा." याप्रमाणें शैलबाला तिला धीर देण्याचा प्रयत्न करूं लागली, पण तिचें दुःख कांहीं केल्या कमी होईना.

एके दिवशीं रात्रीं प्रभावती व शैलबाला गच्चीवर निजलीं होतीं. रात्र फार झाली होती. चारी बाजूंनीं वारा येत होता. शैलबालेस स्वस्थ झोंप लागली होती, पण प्रभावती जागीच होती. तिचें मन चंद्रपतीकडे

लागलें होतें. कांहीं केल्या तिला नीज येईना. ती जरा खालीं पडे, पुनः उठे, पुनः पडे, पुनः उठे; पण डोळे ताठ ते ताठच! याप्रमाणें बराच वेळ गेल्यावर एकदांचे तिचे डोळे लागले. पण निद्रास्थितींत तिला एक भयानक स्वप्न पडलें. ती दचकून उठली. तिची नीज पार नाहींशीं झाली. तिनें आसपास पाहिलें तों शय्येवर शैलबाला नाहीं! ती बागांत जाऊन नदीच्या किनाऱ्यावर तिची तरंगलीला पाहत बसली होती! तिला पाहण्यास प्रभावती बागांत आली तों ती गात आहे असें तिनें पाहिलें. तिचा मधुरस्वर ऐकून तिचें उद्वेगपूर्ण चित्त क्षणमात्र शांन्त झालें. ती शैलबालेजवळ जातांच ती ह्मणाली, "आज तुझें मुख इतकें म्लान कां दिसतें बरें? काय रात्रंदिवस रडल्याशिवायं बरेंच वाटत नाहीं?" प्रभावती ह्मणाली, "मला नुकतेंच एक दुष्ट स्वप्न पडलें त्यामुळें मला कसें-सेंच झालें आहे. तिकडे कैदबिद तर भोगावी लागत नसेलना?" हें ऐकून शैलबाला हांसूं लागली. तें पाहून प्रभावती ह्मणाली, "बरें आहे, तुझ्याबरोबर आजपासून कसल्याच गोष्टी बोलत नाहीं!" तेव्हां शैलबाला ह्मणाली, "वा ग वा! राग कसा ह्मणतां अगदीं नाकावर! मर्जी असेल तर चला मुसलमानांच्या छावणींत जाऊं आणि तुझ्या प्राणनाथास घेऊन येऊं!" प्रभा-

वती ह्मणाली, "तुला थट्टाच वाटत आहे, पण माझा तर असाच संकल्प झाला आहे."

शैलबाला प्रभावतीवर मनापासून प्रीति करीत होती, व चंद्रपतीविषयींही तिला फार काळजी होती. पण आपण काळजींत आहें असें प्रभावतीस समजल्यास तिचें दुःख द्विगुणित होईल या भीतीनें ती वरवर समाधानानेंच बोलत असे. पण आतांची वेळ निराळी आहे असें जाणून ती गंभीरस्वरानें ह्मणाली, "सखे, मलासुद्धां, खरोखर विचारशील तर, असेंच वाटतें. पण प्रथम मुसलमानांच्या छावणींत न जातां दिल्लीस जावें हें बरें." प्रभावती ह्मणाली, "तिकडे कशाला? तेथें प्राणनाथ खचित नाहींत. तसें असतें तर मला खात्रीनें पत्र आलें असतें." शैलबाला ह्मणाली, "माझ्या मनांत तर असें येत आहे कीं, दिल्लीस गेल्याशिवाय चंद्रपतीस सोडविण्याची संधी आपणास मिळावयाची नाहीं." प्रभावती—"ती कशी?" शैलबाला ह्मणाली, "मुसलमानांच्या छावणींत जाऊन त्यांस सोडविणें हें आह्मां बायकांस असाध्यच. छावणींत कोणत्या प्रकारचा बंदोबस्त व रीतभात आहे हें आह्मांस मुळींच ठाऊक नाहीं. कदाचित् आह्मी त्यांच्या हातीं लागण्याचा संभव आहे.. पण दिल्लीस जाऊन पृथुराजाकडून गुप्तसेना घेऊन युद्धस्थानांत जावें, व यवनांच्या

छावणीवर अचानक स्वारी करून चंद्रपतीची सुटका करावी ह्मणजे झालें."

हा विचार प्रभावतीस पसंत पडला, व आपल्याबरोबर थोडकेंच सामान घेऊन अजमीर सोडण्याचा दोघींनींही निश्चय केला. यावेळीं अनाथ सेवकाची फार जरूर होती. पण तो अजारी होता ह्मणून दुसऱ्याच नोकरास बरोबर घेण्याचें ठरलें. शैलबालेच्या सूचनेवरून दोघींनींही पुरुषवेष धारण केला. त्यांनीं कमरेवर एक एक तरवार व बरची लटकावली. आतां ती शैलबाला नव्हे, व ती प्रभावती नव्हे; तर त्या शैलराज व प्रभाप्रसाद बनले आहेत!

संध्याकाळ होतांच त्यांनीं अजमीर सोडून दिल्लीचा रस्ता धरला. राजरस्ता सोडून त्यांनीं पर्वतावरील चोरवाट धरली. त्या वेळीं रजपूतांगना घोड्यावर बसण्यांत पटाईत होत्या. त्यांस लहानपणींच घोड्यावर बसण्यास व घोडा भरधांव सोडण्यास शिकवीत असत. प्रभावती व शैलबाला घोड्यावर बसण्यांत निपुण होत्या. चालतां चालतां त्या पांचव्या दिवशीं दिल्लीच्या अलीकडे तीन कोसपर्यंत गेल्या. परंतु लांबच्या प्रवासामुळें व उन्हाच्या परितापामुळें त्या बऱ्याच थकल्यामुळें त्यांनीं जवळच्या पर्वतावर विश्रांति घेण्याचा बेत केला. जवळच्या गांवांतून खाण्याचा जिन्नस आणण्यासाठीं

त्यांनीं आपल्या नोकरास पाठवून दिलें. या वेळीं संध्याकाळ झाला होता. चंद्रमानें पृथ्वीला शोभित केलें होतें. जवळून वाहणाऱ्या झऱ्यांचें पाणी पर्वतावरील शिलाखंडांस वारंवार आपटून वर उडणारे जलकण चांदण्यामुळें मौक्तिकांसारखे शोभत होते. त्यांचा खळखळ होणारा निनाद जणुं काय कर्णांत अमृतवर्षाव करीत होता. ही लीला पाहण्यांत शैलबाला आणि प्रभावती लीन झाल्या.

इतक्यांत पश्चिम दिशेकडून वादळ येण्यास आरंभ झाला. चंद्रावर मेघांचें अवडंबर आलें. आकाश घनघोर झालें. पृथ्वी अन्धकारमय झाली. विद्युत् चमकूं लागली. अंधकार घटकेघटकेनें वाढूं लागला. गगनमंडलांत तारा दिसेनाशा झाल्या, व जलवृष्टीचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. त्या दोघी स्त्रिया होत्या, निराधार होत्या! त्यांची छाती धडधडूं लागली! वर्षाकाळाचें हें भयानक स्वरूप पाहून दोघीही एकमेकांस मिठी मारून राहिल्या. इतक्यांत वाराही कमाल करूं लागला. तेव्हां त्या कोठें तरी निवांत जागा पाहूं लागल्या. चोहींकडे दृष्टि केली तर दिशासुद्धां समजतांनां मारामार पडूं लागली! इतक्यांत वीज चमकली, व तिच्या क्षणजीवी प्रकाशानें, जवळच एक गुहा होती ती त्यांस दिसली. त्यांत जाऊन दोघीही बसल्या.

ज्या गुहेंत त्या बसल्या होत्या त्याच्या शेजारींच दुसरी एक गुहा होती. दोन्ही गुहांमध्यें जरी बरेंच अंतर होतें तरी मध्यें एक मोठें छिद्र असल्यामुळें, एका गुहेंतून दुसऱ्या गुहेंत काय चाललें आहे तें स्पष्ट दिसे. कांहीं वेळानें दुसऱ्या गुहेंत दोन मनुष्य दिवा घेऊन जात आहेत असें यांस दिसलें. तेसुद्धां बाहेर बेसुमार वृष्टि होत असल्यामुळेंच तेथें आले होते. ते गुहेंत आल्याबरोबर बाहेर मोठमोठ्यानें गर्जना करीत बाणांप्रमाणें जलधारा पडूं लागल्या. विद्युत्प्रकाश क्षणोक्षणीं पडूं लागला. प्रचंड वायु एका पर्वताकडून थप्पड खाऊन दुसऱ्या पर्वताकडे जाई, पण त्याच्याकडून मुष्टिप्रहार होतांच तिसऱ्यावर जाऊन पडे! पर्वतावरील मोठमोठे दगड धाड धाड करीत खालीं सरकूं लागले. प्रलयसमयीं जशा दशदिशा गाजूं लागतात, तद्वत् मोठा आवाज होऊन ती गुहा एकदम हालल्यासारखी झाली. तेव्हां प्रभावती फार बावरूं लागली. तिला शैलबाला ह्मणाली, "सखे! अशी बावरतेस कां?" प्रभावतीनें तिला कांहींच उत्तर दिलें नाहीं.

प्रभावती व शैलबाला ज्या गुहेंत होतीं त्यांत अंधार असल्यामुळें दुसऱ्या गुहेंतील मनुष्यांस त्यांस पाहतां आलें नाहीं. तरी शैलबालेचें बोलणें त्यांस

अस्पष्ट रीतीनें ऐकूं आलें. त्यांपैकीं एकजण दुसऱ्याजवळ कांहीं बोलत आहे असें पाहून शैलबाला चांगलें लक्ष्य देऊन ऐकूं लागली. त्यांपैकीं एकजण दुसऱ्यास ह्मणाला, "पर्वतावर कोणी तरी असावें असें मला वाटतें. कोणी तरी बोलत असावेंसें दिसतें. तूं दिवा ठेऊन बाहेर जा, आणि इकडे तिकडे पाहून ये." दुसरा मनुष्य बाहेर जाऊन आला व ह्मणाला, "बाहेर तर कोणी नाहीं. या अंधारांत, आणि या पावसांत मरण्यास कोण येणार आहे?" आपल्यावर येणारा महत्प्रसंग टळला असें पासून या दोघींसही अत्यानंद झाला, व पुढें त्या दोघांचें भाषण त्या स्वस्थपणें ऐकूं लागल्या. ते दोन मनुष्य कोण आहेत तें त्या पहावयास गेल्या तों एक मनुष्य मुससमान व दुसऱ्याची जरी त्यांच्याकडे पाठ होती, तरी तो हिंदु असावा असा त्यांनीं त्याच्या पोशाखावरून सहज तर्क केला. कांहीं वेळानें तो मुसलमान हिंदूस ह्मणाला, "मला आपल्याकडे महम्मद घोरीनें पाठविलें आहे." हिंदु ह्मणाला, "याचें कांहीं प्रमाण?" तेव्हां मुसलमानानें त्याच्या हातीं कांहींसें दिलें, तेव्हां तो ह्मणाला, "तुह्मी सेनापतींकडून आलां आहां खरे. त्यांस असें सांगा कीं, दिल्ली सर करण्यास आपणास जितकी मदत लागेल तेवढी मिळेल; आणि त्यासाठीं

अशी युक्ति केली पाहिजे कीं—" यानंतरचे शब्द तो बऱ्याच हलक्या स्वरानें बोलत असल्यामुळें ते ऐकूं आले नाहींत. बोलणाऱ्यास, भिंतीस जणूं काय कान असावेत अशी शंका आली होती; पण यावेळीं भिंतीस खरोखरच कान होते हें त्यास ठाऊक नव्हतें! पण ते कान कच्चे होते! ते पक्के असते तर त्याच्या झालेल्या गोष्टी पृथु-राजाच्या कानावर गेल्याच असत्या. असो. शेवटीं तो हिंदु मोठ्यानें ह्मणाला, "याप्रमाणें वागलें ह्मणजे घोरी साहेबांचा खात्रीनें जय होईल. कांहीं विशेष असेल तर मागाहून कळवीन. आठव्या दिवशीं तुह्मी इकडे या. घोरी साहेबांस विशेष असें सांगा कीं, तुह्मी आपल्या वचनास फिरतां कामा नये." याप्रमाणें गोष्टी पुऱ्या झाल्या व इतक्यांत वृष्टि बंद होऊन आकाशही नि-र्मळ झालें. तेव्हां तो हिंदु गुहेंतून एकटाच चालता झाला.

हा हिंदु कोण? हा मातृद्रोही, देशद्रोही विजय-सिंग! पृथुराजानें दूध पाजून वाढविलेला सर्प!!

---

# प्रकरण २४ वें.

## प्रेम! प्राण!

विजय गेल्यावर तो यवन गुहें-तून बाहेर पडला. ह्या वेळीं पाऊस थांबला होता. चंद्र-प्रकाशामुळें पर्वत शोभायमान दिसत होता, मंद मंद शी-तल वायु वाहत असल्यामुळें वृक्षांवरून जलबिंदु खालीं पडत होते; व चंद्रप्रका-शांत त्यांची अलौकिक शोभा दिसत होती. तो मुस-लमान हळु हळु पर्वतावरून खालीं उतरला, तों ज-वळच दोन घोडे त्याच्या दृष्टीस पडले. शैलबाला आणि प्रभावती यांनीं चरण्याकरितां आपले घोडे सोडले होते तेच हे घोडे होत. त्यांस पाहतांच तो फार घाबरून गेला. तो मनांत ह्मणाला, "येथें हे घोडे कोठून आले? आमचें बोलणें तर कोणी ऐकलें नसेलना? तसें असेल तर विजयसिंगाचे प्राण वांचणें कठिण. व तो गेल्यावर आमचा जय कसा होईल?" याप्रमाणें विचार करीत तो आसपास पाहूं लागला, पण त्यास कोणी दिसेना. तेव्हां तो कदाचित् तेथें दुसरी गुहा असेल अशा विचारानें जरा बारकाईनें पाहूं

लागला, तों शैलबाला व प्रभावती ज्या गुहेंत होत्या ती गुहा त्याच्या दृष्टीस पडली. तो तिच्याजवळ गेला, पण अंधारामुळें त्याला आंत कोणी दिसलें नाहीं. तेव्हां तो गुहेंत शिरला व हातानें चांचपून पाहूं लागला. त्यास पाहतांच शैलबाला व प्रभावती यांस, तो कांहीं दुष्ट हेतु मनांत धरून आंत आला असावा असें वाटून भीतीनें त्यांची गाळण झाली. इतक्यांत शैलबालेच्या अंगावर त्याचा हात पडला. त्याबरोबर तो घाबरून मागें सरला. त्यास वाटलें कीं आपलें व विजयसिंगाचें बोलणें त्या मनुष्यानें ऐकलें असावें. ह्मणून त्याला मारण्याचा तो विचार करूं लागला, इतक्यांत त्याच्या हातावर तरवारीचा एक वार झाला.

जेव्हां तो मीयाभाई चहूंकडे चांचपूं लागला, तेव्हांच शैलबाला सावध झाली, आणि कमरेंतून तरवार काढून तिनें त्याच्या हातावर हा वार केला; आणि मग त्याच्या पायावर वार करण्यासाठीं तिनें तरवार उचलली, पण अनभ्यासामुळें तिचा नेम चुकला, आणि पुनः त्याच्या हातावरच वार झाला. त्याबरोबर त्यानें दुसऱ्या हातानें कमरेंतून शस्त्र काढलें, आणि शैलबालेस खेंचून गुहेच्या बाहेर आणलें. तें पाहतांच "रक्षण करा! रक्षण करा!" असें मोठमोठ्यानें ओरडत

प्रभावती तिच्या मागोमाग धांवली. याच वेळीं समोरून "भीऊं नका, भीऊं नका" असा धैर्यजनक ध्वनि निघाला, आणि एका क्षणांत एक तरुण पुरुष हातांत नागवी तरवार घेऊन भरधांव घोडा टांकीत त्यांच्या जवळ येऊन उभा राहिला! त्याच क्षणीं प्रभावतीचा सेवकही तेथें आला.

त्यांस पाहून मुसलमान घाबरून गेला. त्या सर्वांपुढें आपलें कांहीं चालणार नाहीं असें त्यास वाटलें. तेव्हां तेथून आपली सुटका करण्यास पळण्याशिवाय दुसरा इलाज नाहीं, असा विचार करून त्यानें एकदम धांव ठोकली. तो तरुण पुरुषही त्याच्या मागें धांवूं लागला. पण त्या पर्वतावरील मार्गांची त्यास माहिती नसल्यामुळें त्यास पकडतां आलें नाहीं. ह्मणून तो मागें फिरला आणि प्रभावती व शैलबाला जेथें उभ्या होत्या तेथें आला.

ह्या दोन सुकुमार व स्वरूपसंपन्न बालकांस अशा वेळीं तेथें पाहून त्या तरुणास फार आश्चर्य वाटलें; आणि तो त्यांच्याकडे एकसारखा टक लावून पाहत राहिला. त्या तरुणाच्या मुखावर चंद्रप्रकाश पडला असल्यामुळें शैलबालेनें तो दिलीप आहे असें तात्काळ ओळखलें; व त्याबरोबर ती दचकून मागें सरली. तिचें शरीर रोमांचित झालें, मन चंचल झालें! पुनः तिनें

त्याच्याकडे पाहिलें, पण लज्जेमुळें लागलेंच वदन खालीं केलें. तसें ती न करती तर तिचें पूर्ण अनुराग-युक्त व लज्जेनें आरक्त झालेलें मुखमंडळ पाहून दि-लीपाच्या मनांत खरोखर संदेह उत्पन्न झाला असता. शैलबालेनें दोन तीन वेळ तोंड वर करण्याचा विचार केला, पण कांहीं केल्या तें वर होईनाच! ती तिची अवस्था पाहून हें आहे तरी काय? अशी प्रभावतीस शंका उत्पन्न झाली. तिनें शैलबालेच्या कानांत विचा-रलें, "शैल, हें काय? तुझी अशी अवस्था पाहून ह्या पुरुषास काय वाटेल बरें?" हें ऐकतांच शैलबाला ओशाळून गेली.

नंतर करणसिंगानें आपणावर हें संकट कसें आलें असें त्यांस विचारलें, पण वाक्चतुरा शैलबालेच्या मुखांतून एकही शब्द निघेना. आज तिला लज्जा उ-त्पन्न झाली. ज्याच्याबरोबर एकाच ठिकाणीं ती राहिली, हांसली, खेळली; व ज्याची तिला पूर्वीं किं-चित्‌ही लाज वाटत नसे, त्याच्याचबरोबर बोलण्यास आज तिला लाज वाटूं लागली. हे लज्जे! याचें कारण रसिकच जाणूं शकतील! शैलबाला कांहीं बोलत नाहीं असें पाहून प्रभावतीनें त्यास सर्व वृत्तांत निवेदन केला. तो ऐकून करणसिंग अत्यंत विस्मित झाला. तो ह्मणाला, "आर्यकुलांत असा कोण कुलांगार जन्म

पावला आहे, कीं तो असें निंद्य कम करण्यास प्रवृत्त झाला? पण ईश्वर आमचा साह्यकर्ता आहे. त्यानेंच तुह्मांला येथें पाठविलें, आणि त्याचा गुप्त बेत फोडला. ही बातमी सांगण्यास मला पुनः दिल्लीस गेलें पाहिजे. पण त्या विश्वासघाती कुलांगाराचें तोंड तुह्मांस दिसलें काय? त्यास त्याच्या कर्माचें यथायोग्य प्रायश्चित्त मिळालें पाहिजे" प्रभावती ह्मणाली, "नाहीं, त्याचें तोंड आमच्या दृष्टीस पडलें नाहीं." तें ऐकतांच करणसिंग निराश झाला.

नंतर प्रभावतीनें नोकरास घोडे तयार करण्यास सांगितलें, आणि ती करणसिंगास ह्मणाली, "महाराज! आज आपण आमच्यावर जे उपकार केले आहेत त्यांची फेड आमच्याकडून कधींही होणार नाहीं." तें ऐकून तो ह्मणाला, "यांत उपकार ते कसले? मी तर आपलें कर्तव्यच केलें असें समजतों. आतां मी दिल्लीस जाणार आहें. तुह्माला तेथेंच यावयाचें असल्यास माझ्याबरोबर चला. मी तेथें तुह्माला सुखरूप नेऊन पोंचवीन." प्रभावतीनें त्याचें ह्मणणें मान्य केलें, व तीं तिघेंही पर्वतावरून खालीं उतरूं लागलीं. चालतां चालतां करणसिंग त्या दोघींकडे पाहून ह्मणाला, "तुमचें वय इतकें लहान असून या पर्वतावरील दुर्गम मार्गानें, कोणासही बरोबर न घेतां तुह्मी दिल्लीस चाललां आहां

हें पाहून मला फार आश्चर्य वाटतें. याच मार्गानें जाण्याचें आपणास कांहीं कारण आहे काय?" ह्या वेळीं शैलबालेच्यानें उगी राहवेना. इतका वेळ तिनें मौन धारण केलें होतें तेंच तिला फार जड गेलें होतें. ह्मणून हा सहजच आलेला योग फुकट चालवूं नये असा विचार करून ती प्रभावतीच्या कानांत ह्मणाली, "तूं बोलूं नको. मी घटकाभर मौज करतें ती पहा." नंतर ती करणसिंगाकडे वळली आणि ह्मणाली, "होय. कारण तर आहेच. कारणावांचून उगीच कोणी असा त्रास करून घेईल काय? जरी आपण आमचे नवीनच स्नेही आहां तरी आह्मी दिल्लीस कां जात आहों हें आपणाला सांगण्यास कांहीं हरकत नाहीं." वीणारवा-प्रमाणें ती मंजुळ वाणी ऐकून करणसिंगास पूर्वीं आपण ती कधीं ऐकिली असावीसें वाटलें व तत्क्षणींच शैल-बालेची रम्य मूर्ति त्याच्या डोळ्यांपुढें उभी राहिली. त्यानें एक दीर्घ निःश्वास टांकला व त्याच्या मुखश्रीवर एकदम औदासिन्याची छाया पसरली. तें पाहून त्याला फसविण्यासाठीं शैलबाला ह्मणाली, "हा तरुण पुरुष एका स्त्रीवर आसक्त झाला आहे, ह्मणून आईबापांची-ही आज्ञा न घेतां हा गुपचुप तिला भेटावयास जात आहे. मी याला असें न करण्याविषयीं पुष्कळ सांगि-तलें, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं." तें ऐकून करणसिंगानें पुनः एकदां दीर्घ निश्वास टाकला.

पर्वतावरून खालीं उतरतांच विजयसिंग तेथून चालला आहे असें करणसिंगाच्या दृष्टीस पडलें. शहाबुद्दीनाच्या मुसलमान दूताची भेट घेऊन, भरतखंडाच्या अकल्याणाचें, स्वामिद्रोहाचें, व कृतघ्नतेचें निंद्य कार्य करण्याचें ठरविल्यावर तो सावकाश व निःशंकपणें चालला होता. करणसिंगानें घाईघाईनें चालत जाऊन त्यास गांठलें, आणि तो ह्मणाला, "कोण? विजयसिंग? तुह्मी या वेळीं इकडे कोठें?" विजयसिंगानेंही त्यास उलट तोच प्रश्न केला. करणसिंग शंकित होऊन ह्मणाला, "मी सांगेनच. पण तुह्मी तर अगोदर सांगा." कांहीं वेळपर्यंत विजयसिंग अगदीं जडभरतासारखा स्तब्ध राहिला. तो मनांत फार घाबरून गेला. त्याच्या तोंडांतून एकही शब्द निघेना. नंतर तो ह्मणाला, "मी सहजच येथें आलों होतों. ह्या पर्वतावर एक भूतभविष्य जाणणारा संन्यासी राहतो, त्यास ह्या लढाईत कोणाचा जय होईल हें विचारण्यास मी आलों होतों. पण त्याची भेट झाली नाहीं." "मी चंद्रपतीची सुटका करण्यासाठीं दिल्लीहून मुसलमानाच्या छावणींत जाण्यास निघालों होतों. पण सुदैवानें आपली गांठ पडल्यामुळें मला आतां कदाचित् दिल्लीस जावें लागणार नाहीं. जें काम करण्यास मी जाणार आहें तें आपणच कराल." असें करणसिंगानें त्यास मोकळ्या मनानें सांगितलें.

नंतर प्रभावतीकडून त्यास जी हकीगत समजली होती ती सर्व त्यानें त्यास निवेदन केली. ती ऐकून विजयसिंग क्रोधायमान होऊन गेला. त्याचें आंग लालबुंद झालें, व डोळे गरगरां फिरूं लागले. "जर तो विश्वासघाती मातृद्रोही सांपडला तर त्याचे तुकडे तुकडे करून टांकीन" असें ह्मणून तो रागानें दांत ओंठ खाऊं लागला. प्रतापी करणसिंगानें स्वतः दिल्लीस जाऊन जर पृथुराजास ती गोष्ट सांगितली असती, तर आह्मांस आज हा दुर्दशेचा दिवस आला नसता. पण भरतखंडाच्या दुर्भाग्यामुळें त्यानें विषास अमृत मानलें, अग्नीस शीतोदक गणिलें, शत्रूस मित्र ह्मटलें!

भरतखंडाच्या परवशतेच्या प्रारंभाचा हा दुसरा दिवस होता.

विजयसिंग क्रोधित झालेला पाहून करणसिंग ह्मणाला, "आतां क्रोध करण्याचें कांहीं करण नाहीं. तुह्मी आतां झटपट दिल्लीस चला, आणि महाराजांच्या कानावर हें वर्तमान घाला. दुसरेंही माझें एक काम आहे. ह्या दोन बालकांस सुखरूप दिल्लीस पोंचवा; कारण मी येथूनच मागें फिरण्याचा विचार केला आहे." विजय ह्मणाला, "कुमाराची आज्ञा शिरसा मान्य आहे." 'कुमार' शब्द ऐकतांच शैलबाला चकित झाली आणि मनांत ह्मणाली, "दिलीप—कुमार! दिलीप—रा-

जपुत्र! तर मग हा मला क्षमा करील!" हा विचार मनांत येतांच तिच्यावर आभाळ कोसळल्यासारखें झालें, तिचें हृदय छिन्न विच्छिन्न झालें, तिच्या डोळ्यांसमोर अंधकार आला, आणि आपण पुरुषवेष धारण केला आहे हें विसरून जाऊन ती एकसारखे सुस्कारे टांकूं लागली.

शैलबाला आतां पूर्ण युवावस्थेंत आहे, तिच्या बालचेष्टा नाश पावल्या आहेत, तिचे अवयव सुघटित झाले आहेत, मुखारविंदावर यौवनावस्थेंचें तेज झळकत आहे, नेत्रांतील चंचलता दूर झाली आहे, तिला प्रेमरहस्य समजूं लागलें आहे, तिचे नेत्र प्रेमपूरित झाले आहेत, तिच्या हृदयांत नवीन नवीन तरंग उठत आहेत--अशा तिला पुरुषवेषामुळें करणसिंगानें ओळखलें नाहीं यांत नवल तें कसलें!!

करणसिंग विजयसिंगास आपणास दिल्लीस नेण्याविषयीं सांगत आहे असें पाहतांच प्रभावती घाबरली आणि त्यास एकीकडे बोलावून ह्मणाली, "कुमार! मी अपराध केला आहे, क्षमा करा!!" करण विस्मित होऊन ह्मणाला, "अपराध? तो कसला?" प्रभावती ह्मणाली, "होय, मी अपराध केला आहे. आह्मी कोण आहों हें तुह्मास आह्मी कळविलें नाहीं." करण ह्मणाला, "तुह्मी कोण आहां हें जाणण्याची मी इच्छाच

केली नाहीं. मग त्यांत तुमचा अपराध कसला?" प्रभावती ह्मणाली, "तें खरें, पण आपल्यासारख्या परार्थी मनुष्यास सर्व सांगणें हा आमचा धर्मच होता. आपण चंद्रपतीला ओळखतां काय?" करण आश्चर्यानें ह्मणाला, "वाहवा! मी तर त्यांची सुटका करण्यासाठीं दिल्लीहून निघालों आहें." प्रभावती ह्मणाली, "मी त्यांची पत्नी आहें." असें बोलून ती लज्जित झाली व खालीं तोंड करून स्तब्ध राहिली. करणसिंग चकित होऊन ह्मणाला, "आपण चंद्रपतींची पत्नी आहां? मग हा पुरुषवेष तुह्मी कां धारण केला आहे?" प्रभावती ह्मणाली, "मीही प्राणनाथांचा शोध करण्यास निघालें आहें. आपण आह्मांस आपल्या बरोबर न्याल तर आह्मांवर फार उपकार होतील." नंतर प्रभावती शैलबालेकडे वळून ह्मणाली, "शैल, तुला कसें वाटतें? यांच्याबरोबर जाणें चांगलें कीं नाहीं?" 'शैल' हें नांव ऐकतांच कुमार गंभीर स्वप्न पाहत असतां अकस्मात् जागृत होऊन स्वप्नांतील गोष्ट खरोखरच घडत आहे असें त्यास वाटलें. तो शंकाकुल होऊन मनांत ह्मणाला, "ज्या शैलबालेचें मी नित्य ध्यान करीत आहें तीच ही शैल असेल काय? पण शैल तर अजमिरांत आहे!" असें ह्मणून त्यानें तिच्याकडे पाहिलें, तों ती आपली बालसखी शैलच

होय असें त्यानें ओळखलें. त्याबरोबर त्यास अत्यानंद झाला. त्याच्या शरीरांत मदनानें संचार केला व तिला जाऊन एकदम आलिंगन द्यावें असें त्यास वाटलें. तो अत्यंत आतुर झाला. पण आपल्या हृदयांत कोणता भाव उत्पन्न झाला आहे हें त्यास कळलें नाहीं.

थोड्याच वेळांत मन शांत करून तो मनांतल्या मनांतच ह्मणाला, "शैल, तूं बाल्यावस्थेंतील चंचल मूर्तिच कां राहिली नाहींस? तूं तशी असतीस तर तुला भेटण्यास मला संकोच वाटला नसता." नंतर त्यानें मोठ्या हर्षानें प्रभावतीचें ह्मणणें मान्य केलें.

शैलबाला व प्रभावती दिल्लीस येत नाहींत असें पाहतांच विजयास अत्यानंद झाला. त्यांस दिल्लीस नेलें असतां कदाचित् त्या सर्व हकीकत महाराजांस सांगतील अशी त्यास भीति पडली होती. पण ती आतां अनायासेंच दूर झाली. तो हर्षित होऊन नगराकडे चालला. तो आपल्याशींच ह्मणाला, "चंद्रपति कैद झाला आहे, माझा बेत फुटण्याचे प्रसंग वारंवार येत असून अजून तो गुप्त राहिला आहे, आणि चोहींकडे यवनांच्याच जयाचीं चिन्हें दिसत आहेत! आतां माझी आशा सफल कीं विफल होईल तेंच पहावयाचें राहिलें आहे. दिल्लीच्या सिंहासनावर मी आरूढ होतों कीं दुसरा कोणी होतो तें आतां दिसून येईल!"

# प्रकरण २५ वें.

## चंदकवीची सुटका.

महम्मद घोरीनें चंद्रपतीस कैद केलें होतें, पण त्यास मारून टाकलें नव्हतें. खून कर, मार दे, कापून टाक, हीं तर मुसलमानांचीं स्वाभाविक कर्में. असें असतांही त्यास जिवंत ठेवण्यास त्यास अनेक कारणें होतीं. त्यास असा विचार सुचला कीं, कदाचित् पूर्वींप्रमाणें आपला पराजय झाल्यास चंद्रकवि हा एक आपल्या रक्षणासाठीं ढालच होईल. त्याच्या बचावासाठीं पृथुराज आपल्यावर दया करील; पण त्याचा वध केल्यास तो अत्यंत कोपायमान होऊन आपला अनेक प्रकारें विध्वंस करण्यास कमी करणार नाहीं; आणि आपलाच जय झाला तर या 'काफरास' मारण्यास विलंब काय लागणार आहे? असा विचार करूनच त्यानें चंद्रपतीवर दया (!) केली होती. तथापि त्यानें त्याच्या हातापायांत जड बिड्या घातल्या होत्या, रात्रंदिवस त्याच्या तंबूवर खडा पाहरा ठेवला होता, व पहारेवाल्यांकडे नागव्या तरवारी दिल्या होत्या. अशा स्थितींत चंद्रपति मोठ्या दुःखानें काळ कंठीत

होता. संध्याकाळीं त्यास नदीतीरावर जाऊन स्वयंपाक करण्यास परवानगी होती, त्या वेळीं मात्र त्याच्या बिड्या मोकळ्या होत असत. प्रथम दोन तीन दिवस त्यास बरेच हाल भोगावे लागले. त्यास धड खाण्या-सही मिळालें नाहीं. मुसलमान लोक आपल्या हातानें केलेलें अन्न त्याच्यासाठीं आणीत असत. परंतु कवि त्याचा स्वीकार करीना. तो क्षुधेनें व तृषेनें व्याकुल होऊं लागला, तरी हिंदु धर्माचा परित्याग करण्यास तो मुळींच प्रवृत्त होईना. ही गोष्ट महम्मदाच्या कानावर जातांच त्यानें छावणीजवळ असणाऱ्या नदीच्या किनाऱ्यावर त्यास स्वयंपाक करण्यास संध्याकाळीं एक वेळ मोकळीक देण्याचा हुकूम दिला. पण जेव्हां कवि स्वयंपाक करी तेव्हां त्याच्यावर आसपास पांच सहा शिपाई पहारा ठेवीत असत. असे कांहीं दिवस गेले. कैदी पळून जाण्याची कांहीं भीति नाहीं असें जेव्हां पहारेवाल्यांनीं पाहिलें, तेव्हां सर्व असामी त्याच्याबरोबर असण्याची आवश्यकता त्यांस दिसली नाहीं. सहाचे पांच, पांचांचे चार असे होतां होतां शेवटीं कवीबरोबर दोन असामी नदीतीरावर जाऊं लागले. तो पळूं लागलाच तर एक ओरड मारली ह्मणजे छावणींतील सारे लोक धांवून येतील अशा विश्वासावर ते राहिले.

एके दिवशीं संध्याकाळीं नदीतीरावर एका झाडाच्या खालीं चंद्रपति स्वयंपाक करीत होता, व त्याच्याजवळ नेहमीप्रमाणें दोन पहारेवाले होते. त्या दिवशीं अमावास्या होती. चारी बाजूंनीं अंधार पडला होता. मात्र स्वयंपाकाकरितां पेटविलेल्या अग्नीचा प्रकाश पडत होता. कवीनें सहज नदीकडे पाहिलें तों त्यांतून एक होडी चालली होती. त्या होडींतील मनुष्यानें त्याच्याकडे एक दगड फेंकला हेंही त्यानें पाहिलें. तो दगड त्यानें उचलला. त्यास एक पत्र बांधलेलें होतें. तें वाचल्यावर आपली सुटका करण्यासाठीं कोणी आला आहे असें त्यास समजून आलें. दगडाचा आवाज होतांच पहारेवाले एकदम दचकले. "काय आहे? काय आहे?" असें ह्मणत ते कवीजवळ आले. कवीनेंही बतावणी करण्यास आरंभ केला. तो भ्याल्यासारखें करून कांपूं लागला. दुसरा शिपाई तर ही भूतचेष्टा असावी अशी शंका घेऊन घाबरून गेला. पहिल्यानें शेवटीं असा तर्क केला कीं, झाडावरील पक्ष्यानें कांहीं तरी खालीं टाकलें असावें.

याच वेळीं छावणींत मोठा गोंगाट होऊं लागला. लोकांची धांवपळ सुरू झाली. तेव्हां दुसरा पहारेवाला पहिल्या भित्र्या पहारेवाल्यास ह्मणाला, "मियां, क-

सली गडबड चालली आहे ती पाहून ये बरें?" कवि चंद्राच्या ढोंगावरून तो बिचारा अगदीं घाबरून गेला असल्यामुळें छावणीपर्यंत जाण्याची त्यास शक्ति राहिली नव्हती. तो कांकूं करतोसें पाहून दुसरा ह्मणतो "अरे असा भितोस काय? बरें तर मी अस्सा जाऊन येतों. मला येण्यास वेळ लागला तर कैदीस घेऊन छावणींत जा. माझी वाट पाहत राहूं नको."

पळून जाण्यास हाच वेळ बरा आहे असें चंद कवीस वाटलें. तेव्हां त्यानें आपणाकडे पडलेल्या पत्राच्या उलट बाजूस, कोळशानें "पळून जाण्याची हीच संधी आहे. येथें एकच शिपाई आहे." असा मजकूर लिहून एका पानाची होडी करून त्यांत तें पत्र ठेवलें, व पाणी आणण्याचें मिष करून ती होडी हळूच नदीच्या पाण्यांत सोडून दिली. नंतर पाणी घेऊन कवि मागें येऊं लागला, पण येते वेळीं पुनः पुनः मागें फिरून पाहूं लागला. तें पाहून तो शिपाई ह्मणाला, "कायरे, मागें काय पाहतोस?" कवीनें त्या होडीकडे बोट दाखवितांच त्यानें तिकडे पाहिलें, व त्या बरोबर भीतीनें त्याची बोबडी वळली!

होडींतून एक भयंकर, विक्राळ, कालरात्रीरूप मूर्ति वेगानें तीरावर आली. ती पाहून पहारेवाला रोमांचित झाला. 'ऑ. ऑ' शिवाय त्यास कांहींच

बोलतां येईना. त्याच्या भीतीचा फायदा करून घ्यावा असें चंद्रपतीच्या मनांत आलें. तो कदाचित ओरडेल या भीतीनें तो त्यास ह्मणाला. "मोठ्यानें बोलूं नको बरें! नाहीं तर येथल्या येथेंच आमचे बारा वाजतील. हें भूत आहे. त्याचें आमच्याकडे लक्ष्य नाहीं. बोललों तर आह्मी त्यास दिसल्याशिवाय राहणार नाहीं." कवीची युक्ति सफल झाली. पहारेवाला मुक्याप्रमाणें स्तब्ध राहिला. इतक्यांत एका हातांत नागवी तरवार व दुसऱ्यांत खंजीर घेऊन काळ्या तोंडाचा काळीं वस्त्रें धारण केलेला एक मनुष्य त्याच्या पुढें आला. भयभीत झालेल्या पहारेवाल्यास तो माडाइतका उंच व भयंकर दिसूं लागला. त्याची तरवार दहा हात लांब, पाय वीस हात लांब, व डोकें पर्वतशिखराएवढें उंच दिसूं लागलें! तो तेथून पळून जाण्याचा विचार करूं लागला, पण त्याचे पाय जागच्याजागींच खिळून राहिले. ती भयंकर मूर्ति त्याच्यावर एकदम चाल करून गेली. त्याबरोबर त्यास मूर्च्छा येऊन तो खालीं पडला. तेव्हां ती मूर्ति कवीस घाईघाईनें ह्मणाली, "चला!" कवि त्या मूर्तीबरोबर झपाट्यानें चालूं लागला. दोघेही होडींत जाऊन बसल्याबरोबर होडी झपाट्यानें चालूं लागली. ही मूर्ति कोण? करणसिंग!

होडींत बसल्यावर दोघांच्या जीवांत जीव आला.

कांहीं वेळानें करणसिंग कवीस ह्मणाला, "पहारेवाला मूर्च्छित झाला आहे, पण सावध होईतोंपर्यंत आपण कोठच्या कोठें जाऊन पोंचूं." कांहीं वेळ गोष्टी झाल्यावर आपली सुटका करणारा संन्याशाचा पुत्र दिलीपच आहे असें त्यास समजतांच तो अत्यंत विस्मयान्वित झाला.

होडी चालूं लागल्यावर कवीनें विचारलें, "तुह्मी दिल्लीहून आलां काय?" करणसिंग ह्मणाला, "आपणास येण्यास विलंब झाला ह्मणून महाराजांच्या आज्ञेवरून आपली सुटका करण्यासाठीं मी आलों आहें." प्रभावती व शैलबाला अजमिरास असल्यामुळें त्यांची बातमी त्यास ठाऊक नसावी अशा विचारावरून त्यानें त्यास त्या संबंधीं कांहीं प्रश्न केला नाहीं. कवीनें पुनः विचारलें, "दिल्लीचा काय समाचार आहे?" प्रातःकाळीं कवि उठला आणि त्याच्या पुढें प्रभावती दिसली ह्मणजे त्यास अत्यानंद व अत्याश्चर्य होणार आहे असें वाटून व तसेंच करण्याचा बेत करून करणानें थोडक्यांतच जबाब दिला कीं, "तेथें सर्व कांहीं ठीक आहे, पण आतां रात्र फार झाली आहे, व होडीही किनाऱ्यास लागली आहे, तर आतां जवळच असलेल्या एका संन्याशाच्या आश्रमांत ही रात्र विश्रांति घेऊन प्रातःकाळीं सर्व गोष्टी को-

लूंया." इतक्यांत होडी किनाऱ्यास लागली, व ते दोघे खालीं उतरले.

दिल्लीची खबर चांगली आहे, तेथें शान्ति आहे, युद्धासाठीं सर्व सैन्य निघालें आहे, प्रजा महाराजांचा जय इच्छीत आहे, देवी आशापूर्णेनें आपली आशा फलीभूत होण्याचें आश्वासन दिलें आहे इत्यादि वृत्तान्त ऐकून कवीस आनंद झाला खरा, तरी शैलबाला व प्रभावती यांचा काय समाचार आहे, युद्धास कोण कोण राजे आले आहेत, सेनापति कोण कोण नेमले आहेत हें जाणण्याची त्यास फार उत्सुकता होती. परंतु करणसिंगानें सर्वच गोष्ट संपुष्टांत आणल्यामुळें त्यानें पुढें कांहीं विचारलें नाहीं. विजयसिंगाची गोष्ट त्यास सांगण्याचें त्याच्या ध्यानीं आलें नाहीं. इतक्यांत ते संन्याशाच्या आश्रमा जवळ येऊन ठेपले. तेथें एक मनुष्य संन्याशाचा वेष घेऊन बसला होता त्यास नमस्कार करून करणसिंग ह्मणाला, "आतां आह्मी निजायला जातों." नंतर दोघेही एक जवळच पडलेला बिछाना पसरून त्यावर निजले.

पुष्कळ दिवसांनीं, यवनांच्या तडाक्यांतून सुटून, स्वतंत्र हवेचा आस्वाद घेऊन, दिल्लीचा मंगल समाचार ऐकून, पराधीनतेचा त्याग करून, काळाच्या पाशांतून सुटून, पूर्णानंदांत चंद कवि झोंपीं गेला.

## प्रकरण २६ वें.

### विलक्षण भेट !

सर्वत्र शान्त होतें. करणसिंगास मात्र नीज आली नव्हती. चंद कवीची सुटका व शैलबालेची अकस्मात् गांठ, या दोन गोष्टींमुळें तो वेडा होऊन गेला होता! कांहीं वेळानें तो आपल्या बिछान्यावरून उठला व प्रभावती आणि शैलबाला त्याच आश्रमांत जेथें निजल्या होत्या तेथें जाऊन प्रभावतीस ह्मणाला, "आपण चंद्रपतीच्या शेजारीं जाऊन बसावें अशी माझी इच्छा आहे. कारण चंद्रपतीस एकदम विस्मित करावें असें माझ्या मनांत आलें आहे." प्रभावती प्रथम त्याचें बोलणें मनावर घेईना. पण त्याचा फारच आग्रह पडल्यामुळें ती उठून चंद्रपति दुसऱ्या खोलींत निजला होता त्याच्या शेजारीं जाऊन बसली. ती गेल्यामुळें इकडे शैलबाला व करणसिंग एकटींच राहिलीं.

शैल व करण यांपैकीं कोणीही बोलण्यास सुरवात करीना. तरी दोघांच्याही अंतःकरणांत आवेशानटी थै थै नाचत होती! करणसिंग विचार करूं लागला,

"असें हें कोठपर्यंत चालणार? जिच्याबरोबर बोल-ल्याशिवाय एक घटकाही जाणें कठीण, तिच्याबरो-बर आतां हा मूकभाव धरावा तरी कसा! पण तिच्या मतांत आतां कशा प्रकारचे विचार चालत असतील कोणास ठाऊक! ती माझ्याविषयींच विचार करीत असेल काय? अथवा संशय नकोच. तिचे हे लज्जावनीत नेत्रच तिच्या मनांतील भाव व्यक्त करीत आहेत."

यावेळीं शैलबालेच्या मनांत काय विचार चालले होते तें समजत नव्हतें. पण कादंबरीकारांस अशक्य असें काय आहे? सर्वांच्या अंतःकरणांतील विचार य-थास्थित जाणण्याची त्यांस शक्ति आहे. ब्रह्मलोकांत जाऊन तेथील स्थिति पाहण्यास, स्वर्गांत जाऊन तेथील सुखोपभोग घेण्यास, युद्धांत जाऊन तरवारबहादुरी क-रण्यास, क्षणार्धांत आकाशमंडलांत उड्डाण करण्यास, व क्षणार्धांत पाताळांत उडी ठोकण्यास, मृतजनांस ली-लामात्रेंकरून संजीवन करण्यास, सारांश सर्व कांहीं करण्यास ते समर्थ आहेत!

चंद्रपतीची सुटका झाली आहे हें ऐकून प्रभावती व शैलबाला यांस फार आनन्द झाला होता, व शैल-बाला नेहमींप्रमाणें प्रभावतीची थट्टा करीत होती. इत-क्यांत पूर्वी सांगितल्याप्रमाणें तेथें करणसिंग आला व त्याच्या सांगण्यावरून प्रभावती तेथून गेली.

प्रभावती गेल्यावर प्रथम शैलबाला बावरली, तिचे ओंठ हालूं लागले, व शरीर कांपूं लागलें. तिच्या मनांत अनेक तर्कवितर्क येऊं लागले. करणसिंग प्रेमविचारवश झाला आहे तों तीही प्रेमपाशांत गुंतूं लागली! ती मनांत ह्मणाली, "अझूनही दिलीप कांहीं बोलत नाहीं हें कसें? याच्या मनांत दुसराच कांहीं विचार चालत आहे काय? पूर्वीप्रमाणें माझ्यावर याचें प्रेम नाहीं काय? पण तसें असेल तर हा माझ्याकडे वारंवार कां बरें पाहत आहे? छेः! मला हा विनाकारण संशय येत आहे." याप्रमाणें विचार करीत करणसिंग आतां बोलेल, मग बोलेल असें ह्मणून ती वाट पहात होती. बराच वेळ कोणी कांहीं बोलेना. दोघेंही लज्जेनें व शंकेनें पूर्ण असल्यामुळें त्यांचें मन 'तूं बोल, तूं बोल' असें ह्मणत असतांही त्यांस बोलतांच येईनासें झालें! शेवटीं करणसिंग, कोमल, मार्मिक, सुंदर, गंभीर पण विनोदी शब्दांनीं शैलबालेस ह्मणाला, "कां, आमच्याजवळ कांहीं बोलायाचें नाहीं वाटतें! आतां तुह्मी मोठ्या झालां आहां!" तेव्हां शैलबाला ह्मणाली, "मोठें कोण तें दिसतेंच आहे; मी मोठीही नाहीं व लहानही नाहीं!" करणसिंग ह्मणाला, "वाः! काय हा मधुर स्वर! पण आमच्या बरोबर न बोलण्या इतका मी कोणता अपराध केला आहे तो तरी सांगाल

कीं नाहीं ?" शैलबाला ह्मणाली, "तुमच्या बरोबर बोलण्याचा माझा हक्क कोणी नेला आहे ? मी कीं तुह्मी ?" करणसिंग ह्मणाला, "मी तर नाहीं, तुह्मींच नेला आहे. पुरुषाचा वेष घेऊन फसविणाऱ्या आपणच कीं नाहीं !" शैलबाला ह्मणाली, "कांहीं सीताहरणासारखा तर प्रकार नाहींना ? असेल तर सांगा. तुह्मी मला ओळखल्याबरोबर 'शैल, तूं खुशालना ?' असें कांहीं विचारलें नाहीं. तेव्हां बोलण्याचा हक्क तुह्मीच नेला कीं नाहीं ?" करणसिंग ह्मणाला, "वाः ! तुह्मी मला प्रथमच ओळखलें असतांही मला ओळख न देतां माझी थट्टा करायला लागलां ! वाः शैल ! तुह्मी माझी बरीच थट्टा केली ह्मणायची ! मी तर रात्रंदिवस तूं माझ्यावर प्रीति करीत असशील कीं नाहीं याच विचारांत होतों ! बालसखे शैलबाले, तूं माझ्यावर प्रेम करतेस काय ?" शैलबाला गद्गदित स्वरानें ह्मणाली, "आपण आतां राजकुमार झालां आहां. तुह्मी काय या झोंपडींत राहणाऱ्या शैलबालेवर प्रेम ठेवणार !" कुमार ह्मणाला, "तूं राजकन्या असतीस व मी राजपुत्र नसतों तर तूं माझ्यावर प्रीति ठेवली नसतीस हें तुझ्या बोलण्यावरून सिद्ध झालें तर ! शैलबाला हांसून ह्मणाली, "दिलीप ! स्त्रीची प्रीति विशुद्ध व अचल असते, पण पुरुषाची प्रीति क्षणोक्षणीं बदलते हें आप-

णास ठाऊक नाहीं काय? मी जरी पृथ्वीपतीची कन्या झालें तरी दिलीपाशिवाय मी दुसऱ्या कोणावरही प्रेम ठेवणार नाहीं. ज्याप्रमाणें सीता आणि राम, सुभद्रा आणि अर्जुन, रुक्मिणी आणि कृष्ण, त्याप्रमाणें शैल आणि दि—" एवढें बोलून ती लाजली. तेव्हां कुमार ह्मणाला, " मग मी प्रेम करीत नाहीं असेंच ह्मणणें आहे कीं काय? शैलबाला म्हणाली, " कुमारास ही दासी योग्य आहे काय? आपणास योग्य अशी कोणी दुसरीच राजभवनसुंदरी असेल." करणसिंग म्हणाला, " तूं मला योग्य असलीस किंवा नसलीस तरी तुझ्याशिवाय मी कोणावरही प्रेम ठेवणार नाहीं. माझी भूत, वर्तमान, व भावी स्थिति जाणण्यास जी योग्य, व माझ्या सुखदुःखांची जी खरी विभागी, ती तूंच—तूंच आहेस. पण तूं मला योग्य नाहीं कां?" शैलबाला ह्मणाली, " सगळ्यांत कुलशील हें मुख्य आहे." करणसिंगानें विचारलें, " तुला तुझें कुलशील माहित नाहीं काय?" शैलबाला ह्मणाली, " नाहीं. तुह्मांला ठाऊक आहे कीं काय?" करणसिंग ह्मणाला, " हो, मला आहे माहित. पण स्त्रिया ह्मटल्या ह्मणजे चलितचित्ता. माझ्यापेक्षां चांगला राजकुमार मिळाला ह्मणजे त्याच्याबरोबर तुह्मी विवाह कराल. ह्मणून विचारतों, माझ्यावर तुमचें खरोखर प्रेम आहेना?" शैल-

बाला खूप चिडून ह्मणाली, "मी याचें उत्तर देत नाहीं! असलें काळीज फाटणारें बोलणें मला ऐकायलाही नको! पुरुष निष्ठुर ते निष्ठुर!" करणसिंगानें विचारलें, "आणि स्त्रिया नाहींत का?" शैलबाला ह्मणाली, "नाहींतच! काय सीतेनें रामाचा त्याग केला होता? काय दमयन्ती वनांत तळमळत असतांही नळास भजत नव्हती? आपलें दुसऱ्याच कोणावरही प्रेम असेल झालें. उगाच ही माझी थट्टा मांडली आहे. चितोडच्या कुमारास ही अज्ञात कुलशीलाची शैलबाला योग्य नव्हेच!" कुमार हांसून ह्मणाला, "आणि हा झोंपडींत राहणारा अज्ञात कुलशीलाचा दिलीप, जयचंद्राचा चुलता तेजसिंग याच्या कन्येस योग्य नव्हेच!" कुमारी दचकून ह्मणाली, "कोण मी? कान्यकुब्जाधिपति जयचंद्राच्या चुलत्याची कन्या?" हांसत हांसत करणसिंग तिच्या सन्निध जाऊन ह्मणाला, "होय, तूं राजकन्याच आहेस; आणि नसलीस तरी माझी रमणी तरी आहेस कीं नाहीं!" शैलबालेस आनंदातिशयास्तव कांहीं बोलतां येईना; मात्र हर्षानें तिचे नेत्र तत्क्षणीं सजल झाले!

पण इतक्यांत सुखस्वप्न नाहींसें झालें. मोहनिद्रेंतून शैलबाला व करणसिंग जागीं झालीं. दोघांच्याही तोंडांतून शब्द निघेना. तीं एकमेकांकडे पाहत रा-

हिलीं. दोघांच्याही नेत्रांत प्रेमविद्युत् चमकूं लागली. इतक्यांत चंद्रपतीनें "करणसिंगजी! इकडे या!" अशी मोठ्यानें हांक मारली! ती ऐकतांच 'रंगांत भंग' झाला! करणसिंग तसाच उठला व मागें वळून पुनः पुनः शैलबालेस पाहत पाहत चंद्रपतीच्या पुढें येऊन उभा राहिला; आणि शैलबाला विरहाकुल व चिन्तातुर होऊन शय्येवर पडली!

चंद्रपतीस पुष्कळ दिवस जागरण झालें असल्यामुळें इतकी गाढ निद्रा लागली होती कीं क्षितिजास सोडून सूर्य बराच वर आला असतांही तो जागृत झाला नव्हता. प्रभावती तो उठण्याची वाट पहात होती. त्याची नीज पुरी होतांच त्यानें डोळे उघडले, तों प्रभावतीचें विकसित कमलाप्रमाणें सुंदर मुख त्याच्या दृष्टीस पडलें! तेव्हां खरोखर आपण अजून स्वप्नांतच आहों कीं काय अशी त्यास शंका उत्पन्न झाली! 'येथें प्रभावती कशी येईल? ती तर घरीं शोकविव्हल होत असेल' असा विचार त्याच्या मनांत आला. पुनः त्यानें नीट निरखून पाहिलें तों ती प्रभावतीच असावी असें त्यास वाटलें. इतक्यांत प्रभावतीच्या तोंडून "प्राणनाथ! मी आपली प्रभावतीच आहें" असे शब्द ऐकतांच तो सानंदाश्चर्यांत निमग्न झाला! नंतर त्यांच्या प्रेमकथांस आरंभ झाला. गोष्टी होत असतांना मध्येंच

प्रभावती ह्मणाली, "प्राणनाथ! आह्मी तर सुखी झालों. पण शैलबालेस सुखी केलें पाहिजे. तिला सुखी करण्यास मी अत्यंत उत्कंठित झालें आहें." कवीनें विचारलें, "ती दुःखी कशानें?" प्रभावती ह्मणाली, "ती नेहमीं 'दिलीप दिलीप' करीत असते हें विसरलां वाटतें? दिलीप कोण तो समजलें का?" कवि ह्मणाला, "मला ती माहिती मिळविण्यास वेळच मिळाला नाहीं. तुला ठाऊक आहे काय?" प्रभावती ह्मणाली, "तो चितोडाधिपति समरसिंगाचा बुडालेला मुलगा करणसिंग आहे!" आश्चर्यापन्न होऊन कवीनें एकदम विचारलें, "हें तुला कसें कळलें?" प्रभावती ह्मणाली, "गोष्टी बोलतां बोलतां त्यानेंच हें सांगितलें." नंतर त्याची आपली भेट कशी झाली, त्यानें आपली केवढ्या मोठ्या संकटांतून सुटका केली, पर्वतावर एका दुष्ट हिंदूनें कसा कपटप्रबंध केला होता, व तो पृथुराजास कळविण्यास स्वतः करणसिंग न जातां त्यानें विजयसिंगासच कसें पाठवून दिलें, ह्या सर्व गोष्टी प्रभावतीनें त्यास निवेदन केल्या. हा वृत्तान्त ऐकून चंद कवि दचकला आणि कांपूं लागला. विजयाच्या कपटाचें त्यास स्मरण झालें! त्याच्या शरीरावर रोमांच उभे राहिले, नेत्र रक्त झाले, निराशा व क्रोध यांनीं त्याचें कपाल विकृत दिसूं लागलें. चंद्रपति आतां एक अपूर्व मूर्ति

दिसूं लागला! तो ह्मणाला, "रे दुष्टा, पातक्या, विश्वासघातक्या विजयसिंगा! करणसिंगानें हें किती वरें अयोग्य काम केलें! या विश्वासघातक्यास निरोप सांगण्यास पाठविलें! हाय हाय! अग्नींत पडून शीतलतेची आशा करण्यासारखेंच झालें हें!" यानंतर महम्मद घोरीच्या तंत्रांत विजयसिंगानें केलेला प्रकार निवेदन करण्यासाठीं त्यानें मागें सांगितल्याप्रमाणें करणसिंगास हांक मारली.

करणसिंग तिकडे आला व त्यानें त्या सक्रोध मूर्तिमुखांतून निघालेला शोकव्यंजक शब्द ऐकला. कांहीं तरी दगा असावा असें वाटून त्यानें प्रथम बाहेर जाऊन पाहिलें तों तेथें कांहीं नाहीं असें पाहतांच तो पुनः येऊन कवीच्या शेजारीं बसला. नंतर कवीनें विजयसिंगाचा सारा कपटप्रबंध तुटक तुटक शब्दांनीं त्यास सांगितला. कारण क्रोधावेशामुळें त्यास बोलतांही येत नव्हतें. करणसिंग ह्मणाला, "हाय! तर आतां देशाचें रक्षण कसें होईल!" कवि निराश होऊन ह्मणाला, "माझी बुद्धि तर पाण्याच्या लाटांप्रमाणें अत्यंत अस्थिर झाली आहे. मला कांहीं सुचत नाहीं. पण मी आतांच्या आतां दिल्लीस जाऊन तेथून ठाणेश्वरीं जाईन. आपण कोण आहां हें मला कळलें आहे. तुह्मी या दोघींना बरोबर घेऊन चितोडास

चला. मी दिल्लीस जाऊन तेथला पुरा बंदोबस्त करून ठेवतों, व महाराजांस भेटून विजयसिंगास ठार करतों. स्त्रियांस बरोबर नेण्यास वेळ लागेल; शिवाय या युद्धकाळांत त्यांस बरोबर ठेवणें मोठें धोक्याचें आहे. करण, मी दिल्लीहून सुखरूपपणें आलों तर प्रभावतीस घेऊन जाईन, व शैलबालेबरोबर तुमचा विवाह होईल, पण मी नाहींच आलों तर–" इतकें भाषण ऐकल्याबरोबर प्रभावतीच्या नेत्रांतून पाणी खालीं पडूं लागलें. आतां ज्यास्त वेळ राहिल्यास मोहामुळें आपल्या कामास अंतराय येईल या भीतीनें तो तसाच उठला व मागें न पाहतां एकदम चालता झाला. जातां जातां करणसिंगानें शैलबाला कोण आहे तें त्यास कळविलें. क्षणांत सर्वांची गांठ पडली, पण क्षणांत पूर्वीप्रमाणें वियोग झाला. प्रभावतीला तिचा शिरोमणि मिळाला, पण तो पुनः नाहींसा झाला! चंद्रपति गेल्यावर प्रभावती अमंगलशंकाजनक उद्वेगानें निस्तेज होऊन निश्चेत झाली!

---

# प्रकरण २७ वें.

## मुसलमानांच्या छावणींत धामधूम.

चंद्रपतीवर पहारा करणाऱ्यांपैकीं एक जण, त्या भित्र्या पहारेकऱ्यास पहारा करण्यास ठेवून, छावणीकडे गेला तों त्यास अधिकाधिक कोलाहल ऐकूं येऊं लागला. तो ह्मणाला, "हें आहे तरी काय? इतकी गडबड कसली चालली आहे? काफर हिंदूंनीं घाला तर घातला नसेलना? अथवा आग तर लावली नसेल, किंवा कोणास पकडलें तर नसेल! आवाज तर मोठमोठ्यानें ऐकूं येत आहे." पण छावणीजवळ जातांच ती आनंदाची व खुशालीची धामधुम आहे असें त्यास समजलें. कोणी ताना मारीत होते, कोणी गजल गात होते, व कोणी मदिरापानांत गुंग झाले होते. तो पहारेकरी एका शिपायाजवळ जाऊन ह्मणाला, "कायरे? इतका आनंद कसला चालला आहे?" तो शिपाई ह्मणाला, "भल्या माणसा! तूं कोणी सैतान आहेस कीं माणूस आहेस? मला काय ठाऊक? दुसऱ्या कोणाला तरी विचार जा. अरे ए, हें गोड गोड सरबत तर थोडें

पी. सगळे लोक ख्यालीखुशालींत असतां तूंच कां मरतोस? ये, हें शराब घे." त्या पहारेकऱ्यास या भाषणावरून कांहींच उमज पडेना. तेव्हां तो दुसऱ्या एका शिपायाकडे जाऊन त्याचें कारण विचारूं लागला. तो दुसरा शिपाई ह्मणाला, "तूं कोणी गद्धा तर नाहींस? मियां, तुला इतकें ठाऊक नाहीं? अरे आमचा जय होणार ह्मणून बातमी लागली आहे." तिसऱ्या शिपायास विचारतां तो ह्मणाला, "गिझनीहून अशी खबर आली आहे कीं सिपेहसालारांस मुलगा झाला आहे." चौथा ह्मणाला, "दिल्ली जळून गेली. आतां सेनापति मागें फिरेल आणि आमचें मरण वांचेल! काय मियां! मरण्यापेक्षां जगणें चांगलें कीं नाहीं!" ह्याप्रमाणें अनेक जण अनेक प्रकारें सांगूं लागले, पण खरी हकीगत काय आहे हें कोणासच ठाऊक नव्हतें.

नंतर तो पहारेकरी महंमदघोरीच्या तंबूजवळ आला. तेथें सर्व अमीर उमराव बसले होते व एक शिपाई सांगत असलेली हकीगत मोठ्या उत्सुकतेनें ऐकत होते. दिल्लीजवळच्या पर्वतावरील गुहेंत विजयाबरोबर ज्याचें संभाषण झालें होतें तोच हा शिपाई होय. तो विजयासिंगाच्या साहाय्यानें आपणास कसा जय मिळेल हें सांगत होता व तें ऐकून मुसल-

मान सेनापति मोठ्या खुशींत आले होते. पण पायदळ व सेनापति यांस हीं हकीगत ठाऊक नव्हती. त्या पहारेकऱ्यानें तो शिपाई जें सांगत होता तें ऐकल्यावरून त्याला त्या आनंदोत्सवाचें खरें कारण समजलें. मग तो सुद्धां सगळ्यांबरोबर दारू पिऊन मत्त झाला व नाचूं उडूं लागला.

ह्या आनंदोत्सवांत मग्न झाल्यामुळें त्या पहारेकऱ्यास कवि चंद व तो मित्रा पहारेकरी यांची आठवण राहिली नाहीं. कांहीं वेळानें त्यांचें स्मरण होतांच तो उठला आणि चंदपतीच्या तंबूंत जाऊन त्यानें त्याचा तपास केला, तों तो तेथें नाहीं असें त्यास आढळून आलें. तेव्हां अत्यंत विस्मित होऊन तो नदीच्या किनाऱ्यावर गेला. कवि ज्या झाडाखालीं स्वयंपाक करीत असे तेथें जाऊन त्यानें पाहिलें, पण त्यास तो कोठें दिसेना. तेव्हां कदाचित् दुसऱ्या रस्त्यानें तो छावणींत गेला असेल असें त्यास वाटून तो मागें परतूं लागला. इतक्यांत कोणाच्या कण्हण्याचा स्वर त्याच्या कानीं पडला. ज्या दिशेनें तो शब्द आला तिकडे तो वळला. तो थोडेंसें चालून गेल्यावर, नदीतीरावर एक मनुष्य पडला आहे व त्याच्या मुखांतून अस्फुट शब्द निघत आहेत असें त्यानें पाहिलें. दारूच्या गुंगींत असल्यामुळें भीत भीत तो त्याच्या जवळ गेला, पण तो कोण

होता, हें त्यास ओळखतां आलें नाहीं. दोन चार वेळ खालीं वांकून त्यानें त्याच्याकडे पाहिलें, तेव्हां तो आपल्या जोडीचा पहारेकरीच आहे असें त्यास दिसलें. त्याला उठविण्यासाठीं त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, पण तो शुद्धीवर आला नाहीं. शेवटीं नदींतून पाणी आणून त्यानें तें त्याच्या तोंडावर शिंपडलें तेव्हां तो जरासा सावध झाला, आणि त्यानें डोळे उघडले. पण त्या पहारेकऱ्यास पाहतांच तो पूर्वींचाच सैतान आहे असें समजून "या अल्ला! या अल्ला!' असें ह्मणत तो पुनः निचेष्ट पडला. तें पाहून दुसरा पहारेकरी ह्मणाला, "काय मियां, असें काय करतोस? मी तो शेरअली आहें. असा भितोस कां?" पहिल्या पहारेकऱ्यास त्याचें ह्मणणें मुळींच खरें वाटेना. त्यास तो खरोखरच सैतान मानून गुपचुप राहिला. शेरअली ह्मणाला, "मियां उठ उठ. कैदी कोठें आहे?" पहिला पहारेकरी ह्मणाला, "सैतान, माफ कर! मी नाहीं! मी—मी! मरून गेला! अँ! अँ! गेला" त्याला ह्याप्रमाणें बावरलेला पाहून शेरअली त्याच्यावर एक लाथ मारून ह्मणाला, "बोल कैदी कोठें आहे?" लाथ बसल्यावर मियांस शुद्धि आली आणि डोळे चोळीत त्यानें शेरअलीकडे पाहिलें. पण पुनः कदाचित् सैतान येईल या भीतीनें आसपास पाहत तो ह्मणाला,

"गेला! आला! सैतान! अँ! अँ!" याप्रमाणें तो इतकें कांहीं अस्पष्ट बोलूं लागला कीं तें ऐकून शेरअलीस हंसें आलें. तो म्हणाला, "गद्धया, कैदी कोठें गेला?" त्या भित्र्या पहारेकऱ्यानें नदीकडे बोट दाखविलें; पण त्याच्या तोंडावाटे एकही शब्द निघेना. शेरअली म्हणाला, "काय? पळून गेला? बोल." भित्रा डोकें हालवून म्हणाला, "नाहीं." "तर मग काय झालें?" शेरअलीनें विचारलें. भित्रा हळू हळू शेरअलीच्या कानांत म्हणाला, "हळू बोल! मोठ्यानें बोलशील तर कैद्याची जी गत तीच आमची! तो सैतान आह्मा दोघांसही घेऊन जाईल." शेरअली क्रोधानें म्हणाला, "पण कैदी कोठें आहे?" भित्रा मियां कांपत कांपत म्हणाला, "तंबूंत चल. मी मरून जाईन. माझ्यानें बोलवत नाहीं. तंबूंत सांगेन!" आतां तर शेरअलीस अतिशय संताप आला. त्यानें रागाच्या सपाट्यांत त्याच्यावर दोन तीन गुद्दे चढवून म्हटलें, "कैदी दाखव! नाहीं तर ठार मारीन! कंबक्त! कैदी सोडून दिला!" भित्रा मियां म्हणाला, "हळू बोल. तो पळून गेला नाहीं. हा पहा! सैतान आला! पळ पळ! मियां, बघ बघ! तो तेथें उभा आहे! कैद्याला त्यानें उचलून नेलें! पळ पळ बघतोस काय!" याप्रमाणें बोलून त्यानें धांव ठोकली.

आतां शेरअलीच्या डोळ्यावरची धुंदी उतरून गेली आणि कैदी दगा देऊन पळून गेला असावा असें त्यास वाटलें. तेव्हां घाबरून त्यानें "धांवा धांवा! कैदी पळून गेला अशी आरोळी मारली. त्याबरोबर छावणींतून कांहीं शिपाई व अधिकारी मशाली घेऊन धांवत आले. कांहीं नदीकडे धांवले, कांहीं दुसऱ्या बाजूस वळले, पण चंद्रपति कोणत्या दिशेनें निघून गेला त्याचें अनुमान कोणासच करतां आलें नाहीं. त्यांनीं तीन तास शोध केला, व शेवटीं थकून जाऊन तें वर्तमान महंमदघोरीला सांगण्यासाठीं ते त्याच्या तंबूंत गेले. इतकें झालें तरी त्या भिऱ्या मियांस आपणास सैतानानेंच पछाडलें आहे असें वाटत होतें. महंमदघोरी-समोर त्यानें जो जबाब दिला त्यांतही असेंच सांगि-तलें कीं, "एक मोठा विक्राळ भयंकर सैतान येऊन तो कैदीस घेऊन पळून गेला आणि त्यानें माझ्यावर एक लाथ मारून मला शंभर कोस दूर फेंकून दिलें-नंतर दुसऱ्या एका सैतानानें उचलून मला येथें आ-णून टाकलें."

———

## प्रकरण २८ वें.

### पहिल्या लढाईतील त्रेधा!

चंद कवि सुटून गेला हें वर्तमान ऐकतांच महम्मदघोरी फार घाबरला. तो ह्मणाला, "अल्ला! दैव प्रतिकूळ होऊन जर आमचे लोक कैद झाले, तर यावेळीं पृथुराज कोणासही जिवंत ठेवणार नाहीं. गिजनीस जाऊन हें वर्तमान कळविण्यास एकही मनुष्य राहणार नाहीं." पुनः तो हात चोळीत चोळीत ह्मणाला, "सैतान! या अल्ला! काय मुसीबत! मी एवढा वेळ चंद्रपतीस कां जिवंत राखलें? त्याचा तेव्हांच कां वध केला नाहीं?" आपल्या मनास शांत करण्यासाठीं तो पुनः ह्मणाला, "जर युद्धांत माझा जय झाला, तर याचा मोबदला घेईन! पण आतां चंदकवि खात्रीनें दिल्लीस जाऊन तेथून पृथुराजाकडे जाईल. त्यानें विजयसिंगाचा वृत्तान्त त्यास सांगितला ह्मणजे तो त्याचा शिरस्च्छेद केल्याशिवाय राहणार नाहीं. तो एक वेळ गेला ह्मणजे आमचा उजवाच हात गेला! आणि या वेळीं पराजय पावून मागें गेलों ह्मणजे पुनः इकडे येण्याची आशाच नको! सात वेळ कैद होऊन

आतां आठव्या वेळीं कैद झालें तर आपल्या देशास कोणत्या तोंडानें जाऊं? विजयसिंगाकडून तर खबर मिळाली आहे. आतां दिल्लीकडे जावें हाच उत्तम मार्ग. कारण, त्यामुळें पृथुराजास युद्धाची तयारी करण्यास सवड सांपडणार नाहीं. त्यानें दोन महिन्यांची मुदत मागितली आहे, पण आपल्या फायद्यासाठीं या मुदतीपर्यंत वाट पाहतां येत नाहीं." असा विचार करून त्यानें दिल्लीवर चाल करण्यास सेनापतीस आज्ञा दिली.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं मध्यरात्रीं तीस हजार स्वार व चाळीस हजार पायदळ घेऊन सेनापति, पृथुराजाच्या सेनेपासून थोड्याशाच अंतरावर येऊन उभा राहिला. तो इतक्या सावधगिरीनें तेथें आला होता कीं, त्याची चाहुलसुद्धां कोणास समजली नाहीं. ठाणेश्वरच्या मैदानांत येऊन त्यानें सेनेचे चार भाग केले, व एका भागांतील लोकांस तेथील झाडींत लपण्यास सांगून बाकी सैन्य घेऊन रजपूत सैन्यावर चाल केली.

विजयसिंगाच्या कुटिलतेमुळें रजपुतान्यांतील बरेच राजे आले नव्हते; फक्त दोन तीन आले होते. बाकीचे न येण्याचें कारण केवळ द्वेष, वैर, स्पर्धा, व स्वार्थपरायणताच होय. कित्येक समजले कीं पृथुराज युद्धकार्यास एकटाच समर्थ आहे; कित्येक ह्मणाले, तो गर्वानें फुग-

लेला आहे, तेव्हां त्याचा गर्व उतरला पाहिजे; आणि कित्येक जयचंद्राच्या सांगण्यावरून युद्धास आले नव्हते. असें असतांही पृथुराज आपल्या सेनेस सज्ज करून युद्धास तयार झाला होता. ठाणेश्वरास त्यानें मुक्काम केला होता. त्या ठिकाणीं सर्व सेना असावध असतां एका दुतानें त्वरेनें येऊन यवन आल्याची बातमी दिली. त्याबरोबर पृथुराजाची सेना लगेच सावध होऊन यवनसेनेशीं टक्कर मारण्यास तयार झाली. तें पाहून शहाबुद्दिन चकित झाला, परंतु तो मुळींच खचला नाहीं. कागल नदी—दृशद्वती नदी उतरून यवनसेना अकस्मात् पानिपतच्या मैदानांत येऊन उभी राहिली. त्याच वेळीं रजपुतांच्या हातांतील भालेही झळकूं लागले. एका बाजूस यवनसेना हातांत तरवार, भाले, धनुष्य व पाठीवर ढाल आणि बाण घेऊन उभी आहे, व दुसऱ्या बाजूस प्रचंड पर्वतोपम रजपुत सेना उभी आहे. मुसलमानांचें सैन्य भरतखंडांतून क्षत्रिय बीजाचा नाश करण्याचा संकल्प करून उभें आहे, व " अल्लाहो अकबर " असा जयघोष करीत आहे; इकडे धनुर्धारी रजपुत सैन्य यवनसंहार करण्यास उभें आहे व त्याच्या आजूबाजूस तोफांच्या रांगाच रांगा लागून राहिल्या आहेत.

सविस्मय झालेला शाहबुद्दिन सैन्यापुढें येऊन

ह्मणाला, "तरवारीवाले तुह्मी पुढें व्हा," त्यानें स्वतः "अल्लाही अकबर" असा शब्द केल्यावर दशदिशा कंपायमान करणारा प्रतिघोष होऊन आकाश दुमदुमून गेलें; व त्याबरोबरच मुसलमान सैन्य "दिन दिन" करीत पुढें सरसावलें. रजपुत लोकही तेवढ्याच जोरानें "हर हर महादेव! जय आशापूर्णा! जय पृथुराज! जय समरसिंग!" असा उन्नाद करूं लागले. लगेच तोफांचा आवाज होऊं लागला, व सैन्यांत कापाकापीही सुरू झाली. रणक्षेत्र भयानक होऊन गेलें. कांहींचीं डोकीं पटापट खालीं पडूं लागलीं व कांहींचे हातपाय पडूं लागले. तोफांच्या गोळ्यांनीं व बंदूकांच्या बारांनीं यवनसेनेंतील लोक खालीं पडत असतांना त्यांच्या आरोळ्यांनीं रणक्षेत्र दणाणून गेलें. रजपुतसेना पुढें पुष्कळ होती, परंतु मागें फार थोडी होती. सेनेच्या मध्यभागाचा नायक पृथुराज होता. त्याच्या डाव्या बाजूस मेवाडची सेना होती व उजव्या बाजूस इतर राजांच्या सैन्याबरोबरच युवराज कल्याणसिंग होता. मागें विजयसिंग होता. सेनेच्या ज्या भागाची हार तुटेल त्या भागास माणसांची मदत करण्याचें काम त्यावर सोंपविलें होतें.

अकस्मात् हल्ला करण्याची युक्ति निष्फळ झाली असें जेव्हां शहाबुद्दिनानें पाहिलें, तेव्हां त्यानें दुसरी

युक्ति काढली; पण ती सफल होण्यापूर्वींच रजपुत-सेनेनें यवनाचे सहा हजार लोक कापून काढिले व रजपुतांचे अकराशें मरण पावले. येवढ्या सुमारास प्रातःकाल झाला, त्याबरोबर रजपुतवीर जास्त सावध होऊन मोठ्या वेगानें यवनसेनेचा संहार करूं लागले. त्यांनीं पहिल्या सपाट्यासच त्यांची पहिली तुकडी कापून टांकली. तोफांच्या माऱ्यापुढें यवनांस दे माय धरणी ठाय होऊन गेलें. त्यांचा टिकाव लागेनासा झाला. "मार मार! काप काप! जय भवानी! हरहर शंकर!" असा घोर घोष करणारे रजपुत लोक, मुसलमानांच्या तोंडांतून "अल्लाही अकबर" असे शब्द पूर्णपणें बाहेर निघण्यापूर्वींच त्यांस अल्लाकडे पोंचवीत होते! इतक्यांत कुमार कल्याणसिंगानें आपलें सैन्य पुढें आणून तीरांचा वर्षाव केला. त्याबरोबर यवनदल घाबरून गेलें. महंमद घोरी सैन्यास पुढें आणण्याचा प्रयत्न करीत होता, पण तें मागेंच हटूं लागलें. महंमद सेनेपुढें आला व तरवार परजवून पृथुराजाच्या सेनेस वेरा देण्यास आग्रह करूं लागला. पण क्षत्रियांच्या तरवारींनीं त्यांचीं मस्तकें कागदांच्या तुकड्यांप्रमाणें पटापट हवेंत उडूं लागलीं! शिपाई लोक किती मेले यांचा तर पत्ताच लागेना.

हा घोर संहार पाहून महंमद घोरी, पृथुराजाची जी

सेना घेऱ्यांतून सुटली होती तिच्याजवळ आला व सेनेच्या मध्यभागीं प्रवेश करून त्यानें घोर संग्रामास आरंभ केला. पण या वेळींही त्याची युक्ति फलवती झाली नाहीं. रजपुतसेनेस घेरण्याचा प्रयत्न करीत असतांनाच रजपुतांच्या चातुर्यामुळें त्याचीच सेना उलटी घेऱ्यांत सांपडली. समरसिंग व कल्याणसिंग यांनीं तिचा संहार करण्यास आरंभ केला. घोड्यांच्या व पायदळांच्या आवाजामुळें, जयजयकाराच्या नादामुळें, तोफांच्या भडक्यामुळें, तरवारींच्या खणखणाटामुळें, तीरांच्या सणसणाटामुळें, नभोमंडल गाजून गेलें. आकाश धुळीनें व्याप्त झालें. धूलिपटलामुळें सूर्य दिसेनासा झाला. सर्व दिशा प्रलयकालवत् कोपायमान झाल्या. चारी बाजूंनीं अंधकार पडला. तोफांचा व रणवाद्यांचा आवाज एकवट होऊन गेला. आणि तुमुल युद्ध चाललें असतां सेनेच्या कोलाहलानें दिशादशक गर्जनामय होऊन गेलें.

रजपूतांनीं खूप गाजविली ! पृथुराजानें समोरून, कल्याणसिंगानें डाव्या बाजूकडून, व समरसिंगानें दोन्ही बाजूंनीं यवनसेनेस घेरलें. यवनसेना त्या घेऱ्यांत अशा विलक्षण रीतीनें सांपडली होती कीं, त्यावेळीं चौथ्या बाजूनें विजयसिंगाच्या सैन्यानें घेरा दिला असता तर त्यांतून एकही मनुष्य गिझनीस जाण्यासाठीं जिवंत राहिला नसता. यवनासाठीं दु-

सऱ्या दिवशीं सूर्यच उगवला नसता! पण मातृद्रोही—देशद्रोही विजय आपल्या सेनेस घेऊन पृथुराजाच्या मागेंच निश्चित राहिला! या वेळीं मोठा कोलाहल करून रजपुत सेना युद्धास जाण्यास प्रवृत्त झाली; पण तिचा उत्साह मंद करण्याच्या हेतूनें तो ह्मणाला, "अजून वेळ आला नाहीं"!!

महंमद घोरीची सेना तीनही बाजूंनीं घेरून रजपुत लोक तिचा नाश करीत आहेत असें जेव्हां तातारखानें (शहाबुद्दीनाचा सेनापति) पाहिलें तेव्हां त्यानें बिगुल फुंकून आपल्या लोकांस मागें वळण्याची खूण केली. चौथी बाजू रिकामी होती. त्या बाजूनें प्रथम शाहाबुद्दीनानें पळ काढला व त्याच्या मागून यवनसेना पळूं लागली. रजपुत सेनेनें त्यांचा पाठलाग करून अनेक यवनांच्या रक्तानें कागल नदीस रक्तनदी बनविलें!

यवनांचा संहार होतांच रजपुतसेना जयवाद्यांचा कर्णमधुर ध्वनि ऐकत ऐकत छावणींत आली. रात्रीं महादेवाची व आशापूर्णेची पूजा करून तिनें मोठा आनंद केला. दुसऱ्या दिवशीं तीनही सेनापतींनीं सैन्यास सज्ज करून युद्धाची तयारी केली. सैन्य तयार होतांच कल्याणसिंग आणि पृथुराज राणीस व रुपावतीस भेटण्याकारितां तंबूंत गेले.

———

# प्रकरण २९वें.

## प्रेमाविर्भाव.

ठाणेश्वर येथील छावणीच्या शेवटास पट्टराणीचा तंबू होता. त्याच्या मध्य भागीं एक सुवर्ण मंचक होता व त्यावर उषावती बेशुद्ध होऊन पडली होती. तिच्याकडे पाहून राणी विलाप करीत होती. रात्र जरी संपली होती, तरी अजून सूर्यकिरण पडण्यास सुरवातही झाली नसल्यामुळें तंबूंत दिवा पेटत होता. इतक्यांत कल्याणसिंग व पृथुराज तेथें आले.

तंबूंत येतांच कल्याणसिंगास विभ्रम होऊं लागला, व तो उषावतीच्या निर्जीव, निर्दोष मुखमंडलाकडे एकसारखा पाहूं लागला. त्यावेळीं त्याचें हृदय छिन्न-भिन्न झालें, व त्याच्या मनांत अत्यंत परिताप उत्पन्न झाला. तो विचार करीत करीत एक वेळ नेत्र झांकी, व पुनः उघडी! उषावती मृदु शय्येवर मूर्च्छागत पडली आहे असें पाहून त्याच्या अंतःकरणावर मोठा आघात झाला. तिच्या या दुर्वह स्थितीचें कारण तोच होता. ज्याप्रमाणें कुठारप्रहारामुळें कोमल लतेचा उत्पात होतो, त्याप्रमाणें त्याच्या निष्ठुर शब्दांमुळें तिचें कोमल

हृदय छिन्नविच्छिन्न होऊन गेलें होतें. त्यामुळें तो वेड्यासारखा, भ्रमिष्टासारखा, समाधिनिष्ठासारखा उपावतीचें प्रातःशशीसम मलिनकान्ति मुखमंडल एकसारखा पाहूं लागला. तो शोकाग्नीमध्यें जळून जाऊं लागला. त्याची ती शोकमूर्ति पाहून, तो हताश होऊन उभा राहिलेला आहे असें एखाद्या बालकासही वाटलें असतें.

एकुलत्या एका कन्येची अशी अवस्था पाहून पृथुराजही उदासीन होऊन उभा राहिला होता. तरी त्यानें आपलें दुःख झांकलें होतें. तो एकही शब्द बोलत नव्हता. कांहीं वेळ गेल्यावर तो ह्मणाला, "प्रिये! या हृदयविदारक प्रसंगीं क्षत्रियांनीं धीरच धरला पाहिजे. क्षत्रियांच्या कुळांत जन्म घेऊन, स्वदेशसंरक्षण केलें नाहीं तर पुरुषांपेक्षां दगड होणें फार बरें. देशरक्षण व मातृलज्जारक्षण हा क्षत्रियांचा प्रधान धर्म होय, व तोच पाळण्यासाठीं मी आतां जात आहें. क्षत्रियांवर अनेक संकटें आलीं, त्यांच्यावर अनेक वज्रप्राय दुःखें पडलीं, त्यांच्यावर आकाशही तुटून पडलें, तरी या धर्मकार्यप्रसंगी त्यांनीं उत्साह सोडतां कामा नये. प्रिये! चक्रवर्तिनी! मी आतां जातों. देवी आशापूर्णा—जगदंबा तुझें रक्षण करो! कोणतेंही संकट आलें तरी त्यांतून तुला बचावो! मी आतां माझी प्राणाधिक पत्नी व कन्या तिच्याच स्वाधीन करतों!"

राणी उषावतीचें मुख पाहून रडत होती. त्यामुळें तिनें कांहीं शब्द ऐकले, कांहीं ऐकले नाहींत. ती रडत रडत ह्मणाली, "प्राणनाथ! या वेळीं आपणास गृहलक्ष्मी सोडून जाणार आहे असें दिसतें. महादेवी महालक्ष्मी यावेळीं आपल्यावर निर्दय झाली आहे. प्राणनाथ! माझी मनोवृत्ति बदलून गेली आहे, व मला अशी शंका येते कीं या प्रसंगीं आपला जय होणार नाहीं." पृथुराजानें कांपत विचारलें, "हें काय बोलत आहेस? या मंगल प्रसंगीं अशी वाणी काय काढतेस? कालच एका सपाट्यासरशीं या मुसलमानांची खोड मोडली आहे, आणि आतां पराजयाची गोष्ट! शोकानें व्याकुल झाल्यामुळेंच तूं आज क्षत्रियांच्या वीरतेविषयीं शंका घेत आहेस. आता, तूं ह्मणतेस त्याप्रमाणें झालें, अधर्माचा जय झाला, तर ध्यानांत ठेव, मी जिवंत मागें परतणार नाहीं. जय मिळवीन तर हें मुख तुला दृष्टीस पडेल, नाहीं तर—"

इतक्यांत राणी ह्मणाली, "हाय हाय! जगदंबा आपलें सर्व संकट निवारण करो! प्राणनाथ! आपला पराजय व्हावा असें स्वप्नांतसुद्धां मी इच्छीत नाहीं. पण आपल्याबरोबर मलासुद्धां यावयास मिळत नाहीं ह्मणूनच मला दुःख होतें. या लोकांतील सुख इष्ट आहे असें मुळींच नाहीं. स्वर्गीचें सुख तेंच खरें सुख. रण-

क्षेत्रांत आपण मृत्युवश झालां तर आपल्यामागून मीं तयारच आहें. चला, म्लेंच्छांचीं काळिजें चिरा, आणि विजयशाली व्हा. रणक्षेत्रांत असतांना आमचा विचार आणूंच नका. क्षत्रिय सुन्दरी आपलें रक्षण करण्यास समर्थ आहेत!"

हा वेळपर्यंत कल्याणसिंग एखाद्या समाधिस्थासारखा उभाच होता. तो मनांत म्हणाला, "प्रिये उषावती! आतां तुझें निर्दोष मुखमंडल मी कोठें पाहीन? हे ईश्वरा, हें काय केलेंस? कल्याण, प्रजेचा आवडता, सर्वांचें रंजन करणारा, सर्वांचा स्नेही, सर्वांचें कल्याण करणारा, तो उषावतीचें अकल्याण करणारा, तिचा शत्रु झाला अं! प्रिये उषावती! तूं माझ्या अपराधाची क्षमा करशील काय? काय मी मूर्ख, निर्दय, पापी, विचारशून्य झालों नाहीं काय? मीच तुला मृत्युवश केलें नाहीं काय? तुझ्या सुखवैभवाचा नाश केला नाहीं काय? खरोखरच, हें शरीर दुरात्म्याचें स्थान आहे. ही जीभ कापण्यासच योग्य आहे! हा हात–ज्यानें उषावतीस झिडकारलें तो हा हात अपवित्र झाला आहे. हे जिव्हे, तूं तुटून जा. हस्ता, तूं सुद्धां त्याचाच मार्ग पत्कर. हे शरीरा, तूं एकदम भस्म होऊन जा कसें! प्रियेशिवाय तूं सुखाची आशा कशाला बरें करतेंस? बिचारी उषावती! निर्दोष उषावती! दुःख,

दया, मूर्खता, विरह इत्यादिकांमुळें मी खुशाल आत्म-घात करण्यास तत्पर झालों असतों. परंतु युद्ध करण्यास भीति वाटत असल्यामुळें यानें आत्मघात केला असें लोक ह्मणतील ह्मणूनच मी प्राण धरून राहिलों आहें!" याप्रमाणें तो शोकवश व गद्गदितकंठ होऊन एकसारखा रडत होता. कांहीं वेळानें तो पुनः मनांत ह्मणाला, "हे ईश्वरा, माझ्या अभाग्यामुळेंच आज ही कुसुमलतिका सुकून जात आहे. पण या अपराधा-साठीं मी कोणतें प्रायश्चित्त घेऊं? मी पूर्णपणें दोषी आहें. या पृथ्वींत माझ्यासारखा पापी, अपराधी, कोणीही नसेल. उपावतीच्या प्रस्तुत स्थितीचें कारण मीच. ती मला शिरोमाणि मानीत होती. तिच्या सुखानें मी आल्हादित होत असें, व ती मलाच सुख देण्यासाठीं प्रयत्न करीत असे. पण मी मात्र तिच्यावर विश्वास ठेवला नाहीं! हे चितोडाधिष्ठात्री देवी! मी या पापाबद्दल कोणतें प्रायश्चित्त घेऊं? हे देवी! मला योग्य शिक्षा कर. या देहास भस्मीभूत कर. या पापाबद्दल मला नरकाशिवाय दुसरी जागा मिळ-णारच नाहीं; तरी मला जें आतां दुःख होत आहे तें नरकाहूनही अधिक होय. पण हे देवी! आतां मला प्रार्थना करण्याचा अधिकार आहे काय? तुझें पवित्र नांव घेण्यास मी पात्रच नव्हें. मी कलंकित झालों

आहें. तरी मोठ्या संकोचानें एवढीच प्रार्थना करतों कीं, एकवेळ उषावतीचें रक्षण कर, ह्मणजे ती मला माझ्या अपराधाची क्षमा करील. मी तिच्या हृदयांत अग्नि पेटविला आहे, तर आतां त्या ठिकाणीं तूं अमृतजलाचें सिंचन कर."

नंतर उषावतीकडे एक वेळ दृष्टि करून व पुनः लगेच ती दुसरीकडे वळवून तो म्हणाला, "अरे! आतां हिच्या मुखमंडलाकडे पाहण्याचा मला अधिकारच नाहीं. ही पवित्र पुतळी माझ्या प्रेक्षणानें अपवित्र होईल! मी विश्वासघातकी, स्त्रीहन्ता आहें. आतां युद्धच! बस्, तेंच आतां माझें मोक्षसाधन. रणक्षेत्रांत जाऊन प्राणांची आहुति देणें हेंच खरें प्रायश्चित्त! पण हाय हाय! मी अपराधी होऊन मरूं काय? छे छे. मी हिची क्षमा मागूनच मरेन. मी क्षमेस पात्र नाहीं, तरी ही क्षमावंती सद्गुणसंपन्न आहे. ती माझ्या अपराधाकडे लक्ष्य न देतां मला क्षमा करील! तरी मी समरक्षेत्रांत प्राणाहुति देणारच; मग देवताही संतुष्ट होतील. पण मी उषावतीजवळ कोणत्या प्रकारें क्षमा मागूं? ही तर निश्चेष्ट पडून मृत्यूची वाट पहात आहे. हाय हाय!" त्याला चारी दिशा शून्यमयी दिसूं लागल्या, त्याचें डोकें फिरूं लागलें, व तो, क्षमा मागण्याकरितांच कीं काय कोण जाणे, राजकन्येच्या चरणांजवळ पडून मूर्च्छागत झाला!

कल्याणसिंगाची अशी अवस्था पाहून पृथुराज घाबरून गेला. तो त्याच्याजवळ गेला, व त्याच्या कपाळावर हात ठेवून ह्मणाला. "कल्याण! प्राणाधिक कल्याण!" पण कल्याण शुद्धीवर असल्यास ना उत्तर देणार! पृथुराजाच्या एका बाजूस प्राणाधिक कन्या उषावती मृत्युशय्येवर पडली आहे, दुसऱ्या बाजूकडे राणी शोकाकुल झाली आहे, तिसऱ्या बाजूकडे पुत्रतुल्य वीरकेसरी कल्याणसिंग मूर्च्छागत झाला आहे, व चवथ्या बाजूस यवनांचा संहार करण्यास सज्ज होऊन सर्व सैन्य उभें आहे! इतक्यांत "यवन आले! यवन आले!!" अशी सैन्यांत अकस्मात् गुरुगर्जना झाली. तो भयानक शब्द त्याच्या कानांतून आरपार निघून गेला! सर्व संकट आपल्यापुढें उभें आहे असें त्यास दिसलें. यवन लोक चाल करून आले हें पाहून पृथुराज राणीस ह्मणाला, "आतां मी येथे उभा राहूं शकत नाहीं. यवन लोक आलेसे वाटतात. तूं कल्याणास व उषावतीस सांभाळ. मला विलम्ब करतां येत नाहीं. कारण, प्रेम हें क्षत्रिय धर्मापेक्षां प्रबळ आहे, व प्रेमांत सांपडलों तर धर्माची अवज्ञा केल्यासारखें होईल." राणी रडत रडत ह्मणाली, "मी एकटी युवराजास व उषावतीस कशी सांभाळूं? आपण गेल्यास मी विशेष घाबरून जाईन, व

युद्धांत—"राणीचें वाक्य पुरें झालें नाहीं तोंच पृथुराज ह्मणाला, "भगवती कात्यायनी तुझें रक्षण करील! अजून क्षत्रियकुलदेवीला नीज लागली नाहीं! धर्मच आपला साह्यकारी आहे." राणी ह्मणाली, "पण—" पृथुराज ह्मणाला, "आतां पण बीण कांहीं नको. तूं आतां रडून माझा उत्साह कमी करूं नकों." राणी ह्मणाली, "क्षत्रियस्त्रिया वीरपतीचा समरोत्साह कधींही मंद करीत नसतात. मी आपला खोळंबा करीत नाहीं. मात्र इतकेंच म्हणतें कीं, युवराज सावध होईपर्यंत आपण राहावें. इतक्यांत कांहीं अनिष्ट होणार नाहीं. तशांत तशी भीति वाटत असल्यास आपण जावें."

हें बोलणें संपतें न संपतें तोंच कल्याणसिंगानें एक दीर्घ निःश्वास सोडला. दासींनीं त्याच्या मुखावर व नेत्रांवर गुलाबपाणी सिंचन केल्यावर तो सावध झाला. नंतर पृथुराज राणीस ह्मणाला, "कुमाराची मूर्च्छा गेली आहे." तें पाहून राणीनें प्रेमपूर्ण हृदयानें कल्याणास विचारलें, "कल्याण! राजकन्येची स्थिति पाहून तुला मूर्च्छा आली काय?" पण तिचें बोलणें न ऐकतां "भगवती शैलसुते! क्षत्रिय कुलरक्षिणी! माते!" याप्रमाणें तो बडबडूं लागला. तें पाहून राणी घाबरली व त्याचा हात धरून व त्याच्या मुखावर हात फिरवून ह्मणाली, "कल्याण! कल्याण! हें काय?" या-

प्रमाणें ती मोठमोठ्यानें त्यास विचारूं लागल्यामुळें तो शुद्धीवर आला, व राणीस पाहून बराच लाजला. त्याचे डोळे पुनः झांकले व तो पुनः बडबडूं लागला—"भगवती शैलसुते! जर मी जन्मापासून आजपर्यंत तुझी सेवा केली असेल तर उपावतीस एक वेळ सावध करें. मी एक वेळ माझ्या अपराधाची क्षमा मागेन, व माझ्या हृदयास तृप्त करीन." असें बोलत असतांना त्याचे ओंठ कांपूं लागले, डोळ्यांतून अश्रु येऊं लागले, व ते गालांवरून भूमीवर पडूं लागले. त्यानें अश्रुपूर्ण लोचनांनीं, व्यथित हृदयानें, व्याकुल दृष्टीनें उपावतीकडे पाहिलें, पण तिचें वदनकमल सुकून गेलें आहे असेंच त्यास दिसलें. त्यानें एक दीर्घ निःश्वास सोडला. त्याचें हृदय स्तंभित झालें, त्यास कांहीं ऐकूं येईनासें झालें, कांहीं दिसेनासें झालें!

परंतु तो या अवस्थेंत जास्त वेळ राहिला नाहीं. थोड्याच वेळांत त्याचें नष्ट झालेलें चैतन्य—गेलेली बुद्धि गेलेलें ज्ञान पुनः आलें. शरीरांत रक्त धांवूं लागलें, निर्जीव इंद्रियें सजीव झालीं, व तो विचार करूं लागला. पुनः चिंतेनें त्याच्यावर छाप घातली. तो विचारवश होऊन ह्मणाला, "अरे! आज हें सुन्दर मुखमंडल इतकें कमें सुकून गेलें? हिचा सुमधुर कंठ, कोकिलेमारखा मधुर कंठ गेला कुठें? हिचे प्रेमपूर्ण नेत्र

कां झांकले आहेत? आज राणीचें हृदय शून्य-चिन्तातुर कां दिसत आहे? दिल्लीश्वराचें मुखही कां शोकपूरित झालें आहे? हाय! आज ही हृदयरमणी मृत्युसेवन करीत असल्यामुळेंच हा देखावा मला दिसत आहे! ह्या देखाव्यास करण कोण? हा पापी, मूर्ख, ह्या सर्वांचें कारण आहे. आतां मी जाईन व बाणांच्या समोर उभा राहीन. म्हणजे या पीडेंतून, या पापांतून, या विरहवेदनांतून सुटेन. मूर्खपणानें केलेल्या कृत्यासाठीं असेंच प्रायश्चित्त पाहिजे. या नशिबांत लिहिलें आहे तें कसें खोटें ठरेल? हें हृदय तर मरण पावलेंच आहे; आतां शरीर मरण पावलें पाहिजे. जिवा! जा, तूं आपल्या मार्गानें जा. तुझ्या कृत्याचें प्रायश्चित्त घे. उषावती! प्रथम तूं जा!"

कल्याणसिंगाच्या मनांत असे विचार येत आहेत इतक्यांत पृथुराज त्याच्या कानांत ह्मणाला, "युवराज कल्याण! मेवाडचा सूर्य व समरसिंगाचा पुत्र आज बायकांप्रमाणें अधीर होऊन रडतो, व युद्धास जाण्याचें चुकवितो हें काय? हा रणवाद्यांचा आवाज ऐक. हा कोलाहल तुला ऐकूं येत नाहीं काय?" कल्याणसिंग ह्मणाला, "महाराज! चला, मी आपल्या मागून येतों." कल्याणसिंग आणखी एक क्षण तिकडे राहिल्यास शोकपूर्ण होऊन युद्धास जाण्यास प्रवृत्त

होणार नाहीं असें वाटल्यामुळें पृथुराज कपटकोप आणून त्यास ह्मणाला, "काय, आज वीरवर कल्याणसिंग समरक्षेत्र सोडून स्त्रीवत् घरीं बसतो?"

कल्याणसिंगानें लाजून खालीं मान घातली, व राणीची आज्ञा घेऊन, पण निश्चेष्ट उषावतीच्या मुखाकडे मुळींच न पाहतां, तो विचार करीत करीत तंबूबाहेर पडला, व त्याबरोबर रणवाद्यें, सैन्यांतील कोलाहल, 'हर हर महादेव' व 'जय आशापूर्णा' हे शब्द त्याच्या कानीं पडले, व त्याच्या अंगांत एकदम वीरतेचा संचार झाला.

---

## प्रकरण ३० वें.

### कपटसंधि.

ज्या वेळीं पृथुराज आणि कल्याणसिंग पट्टराणीच्या तंबूत गेले, त्या वेळीं योगींद्र समरसिंग प्रातःसंध्या करण्याकारितां पुण्यवती दृशद्वती नदीच्या तीरावर बसला होता. त्याच्या बरोबर त्याच्या सेनेंतील आणखीही कित्येक लोक संध्या करीत होते. या वेळीं उषःकाल झाला होता. प्राची दिशा आपला

प्रिय पति आतां लवकरच येईल ह्मणून जणूं काय चित्रविचित्र वस्त्रें परिधान करून मोठ्या उत्सुकतेनें त्याची वाट पाहत होती. लतापल्लव हालविणारा, सरोवरांतील उदक कंपित करणारा, व दृशद्वतीच्या निर्मल जलांत तरंग उत्पन्न करणारा मंद समीर झुळ झुळ वाहत होता. तीरावरील मल्लिका व मालतीलतांवर मधुलोभानें भ्रमरभ्रमरीगण गुंजारव व पक्षीसमुदाय मोठ्या उल्हासानें मंजुल कलरव करीत होते.

समरसिंगानें ध्यानविसर्जन करून, डोळे उघडून लांबवर पाहिलें, तों दृशद्वती नदीच्या समोरील किनाऱ्यावर नीलमेघांप्रमाणें पसरलेलें लष्कर त्याच्या दृष्टीस पडलें, आणि कांहीं सेना गुपचुप नदी उतरून गेलेली आहे असें त्यानें पाहिलें. त्याबरोबर तो एकदम उठला आणि सेवकास भयसूचक बिगुल फुंकण्यास त्यानें हुकुम केला. लागलाच रणशृंगाचा आवाज झाला व कांहीं लोकांनीं पृथुराजाला ही खबर कळविण्याकरितां त्याच्या तंबूकडे धांव ठोकली. यवनसेनेस अवरोध करण्यासाठीं समरसिंगाचें सैन्य टोळी टोळीनें मैदानांत येऊन उभें राहिलें; आणि कांहीं लष्करानें तिचा संहार करण्यासाठीं दृशद्वती नदीकडे कुच केलें. यवनांचें अर्धें सैन्य नदींत होतें, व अर्धें नदी उतरून आलें होतें, त्याच्यावर समरसिंगानें जाऊन झडप घातली.

मुसलमानानींही त्याच्या सैन्यावर चाल केली, व त्याला हटविण्याचा खूप प्रयत्न केला; पण अचल आणि वीरभावानें परिपूर्ण अशी समरसिंगाची सेना जराही मागें हटली नाहीं. उलट तिनें इतक्या जोरानें प्रहार करण्यास सुरवात केली कीं, तिच्या माऱ्यापुढें यवन-सेनेस टिकाव धरतां आला नाहीं. यवनांच्या सैन्यांत ६,०००० माणसें होतीं, व समरसिंगाच्या सैन्यांत १३००० होतीं; असें असतांही एक तासपर्यंत समर-सिंगानें टिकाव धरला. तितक्या अवकाशांत त्याचीं पुष्कळ मनुष्यें घायाळ झालीं व पटापट भूमीवर पडूं लागलीं. तें पाहून तो वीरभद्राप्रमाणें आजानुबाहु वीर घाबरला, आणि त्यानें पुनः एकदां भयसूचक बिगुल फुंकलें, पण पृथुराज आला नाहीं. रजपूत सैन्य घाब-रलें आहे असें पाहून यवनदलास धीर आला आणि त्यानें त्याच्यावर चाल करण्याचा खूप प्रयत्न केला; पण मेवाडकरांनीं त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. ह्या वेळीं राणीच्या तंबूंत कल्याण मूर्छित झाल्यामुळें पृथु-राज घाबरून गेला होता. त्यास विलंब होण्याचें कारण समरसिंग न समजल्यामुळें, त्यानें पुनः एकदां जोरानें बिगुल फुंकावयास लावलें, त्याबरोबर पृथुराज आणि कल्याणसिंग आपापलीं सैन्यें बरोबर घेऊन तेथें दाखल झाले; आणि दुसरीकडून हत्तीवर चढवलेल्या लहान तोफाही आल्या.

क्षणार्धांत चामुंडरायानें (पृथुराजाचा एक प्रतापी सेनापति) सैन्याची व्यवस्था करून तोफांचा मारा सुरू केला. त्याच्या सपाट्यापुढें मुसलमान सेनेच्यानें पुढें येववेना इतकेंच केवळ नव्हे, तर तिच्यानें जागच्या जागींही टिकाव धरवेना. इतक्यांत समरसिंगानें "जय! आशापूर्णाकी जय!" असा घोर शब्द करून दोन्ही हातांनीं तरवार फिरवण्यास आरंभ केला. तो क्रोधसिंग बनला व कल्याणसिंग अकल्याणकर्ता झाला! पाप्यांचा नाश करण्याकरतां कोपायमान झालेल्या भवानीच्या सिंहाप्रमाणेंच जणुं काय पृथुराजाचा अश्व नाचूं लागला! पृथुराज आणि समरसिंग यांच्या तरवारी विद्युल्लतेप्रमाणें चालल्याच होत्या. आकाश गाजून राहिलें होतें, सैन्याच्या कोलाहलाचा मैदानांत भयंकर प्रतिध्वनि होत होता, रजपुतांनीं "जय शंकर, हरहर महादेव!" ह्या नांवांचा घोष चालविला होता व मुसलमान "अल्ला! अकबर!" असें मोठमोठ्यानें ह्मणत होते. याप्रमाणें एक तासपर्यंत चाललें. तरी एकही सैन्य मागें हटलें नाहीं. इतक्यांत पृथुराजाची तोफांची सेना येऊन पोहोंचली, व तिनें असा कांहीं मारा चालविला कीं त्यामुळें यवनसेनेस पळच काढावा लागला.

मध्यान्ह होतांच रजपूतसेना छावणींत पर

आली. त्या वेळीं ती अगदीं थकून गेली होती. संध्याकाळीं समरसिंगानें पृथुराजास भेटून रात्रीं विचार करण्याकारितां सभा बोलावली. समरसिंगाच्या तंबूंत सर्व सरदार जमा झाले. मध्यभागीं पृथुराज, त्याच्या दोन्ही बाजूंस समरसिंग, कल्याणसिंग, सामंत चामुंडराय आणि राजगुरू रामदेव, समोर विजयसिंग, अजितसिंग, समरसिंगाचा सहाय राजा नागोपति, चंदेरीपति, त्याचप्रमाणें सेनापति, वृद्ध मंत्री—विजयसिंगाचा पिता—आणि दुसरे सरदार, इतकी मंडळी तेथें होती.

सर्व जण आल्यावर समरसिंग ह्मणाला, " शाहबुद्दीन घोरीला मागच्या लढाईंत आह्मी आर्यधर्मानुसार जिवंत सोडलें, पण तें न स्मरतां तो आज पुनः आला आहे. दोन्ही दिवसांच्या लढाईंत त्याचा पराभव झाला आहे. पराजितावर शस्त्र धरणें हा रजपुतांचा धर्म नव्हे. बरें, तसें न करावें तर हे पुनः पुनः येऊन त्रास देतात! तेव्हां आतां करावें तरी काय?"

राजगुरु रामदेव ह्मणाला, " महम्मद घोरी जर मागें परतून जात असेल तर त्याला जाऊं द्यावें. पुनः लढाई करण्याचें कारण नाहीं; कारण, असमर्थ व थकून गेलेल्या शत्रूवर शस्त्र धरणें बरोबर नाहीं. मी अशी सल्ला देतों कीं, महम्मद घोरीकडे दूत पाठवून

त्यास असें कळवावें कीं, जर तूं देश सोडून निघून जाशील तर आह्मी तुझ्यावर दया करूं.'

चामुंडराय ह्मणाला, "मी शस्त्र धारण करणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली आहे. परंतु देशरक्षण करण्यासाठीं जर श्रीकृष्णानेंही सुदर्शन धारण केलें, तर मला माझा तिरकमठा घ्यायला कोणती हरकत आहे? तरवार मात्र मी कधीं हातांत धरणार नाहीं. महाराज जर आज्ञा करतील तर वाटेल त्याचे प्राण हरण करण्यास मी तयार आहें."

यानंतर कांहीं भाषणें होऊन शेवटीं समरसिंगानें अशी सल्ला दिली, "आतां आपण महम्मदघोरीकडे दूत पाठवा व त्यास असें कळवा कीं, जर तो गुपचुप मागें गेला तर त्यास जिवदान मिळेल." सर्व सभासदांस त्याचें हें ह्मणणें कबूल होऊन महम्मद घोरीकडे दूत पाठविण्याचें ठरलें.

इकडे महम्मद घोरी पुढें आपलें कसें होईल ह्मणून अत्यंत चिंतातुर होऊन बसला होता. त्याच्या शेजारीं तातारखां व गुलाम कुतुबुद्दीन बसले होते व पुढें काय करावें या विचारांत ते गढून गेले होते. इतक्यांत एक हिंदु दूत तेथें आला व ह्मणाला, "महाराज पृथुराजांनीं आपणास असें सांगितलें आहे कीं, 'आपणास आह्मी सात वेळ कैद केलें असतांही आ-

मच्या आर्यरीतीप्रमाणें सोडून दिलें होतें. आतां तु मचा हा आठव्या खेपेस पराभव झाला आहे. तरी जर तुमची निमूटपणें परत जाण्याची इच्छा असेल, तर आह्मी तुह्मास जाऊं देऊं," हा निरोप ऐकून शाहबुद्दिनाला अत्यंत आनंद झाला, आणि कृतज्ञतापूर्वक त्यानें ह्या तहाचा स्वीकार केला. पण त्यानें पृथुराजास असें सांगून पाठविलें कीं, "मी स्वतंत्र नाहीं. गिजनीला ही खबर पाठवून तेथून होकार येईपर्यंत मला मुक्काम उठवतां येत नाहीं. तोंपर्यंत आपण निश्चित राहावें. आपणास लवकरच काय तें कळवीन. दूत निघून गेल्यावर, महंमद घोरीनें विजयसिंगाचें यावर काय ह्मणणें आहे तें ऐकण्याकरितां आपला दुत संकेतस्थानीं पाठविला. विजयानें अशी सल्ला दिली कीं, "संधि करावा, व सैन्य परतून नेण्याची तयारीही दाखवावी. तसें केलें ह्मणजे रजपुत सैन्य निश्चित राहील. मग अकस्मात् त्यांच्यावर तुटून पडावें. एकदमच सगळें सैन्य घेऊन जाऊं नये. कांहीं सैन्य गुप्त ठेवावें व रजपुत सैन्य थकून गेलें ह्मणजे त्यास पुढें आणावें. ह्मणजे खात्रीनें जय होईल." विजयाच्या सुचनेप्रमाणें तीन दिवसांनीं शाहबुद्दीनानें पृथुराजास असें सांगून पाठविलें कीं, "गिजनी सरकारानें सन्धीचा स्वीकार केला आहे, आणि तुमचें

जें नुकसान झालें आहे, त्याबद्दल शंभर घोडे व दहा हजार मोहोरा ते पाठवून देणार आहेत." ह्या निरोपाबरोबर दूतानें पृथुराजास आणखी असेंही सांगितलें कीं, आह्मी तंबू देखील उठविले आहेत. हें वर्तमान रजपुत सेनेंत प्रकट होतांच सर्वत्र आनंद व्यापून राहिला.

महंमदानें पृथुराजासमक्ष आपला अधमदणा कबूल केला, पण पृथुराज समरसिंग व चामुंडराय यांपैकीं एकासही, आपल्या मंडळींत कोणी मुसलमानांस फितुर आहे कीं काय अशी शंका आली नाहीं. त्यांनीं शहाबुद्दीनाचें तहाचें बोलणें खरें मानून, उद्यां तंबू उठवून आपणास दिल्लीस परत जावयाचें आहे अशी सैन्यास वर्दी दिली. ही आनंदाची खबर ऐकून रजपुत सेनेनें ती रात्र आनंदांत घालविण्याचा निश्चय केला. सर्व जण एकमेकांस गाढ आलिंगन देऊं लागले. पुनः पिता, माता, स्त्री, मित्र, बंधु यांची गांठ पडेल या आशेनें सर्वांनीं एवढ्या मोठ्यानें आनंदध्वनि केला, कीं त्याच्या योगानें आकाशमंडळ दुमदुमून गेलें.

दुसरे दिवशीं सकाळीं पृथुराजानें 'आज रात्रीं देवी आशापूर्णेचें पूजन करून उद्यां रात्रीं सर्व सैन्यानें दिल्लीस परत जावें—मात्र उषावतीच्या आरोग्यासाठीं थोड्या लोकांनिशीं आपण तेथेंच राहणार'

असें सर्व सेनेस कळविलें. मध्यान्ह होण्यापूर्वींच सर्व सेना पूजेचें सामान आणण्यांत गुंतून गेली. कोणी फुलें आणण्यांत, कोणी दृशद्वतींचें निर्मल जल आणण्यांत, कोणी मूर्ति बनवण्यांत, याप्रमाणें सर्व सेना कांहींना कांहीं करण्यांत मग्न झाली होती. मंडपांत नवीन मूर्तींची स्थापना होत होती. रात्र पडतांच पूजेस सुरवात झाली. पूजा एक प्रहरपर्यंत चालली. इतक्यांत पश्चिमेकडील चंद्रलेखा क्षय पावली. चहूंकडे गाढ अंधकार पडला. आकाशांतील तारका व शिबिरांतील अग्नि यांचाच काय तो प्रकाश पडत होता. पवन मोठ्या सोंसाट्यानें वाहूं लागला. वृक्षशाखांवर पवनलहरींचा आघात होऊं लागला. व्याघ्र, सिंह, इत्यादि हिंसक पशूंच्या भयंकर गर्जनांनीं दशदिशा गजबजून गेल्या. सारांश, रणभूमीनें दिवसाप्रमाणें रात्रींही भयानक स्वरूप धारण केलें.

पूजा समाप्त झाल्यावर सर्व सैनिक आपापल्या तंबूजवळ बसून कोणी गप्पा मारूं लागले, कोणी महाभारत व रामायणांतील गोष्टी सांगूं लागले, कोणी लावणी, ख्याल, टप्पा ह्मणण्यांत लीन होऊन गेले. कोणी एकमेकांच्या दुःखांच्या, कोणी मुसलमानांच्या पराभवाच्या, कोणी स्वतःच्या संकटांच्या गोष्टी चालविल्या. कोणी एकटेच बसले होते व कांहींनीं

ईश्वराचें नामस्मरण चालविलें होतें. कोणी सुरापानांत गुंग झाले होते, व कित्येक 'हरहर शंभो!' ह्मणत भांग पीत होते. याप्रमाणें चहूंकडे आनंदोत्साहाशिवाय कांहींच दिसत नव्हतें!

अशा वेळीं एक गंभीर पुरुष देवीजवळ येऊन तिला प्रणाम करून, आणि अत्यंत दीन मुद्रेनें समाधी लावून तिच्यापुढें उभा राहिला. ह्या भयंकर वेळीं तो एकटाच काय तो अनाथाप्रमाणें दिसत होता. त्याचा निःश्वास आणि प्राण छातींतून बरोबरच बाहेर पडताहेत कीं काय असें दिसत होतें. तो आपलें दीन वदन वर करून प्रार्थना करी त्यावेळीं त्याची मुद्रा अधिकच गंभीर दिसे. मेवाडचा सूर्य समरसिंग, एकांत पाहून, देवीची प्रार्थना करण्यासाठीं आला होता. तो देवीच्या सन्मुख उभा राहून, नेत्र मिटून व हात जोडून ह्मणाला, "हे महादेवी! जगज्जननी! भगवती! क्षत्रियकुलरक्षिणी! माते आशापूर्णे! तूं प्रसन्न चित्तानें आज क्षत्रियांची आशा पूर्ण केली आहेस कीं नाहीं हें मला कळत नाहीं; पण आतां ती पूर्ण कर. हे माते! आमची तुझ्यावर पूर्ण भक्ति आहे. आह्मी तुझी जी सेवा केली आहे तिचा स्वीकार करून आमच्यावर दया कर! माते तूं सर्वांच्या अंतर्यामी आहेस! तर एकवार सदय नेत्रांनीं

माझ्याकडे पहा व माझ्या मनांतील भाव जाण! माते! तूंच सर्वांची मनःकामना पूर्ण करणारी आहेस." ह्याप्रमाणें प्रार्थना करून समरसिंगानें देवीस साष्टांग नमस्कार घातला. नंतर त्यानें उठून देवीच्या हास्यमय वदनाकडे पाहिलें, तों तिच्या दोन्ही ज्योतिमय नेत्रांतून अखंडित जलधारा वाहत आहे असें त्यास दिसलें. ती जलधारा तिच्या गालांवरून भूमीवर पडत होती व रक्ताप्रमाणें दिसत होती.

हा अद्भुत देखावा पाहून समरसिंग गर्भगलित झाला, त्याचें वदन निस्तेज झालें व त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. हें कांहीं तरी अमंगलसूचक असावें असें त्यास वाटून तो पुनः प्रार्थना करूं लागला, "हे देवी! आह्मी काय अपराध केला आहे? आमच्या हातून असें कोणतें पातक घडलें आहे कीं तूं आमच्यावर रुष्ट होऊन आमच्या मनांत भीति उत्पन्न करीत आहेस! देवी! क्षमा कर! आह्मी तुझ्या सेवेंत सदा तत्पर आहों." याप्रमाणें पुष्कळ वेळ आराधना केली तरी कोणत्याही रीतीनें तिच्या मलिन मुखकान्तीवर प्रसन्नतेचा भाव दिसला नाहीं. इतक्यांत एक अति मधुर व गंभीर शब्द झाला:—"हे भक्ता! मेवाडाधिपते समरसिंगा! आतां क्षत्रियसूर्य अस्ताचलावर आला आहे! शोक कां करतोस? ही पृथ्वी

आजपर्यंत कोणाची झाली नाहीं व होणारही नाहीं. मोठमोठ्या भूपतींचा तिनें त्याग केला आहे, मग तूं तो काय? ही भूमि, प्रतापी बलि, वेन, हिरण्याक्ष, राम, हरिश्चंद्र, नळ, रावण, मुचकुंद, आणि मांधातींकडे राहिली नाहीं, व विश्वंभर कृष्णाचा सखा जो अर्जुन त्यालाही ती मिळाली नाहीं. मग पृथुराजाची ती कथा काय! या भूमींत जे वीरवर असार संसारांतील मांयिक भावाचा त्याग करून स्वधर्मरक्षणासाठीं लढतात त्यांचेंच यशोगीत लोक गातात. वीर पुत्रा! रणांत बहादुरी कर. तीच तुझी कीर्ति उज्वल करील."* इतकें बोलून ती वाणी विराम पावली. नंतर समरसिंगानें निराश व उत्साहहीन हृदयानें पूजा समाप्त केली. मग तो देवीच्या देवळांतून बाहेर पडून तंबूंत आला, पण त्यानें ही हकीगत कोणास कळविली नाहीं. तो सर्व रात्र जागृत राहिला. त्यानें आपल्या सीसोडीयाच्या सैन्यास आज कोणीही निद्रा न घेतां सावधान चित्तानें देवीची प्रार्थना करावी अशी आज्ञा केली.

ज्या वेळीं समरसिंग व्याकुलचित्त होऊन ह्या अशुभ लक्षणाच्या फलाफलाचा विचार करीत होता, त्याच वेळीं दृशद्वती नदीच्या दक्षिण तीरावर देशद्रोही विज-

---

* चंद कवीच्या रासांतील सार.

यसिंग चिंतातुर होऊन बसला होता. तो क्षणांत मार्गे पाही व क्षणांत समोर दृष्टि करी. मध्यरात्र होऊन गेली होती, हिंसक पशु घोर गर्जना करीत होते, तरी त्यास भीति वाटत नव्हती; पण मागून येऊन आपणास कोणी पाहिल कीं काय याचें त्यास भय वाटत होतें. इतक्यांत नदीपलीकडून रजपुत वेषधारी तीन यवन हळू हळू त्याच्याजवळ आले. त्यानीं साशंक दृष्टीनें एक वेळ चहूंकडे पाहिलें. नंतर विजयसिंगाबरोबर कांहीं भाषण करून ते तिघेही चालते झाले, व विजयसिंगही हळू हळू शिबिरांत आला.

ह्या वेळीं पृथुराज आणि कल्याणसिंग मूर्च्छित झालेल्या उपावतीच्या पलंगावर बसले होते. पृथुराजास जय मिळाल्यामुळें सर्वांस आनंद झाला होता. परंतु कल्याण! हाय हाय! त्याची स्थिति फारच वाईट होती. त्याची मनःकामना व्यर्थ गेल्यामुळें त्याचें अंःतकरण विदीर्ण झालें होतें! रणांत मृत्युवश होऊन आनंद पावेन अशी जी त्यास आशा होती ती विफल झाल्यामुळें तो शोकमग्न झाला होता! त्यानें मृत्यूचा शोध केला, पण तो त्यास मिळाला नाहीं! पण जास्त विचारा अंतीं तो सहज मिळूं शकेल अशी त्याची खात्री झाली! आत्महत्या करण्याचा भयंकर विचार त्याच्या मनांत आला!

पण आणखी जरा दूरवर विचार केला तेव्हां तो त्यास मानवला नाहीं. तो मनांत ह्मणाला, "हा क्षत्रिय वीर आत्महत्या करणार काय! दुःखांतून सुटण्याकरितां आत्मघात करून दीन आणि मूर्ख ठरणार काय? असलें अधम कार्य माझ्या हातून कधींही होणार नाहीं. असें करून चितोडच्या राजवंशाच्या निर्मल कीर्तीस मी कलंक लावूं काय? नाहीं नाहीं! त्याच्यापेक्षां जिवंत राहून ह्या दुःखदावानलांतच मी निरंतर होरपोळत राहीन. जेथें सूर्याचा ताप अग्नीप्रमाणें प्रखर असेल, जेथें पशुपक्षी व तृणलताही नसतील, अशा निर्जन अरण्यांत, अथवा ज्यांतून निरंतर अग्नीचे लोट निघत असतात अशा ज्वालामुखी पर्वतावर जाऊन उषावतीच्या कल्याणासाठीं ईश्वराची प्रार्थना करीन! मी मरणार नाहीं. या देहाला त्याच्या पापाचें योग्य प्रायश्चित्त देईन. तसें केलें ह्मणजे कदाचित् परलोकांतील दुःखांचा नाश होईल. बस्स, असेंच करावयाचें." याप्रमाणें तो दुःखोदधींत गटंगळ्या खात खात उषावतीच्या मुखकमलाकडे एकसारखा पाहत राहिला.

इतक्यांत भयानक कोलाहलास सुरवात होऊन क्षणोक्षणीं तो अधिकाधिक होऊं लागला. तो ऐकून पृथुराजानें "हें पुनः काय?" ह्मणून कल्या-

णाकडे दृष्टि केली, व त्यास बरोबर घेऊन लागलाच तो तंबूच्या बाहेर पडला.

---

## प्रकरण ३१ वें.

### प्रेममूर्च्छा नव्हे, प्रेममृत्यु!

रात्र पुरी होऊन प्रभातकालास आरंभ झाला होता. राणी, मूर्छित होऊन पडलेल्या उषावतीचें मुख एकसारखें पाहत होती, व मधून मधून दीर्घ निःश्वास सोडीत होती. तिच्या नेत्रांतून अश्रुपूर येत होता. ती उषावतीचे विखुरलेले केश वारंवार नीट करीत होती, व मधेंच तिचें मुख पाहून मोहित होऊन हळूच तिचें चुंबन घेत होती. तिचें डोकें तिनें आपल्या मांडीवर घेतलें होतें, दासी तिचा ताप हरण करण्याकरितां वारा घालीत होत्या, केव्हां केव्हां तर राणी स्वतःही तिला वारा घालीत होती व अशी प्रार्थना करीत होती कीं, "हे ईश्वरा! तूं या कन्येस लवकर आरोग्य दे."

प्रभातकालच्या शीतल वायूमुळें उषावती किंचित् सावध झाली, आणि शून्य दृष्टीनें चहूंकडे पाहूं ला-

गली, तों अत्यंत निराश आणि शोकाकुल होऊन बसलेली राणी तिच्या दृष्टीस पडली. तें पाहून तिला फार आश्चर्य झालें. तिच्या शोकाचें कारण काय असावें तें तिच्या लक्षांत येईना. आई रडत आहे असें पाहून ती ह्मणाली, "आई, हें काय? तूं कां रडतेस?" इतकें बोलून तिनें राणीचा हात धरून आपल्या छातीवर ठेवला, आणि पुनः बोलण्याचा प्रयत्न करूं लागतांच ती पुनः मूर्च्छागत झाली.

थोड्या वेळानें तिनें तिचें डोकें उशावर ठेवलें. इतक्यांत उषावती अकस्मात् "पिता—युवराज!" असें ह्मणत उठली. तें पाहून राणी घाबरली आणि तिचें डोकें पुनः तिनें आपल्या मांडीवर घेतलें. तिला वाटलें कीं, तिच्या डोक्यास कांहीं तरी इजा झाल्यामुळेंच ती ओरडत उठली असावी; पण थोड्याच वेळांत ती स्वप्नावस्थेंत बडबडत आहे असें तिला समजून आलें. या वेळीं राजकन्या एक घोर स्वप्न पाहत होती. कल्याणसिंगाबरोबर आपण यमुना नदीच्या तटावर प्रेमकथा करीत आहें, व तो अश्रुपूरित नेत्रांनीं आपली क्षमा मागत आहे असें तिनें पाहिलें. त्याचें खिन्न वदन पाहून तिनें मनांतल्या मनांत त्यास क्षमा केली, पण लज्जेमुळें तिला तसें स्पष्ट बोलतां येईना. मात्र तिनें सुमधुर हास्य करून आपल्या मनांतील भाव प्र-

कट केला. गोष्टी चालल्या असतां कल्याण पुनः उषावतीच्या पायां पडून तिचे पाय धरूं लागला, त्याबरोबर लज्जेनें हांसत हांसत ती मागें सरली आणि ह्मणाली, "प्राणनाथ! उठा उठा! आपण माझी माफी कां मागतां? ही दासी आपणास माफी करण्यास पात्र आहे काय? आपण असा काय अपराध केला आहे तो मी माफी करणार? मला तर आपला कांहीं दोष दिसत नाहीं. तुह्मी माझे केवळ प्राण आहां!" हें ऐकून कल्याणसिंग आनंदांत लीन झाला, व तिलाही फार समाधान आलें. त्या दोघांच्याही आनंदास पारावार नाहींसा झाला.

इतकें पाहिल्यावर स्वप्नाचा देखावा बदलला. नंतर, नदींतून अनेक होड्या किनाऱ्यावर येत आहेत असें तिला दिसलें. त्या होड्यांतून अगणित मुसलमान शिपाई मोठ्या आवेशानें किनाऱ्यावर उतरले. त्यांच्या 'अल्लाहि अकबरच्या' कर्कश रवानें आकाश दणाणून गेलें. त्यांच्या अस्त्रांचा झणझणाट ऐकूं येऊं लागला. ह्या यवनांस पाहून कल्याणसिंगाचें क्षात्रियरक्त उसळूं लागलें. त्याच्या जवळच उषावती उभी होती तिची त्यास आठवण राहिली नाहीं. उषावतीस तशीच टांकून तो तीरवेगानें यवनांच्या सेनेंत घुसला. ह्याप्रमाणें यवनांच्या सेनेंत त्यानें अकस्मात् प्रवेश केलेला पाहून ती मूर्छित झाली.

पुनः स्वप्नस्वरूप बदललें! यमुनेच्या किनाऱ्यावर आपण मूर्छित पडलें आहें असें तिला दिसलें. पण तिचें जल आतां रक्तमय झालें होतें, व त्याचे तरंग तिच्या पायांवर येऊन आपटत होते. किनाऱ्यावर अनेक मुडदे पडले असून त्यांच्या मध्यभागीं ती पडली होती. कोल्हे, कुत्रे, गिधाड इत्यादिकांच्या टोळ्या त्यांच्यावर झडप घालीत होत्या. तें पाहून भीतीनें कांपत कांपत ती उठून बसली, तों एक भयानक देखावा तिच्या नजरेस पडला. आपला पिता पृथुराज कैद झाला आहे व त्याच्या हातापायांत बिड्या पडल्या आहेत, आणि ह्याच वेळीं राजमहालांतून आगीचे लोळ निघत आहेत असें तिनें पाहिलें. हा भीतिजनक देखावा पाहून तिला चक्कर आली व ती खालीं पडली. पडतां पडतां तिनें पाहिलें तों आपल्या शेजारींच कल्याण कुमाराचें प्रेत पडलें आहे. स्वप्नांत असा देखावा पाहूनच ती "पिता—युवराज!" असें ओरडत उठली होती.

तें पाहून राणी ह्मणाली, "लाडके उषे! तूं अशी कां घाबरलीस?" हें ऐकून उषावती सावध झाली, तिनें हळू हळू नेत्र उघडले आणि एक दीर्घ निःश्वास टाकून ती ह्मणाली, "आई! आई!" इतक्यांत पुनः राणी ह्मणाली, "लाडके, अशी घाबरतेस

कां ?" तेव्हां उषावती मृदु स्वरानें ह्मणाली, " आई, मला एक फार वाईट स्वप्न पडलें. त्यांत मा—पि—रे—ते—ते—" इतकें बोलत आहे तोंच तिचा कंठ सुकून गेला. तिच्यानें कल्याणाचें नांव घेववलें नाहीं. ती इतकेंच बोलली कीं, " ते कोठें आहेत ? त्यांस पाहण्याची मला फार इच्छा झाली आहे. मी स्वप्न पाहिलें त्यांत पिता--युवराज ! " उषावतीनेंच्यानें ज्यास्त बोलवलें नाहीं. तिचें तोंडच बंद झालें! आणि ती अगदीं निश्चेष्ट होऊन पडली.

थोड्याच वेळांत वैद्यराज आले. त्या दिवशीं राजकन्या बरेच वेळां सावध होऊन बोलली हें ऐकून त्यांस आश्चर्य वाटलें. तें सुलक्षण कीं कुलक्षण आहे हें त्यांस कळेना. राजकन्या ज्या दिवशीं निश्चेष्ट पडली होती त्या दिवसापासून आजपर्यंत ती सावध झाली नव्हती. पण आज ती बोलली तें आरोग्याचें चिन्ह होतें होतें कीं मृत्यूचें पूर्वलक्षण होतें त्याचें निदान वैद्यास करतां येईना. तरीही तो उत्साह दर्शवून ह्मणाला, " ' ईश्वरेच्छा बलीयसी'. त्याच्याच इच्छेप्रमाणें सर्व कांहीं होतें. पण आजचें चिन्ह मंगलकारी आहे. " नंतर तो उषावतीजवळ बसून तिच्या मुखाचा भाव सूक्ष्मपणें पाहूं लागला. त्यावेळीं तिचें मुखमंडल किंचित् हास्यामुळें विकसित दिसत होतें.

त्यानें पुनः पाहिलें तों तिचा अधरोष्ठ कांपत असून, ती जणुं काय बोलण्याचा प्रयत्न करीत आहे असें दिसत होतें. इतक्यांत ती ह्मणाली, "इंद्रभुवन–पारिजात–हेंच–युवराज–उठा–रे–हें मस्तक–!" इतकें बोलतांच ती श्रमित होऊन तिचे पुढचे शब्द कंठांतल्या कंठांत राहिले. थोड्या वेळानें उषावतीनें आपले दोन्ही हात वर करून आपल्या मस्तकाचे केश धरिले, मग हळू हळू कपाळास हात लावला, आणि तेथें सौभाग्यचिन्ह आहे असें पाहून ती हांसूं लागली. तें पाहून वैद्यराज ह्मणाला, "राणीसाहेब. राजबाला शुभ स्वप्न पाहत आहे. हें तरी एक सुचिन्हच आहे. तिला आतां हें मृत्तिकाभरण औषध द्या. आतां मस्तकावर दुसरें औषध लावण्याची गरज नाहीं. आज जें चिन्ह दिसलें तसेंच जर उद्यां सकाळीं दिसेल तर सात दिवसांत राजबाला पूर्ण आरोग्यवती होईल." हें ऐकून राणीस व दासींस आनंद झाला. नंतर वैद्यराज निघून गेला.

बरोबर दोन वाजतां उषावती पुनः सावध होऊन ह्मणाली, "मला फार तहान लागली आहे." राणीनें स्वतः सोन्याच्या झारींतून तिला पाणी पाजलें, तेव्हां ती ह्मणाली, "आई, मला आतां असें स्वप्न पडलें कीं मी येथून कोठें दुसऱ्या ठिकाणीं गेलें आहे. तेथें किती

तरी मजा आहे ह्मणून सांगू! तेथें अनेक पारिजातक वृक्ष व कनककमलें होतीं, पण तेथें तुह्मी कोणी नव्हतां. आई, तेथें तुह्मी मला भेटालना?" हें ऐकून राणीस फार दुःख झालें, पण तें व्यक्त न करितां ती ह्मणाली "भेटूं बरें!" उषावती ह्मणाली, "आई, बाबा कुठें आहेत? मला ते-ते" ह्या वेळीं तिला लज्जा उत्पन्न झाल्यासारखें दिसलें. युवराजाचें नांव तिच्यानें घेववलें नाहीं. राणी ह्मणाली, "ते तर रणांत गेले आहेत." उषावती दीर्घ निःश्वास टांकून ह्मणाली, "मग मला सांगून ते कसे गेले नाहींत?" राणी ह्मणाली, "तूं त्या वेळीं निजली होतीस" यानंतर उषावती कांहीं बोलली नाहीं. तिला कांहीं तरी वेदना होत असाव्या असें दिसलें. थोड्या वेळानें ती अडखळत अडखळत ह्मणाली, "आई, आतां माझ्यानें बोलवत नाहीं. पण मी विचारतें कीं मी तेथें जाऊन त्यांना भेटलें तर चांगलें कीं नाहीं?"

ह्याच शब्दांबरोबर तंबूच्या बाहेर एक अत्यंत भीतिप्रद ध्वनि झाला, व त्याबरोबर सर्व दासी घाब-रून जाऊन त्यांचें तिकडे लक्ष्य लागलें. राणीही घाब-रून गेली. मूर्छित उषावतीच्यादेखील कानांत तो शब्द पडला. इतक्यांत दोन तीन क्षत्रिय शिपाई धांवत धांवत राणीजवळ येऊन "चला-सर्व जण चला."

असें सांगूं लागले. तें ऐकतांच सर्व जण एकदम "काय आहे? काय आहे?" ह्मणून विचारूं लागल्या. तेव्हां ते शिपाई भीत भीत ह्मणाले, "जल्दी चला, चला लवकर! आतां बोलण्यास वेळ नाहीं. यवनांचा जय झाला आहे व ते लूट करण्यास छावणींत येत आहेत. चला, पालखी तयार आहे." राणीनें भयभीत होऊन विचारलें, "महाराज कोठें आहेत?" शिपाई ह्मणाले, "ते लढाईत पडले! गेले! आह्मी त्यांस पडतांना पाहिलें!"

हा वृत्तांत ऐकतांच राजकन्या बावरली, व डोळे उघडून चहूंकडे पाहूं लागली, इतक्यांत राणीनें विचारलें, "कल्याण व समरसिंग यांचें काय झालें?" कल्याणाचें नांव राजकन्येच्या कानांत पडतांच ती मोठ्या बळजबरीनें उठून बसली व शिपाई काय उत्तर देतात तें ऐकण्याकरितां फार उत्कंठित झाली. एक शिपाई ह्मणाला, "समरसिंग बलहीन झाला आहे, तरीही यवनांशीं टक्कर देत आहे, आणि युवराज कल्याण यांनें तर युद्धांत प्राणाहुति दिली! असें सांगतात कीं आपल्या विजयसिंगानेंच त्यांचा वध केला!" हें ऐकतांच उषावती भयंकर किंकाळी मारून ह्मणाली, "हाय हाय! प्राणनाथ! माझ्याकरतांच तुह्मी आपल्या प्राणाची आहुति दिली! माझा

अंत होईल या शंकेनेंच आपण या जगतांतील मायेचा त्याग करून, माझ्या पूर्वींच निघून गेलां! चला! मीही तुमच्या मागून आलेंच!" याप्रमाणें अत्यंत दीन स्वरानें विलाप करीत असतां ती धाडकन् बिछान्यावर पडली! पडतां पडतां "युवराज! माता! पिता!" हे शब्द तुटक तुटक बोलत तिनें नेत्र झांकले! ती रम्य मूर्ति चिरकालिक निद्रेंत लीन झाली!

प्राणत्यागसमयीं तिची मुखाकृति विशेष रम्य दिसंत होती—तिच्या मुखमंडलावर विलक्षण शांतिभाव प्रकट होत होता. तिचे अधरोष्ठ किंचित् स्फुट दिसत होते, व नेत्र अर्धे झांकलेले होते, त्यावरून तिला अजून कांहीं बोलावयाची इच्छा होती, पण तें बोलतां आलें नाहीं असें दिसत होतें. हें पाहून राणीच्या नेत्रांतून अखंडित जलधारा वाहूं लागली, व तिचा शोकातिशय तिला दुःसह होऊन ती मूर्छित होऊन खालीं पडली.

दासींनीं तिच्या अंगावर गुलाबपाणी शिंपडतांच ती हळू हळू सावध होऊन उठून बसली. पण शिपायाकडे लक्ष्य जातांच आपण कोणत्या स्थितींत आहें याची तिला आठवण झाली. ती आतां पतिविरहिणी, कन्याविरहिणी, राज्यविरहिणी झाली होती! यवनांच्या हातांत देश सांपडला आहे हें कळतांच तिची छाती फाटून गेली होती! भीतीमुळें तिला उठतां येईना,

बोलतां येईना, पाहतां येईना! तिच्या नेत्रांतून एकसारखी अश्रुधारा वाहत होती! आपल्या मृतकन्येस पोटाशीं धरून ती शोकसागरांत निमग्न झाली होती!

राणी बोलत नाहीं असें पाहून एक शिपाई ह्मणाला, "राणीसाहेब, कोलाहल अधिकाधिक होत आहे तेव्हां आतां विलंब करणें बरोबर नाहीं. लवकर उठाल तितकें चांगलें." हें ऐकतांच राणी जागृत झाली, तिनें झटपट अंगावरचे अलंकार काढून फेंकून दिले, कासोटा मारला, व केश मोकळे सोडले. ह्या वेळीं ती उन्मादवेषी कालिकेप्रमाणें दिसूं लागली. उन्मादावस्थेंत शून्य दृष्टीनें चहूंकडे पाहून ती हृदयभेदक, गंभीर स्वरानें ह्मणाली, "हाय हाय! काय हा प्रसंग! पण मला आतां संकट आणि विपत्ति यांची काय पर्वा आहे? आतां मला त्यांचें मुळींच भय वाटत नाहीं. तुह्मास विपत्तीचें भय वाटत असेल तर येथून चालते व्हा. तुह्मास जीवित प्रिय वाटत असेल तर क्षणभरही येथें राहूं नका. पण मी पळून जाणार नाहीं. मी वीरपत्नी आहें, वीर पित्याची कन्या आहें! स्वामी, कन्या आणि राज्य गमावल्यावर पळून जावयाचें? छे छे, असें मुळींच व्हावयाचें नाहीं. चला, पालखी आणा. चिता पेटवा! ही मी स्वामीकडे चाललें!

यवनांचें मला भय नाहीं! तुह्मास भय वाटत असेल तर तुह्मी पळा! आपले प्राण वांचवा! मला मृत्युच प्रिय आहे! म्लेंच्छांच्या हातीं सांपडून जगण्यापेक्षा मरणच बरें! दिल्लीश्वराची, चक्रवर्तीची, शत्रूंचा शिरश्छेद करणारांची, चांडाळ पापी म्लेंछांना बंदिवान करणाराची, मी पत्नी आहें, ती मी दुष्ट पाप्याच्या हातीं पडेन काय? नाहीं! नाहीं! मी पट्टराणी आहें, अशीच मरेन, वीरपत्नीसारखी मरेन, सतीसारखी मरेन, पवित्र स्थितींतच मरेन! लक्ष्मी चल आहे, जगत् चल आहे, सर्व अस्थिर आहे, पण विशुद्धि अविचल आहे, परम पवित्र आहे, यशोदायी आहे, प्राणिमात्राचें तारण करणारी आहे, तिला वरून मरेन! यवन येथें येत आहेत? पहातें ते कसे येतात ते! त्यांचे तुकडे तुकडे करून टाकीन!" याप्रमाणें बोलून तिनें चिता पेटविण्यास हुकुम केला, आणि वीरक्षत्रियांस लज्जित करून त्यांच्या रोमरोमीं शूरत्वाचें उद्दीपन केलें! लवकरच ती राजकन्येसह तंबूच्या बाहेर पडली!

---

## प्रकरण ३२ वें.

### विश्वास देऊन घात केला.

पृथुराज आणि कल्याणसिंग राजशिविरांत उषावतीजवळ होते, समरसिंग, आशापूर्णेनें जें भविष्य सांगितलें होतें त्याचा विचार करीत होता, रजपुतसेना आनंदोत्सवांत तल्लीन होऊन व शस्त्रास्त्रांस बाजूस ठेवून निश्चिंत पडली होती, व याच वेळीं विजयसिंग, आपल्या तंबूंत इकडून तिकडे फिरक्या मारीत नदीच्या तीराकडे पाहत राहिला होता. याच वेळीं महंमद घोरीच्या छावणींत दुसराच प्रकार चालला होता. सर्व मुसलमान सरदार महंमदाच्या तंबूंत बसून कोणाची तरी वाट पाहत होते. इतक्यांत तेथें तीन रजपूतवेषधारी यवन आले. एक तर पर्वताच्या गुहेंत विजयसिंगाबरोबर भाषण करणारा पूर्वीचा दूतच होता. आपला छद्मवेष काढून व घोरी साहेबास सलाम करून तो ह्मणाला, "आतां विलंब करतां कामा नये. विजयसिंगानें असें सांगितलें आहे कीं, या वेळीं रजपुतसैन्य आनंदलीन झालें आहे, व सर्व सामंत स्वस्थ बसले आहेत. एक-

दम हल्ला होईल तर खात्रीनें फत्ते होईल." हें आनंद-जनक वर्तमान ऐकून घोरीचे नेत्र चमकुं लागले व तातारखां, कुतुबुद्दीनखान, महंमद बखत्यार, गिझनीचा सरदार हुशेनखान, कंदाहारचा सरदार हुमायुनखान, इत्यादिकांनीं आपली अशी सल्ला दिली कीं, 'अशी संधी पुन्हा येणार नाहीं; यासाठीं सैन्य सत्वर सज्ज करून नदी उतरून एकदम छापा घातला पाहिजे." ही सल्ला लवकरच अमलांत आली. एका तासाच्या आंत सर्व सैन्य तयार होऊन हळूहळू यत्किंचित्‌ही आवाज न करितां कागर* नदीवर आलें. पण दुर्दैवानें नदीला भरती आल्यामुळें त्यांनां आणखी एक तास खोळंबावें लागलें. अरुणोदय होण्यास थोडाच वेळ राहिला होता.

नदी उतरून यवनसेना हळू हळू रजपूत छावणीपासून दोनशें हात अंतरावर आली; तोंपर्यंत रजपुतांना मागून भयंकर वादळ येत आहे याची मुळींच खबर नव्हती. मुसलमानांनीं आपल्या सैन्याची यथायोग्य व्यवस्था केली. शहाबुद्दीनाचा सेनापति तातारखांनें अर्धचंद्रकार व्यूह रचिला होता. व्यू-

---

* ठाणेश्वर, स्थानेश्वर, पानिपत हीं सर्व एकच होत. कागर, कागल आणि दृशद्वती हीं एकाच नदीचीं नांवें होत. कागर नदी सांप्रत ठाणेश्वरच्या दक्षिणेस वाहते.

हाच्या मध्यभागीं शहाबुद्दीनाच्या सैन्याची रांग होती व त्यांत सोळा हजार सरदार व नव हजार शिपाई होते. त्यांच्या हातांत तरवारी होत्या. बाजूसच चारशें लोक हातांत बरच्या घेऊन उभे होते. हे लोक शत्रूवर तुटून पडणारे होते, तरी त्यांस शिक्षण मुळींच मिळालें नव्हतें. तातारखां व कुतुबुद्दीन यांच्या सैन्यामध्यें तीन तीन हजार घोडेस्वार होते. चंद्रव्यूहाच्या मागच्या बाजूस पंधरा तोफा होत्या. आपलें रक्षण करण्यासाठीं मुसलमान लोकांनीं चांगलीच खबरदारी घेतली होती, व कदाचित् विजयासिंगाजवळून मदत न मिळाल्यास अडचण पडूं नये म्हणून सोळा हजार लोकांची तुकडी छावणींत लपवून ठेविली होती.

ही सेना रजपुतांच्या छावणीपासून दोनशें हात दूर होती हें वर सांगितलेंच आहे. तेथून पुढें येऊन त्यांनीं रजपुतांच्या तंबूंस आग लावली आणि विश्वासामुळें निश्चित बसलेल्या रजपुतांची जिकडून तिकडून कत्तल करण्यास आरंभ केला. एका बाजूनें आग पेटतांच व एका बाजूनें कापाकापी सुरू होतांच ते अगदीं घाबरून गेले. ते प्रथम आग विझविण्यासाठीं गेले तेव्हां मुसलमानांनीं पुढें शिरकाव केला. ही गडबड ऐकून समरसिंग विचार करीत बसला होता तो सावध झाला, व आपल्या

सैन्यास बोलावण्यासाठीं बिगुल वाजवून विश्वासघाती मुसलमानांस दंड करण्यास तयार झाला. इतक्यांत तोफांचा धडाका सुरू झाला. त्याच सुमारास समरसिंग तेरा हजार लोक घेऊन पुढें आला, व यवनांच्या विश्वासघाताचें वर्तमान पृथुराजास व कल्याणसिंगास कळविण्यासाठीं त्यानें मनुष्य पाठविले. समरसिंगानें शहाबुद्दीनच्या सैन्यावरच चाल केली व पहिल्या सपाट्यासच पहिल्या रांगेस यमसदनास पाठविलें. मारामार आणि कापाकाप सूरू झाली. आपण कोणास कापीत आहों हें त्यांस दिसत नव्हतें; पण दीन दीन आणि अल्लाह अकबर, आणि जय आशापूर्णा व हरहर शंकर, अशा शब्दांवरून हिंदू मुसलमानांस आणि मुसलमान हिंदूंस ओळखीत होते. यावेळीं दूर पेटत असलेल्या तंबूंच्या प्रकाशामुळें रजपूत सेनेस फार लाभ झाला. तिनें पहिल्या सपाट्यासच यवनसेनेस मागें हटविलें.

दोन्ही सेनांच्या गोंगाटामुळें कर्ण बधिर होऊन गेले. आकाश गाजूं लागलें व सर्व दिशा ध्वनिप्रतिध्वनींनें भरून गेल्या. समरसिंगाच्या माऱ्यापुढें शहाबुद्दीनाच्या सैन्याचा टिकाव लागेना. तेव्हां त्यांनीं तोफा पुढें काढल्या. त्यांचा मारा जरी विशेष नव्हता तरी त्यामुळें रजपुतांस पुढें जातां येईना. तेव्हां ते

आपली हार फिरवून दुसऱ्या बाजूनें कुतुबुद्दीनाच्या सैन्यावर घसरले. त्यांच्या झटापटींत तरवारी हातांतल्या हातांत राहून हातच तुटून पडूं लागले व डोकीं वर उडण्यास विलंब लागेनासा झाला. मुडद्यांचे ढीग पडूं लागले व रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या. रजपुतांस मुसलमानान लोक भाल्यांनीं विंधूं लागले, व मुसलमानांस रजपुत तरवारीनें कापूं लागले!

इतक्यांत तातारखांच्या समोर समरसिंग आला व येतां येतां त्यानें त्याच्या घोड्यावर एक घाव करून त्यास जमिनीवर पाडलें, व दुसरा घाव त्याच्या डोक्यावरच होणार होता; पण तो खालीं वांकून गेल्यामुळें बचावला गेला. तो समरसिंगाच्या घोड्यावर बरची मारीत होता; पण भीतीमुळें चमकून घोड्यानें दूर उडी मारली. रजपुतांनीं मारूं किंवा मरूं असा निश्चय केला होता. त्यांच्या तोंडांतून "मार मार आणि काप काप" यांशिवाय दुसरा शब्दच निघत नव्हता. कांहींच्या डोक्यावर टोप होते व कांहीं तर उघडेच धांवत आले होते. त्यांस कशाचेंही भान नव्हतें. मार यवन! काढ प्राण! जय भवानी! जय पृथुराज! कापा कापा! मारा मारा! जय जय! असा एकसारखा पुकारा चालला होता. रजपुतसैन्य इतकें

पुढें झालें कीं त्यामुळें तातारखांची तुकडी तुटून मागें हटली.

सैन्य पळूं लागलें हें पाहतांच घोड्यास टांच देऊन तातारखां पुढें आला व ह्मणाला, "जिवंत राहून आपला बचाव कसा कराल? गिझनी कांहीं जवळ नाहीं; पळून जाल तरी मराल व लढाल तरी मराल. लढाल तर जय मिळेल, पळाल तर अपजयच. संभाळा, मागें फिरा. खुदा साह्य करील." तेव्हां एक शिपाई पुढें होऊन ह्मणाला, "खुदावंद! मऊलामालक! आह्मांला भय ह्मणजे काय हें माहीतच नाहीं. पण हे काफर कशी काय कापा कापी करीत आहेत हें आपण पाहत नाहीं काय? बघतां बघतां यांनीं किती लोक कापले बरें?" इतक्यांत मोठ्या वेगानें रामगुरूचें सैन्य तेथें आलें, तेव्हां तातारखांनें लष्करास मागें वळविण्याचा यत्न केला, पण व्यर्थ. रजपुतांच्या माऱ्यापुढें सैन्य उभें राहूं शकलें नाहीं. इतक्यांत कुतुबुद्दीन तेथें आला; त्यास रामगुरु सामोरा गेला. त्याचवेळीं शहाबुद्दीन तेथें आला; त्याच्यावर समरसिंग वसरला.

---

## प्रकरण ३३ वें.

### महायुद्ध.

समरसिंगानें विश्वासघाती म्लेंच्छसेनेस मागें हटविलें. इतक्या वेळांत पृथुराज, कल्याणसिंग, रामगुरु व चामुंडराय आपापलें सैन्य घेऊन तेथें आले व त्यांनीं आपल्या सैन्याची यथायोग्य व्यूहरचना केली. यवनसेनेच्या मध्यभागीं समरसिंग लढत होता त्याच्या साहाय्यास रामगुरूचें सैन्य गेलें, व पृथुराज आणि कल्याणसिंग यांनीं दुसऱ्या बाजूस प्रयाण केलें. जातेवेळीं पृथुराजानें एक घोडेस्वार पाठवून विजयसिंगास असा हुकूम केला कीं त्यानें चार हजार घोडेस्वार व तीन हजार पायदळ बरोबर घेऊन मागें उभें रहावें व राजभेरी वाजवितांच एकदम युद्धांत सामील व्हावें. पृथुराजाच्या सैन्यानें तातारखांच्या सेनेचा पहिल्या सपाट्यासच समाचार घेतला. या लढाईचा परिणाम बरावाईट होणें विजयसिंगावर अवलंबून आहे व तो युद्धांत न मिसळल्यास आपणासच जय मिळणार आहे हें शहाबुद्दीनास ठाऊकच होतें. थोड्याच वेळानें त्या दारुण संग्रामांत पृथुराज व

शहाबुद्दीन यांचें लष्कर एकमेकांसमोर आलें. शहाबुद्दीनाजवळ पृथुराजावर रुष्ट झालेला हाहोलीराय होता. पृथुराजाजवळ चामुंडराय तिरकमटा घेऊन उभा होता. त्यानें पृथुराजास विचारलें, "महाराज! मी लोखंडाचें शस्त्र हातीं घेणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली आहे; तरी ज्याअर्थी या रणक्षेत्रांत आलों आहें त्याअर्थी आतां कोणाचें डोकें उडवूं सांगा." हाहोलीरायास पाहून पृथुराज क्रोधावेशानें ह्मणाला, "या हाहोलीस मारा. यानें या म्लेंच्छांस बोलावून आणिलें आहे." चामुंडरायानें पुनः विचारलें, "विचार करा. माझा बाण निष्फळ होणार नाहीं. ज्याच्या मरणानें सर्व संकट दूर होईल त्यावरच बाण सोडण्यास हुकूम करा." विनाशकालीं विपरीत बुद्धि होते, व मनुष्य लाभालाभ व कर्तव्याकर्तव्य यांचा विचार करीत नाहीं. पृथुराजानें या वेळीं शहाबुद्दीनाचेंच नांव घेतलें असतें तर बरें झालें असतें, पण क्रोधाग्नीमध्यें तप्त होणारा तो वीर ह्मणाला, "बस्स! याच चांडाळास मारा!" चामुंडरायानें एका बाणानेंच हाहोलीरायास यमलोकास पोंचविलें! यावेळीं धूळ व तोफांचा धूर पुष्कळ झाल्यामुळें कोणास कोणी दिसेना; पण इतक्यांत सूर्यनारायण, मानववधाची ही भयंकर वार्ता ऐकून क्रोधाविष्ट झाला व रक्तवर्ण होऊन प्र-

काशूं लागला. तरवारींचा झणझणाट, बाणांचा सणस-णाट व धनुष्यांचा टणत्कार यांनीं मैदान गाजून गेलें. अल्लाह अकबर! व हरहर शंभो! हेच काय ते शब्द ऐकूं येत होते. यवनसेनेची पिछेहाट व हाहोलीरायाचें मरण हीं शहाबुद्दीनास घाबरविण्यास पुरे झालीं. तरी त्याला क्रोध येऊन त्यानें मोठ्या आवेशानें चामुंडरा-यावर चाल करून त्याच्यावर भाला मारल्याबरो-बर तो खालीं पडला. हें पाहतांच पृथुराज ह्मणाला, "देशद्रोही लोकांस मारून मरण्यांत जन्माचें सार्थक आहे!" नंतर पृथुराजानें शहाबुद्दीनावर चाल करून त्याचा एक दांत पाडला, व त्यास अर्ध्या तासाच्या आंत सैन्यासह पळावयास लाविलें.

याच वेळीं कल्याणसिंग महम्मद बखत्यारचे सेनेस छिन्नभिन्न करीत पुढें चालला होता; हें पाहतांच महम्द घोरीनें त्याच्या छातीवर तरवारीचा घाव केला. तरी त्यास दाद न देतां त्यानें महम्मद बखत्यारास तरवारीच्या एका झपाट्यानें यमसदनास पाठविलें. तो आपल्या सेनेस पुढेंच नेत होता. परंतु समरसिंगास हें चिन्ह बरोबर दिसलें नाहीं. कारण रजपुत सेनेंत अजून यथायोग्य व्यवस्था झाली नव्हती. तरी कल्याणाचा वीरावेश पाहून वीरचुडामणि समरसिंग त्याच्या साहाय्यास गेला. कागल नदीच्या तीरावर येतांच

घोरी आपलें सैन्य तेथेंच थांबवून स्वतः पुढें आला. कल्याणसिंगही त्यास सन्मुख झाला. त्यानें शहाबुद्दीनाच्या छातीवर तरवार फेंकली. पण तो तीरासारखा एकीकडे झाल्यामुळें वांचला. त्यानें कल्याणसिंगावर आपली तरवार चालविली, पण त्यानें तत्क्षणीं तिचे दोन तुकडे केले. तो कमरेंतून दुसरी तरवार काढूं लागला, पण इतक्यांत कल्याणसिंगाच्या मस्तकावर मागून एक तीर लागला. कल्याणसिंगानें मागें वळून पाहिलें तों विजयसिंग धनुष्य चढवून हांसत हांसत आपल्याकडे पाहत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें! तो भूमीवर पडतां पडतां विजयाकडे पाहून ह्मणाला, "अरे पापी चांडाळ! नरकाचा अधिकारी! पवित्र उषावतीचा नाश करूनही यास समाधान वाटेना! धिक्! देशद्रोही!" कांहीं वेळानें त्याचे प्राण स्वर्गलोकीं गेले!

याचवेळीं पृथुराज समरसिंग आणि रामगुरु सैन्यासह तेथें येऊन उभे राहिले होते त्यांनीं कल्याणसिंगास पडतांना पाहिलें; पण विजयसिंगाकडे कोणाचीही दृष्टि गेली नाहीं. अभिमन्यूचें मरण ऐकून अर्जुनास शोक झाला तसा कल्याणसिंगाच्या मृत्यूनें समरसिंगासही झाला. तो पुढें येऊन इतकेंच ह्मणाला, "जय मंगलाचार्य! तुमचें वाक्य सत्य झालें!" पण लगेच

सावध होऊन तो शत्रुसंहार करूं लागला. त्यावेळीं त्याला इतका आवेश आला होता कीं त्याच्यापुढें शत्रुसेनेस टिकावच्च काढतां येईना. कुतुबुद्दीन क्रोधांध होऊन रामगुरूपुढें येऊन उभा राहिला. पण गुरूनें तरवारीच्या एका घावानें त्याच्या घोड्यास खालीं पाडिलें. इतक्यांत हुसेनखानानें रामगुरूस खालीं पाडिलें व कुतुबुद्दीनानें भाल्यानें त्याचा प्राण घेतला.

पृथुराज आणि समरसिंग मारामार व कापाकाप करित पुढें चालले होते तें पाहून तातारखां घाबरला व मदतीसाठीं गुप्त सेना आणण्यास त्यानें घोरीस सांगितलें. घोरीच्या हुकुमावरून लगेच गुप्तसेना तेथें येऊन दाखल झाली. यवनसेनेचा मंद उत्साह जागृत झाला हें पाहून पृथुराजानें राजभेरी वाजवून विजयसिंगास सैन्यासह येण्यास आज्ञा केली. पण त्याचें सैन्य आलें नाहीं! प्रतिक्षणीं समरसिंग व पृथुराज विजयसिंगाच्या सैन्याची वाट पाहत होते, तरी विजय येत नाहीं हें पाहून त्यांस फार आश्चर्य झालें. पृथुराजानें पुनः राजभेरी वाजविली तरी कोठें कांहीं नाहीं! विजयसिंग निमकहराम झाला आहे याची त्यांस मुळींच खबर नव्हती! शेवटीं निराश होऊन त्यांनीं जवळ असलेल्या सैन्यानिशींच युद्ध चालविलें. इतक्यांत उलट दिशेनें एक सैन्य येऊं लागलें. तें पाहून,

मार्ग न मिळाल्यामुळें दुसऱ्या बाजूनें विजयसिंग येत आहे असें वाटून रजपुत लोकांस उत्साह उत्पन्न झाला, व "जयजय महाराज! जयजय आशापूर्णा!" अशी गर्जना करून ते मोठ्या आवेशानें शत्रुसेनेवर तुटून पडले. पण समोरून येणारें सैन्य यवनांचें आहे असें जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां तात्काळ त्यांचा उत्साहभंग झाला. रजपुतांच्या माऱ्यानें बावरून जाऊन शहाबुद्दिनानें बाकी राहिलेलें गुप्त सैन्य बोलाविलें होतें तेंच हें सैन्य होय.

रजपूत मंदोत्साह झाले होते व नवें सैन्य येण्याची आशा नव्हती. इतक्यांत पूर्वसंकेताप्रमाणें विजयसिंगानें पळण्यासही आरंभ केला, व त्याच्याबरोबर बाकीची निराश झालेली सेना पळूं लागली. विजयसिंगास पळतांना पाहून तो घाबरून पळत असावा असें पृथुराजास वाटलें; पण समरसिंग ह्मणाला, "दगा, खरोखर दगा!" रजपुतांस उत्साहित करण्यासाठीं अनेक प्रयत्न केले, त्यांस आशापूर्णेची शपथही घातली, तरी विजयसिंगाच्या सैन्याबरोबर ते अधीर होऊन पळूंच लागले. जर विजयसिंगानें सैन्यामध्यें असा भेद पाडला नसता, तर रजपूत लोक शिर सलामत असेपर्यंत लढले असते; पण देशद्रोही विजयसिंगानें फार खोटें काम केलें, त्यामुळें बहुतेक सर्व सेना पळून

जाऊं लागली. मात्र सिसोडीयाची स्वामिभक्त सेना देशरक्षणासाठीं तशीच उभी होती. घायाळ झालेल्या सिंहाप्रमाणें पृथुराज व समरसिंग त्या विश्वासपात्र सेनेसह हजारों यवनांस कापीत सुटले. महायुद्धास प्रारंभ झाला. तरवारी, बरच्या, आणि तीर यांणीं प्रलयकालाप्रमाणें कंपारव करण्यास आरंभ केला. दोनही बाजूंच्या वाद्यांनीं रणभूमि गाजून गेली. समरसिंग दोनही हातांनीं तरवार चालवूं लागला. त्याची तरवार कालिकेच्या तरवारीप्रमाणें चालत होती, व त्याच्या मुखांतून "जय भवानी" असे शब्द निघत होते. सिसोडीयाचें सैन्य जीविताची आशा सोडून शत्रुसंहार करण्यांतच मग्न झालें होतें. दुपारचे चार वाजले. रजपुतांस संध्याकाळपर्यंत लढतां आलें असतें तर यवनसेना निराश होऊन मागें हटली असती. पण यवनदल पुष्कळ होतें व रजपुत लोक अगदींच थोडे राहिले होते. या महायुद्धांत ते पुष्कळ मरण पावले होते व पुष्कळ घायाळ झाले होते. पृथुराज शहाबुद्दीनावर चालून जात होता, इतक्यांत त्यावर तीरांचा वर्षाव झाला. तरी शहाबुद्दीनावर धसरून तो ह्मणाला, "दुष्ट म्लेंच्छा! विश्वासघात करून जय मिळविण्यास आलास काय?" असें ह्मणून त्यानें तरवार उचलली, इतक्यांत अनेक ठिकाणांहून त्याला बाण येऊन लागतांच तो मूर्च्छा येऊन घोड्यावरून

खालीं पडला, व यवनांच्या हातीं सांपडला. तातारखां त्याला घाव करण्यास जात होता, इतक्यांत शहाबुद्दीन ह्मणाला, "त्याला पकडा, मारूं नका."

पृथुराजास भूमिवर पडतांना पाहतांच समरसिंगाची जयाशा नष्ट झाली. तरी यवनांशीं लढण्याचा त्याचा निश्चय अंतकालापर्यंत दृढ राहिला. यावेळीं तर त्याच्या अंगांत विशेष आवेश उत्पन्न झाला. शेवटीं शेवटीं त्यानें इतक्या आवेशानें युद्ध केलें कीं त्यामुळें यवन लोक घाबरून जाऊन मागें हटूं लागले. समरसिंगानें समररंग राखिला. तातारखानें मोठ्या वेगानें येऊन समरसिंगावर घाव केला, पण तो चुकवून त्यानें उलट दुसरा घाव करून तातारखांचें डोकें धडापासून वेगळें केलें. समरसिंग कापीत सुटला आहे व तातारखांच्या मरणानें सेना कांपत आहे, हें पाहून शहाबुद्दीन पुढें आला व आपल्या लोकांस ह्मणाला, "अरे या काफरास भितां कां? अरे हा जिवंत राहिला तर तुह्मी राज्य कसें घ्याल? चला, याला मारा!" पुन्हां दोन्ही सैन्यामध्यें संहार सुरू झाला. हांहां ह्मणतां समरसिंगानें शहाबुद्दीनाचा पुत्र शेरमहंमद यास ठार केलें. इतक्यांत त्याच्या अंगावर अनेक शस्त्रास्त्रांची वृष्टि झाली. अजूनही तो दोन्ही हातांनीं तरवार चालवित होता. शहाबुद्दीनानें घाबरून जाऊन आपली तर-

वार त्याच्या मस्तकावर मारली, पण समरसिंगानें त्याच्या घोड्यावर वार केला. शहाबुद्दीनानें घोड्यावरून खालीं उडी टाकून दुसरी तरवार त्याच्या मस्तकावर मारली. परंतु ती मस्तकास न लागतां त्याचा एक हात तुटून पडला. यावेळेचा समरसिंगाचा पराक्रम अवर्णनीय होता. त्यानें दुसऱ्या हातानें शहाबुद्दीनाच्या पायावर घाव केला, पण तेवढ्यांत दुसऱ्या एका शिपायानें त्याच्या मस्तकावर घाव करितांच तो तत्क्षणींच गतप्राण झाला! संध्याकाळापूर्वीं यवनसेनेचा जय झाला आणि संध्याकाळापूर्वीं भरतखंड परवश झालें! आणि संध्याकाळ झाली! रजपुतांनीं रणरंग राखिला, पण मातृद्रोही, देशद्रोही विजयानें देश गमावला!!!

---

## प्रकरण ३४ वें.

### वीरपत्नी.

भरतखंडाचा स्वातंत्र्यसूर्य अस्तंगत झाला, पण सूर्यनारायण देव अस्ताचलास गेला नव्हता; तर भरतखंडाच्या परवशतेमुळें शोकान्वित होऊन तो मेघमालेच्या आड राहून अश्रुधारांचा वर्षाव करीत होता!

तो क्षणांत मेघमालेच्या आड दडून राही; क्षणांत आपल्या सौम्य किरणांच्या प्रकाशानें बाहेर डोकावून पाही व क्षणांत पूर्वीप्रमाणें गुप्त होई. रात्रिरूप ललनेनें अंधःकारास अशी आज्ञा केली की तूं आपलें जितडे तिकडे साम्राज्य कर. या आज्ञेप्रमाणें अंधकारानें जागजागीं आपले सेनापति ठेविल्यामुळें रणक्षेत्र अगदीं भयानक होऊन गेलें. कोल्ह्या कुत्र्यांस आज मेजवानी होती ह्मणूनच त्यांची जिकडे तिकडे धांवाधांव चालली होती. इकडे नदीच्या तीरावर एक चिता रचलेली होती व त्यांत पृथुराजाची पट्टराणी प्रवेश करणार होती. महाराज मरण पावले आहेत एवढीच बातमी सेवकांनीं दिल्यामुळें ती मुग्ध राहिली होती. राजशिबिरांतून निघून पालखींत बसून व प्राणाधिकप्रिय कन्येचें मस्तक मांडीवर ठेवून ती दगडाच्या हालत्या चालत्या पुतळ्याप्रमाणें चितेजवळ आली. तिच्या नेत्रांत एकही अश्रु नव्हता, व तिचें हृदय अत्यंत स्थिर होतें. चितेजवळ येतांच ती पालखींतून खालीं उतरली. त्यावेळीं तिची कांति स्फटिकाच्या मूर्तीप्रमाणें निर्मळ दिसत होती. ती मोठ्या निश्चयानें चितेजवळ गेली. प्रथम तिनें उषावतीस चितेवर निजवून तिच्या कंठांत आशापूर्णांचा पुष्पहार घातला, कपाळास चंदन चर्चिलें, आपल्या

कपाळासही चंदन लाविलें व पुष्पमाला गळ्यांत घातली. नंतर तिनें ईश्वराची प्रार्थना केली, आणि चितेस प्रदक्षिणा करून तींत ती प्रवेश करण्यास जात होती, इतक्यांत क्षत्रियसेनेची एक तुकडी तेथें येऊन उभी राहिली. एक सामंत सेनापति, त्वरेनें घोड्यावरून खालीं उतरला व राणीस नमस्कार करून व दोन्ही हात जोडून उभा राहिला. राणीनें विचारलें, "बलदेवसिंग, तुह्मांस काय बोलावयाचें आहे?" बलदेवसिंगानें नमन करून उत्तर दिलें. "देवी! या वत्साची एक विनंति आहे. दिल्लीश्वरानें आपणास एक निरोप कळविण्यास मला पाठविलें आहे." राणी अत्यंत विस्मित होऊन ह्मणाली, "कोण दिल्लीपति! माझे प्राणनाथ! त्यांनीं तर रणक्षेत्रांत प्राणत्याग केला आहेना?" बलदेवसिंगानें उत्तर दिलें, "देवी, महाराज मूर्च्छा येऊन घोड्यावरून पडले तेव्हां ते स्वर्गलोकास गेले असावे अशी सर्वांनीं कल्पना केली; परंतु वास्तविक तर ते—" राणीचें आश्चर्य पराकाष्ठेप्रत पावलें! ती ह्मणाली, "वास्तविक काय? बोला, तुह्मास राणी आज्ञा करीत आहे." बलदेवसिंग सद्गदित कंठानें ह्मणाला, "देवी! ते यवनाच्या हातांत कैद होऊन पडले आहेत." कैदेंत पडले आहेत हे शब्द ऐकतांच ती अत्यंत व्यग्र झाली, रक्त नेत्रांनीं

चोहोंकडे पाहूं लागली व वीर्यावेशानें कांपूं लागली. दिल्लीश्वरानें कोणता निरोप पाठविला आहे, हें विचारण्यासही तिला सुचलें नाहीं. ती रोषपुरस्सर भ्रुकुटी वळवून सैनिक लोकांकडे व दासदासींकडे पाहून, थरथर कांपत, गर्वानें ह्मणाली, "हे सेवकांनो, दासींनो, ऐका! हे क्षात्रिय, हे रजपुतकुलावतंस वीरपुरुष, समरक्षेत्राचा त्याग करून, महाराज कैदी झाले आहेत हा समाचार सांगण्यास येथें आले आहेत! रजपुत धर्माचीही धन्य आणि ह्या वीरांचीही पण धन्य! ठीक, ठीक! आतां या वीरत्वाहूंस येथें खुशाल राहूं द्या, अथवा स्वदेशीं जाऊन आपल्या प्रिय पत्नींस आनंद देऊं द्या! परंतु महाराज माझे स्वामी आहेत, आणि मी त्यांची पत्नी आहें, ते कैद झाले असतां मी निश्चित कशी राहूं? या लोकांनीं रजपुतस्त्रीचें दूध खाल्लें नाहीं, पण मी क्षत्रियकन्या आहें! वीरबाला आहें! वीरपत्नी आहें! आज मी जाईन, कोणाचें साहाय्य नसतांनाही जाईन, आणि माझ्या प्राणनाथांस बंधमुक्त करीन! चला!"

एवढें बोलून तिनें बलदेवसिंगाच्या हातून ढाल तरवार हिसकावून घेतली व त्याच्या अश्वावर ती आरूढ झाली. त्यावेळीं महिषासुरमर्दनार्थ देवी चंडीकाच जात आहे कीं काय असें वाटूं लागलें! चितेंत प्रवेश कर-

ण्यासाठीं तिनें निर्मल शुभ्र वस्त्रें परिधान केलीं होतीं व ललाटास रक्तचंदन चर्चिलें होतें; तिच्या पाठीवर मुक्त केशजाल व हातांत ढाल तरवार शोभत होती. ती गंभीर व क्रोधांध दिसत होती; तिचे नेत्र रक्तवर्ण झाले होते; क्षत्रियाभिमान रोमरोमीं जागृत झाला होता व सर्व रीतीनें वीरभावाचें उद्दीपन झालें होतें. ती समरक्षेत्राकडे जाऊं लागली हें पाहून क्षत्रियसेनापति लज्जाकुल व सानुताप होऊन एकदम ह्मणाले, "आपणांपैकीं एक तरी जिवंत राहीपर्यंत, या वीरपत्नीबरोबर महाराज बंधनमुक्त होईपर्यंत रणक्षेत्रांत लढूं; पण महाराजांनीं अशी आज्ञा केली आहे कीं, अत्याचारी, पापी म्लेच्छांच्या हातांत स्त्रिया पडूं नयेत ह्मणून त्यांस चितारोहण करण्यास सांगावें. परंतु आतां करावें कसें!" ते असा विचार करीत आहेत तों राणीचा घोडा बराच पुढें गेला. तें पाहून सगळे रजपुत विद्युल्लतेप्रमाणें चमकून व वीरभाव मनांत आणून, "जय चंडीका जय! जय जय भवानी जय!" असें ह्मणत राणीच्या मागोमाग गेले; इकडे चितेवर पडलेल्या उषावतीकडे शून्य दृष्टीनें पाहत दासी तशाच उभ्या राहिल्या!

ज्या वेळीं यवनसेनेशीं टक्कर मारण्यासाठीं राणी अश्वारूढ होऊन निघाली, त्याच क्षणीं महावीरचूडा-

मणि समरसिंगाचा वध करून रजपुतांची छावणी लुटण्याकरितां यवनसेना चालली होती. तिची दृष्टि या वीरांगनेच्या रुद्ररूप मूर्तीकडे गेली. मुसलमान लोक घाबरून गेले. क्षत्रियसेनेनें एकदम पुढें होऊन मारामार आणि कापाकाप सुरू केली. प्रथम यवनांची गाळण झाली, पण ते लवकरच जागृत झाले. क्षत्रियांनीं तरवारींचा व तीरांचा मारा चालविला, व मुसलमानांनीं त्यांस चारही बाजूंनीं घेरून तरवार, बरची, तीर व बंदुका यांचा मारा चालविला. क्षत्रियसेनेनें दुर्भेद्य व्यूह रचून प्राणांत होईपर्यंत लढण्याचा निश्चय केला होता. तिनें दारुण संग्राम आरंभिला. यवनसेना उन्मत्त लहरींप्रमाणें उसळूं लागली, व क्षत्रियसेना समुद्रतीरावरील शिलापंक्तीप्रमाणें त्या लाटांस मागें लोटून देऊं लागली. पाव तासपर्यंत हें युद्ध चाललें व मुसलमानांचे बरेच व रजपुतांचे थोडे लोक मरणशरण झाले. इतक्यांत सेनेमधून राणी एकदम बाहेर आली व कालिकादेवीप्रमाणें यवनसेनेचा संहार करूं लागली. तिचा हा वीरभाव पाहून क्षत्रियसेना आश्चर्यमुग्ध झाली. हां हां ह्मणतां तिनें शें दीडशें यवन ठार केले, पण इतक्यांत यवनसेनेमधून एक तीक्ष्ण बरची येऊन तिच्या काळजास लागली व ती घोड्यावरून खालीं पडली.

ही वेळ मोठ्या आणीबाणीची होती. यवन लोक राणीस धरण्याकरितां धांवले, व रजपुतसेनेनें त्यांस विलक्षण प्रतिरोध केला. इतक्यांत एका रजपुत स्वारानें तिला जमिनीवरून वर उचलून घेतलें व घोड्याची लगाम सोडून देऊन त्यास भरधांव सोडलें. मुसलमान लोक मागून धांवूं लागले, पण रजपुत लोक त्यांचा फडशा पाडूं लागले. रजपुतांनीं जीवाची आशा राखलीच नव्हती. त्यामुळें पुष्कळ यवन लोक अल्लाकडे गेले खरे, पण क्षत्रियवीरही थोडेच जिवंत राहिले.

रजपुत लोक राणीचें शव घेऊन चितेजवळ आले त्यावेळीं संध्याकाळ झाली होती. आकाशांत जरी चन्द्रलेखा होती तरी ती मेघावृत्त होती. इकडे उपावतीस आपल्या मांडीवर घेऊन शांत भावानें चिता राणीची वाट पाहत होती. इतक्यांत रजपुतांनीं उपावतीजवळ राणीस ठेऊन चितेस आग लाविली. ती पेटूं लागल्याबरोबर त्यांतून चंदन, तूप, वाळा इत्यादिक पदार्थांचा सुगंध जिकडे तिकडे पसरला. अग्निज्वाला आकाशास जाऊन भिडल्या. इतक्यांत दासीही चितेमध्यें भडाभड उड्या मारूं लागल्या. पतिव्रतेच्या, वीरांगनेच्या विशुद्धतेचा प्रकाश सर्व दिशांनीं पडला. दोन तासांत अग्नि शांत झाला. चितेमध्यें अंधकार झाला, भरतखंडांतही अंधकार झाला, व हा अंधकार

वाढण्याकरितांच कीं काय, क्षीणचंद्रमा शोक करीत करीत अस्ताचलाकडे चालता झाला !!

अंधकाराचें राज्य झालें आहे; सर्वत्र शून्य दिसत आहे, ठाणेश्वर स्मशानवत् झालें आहे. अशा वेळीं यवनांचा आनंदनाद, रजपुतांचा करुणारव, बाया-ळांचा दीन स्वर व कोल्ह्यांकुत्र्यांचा अभंग चीत्कार दिगंतरांत गाजूं लागला. आर्तनाद! दीन नाद, व आ-नंद नाद एकसारखे होतच होते. अशा वेळीं डोक्या-वर हात ठेऊन सचिंत मुद्रेनें एक पुरुष, ह्याच मैदा-नाच्या एका नाक्यावर उभा राहून विचार करीत आहे. त्याच्या हृदयांत अंधकार आहे, त्याच्या म-नांत भीति आहे, त्याची छाती धडधड उडत आहे, व मधून मधून त्याच्या नेत्रांतून अश्रुबिंदु खालीं पडत आहेत. हा दुष्ट, कर्मचांडाळ, पापी, विजयसिंग होय. त्याच्या आशारवीचा एक किरण लोप पावतांच तो उशासांवर उशासे सोडूं लागला. त्यानें उषाव-तीची चिता ओळखली व तेथून सर्व मनुष्यें गेल्यानंतर तो ह्मणाला, "हाय,! उषावती! बालसखे! तुझ्या-विषयीं असलेली माझी आशा सगळी नष्ट झाली!" याप्रमाणें त्या पवित्र पुतळीला अपवित्र करणारा तो पापी रानांत गेला.

———

# प्रकरण ३५ वें.

## न जाने जानकीनाथ प्रभाते किं भविष्यति.

सूर्यकुलचूडामणि कल्याणासिंग रणांत पडून अप्सरांस वरिता झाला; चंद कवि ज्यास शिवाचा अवतार असें ह्मणतो तो समरसिंग कैलासास गमन करिता झाला; चक्रवर्ती पृथुराज कैद झाला; देवी चामुंडेच्या आज्ञेवरून चामुंडरायानें देशद्रोही जनाचा वध करून रणक्षेत्रीं आपल्या प्राणांची आहुति दिली. दिल्लींत हाहाकार उडून गेला. लहानांपासून तों थोरांपर्यंत, व गरीबांपासून तों धनिकांपर्यंत सारे लोक चिंतातुर झाले. रजपुतांगना, रणांत पराक्रम गाजवून मरण पावणाऱ्या प्रिय पतीच्या शवाबरोबर नव्हे, तर त्याच्या नांवाचें नुसतें स्मरण करून प्रज्वल चितेंत धाडधाड उड्या घेऊं लागल्या. इकडे ठाणेश्वरीं व आसपासच्या गांवीं निर्दय मुसलमान लुटालूट करीत होते, स्त्रियांची दुर्दशा मांडीत होते, कित्येकांस गुलाम करीत होते, व कांहींचीं रांग करून त्यांचीं डोकीं पटापट उडवून आनंदित होत होते! हे सर्व निंद्य व भयंकर प्रकार पाहून शहाबुद्दीन राक्षसास फारच आनंद होत होता. कित्येक

मुसलमान फार दयाळु होते त्यांचें अंतःकरण मात्र दुभंग होऊन जात होतें.

लढाई संपली त्या दिवशीं रात्रीं शहाबुद्दीन रंगांत आला होता. तो थकल्या भागल्याशिवाय सर्व रात्र उल्लसित चित्तानें फिरत होता. मशाली बरोबर घेऊन तो त्या रात्रीं हिंदूंचे मुडदे पहाण्यासाठीं रणक्षेत्रांत गेला, व त्यांच्या मुड्यांचे ढिगांचे ढीग पाहुन फार खुष झाला! पण जेव्हां त्यानें मुसलमानांचे मुडदे पाहिले तेव्हां मोठ्या त्वेषानें ह्मणाला, "हे रजपुत काफर राक्षसांपेक्षांही निर्दय आहेत." मनुष्य आपल्या गुणावगुणाचें तोलन यथास्थित करीत नसतो हें निर्विवाद आहे. आपला दोष राईएवढा व दुसऱ्याच्या पर्वताएवढा मानण्याची मनुष्यास संवयच होऊन गेली आहे, तेव्हां त्यांत शहाबुद्दीनाचाच दोष कसला? अंधकारांत फिरतां फिरतां जेथें घायाळ झालेले लोक पडले होते तेथें तो गेला. तेथें तो यवन लोकांस धैर्य देऊन हिंदूंचा वध करावा असा हुकूम करूं लागला. सेनेंतील मनुष्यांस छावणी लुटण्याची आज्ञा तर त्यानें प्रथमच दिली होती.

तो रणभूमींत फिरतो आहे तों तिकडे दोन तीन शिपाई येऊन ह्मणाले, "जहांपनाह! आपल्या आज्ञेवरून आह्मी छावणी लुटण्यास जात होतों, पण

इतक्यांत पृथुराजाची राणी वेडी झाल्याप्रमाणें होऊन लढण्यासाठीं आली, व तिनें कापाकापी सुरू केली. पृथुराजास कैद केलें हें ऐकून त्याला सोडविण्यासाठीं ती आली होती, पण तिची आह्मी लगेच कत्तल केली." ही गोष्ट ऐकून शहाबुद्दीन आश्चर्यचकित होऊन स्तब्ध झाला. नंतर तो ह्मणाला, "सेनापति व दुसरे सरदार यांस सकाळीं तंबूंत येण्याविषयीं वर्दी द्या." एक शिपाई ह्मणाला, "सेनापति तर आज लढाईंत पडले!" महम्मद घोरी ह्मणाला, "कांहीं फिकीर नाहीं. आजपासून कुतुबुद्दीन यांस सेनापति नेमलें आहे, त्यांस खबर द्या." त्याच्या आज्ञेप्रमाणें ते ही बातमी देण्याकरितां कुतुबुद्दीनाकडे गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सर्व सेनापति व सभासद एकत्र झाल्यावर कुतुबुद्दिनास उद्देशून महम्मद ह्मणाला, "कुतुब! पृथुराज कैद झाला आहे अशी बातमी ऐकून त्यास मुक्त करण्यासाठीं हिंदू स्त्रिया आल्या होत्या असें ऐकतों!" गुलाम कुतुबुद्दीन ह्मणाला, "जितक्या गर्वानें त्या आल्या, तितका त्यांचा अपमान झाला!" महम्मद घोरी ह्मणाला, फार चांगलें. पण यावरून, जोंपर्यंत पृथुराज जिवंत आहे तोंपर्यंत आह्मांस बेफिकीर राहतां येत नाहीं असें तुह्मांस वाटत नाहीं काय? त्यास सोडविण्यासाठीं हिंदू लोक

आज ना उद्यां पुनः लढल्याशिवाय राहणार नाहींत." सेनापति कुतबुद्दीन ह्मणाला, "इतका पूर्ण पराजय झाला असतां त्यांस पुनः लढण्याची छातीच होणार नाहीं." महम्मद ह्मणाला, "तुह्मांस या लोकांचा स्वभाव अजून नीट समजला नाहीं. हे लोक जीवास जीव देणारे व प्रामाणिक आहेत. राजा कैद आहे असें ऐकतांच पुनः हे हातांत शस्त्रें घेण्यास कमी करणार नाहींत. लढाईंत गुंतलेल्या वीरांच्या बायकाच मधांशीं आल्या असाव्या." गंभीर विचार करून कुतबुद्दीन ह्मणाला, "खुदावंद! त्या आल्या खऱ्या, पण त्यांनीं केलें काय? आतां पृथुराज नाहीं, समरसिंग नाहीं, व तो सिंहाचा बच्चा महापराक्रमी कल्याणसिंगही नाहीं. आतां भीति कोणाची? रयतेची कीं खेडवळांची!" महम्मद-निर्दय महम्मद—चांडाळ महम्मद—ज्याला सात वेळ कैद करून पृथुराजानें दिल्लीस आणलें होतें, व दयाळुपणानें ज्यास पुनः तितकेच वेळ जिवंत जाऊं दिलें होतें, तोच त्याचा नाश करण्याचा बेत करून ह्मणाला, "छे, छे, भिण्याची गोष्टच नको. आह्मी हलक्या सलक्या संकटांस कोठें दाद देतों? पण लढाई झालीच तर आमचे लोक फुकट मरून नुकसानी नाहीं का व्हायची? शिवाय आतां आमचा जय झाला असतां फिरून लढाई करण्यापासून फा-

यदा तो कसला ? पृथुराजास ठार मारून आह्मी एक वेळ मोकळे झालों, ह्मणजे हिंदुलोक जीव देण्यास काशाला येतात ? आतां त्यास ठार मारल्यापासून नफा नुकसान काय आहे याचाच विचार झाला पाहिजे."

नंतर एक अमीर ह्मणाला, "पृथुराजाची कत्तल करण्यापासून फायदा नाहीं; तर त्यास गुलाम करून विजयचिन्हाप्रमाणें गिझनीस नेल्यास फार फायदा होईल." घोरी डोकें हालवून ह्मणाला, "इतके दिवस त्यास कैदेंत ठेवणें अशक्य आहे." तेव्हां दुसरा अमीर ह्मणाला, "जनाब, अजून आपलें काम आहे. आपणास दुसरे देश जिंकावयाचे आहेत व पृथुराज आपल्याबरोबर सल्ला करील, तर त्यास थोडा मुलुख देऊन आपल्या पक्षास घेतल्यास मोठा लाभ होईल. वाटेल तेव्हां त्याचा वध करण्यास आपणास कोण हरकत करणार आहे ? जर तो ताब्यांत राहिला तर ठीक; नाहीं तर जें काम आज करणार आहों तें जरा वेळानें करण्यास विलंब लागणार आहे काय ?" ही सल्ला महम्मदास पसंत पडली, व लगेच त्यानें पृथुराजास सभेंत बोलावून आणण्यास सांगितलें. तेव्हां लगेच हातापायांत बेड्या घालून त्यास तेथें आणलें. त्याचें सर्व अंग लाल झालें होतें, व त्यावर तरवारीचे

घाव पडले होते. तो जरी शक्तिहीन झाला होता, तरी त्याचें मुखमंडल किंचित्‌ही निःसत्व—निस्तेज दि-सत नव्हतें. त्याची भ्रुकुटी वर चढलेली होती. क्षात्र-रक्त उसळतच होतें. तो कैदी झाला असतांही त्यास मुळींच संकोच वाटत नव्हता. तो वीरबाहु व वीरपुत्र होता. सभेंत आल्याबरोबर ती वीरमूर्ति अधिकाधिक कोपानलानें तप्त होऊं लागली. त्याच्या रोमरोमीं क्रोध व्यापून राहिला. तो निमूटपणें उभा राहिला. त्यांच्याबरोबर बोलण्यांत आपला कमीपणा आहे असें तो समजत होता. तो तुच्छभावसूचक, गंभीर, व रोष-मय दृष्टीनें समोर पाहत होता. तें पाहून महम्मद घोरीस आश्चर्य वाटलें. तो पृथुराजास ह्मणाला, "महा-राज! दिल्लीचे अधिपति! आपण पुष्कळ वेळां आ-मच्या लोकांस चांगलया रीतीनें वागविलें आहे, व हें कांहीं आम्ही विसरलों नाहीं असें आपणास दिसून येई-लच. आपणास मी यावेळीं चांगलया रीतीनें वागवीन." एवढें बोलून पृथुराज काय उत्तर देतो त्याची तो वाट पाहूं लागला; पण पृथुराजानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. यवन आपल्यावर अनुग्रह करण्याची गोष्ट काढतो ह्मणून मात्र तो जळूं लागला! घोरीचें अपमानजनक भाषण ऐकून तो स्वस्थचित्तानें खालींच पाहूं लागला. त्यास ह्या अपमानाचें दुःख पराजयदुःखाहूनही अ-

सह्य झालें. यावेळीं प्रियजनांचें दुःख त्याच्या डोळ्यांपुढें आलें, व समरसिंगाचें काय झालें असेल कोणास ठाऊक, अशा दुःखदायी विचारानें त्याचे दोन्ही नेत्र पाण्यानें भरून आले. पांच सात मिनिटांनीं महम्मद घोरीनें पुनः विचारलें, "मी आपणास जीवदान देऊन आपल्या हाताखालीं मुलुख देतों." हें ऐकून पृथुराजास इतका संताप आला कीं, त्यावेळीं त्याच्या नेत्रावाटे अग्निकण निघत आहेत कीं काय असा भास होऊं लागला क्रोधानें त्याचे ओंठ हालूं लागले. अंग थरथर कांपूं लागलें. जीवितदानाच्या आशेनें तो शांत होऊन तेजस्वी दिसत असावा असें महम्मदास वाटूं लागलें; पण जेव्हां त्यानें 'मी जर चांगल्या रीतीनें वागत आहें, तर तुह्मांसही चांगल्या रीतीनें वागलें पाहिजे. मी भरतखंडांतील दुसऱ्या राजांवर चाल करणार आहें, त्या वेळीं तुह्मी मला मदत केली पाहिजे' असें सांगितलें, तेव्हां पृथुराजाचे नेत्र विक्राळ सिंहिणीच्या नेत्रांप्रमाणें अगदीं लाल दिसूं लागले. तो थरथर कांपूं लागला. त्यास तरवार शोधतांनां पाहून सर्व अमीर उभे राहिले व कित्येकांनीं समशेरी बाहेर काढल्या! पृथुराज कमरेवर हात नेऊन तरवार पाहूं लागला, पण तरवार कोठें! त्याची ही चेष्टा निष्फळ झाली. त्यास आपल्या अवस्थेचें स्मरण झालें. आपण स्वतंत्र नाहीं,

तर एक कैदी आहों, आपण महाराज नव्हें, तर नीचांहूनही एक नीच मनुष्य आहों, काल आपण दानशूर होतों, पण आज याचक स्थितींत पडलों आहों; हें सर्व त्यास आठवून एखाद्या दुखविलेल्या सापाप्रमाणें, दोरीनें बांधलेल्या सिंहाप्रमाणें तो उठला, व दावानलवत् भयानक मूर्ति धारण करून, गंभीर स्वरानें ह्मणाला, "रे दुष्ट विश्वासघातक्या! चांडाळा! दुरात्म्या! मी कैदी आहें ह्मणून असें नीचपणानें बोलत आहेस काय? असें बोलतांना तुझी जीभ कशी तुटून पडत नाहीं? काय तूं मला राज्य देणार? मी तुला सात वेळ जीवदान दिलें आहे, व तुझ्यावर दया केली आहे त्याचें स्मरण कर. तुझ्या स्वाधीन राहून मी राज्य करीन कीं काय? माझा देश तुझ्या हातीं देऊन मी राज्य—" एवढें बोलतां बोलतां त्यास इतका क्रोध आला कीं त्यामुळें त्यास पुढें बोलतांच येईना!

पृथुराजाचें हें सगर्व भाषण ऐकून महम्मद घोरी क्रोधायमान झाला. तो क्रोधानें ह्मणाला, "मुसलमानांबरोबर सल्ला करण्यांत जर आपण अपमान समजतां, तर मुसलमानांच्या हातून कत्तल करून घेण्यांत मान समजतां कीं काय?" पृथुराजानें क्रोधानेंच उत्तर दिलें, "मुसलमानांच्या तर काय? पण एखाद्या पिशाच्याच्या हातूनही मरण आलें असतां तें मला सन्मान-

जनक आहे. पण चांडाळा! तुझ्याबरोबर नुसता बोलों तरी माझें क्षात्ररक्त कलंकित होईल! चुप—" दिल्लीश्वराचें हें भाषण ऐकून क्रूर, पापी शहाबुद्दीनास फार क्रोध आला, व त्याचे दोन्ही नेत्र फोडण्यास त्यानें हुकुम केला. या हुकुमाप्रमाणें तेथल्या तेथेंच त्याचे डोळे काढून, लगेच त्यास कारागृहांत नेऊन घातलें! भरतखंड निस्तेज झालें!

---

## प्रकरण ३६ वें.

### उपसंहार.

ज्याप्रमाणें एखादी वैधव्यदग्ध सुंदर ललना, तिनें वस्त्रालंकारांचा, आनंदाचा, गर्वाचा, सुखाचा आणि वैभवाचा त्याग केला असतां, अत्यंत दीन, गरीब व निस्तेज दिसते; अथवा कृष्ण पक्षांतील चतुर्दशेच्या दिवशीं शशिलेखा कांतिहीन दिसते; त्याप्रमाणें शोभेचा सागर, विलासवैभवाचें स्थान, वाणिज्याचें अधिष्ठान, अशी जी दिल्ली ती आज अत्यंत निस्तेज दिसत आहे. आज तेथें दुंदुभीचा नाद व जयवाद्यांचा घोर घोष ऐकूं येत नाहीं. आज तिचा

सर्व थाट नष्ट झाला आहे. तेथील नागरिक जनांच्या नेत्रांतून अखंडित जलधारा वाहत आहेत, व ते अत्यंत संकटावस्थेंत आहेत. सारांश, ज्याप्रमाणें विधवा स्त्री सर्व ठिकाणीं अपमान, तिरस्कार, व दुःख पावते, त्याप्रमाणेंच आज दिल्ली नगरीची दशा झाली आहे.

शाहबुद्दीन घोरीनें जगताचा चंद्र आणि जयचंद्राचा शत्रु जो पृथुराज त्याचे नेत्र फोडल्यावर त्याची काय अवस्था झाली, याबद्दल इतिहासांत दोन तऱ्हेचे उल्लेख आढळतात. कर्नल टॉड आणि मुसलमान इतिहासकार यांचें असें ह्मणणें आहे कीं, त्याला तेथल्या तेथेंच—ठाणेश्वरीं—हाल हाल करून मारण्यांत आलें. महंमदानें आज्ञा करतांच चांडालांनीं त्याच्या अंगाचा एक एक तुकडा काढण्यास आरंभ केला. पण पृथुराजानें दुःखाचें यत्किंचितही चिन्ह दाखविलें नाहीं. उलट तो महंमदापेक्षांही विशेष आनंदी, प्रफुल्लित आणि सुखी दिसत होता. हें पाहून घोरीला अत्यंत क्रोध येऊन त्यानें त्याचे हात कापण्यास आज्ञा केली, व शेवटीं त्याचें डोकें उडविलें.

दुसऱ्या पक्षाचें असें ह्मणणें आहे कीं, पृथुराज कैद झाल्यावर चंदकवि त्याच्या मरणाविषयीं फार आतुर झाला; कारण महात्म्यांना अपमान हा मृत्यूपेक्षां-

ही दुःखदायक आहे अशी त्याची समजूत होती. यव-
नांपासून त्यास पीडा होऊं नये ह्मणून त्यानेंच त्याच्या
मृत्यूचा घाट जमवून आणिला. तो असा.

पृथुराजास कैद केल्यावर महंमद घोरी त्यास गि-
जनीस घेऊन गेला. तेथें गेल्यावर, त्याच्या अपार
शक्तीस भिऊन जाऊन त्यानें त्याच्या गळ्यांत एक
१०० मण वजनाची तोफ बांधली. ही खबर चंदक-
वीस लागतांच तो गिजनीस गेला, आणि आपल्या
वाक्चातुर्यानें महंमद घोरीस प्रसन्न करून, त्यानें
त्याच्याकडून पृथुराजास भेटण्याची परवानगी मिळ-
विली. पृथुराजास जेव्हां चंदकवि आपणास भेटावयास येत
आहे असें समजलें, तेव्हांच त्याच्या गळ्यांतील १००
मणाची तोफ त्यास हलकी वाटूं लागली, व त्या आ-
नंदाच्या भरांत तो एकदम उठून उभा राहिला. तें
पाहून शाहबुद्दीन घाबरला आणि त्यानें त्याच्या ग-
ळ्यांत आणखी एक ५० मणांची तोफ त्याच्या ग-
ळ्यांत बांधविली. पृथुराजास भेटल्यानंतर चंदकवि पुनः
महंमदाकडे गेला आणि ह्मणाला, "खुदाविंद, मी
माझ्या स्वामीचें दुःख कांहीं तरी कमी व्हावें ह्मणून
आलों होतों, पण उलट माझ्यामुळें तें अधिकच झालें
याचें मला फार वाईट वाटतें. तो अंध झाल्यावरही
आतां त्याच्यापासून कसलें भय आहे? सुलतान! पा-

हिजे तर त्यास देहान्त दंड द्या, पण त्यास पीडा करूं नका. तो फार चतुर आहे. आपण जर त्यास मोकळा सोडाल तर तो आपलें चातुर्य दाखवून तुह्मास प्रसन्न करील. हा आंधळा आहे तरी शब्दाच्या अनुरोधानें बाण मारील, आणि शंभर शंभर मण वजनाचे सात तवे एकाच बाणानें फोडून टाकील. हा तमाशा पहाण्याची आपली इच्छा असल्यास याला एक वेळ मोकळा करून पहा." शाहबुद्दीनाला हा तमाशा पाहण्याची फार इच्छा होऊन त्यानें चंदकवीच्या सांगण्यावरून त्यास उत्तम खुराक घालून आठ दिवसांत चागला तयार केला. नंतर एक दिवस तो तमाशा पाहण्याकरितां त्यानें सभा भरविली. पृथुराजास सभेंत आणल्यावर त्यानें त्याच्या हातांत अनेक धनुष्यें दिलीं, पण त्यांच्या दोऱ्या ओढतांच त्या सर्व तटातट तुटून जाऊं लागल्या. त्याच्या जोरापुढें कोणतेंच धनुष्य टिकेना. तें पाहून चंदकवि ह्मणाला, "त्याचें स्वतःचें धनुष्य त्यास मिळाल्याशिवाय त्याला तमाशा करून दाखवितां येणार नाहीं." तें ऐकून सुलतानानें त्याचें धनुष्य आणवून त्याच्याकडे दिलें. नंतर तो चंद कवीस ह्मणाला, "आतां आपण यास जेथून आवाज येईल तेथें बाण मारून तवे फोडण्यास आज्ञा करावी. चंद्रपति ह्मणाला, "खुदाविंद, मी याच्या वरचा नोकर.

हा माझा स्वामी—यास मी आज्ञा कशी करूं? आपणच त्यांस हुकुम करावा." नंतर सुलतानानें तव्यावर दगड मारून ह्मटलें, "पृथुराज होऊं द्या आतां." ह्याच वेळीं चंद कवि पूर्वसंकेताप्रमाणें ह्मणाला,

"चार बंस चोवीस गज, अंगुल अष्ट प्रमाण;
एतेपर सुलतान हे, मत चूके चव्हाण."

तत्क्षणीं पृथुराजानें शाहबुद्दीनाच्या शब्दावर नेम धरून बाण मारला, तो त्याच्या कपाळास लागून तो तात्काळ गतप्राण होऊन आसनावरून खालीं पडला. ह्याच वेळीं चंद्रपतीनें पृथुराजाच्या आणि पृथुराजानें चंद्रपतीच्या गळ्यावर तरवार फिरविली, व याप्रमाणें ते तिघेही एकदम मरण पावले. नंतर ह्या तिघांसही एकाच ठिकाणीं समाधिस्थ केलें. इंग्लंडांत रॉड्रिक आणि गॉथ व या देशांत नानासाहेब यांच्या मरणाविषयीं जशा काल्पनिक गप्पा चालतात, त्याचप्रमाणें पृथुराजाच्या मरणाविषयींही चालतात.

* * * *

देशद्रोही विजयसिंग, महायुद्ध पूर्ण झाल्यावर शाहबुद्दीनाच्या तंबूंत गेला. त्यावेळीं सुलतान सर्व सेनापतींस इनामें वांटीत होता. इनामें वांटून झाल्यावर विजयसिंगानें आपणास दिल्लीची गादी देण्याविषयीं त्याची प्रार्थना केली. तेव्हां तो अत्यंत क्रोधान्वित

होऊन ह्मणाला, "जो मनुष्य आपल्या देशाशीं, धर्माशीं, व स्वामीशीं निमकहरामी करतो, त्याला ठार मारणेंच योग्य. पण मी ह्मणूनच तुला जिवंत सोडतों. हें ऐकतांच विजय जागच्या जागींच थिजल्यासारखा झाला, त्याचें हृदय छिन्नभिन्न झालें, व त्यास अंगावर वीज पडल्याप्रमाणें होऊन गेलें. जो हेतु साधण्यासाठीं त्यानें दुष्कृत्य केलें होतें तो न साधल्यामुळें तो अगदीं वेड्यासारखा झाला. क्षणभर त्याला काय करावें हें सुचेना. तो मनांत ह्मणाला, "मी स्वार्थाला वश होऊन, निर्दय अप्रामाणिक, दंभी, अधर्मी म्लेंछांना ओळखलें नाहीं. हाय हाय! मी माझा नीच स्वार्थ तृप्त करण्याकारितां उपावतीचा घात केला, आणि यवनांच्या हातांत देश दिला! हे मृत्यो, तूं तरी आतां माझ्यावर कृपा कर!" याप्रमाणें विचार करीत असतां त्याला पूर्णपणें पश्चात्ताप झाला, आणि तो आपणास पाप्यांत पापी व मूर्खांत मूर्ख मानूं लागला. "स्वार्थपरायण होऊन मी कल्याणास वायाळ केलें! उपावतीचें सर्व सुख हरण केलें! निर्दोष गुलाबला दूषित केलें! अरे, मी किती चांडाळ! किती पापी!" इत्यादि दुःखद विचारांनीं त्याच्या मनांत कहर उसळून दिला. पण क्षणार्धांत त्याची चिंता आणि शोक दूर होऊन तो क्रोधांध झाला आणि म-

हंमद घोरीकडे पाहून ह्मणाला, "म्लेंछा! विश्वासघातक्या! मी अतिशय मूर्ख ह्मणूनच तुझ्यासारख्या अधम, पाखंडी, कृतघ्न चांडाळावर विश्वास ठेवला, आणि माझ्या देशाचें अकल्याण केलें! पण याद राख, मी त्याचा बदला घेईन!" विजयसिंगाचें हें रागाचें बोलणें ऐकतांच महंमदानें तावडतोब त्याच्या हातापायांत बिड्या ठोकल्या, व त्यास कैदेंत टाकलें. कैदखान्यांत झुरून झुरून तो पुष्कळ वर्षांनीं तेथेंच मरण पावला. त्याचा पिता युद्धांतच मरण पावला होता ह्मणून ठीक होतें; नाहीं तर पुत्राचा देशद्रोह पाहून त्यास अत्यंत संताप झाला असता.

* * * *

चंद्रकवि हा या भरतखंडांत एक अपूर्व पुरुष होऊन गेला. त्याचा जगद्विख्यात रासनामक ग्रंथ हें एक अलौकिक पुस्तक आहे. प्रभावती, शैलबाला, आणि करणसिंग यांस सोडल्यावर तो दिल्लीस जावयास निघाला. पण त्यास फार श्रम झाल्यामुळें तो तेथें वेळेवर जाऊन पोहोंचला नाहीं. मुसलमानाच्या भीतीमुळें त्यानें अगम्य मार्ग धरल्याकारणानें त्यास तेथें जाऊन पोंचण्यास फार दिवस लागले. तो दिल्लीस पोंचण्यापूर्वींच पृथुराज युद्धास निघून गेला होता. तो देवी आशापूर्णेच्या मंदिरांत दर्शनास गेला

असतां मंदिराचे दरवाजे एकदम बंद झाले, तेव्हां त्यानें सहा महिनेपर्यंत तेथेंच बसून 'पृथुराजरासा' हा ग्रंथ लिहिला अशी दंतकथा आहे. इंग्लंडांतील सर वॉल्टर स्कॉट व सर फिलिप सिडनेप्रमाणें चंद्र कवि काव्यांत अतिशयित निपुण होता. त्याचप्रमाणें तो युद्धांतही फार दूरदर्शी होता. त्याचें काव्य पृथुराजाची कीर्ति आणि शौर्य यांच्या वर्णनानें भरलेलें आहे. ज्याप्रमाणें सर्व आर्य लोकांस रामायण आदरणीय आहे त्याचप्रमाणें रजपुत लोकांस चंद कवि पूज्य आहे. रासांत कल्पनिक कथाप्रसंग फारच अल्प आहेत. त्यांत प्राकृत वृत्तांतच फार आहे. चंद कवीचा समग्र जीवनवृत्तांत मिळत नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. जेव्हां त्यास पृथुराज कैद झाला आहे असें समजलें, तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें तो गिजनीस गेला, व तेथें मरण पावला असें कित्येकांचें ह्मणणें आहे. पण दुसऱ्या इतिहासकारांस हें मान्य नाहीं. कारणवशात् त्याला युद्धास जातां आलें नाहीं. पण जेव्हां त्यानें दिल्लीश्वराचा पराजय झाला असें ऐकलें तेव्हां त्यास अत्यंत दुःख झालें. नंतर त्यानें अजमिरजवळच्या पर्वतावरील एका गुहेंत राहून पृथुराजाचा पराक्रम, रूप, महिमा, औदार्य आणि

शौर्य यांवर एक महाकाव्य रचिलें. कर्नल टॉडनें त्याच्या काव्याची फार प्रशंसा केली आहे.

* * * *

करणसिंग आणि शैलाबाला चितोडास जाऊन राहिलीं होतीं. जेव्हां कविचंद तेथें गेला तेव्हां त्यांचें लग्न झालें.

* * * *

विजयाच्या कपटजलांत सांपडलेली गुलाब उपावतीची उन्मत्तावस्था पाहतांच वेडी झाली होती, ती अजून सुधारली नव्हती. तिची ती स्थिति पाहून चंदकवीस फार शोक झाला. त्यानें दिल्लीहून परत जातांना तिला चितोड येथें आपल्याबरोबर नेलें, व ती बरी होण्याकरतां त्यानें पुष्कळ उपाय केले, परंतु भग्नहृदया गुलाबचें चित्त ठिकाणावर आलें नाहीं. नंतर तो तिला व प्रभावतीस बरोबर घेऊन अजमिरास आला, तेथें ती निर्दोष बाला थोड्याच दिवसांनीं परलोकवासी झाली.

* * * *

प्रभावती आपल्या पतीबरोबर राहून कवीच्या सेवेंतच कालक्रमणा करूं लागली. परंतु त्याचा शोक तिच्यानें कमी करवला नाहीं.